म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक गोविंद शंकरशास्त्री

पुस्तकाचें नांव नापोलियन बोनापार्ट

चरित्र

पन

93

चरित्र

९८७८

मुंबई इलाख्यांतील सरकारी विद्याशाळाखातें.

नापोलियन बोनापार्त

याचें

चरित्र

वासुदेव बालकृष्ण साप्रे.

इंग्रजीग्रन्थांच्या आधारानें

गोविन्द शङ्करशास्त्री वापट

यानीं

लिहिलें.

१००० प्रती

ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें

नोंदिली आहे.

मुंबई

गवर्नमेंत सेंत्रल बुक दिपो.

१८७८ इ०

सर्व अधिकार सरकारानें आपलेकडे ठेविले आहेत.

किंमत एक रुपया.

मुंबईमध्यें.

गणपत रुष्णाजीचे छापखान्याचे मालक,

आत्माराम कान्होबा यांणीं छापिलें.

सूचना.

इंग्रजीभाषेच्या लिपींत एका वर्णाचे अनेक उच्चार करतात, एकच उच्चार अनेकवर्णानीं दाखवितात, कित्येक शब्दांत कांही वर्ण मुके असतात ह्मणजे ते कागदावर ल्याहावयाचे मात्र परंतु बोलण्याच्या वेळेस त्यांचा उच्चार करावयाचा नाहीं; असा घोंटाळा असल्यामुळें युरोपखण्डांतील पुरुषांची व स्थलांची वगैरे विशेषनामें महाराष्ट्रभाषेंत लिहिण्याच्या वेळेस संशय उत्पन्न होतो. लिखित श-
ब्दावरून उच्चार होईल तो मराठींत ल्याहावा असें कित्येकांचें मत आहे, कित्येक ह्मणतात कीं, तिकडील लोक भाषणकालीं जसा उच्चा-
र करीत असतील तसा ल्याहावा. या दोन्ही प्रकारांचें सर्वांशीं अवलंबन करतां येत नाहीं. लिखित वर्णांचा उच्चार होईल त्याप्रमाणें मराठीं-
त शब्द ल्याहावा तर मूळच्या उच्चाराशीं अगदींच विसदृश उच्चार होऊन तो कधीं कधीं फारच कर्णकटु होतो. तिकडील लोकांच्या भाषण संप्रदायाप्रमाणें मराठींत शब्द लिहिण्याची अडचणच; कारण, तिकडेही देश भेदानें व प्रांत भेदानें एकाच शब्दाचे अनेक उच्चार होतात, असें तिकडील लोक सांगतात. यामुळेंच वरील दोन्ही प्रकारां-
चा मराठी ग्रन्थकर्त्यानीं अवलंब केला आहे, तोच प्रघात येथें ठेविला आहे. केवळ महाराष्ट्रभाषाभिज्ञ वाचणारांनीं अशाप्रकारच्या नांवा-
चा एक मनुष्य होता असें धरून चाललें पाहिजे, याखेरीज मूळच्या-
नांवाचा खरा उच्चार कळण्यास मार्ग नाहीं. इंग्लिश पुस्तकांतही अ-
साच घोंटाळा आहे. हिंदुस्थान, ग्रीस, इताली, चीन, वगैरे देशांच्या प्राचीन इतिहासांवर इंग्लिशभाषेंत ग्रन्थ झाले आहेत त्यांत ग्रन्थका-
रांच्या मनास वाटेल त्याप्रमाणें एकच विशेष नाम अनेक प्रकारांनीं लिहिलेलें आढळतें, त्यामुळें त्या शब्दाचा मूळचा उच्चार काय होता याचा निर्णय होत नाहीं. या गोष्टीस उपाय नसल्यामुळें अशा प्रका-

रच्या नांवाचा एक मनुष्य होता असें समजून वाचक निर्वाह करितात.

या पुस्तकास इंग्रजींत 'लाकूहार्त' यानें लिहिलेलें 'नापोलियन बोनापार्ताचें चरित्र' या ग्रन्थाचा मुख्य आधार आहे. याशिवाय दुसऱ्या ग्रन्थांतूनही बराच मजकूर घेतला आहे.

अहमदनगर
तारीख १५ अकटोबर
सन् १८७६

गो० शं० शा० बा०

»book M
W'ai
☆Date

अनुक्रमणिका.

V.N.GODBOLE
M. A.

भाग १

पत्र

उपोद्घात १-४

भाग २

जन्म—बालपणा-विद्याभ्यास—सैन्यांत चाकरीस रहाणें ४-१२

भाग ३

फ्रान्स देशांतील राज्यक्रांति १२-४३

भाग ४

कोर्सिका वेटांत लढाईस जाणें—तूलो येथील पराक्रम—तुरुंगांत पडणें—तुरुंगांतील स्थिति—सुटका—दारिद्र्य—पारिस येथील बंड—सैन्यांत पुनः जागा मिळणें—जोसेफाईन—इताली देशांत जाणें. ४३-५२

भाग ५

सैन्यास उत्तेजन येण्याकरितां भाषण—शत्रूंवर हल्ला करण्याचा बेत—मार्गाची योजना—शत्रूंचा पराभव—मर्मूसर याबरोबर पुनः युद्ध-अस्त्रियन लोकांचा पराभव-त्यांशीं व इताली देशांतील इतर संस्थानांशीं तह—लोदी आकौला—खंडणी—चित्रें व पुतळे—औदार्य—राज्याधिकाऱ्यांचा हेवा—बोरीन. ५२-६८

भाग ६

आस्त्रियाशीं तह—फ्रान्स देशांतील अधिकाऱ्यांस भेटीक—जोसेफाईन इताली देशांत आली—रास्तद् येथें नेपोलियन जातो—पारिस येथें पोहोंचला—तेथील स-

पत्र ७६

आरंभ—इंग्लंदावर स्वारी करण्याचा बेत—मिसर देशावर स्वारीची तूलो येथें तयारी.....६८

भाग ७

तूलो येथून गलबतें हांकारलीं–मिसर देशांत फ्रेंच लोकांचा प्रवेश–अलेक्झांद्रिया शहर घेतलें–तेथील लोकांशीं नापोलियन याचें वर्तन–केरो शहरास नापोलियन जातो–फ्रेंच लोकांचे हाल–मुसलमान लोकांशीं युद्ध–पिरमिड् या इमारतींजवळ लढाई–मुसलमानांचा पराभव–केरो शहर फ्रेंचांनीं घेतलें–आबुकीर येथील लढाई–फ्रेंच लोकांचा पराभव–मिसर देशांतील राज्यव्यवस्था–नापोलियन तांबड्या समुद्राकडे गेला–त्यानें हिंदुस्थानांत टिपूसुलतानास पत्र पाठविलें–सिरिया देशावर हल्ला–गाझा शहर घेतलें–जाफा येथील लढाई–तेथील कत्तल–एक्कर येथील पराभव–केरो येथें परत जाणें–अबुकीर येथील मोठें युद्ध–नापोलियन फ्रान्स देशीं परत जातो.....७-९

भाग ८.

पारिस येथें नापोयिन याचा सत्कार–जोसेफाईन–राज्यकारभारांत प्रवेश–लोकसत्ताकराज्याचा शेवट–नापोलियन यानें उत्तम राज्यव्यवस्था केली.....२-१

भाग ९

नापोलियन इंग्लंदच्या राजास पत्र पाठवितो–इंग्लंदच्या राजाचें उत्तर–आस्त्रियाशीं पुनः लढाई–आल्प्स् पर्वतांतून जाणें–चातिल्लोन, सेन्त्बार्द, इत्यादि ठिकाणीं युद्धें–आस्त्रियन लोकांचा पराभव–बोर्बोन राजघराण्यांतील पुरुषांची खटपट–नापोलियन यास मारण्याविषयीं जाकोबिन लोकांचा बेत–नापोलियन याची राज्यपद स्वीकार-

पत्रें

प्याची खेटपेंद-आस्त्रियाशीं तह-इंग्लंदाचा पराभव कर-
प्याचा बेत-एमिन्सू एथील तह.....१०६-१२१

भाग १०

इंग्लिश लोकांस फ्रान्स देशास जाण्याची मोकळी-क-नापोलियन याची राज्यव्यवस्था-धर्मस्थापना-विद्या-वृद्धि-कायदे-नापोलियन इताली देशांतील मुखत्यारांच्या सभेचा अध्यक्ष होतो-फ्रान्स देशांत राज्य चालविण्याचा ताहाहयात अधिकार-स्वित्सर्लंद-सेंत दोमिंगो-पेलूतिअर-एमिन्सू येथील तह मोडणें-इंग्लंदावर स्वारी करण्याचा बेत-ब्यूक दी एंधिन-नापोलियन फ्रान्स देशाचा बादशाहा व इताली देशाचा राजा झाला.....१२१-१४१

भाग ११

इंग्लंदच्या राजास नापोलियन याचें पत्र-त्याचें उत्तर-रशिया, स्वीदन, इंग्लंद, आस्त्रिया, यांचा फ्रान्स देशाशीं युद्ध करण्याचा बेत-अल्म, त्राफल्गार, व्हिएना, अस्तरलित्झ,-आस्त्रियाचा पराभव-तह-प्रुशियाशीं लढाई-त्याचा पराभव-बर्लिन-इंग्लंदचा व्यापार मोडण्याचा नापोलियन याचा बेत-रशियन लोकांशीं लढाई-पोलंद-पुलूतस्क ईलो-फ्रान्स व रशिया यांचा तह....१४१-१५३

भाग १२

नापोलियन पारिस येथें परत आला-इंग्लिशलोक देन्मार्कच्या लोकांचा पराभव करितात-नापोलियन राज्याची आणखी सुधारणा करितो-फौजेंत लोक भरण्याविषयीं कायदा-इंग्लंदाचा व्यापार-युरोप खंडांत बंड करण्याचा आणखी यत्न-स्पेन, पोर्तुगाल, व आस्त्रिया, यांशीं लढाया-व्हिएना व रोम हीं शहरें घेतलीं-आस्त्रियाशीं तह.....१५३-१७०

भाग १३

जोसेफाईन हिचा घटस्फोट–आस्त्रियाच्या बादशाहाच्या मुलीशीं लग्न–लुईस बोनापार्त यास नापोलियन पदच्युत करतो–हालंद देश व जर्मनींतील कित्येक प्रांत फ्रान्स देशाच्या राज्यास जोडितो–स्वीदन देश–बर्नादोत्ते–पुत्रलाभ–इंग्लंदाशीं तह करण्याचा बेत–लोकांचा असंतोष–रशियाचा बादशाहा लढाईची तयारी करितो–नापोलियन रशियावर स्वारी करितो.....१७०–१८५

भाग १४

रशियावर स्वारी आणि पराभव.....१८६–२००

भाग १५

नापोलियन फौज तयार करितो–प्रुशिया व रशिया लढाईस तयार होतात–लत्झन् व वात्झन् येथील युद्ध–तह करण्याच्या उद्देशानें कांहीं दिवस युद्ध बंद–नापोलियनचा हट्ट–पुनः लढाईची सुरवात–देस्दन् शहराजवळील युद्ध–फ्रेंच लोकांचा पराजय–लिप्सिग येथील संग्राम–नापोलियन यास लोक प्रतिकूळ होतात–शत्रूंची पारिस शहरावर चाल–नापोलियन पुढें लढाईस जातो–ब्रेनीशहराजवळ लढाई–शत्रूंनीं पारिस शहर घेतलें–नापोलियन पदच्युत झाला–अठरावा लुई गादीवर बसला–नापोलियन यास एल्बा बेटाचें राज्य मिळालें.....२००–२३१

भाग १६

नापोलियन एल्बा बेटांत जातो–फ्रान्स देशांत परत येतो–पुनः गादीवर बसतो–युरोपांतील राजांशीं पुनः लढाई–वातर्लु.....२३१–२५०

५ ८१.९३

पत्र

भाग १७

नापोलियन यानें पुनः गादीच्या हक्काचा राजीनामा दिला-तो पारिस येथून माल्मेसन् येथें गेला.-फोके याचा विश्वासघात-नापोलियन याचा अमेरिकेंत जाण्याचा बेत-शत्रु पारिस शहरांत आले-नापोलियन इंग्लिश लोकांस शरण जातो-तो त्यांच्या गलबतावर जातो-त्यांनीं त्यास आपल्या गलबतावर नेलें-नापोलियन यास इंग्लिश लोकांचा सेंतहिलीना येथें पाठविण्याचा ठराव-त्यास सेंतहिलीना येथें नेलें-तेथील वर्तनक्रम-क्षीणत्व-मृत्यु-ग्रंथसमाप्ति. २५०-२७४

नापोलियन बोनापार्तचें चरित्र.

भाग १ ला.

उपोद्घात.

पराक्रमी पुरुषाचें चरित्र वाचल्यापासून बहुत उपयोग, आहेत, त्यांपैकीं मनोरंजन हा एक केवळ सामान्य उपयोग होय. याशिवाय दुसरे उपयोग त्यापासून होतात ते फारच मोठे आहेत. ज्ञान व चातुर्य या गोष्टी मनुष्यास बहुशः दुसऱ्यापासून शिकून प्राप्त होतात. यामुळें ज्यांचे बाप वगैरे आप्त चांगले असतात ते बहुशः आपल्या बडिलांप्रमाणें होतात. आप्त, गुरु, इत्यादिकांचें सान्निध्य मनुष्यास चांगुलपणा आणण्यास जसें अंशतः कारण होतें, तसेंच थोर पुरुषांच्या चरित्रांच्या वाचनापासून मनुष्याच्या अंगीं पुष्कळ चांगले गुण येतात. याकरितां थोर पुरुषांचीं चरित्रें वाचावयाचा प्रघात प्राचीन काळापासून सर्व राष्ट्रांत आहे.

थोर पुरुषांनीं ज्ञान कसें संपादिलें व पराक्रम कसे केले, हें कळणें मनुष्यास थोरपणा प्राप्त करून घेण्यास जसें उपयोगी आहे, तसेंच ज्या पराक्रमी पुरुषांच्या हातून कित्येक अशा मोठमोठ्या चुका झाल्या कीं, ज्यांच्या योगानें त्यांच्या सर्व महत्कृत्यांवर पाणी पडलें; व ज्या चुका झाल्या नसत्या तर त्यांचा लौकिक आज वेगळ्या प्रकारचा असता, अशा चुका कळल्यापासूनही मोठा फायदा आहे. कारण यत्न केला असतां मनुष्यास त्या टाळितां येतील. तसेंच ज्या पुरुषाचा वृत्तांत या पुस्तकांत लिहिला आहे, त्याच्या उदाहरणावरून कळेल कीं, ईश्वरावर भरंवसा ठेवून सदाचरणानें वागलें नाहीं तर विशाल बुद्धि, विशाल ज्ञान, हीं सर्व मनुष्यास अधःपातास नेण्यास कारण होतात. तसेंच आपणहीही लक्षांत येईल कीं, परमेश्वरानें

दिलेल्या ऐश्वर्यांत संतुष्ट नसून मनुष्य जर अतितृष्णा धरूं लागला तर त्याचें मूळचें ऐश्वर्यसुद्धां नाहींसें होतें.

आजपर्यंत युरोपखंडांत बहुत विजयी पुरुष झाले, त्या सर्वांत **शिकंदर** बादशाहा **जूलियस्सीझर**, व **नापोलियन् बोनापार्त** हे सर्वांत मोठे असें लोक मानितात. तिघेही विलक्षण बुद्धिमान्, आणि विलक्षण पराक्रमी, असे असून तिघांचा परिणाम फार वाईट झाला. आज दोन हजार वर्षें ज्याच्या तत्वज्ञानास लोक माना डोलवीत आहेत, असा महापंडित जो आरिस्तातल्, त्याचा पट्ट शिष्य **शिकंदर** बादशाहा, पराक्रमी बापाचा पुत्र, आणि स्वत:ही महा पराक्रमी. असा असून ईश्वरानें दिलेल्या एवढ्या मोठ्या राज्यसंपत्तीनें तृप्त न होतां, राज्य वृद्धीच्या लोभानें नेहमीं परदेशावर हल्ले करून विजय मिळवूं लागला. जसें काय लढाईशिवाय त्यास चैनपडेना ! शेवटीं स्वदेशापासून फारदूर मृत्यु पावला. त्यामुळें शौर्याशिवाय शांततेंत प्रसिद्धीस येणारे त्याचे इतर सर्व गुण असून नसल्यासारखे झाले; त्र मरणानंतर पितापुत्रांनीं संपादित केलेल्या एवढ्या थोरल्या राज्यांत बखेडे होऊन दुर्दशा झाली.

जूलियस्सीझर याची गोष्ट यापेक्षां वाईट झाली. त्यानें पहिल्यापासून बुद्धि, व पराक्रमानें मोठमोठीं कृत्यें करून स्वदेशांतील लोकांची प्रीति संपादिली आणि कित्येक दूरचे देश काबीज करून रोमच्या राज्यास जोडिले. असें असतां जेव्हां याच्या मनांत अतिलोभ उत्पन्न झाला, तेव्हां जे लोक यास आपला हितकर्ता समजत होते, त्यांनींच भरसभेंत याचा वध केला. शिवशिव ! काय हा लोभ व असंतोष यांचा परिणाम !

नापोलियनबोनापार्त याचा परिणाम तर याहीपेक्षां वाईट झाला असें म्हटलें तरी चालेल. कारण वर सांगितलेले दोन्ही पुरुष मोठ्या कुळांतले गर्भश्रीमान् असून त्यांची जिवंतपणीं शत्रूंच्या हातून फजिती झाली नाहीं. नापोलियनबोनापार्त लहानशा बेटांत गरीब आईबापांपासून जन्मलेला असून सर्व युरोपखंडांत जो श्रेष्ठ देश त्याचें सार्व

भौमत्व त्यास प्राप्त झालें. मोठमोठे राजेही त्यास नमत होते. रोम येथील धर्माध्यक्षही त्याचे मुठींत आला होता. असें असून एवढ्या ऐश्वर्यानें तृप्त नव्होतां अतितृष्णा करून पदभ्रष्ट होऊन शत्रूंच्या हातीं लागून त्यांच्या कैदेंत पुष्कळ वर्षें राहून मरण पावला. तेव्हां 'अतितृष्णा न कर्तव्या चक्रंपततिमस्तके' यावाक्याचें उत्तम उदाहरण नापोलियनबोनापार्त आहे, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

नापोलियन बोनापार्तांचें चरित्र लिहिण्याचा आणखी एक विशेष उद्देश आहे तो असा. पांच हजार कोसांवरून येऊन अनेक दुःखें सोसून ज्या पराक्रमी पुरुषांनीं, भोज विक्रमादि राजांसही जें प्राप्त झालें नव्हतें तें भरत भूमीचें साम्राज्य संपादिलें, त्यांच्या देशांतील लोकांच्या पराक्रमाचें वर्णन यांत सहज होतें. अलंकारशास्त्रांत वर्णनाचे दोनप्रकार सांगितले आहेत. एक साक्षात् राजाचें वैभव, पराक्रम, इत्यादिकांचें वर्णन करावें; अथवा शत्रूंचें पुष्कळ वर्णन करून त्यांसही जिंकणारा असें म्हणावें म्हणजे सहज वर्णनीयाचें वर्णन होतें. तीच गोष्ट येथें लागू आहे. ज्या महा पराक्रमी पुरुषानें सर्व युरोपखंड पादाक्रांत करून टाकिलें होतें, व ज्याची ग्रेटब्रिटन देश जिंकण्याविषयीं उत्कट इच्छा होती, त्याचे पायही ज्यांनीं आपल्या देशाच्या किनाऱ्यावर लागूं दिले नाहींत, त्यांच्या स्वदेशप्रीतीस उपमा कोणत्या देशांतील लोकांची देतां येईल ?

आजपर्यंत जगांत याप्रकारच्या दोनच गोष्टी घडल्या. प्राचीनकाळीं हानिबाल म्हणून रोमन लोकांच्या राज्याच्या वेळेस महावीर होऊन गेला. आजपर्यंत यासारखे शूर व युद्धकलाकुशल पुरुष जगांत फारच थोडे झाले. शत्रूंनीं त्याचा विध्वंस केला असतांही त्याच्या कीर्तीचा झेंडा आजपर्यंत सारखा जगांत फडफडत आहे. अशा वीराशीं टक्कर देतां देतां रोमन लोकांसहि वाटलें होतें कीं, या वीरश्रीच्या जिवलगापुढें आपलें कांहीं चालावयाचें नाहीं. तथापि त्यांनीं धीर न सोडितां मारूं किंवा मरूं असा दृढ निश्चय करून आपल्या देशाचें रक्षण केलें. अशीच नापोलियनबोनापार्त व इंग्लंद यांची गोष्ट

आहे. ज्यानें लहान मोठे युरोपांतील सर्व देश जिंकले व ज्यास इं-ग्लंद देश जिंकणें झणजे फार कठिण आहे असें त्यावेळेस कोणास वाटत नव्हतें; त्याच्या पायांचा विटाळ इंग्लिश लोकांनीं आपल्या भुमीस होऊं दिला नाहीं, या गोष्टीस त्या लोकांची विलक्षण स्वदेशप्रीति हेंच कारण झटलें पाहिजे. नाहीं तर फ्रेंच लोक झणजे त्यांपेक्षां कमीशूर होते असें नाहीं. नापोलियन यानें जिंकलेले देश हल्लीं स्वतंत्र आहेत; तसा इंग्लंद देशही त्यानें जिंकिला असता तरी आज स्वतंत्र असता परंतु नापोलियनासारख्या शत्रूपुढें क्षणमात्रही नम्र न-होण्याची जी कीर्ति इंग्लंदास आहे ती युरोपांतील दुसऱ्या कोणत्याही देशास नाहीं. ही इंग्लिश लोकांची कीर्ति अक्षय राहील.

भाग २ रा.

नापोलियन बोनापार्त कोर्सिका बेटांत अजेशिओ या शहरीं ता० १५ आगष्ट सन १७६९ यावर्षी जन्मला. त्याचा बाप चार्लस बो नापार्त हा तेथें वकील होता. त्याची तेथें बरीच प्रसिद्धि होती. नापोलियन याची आई लिटीशिआ रामोलिनी ही फार बुद्धिमान्, र्यवान्, चतुर, व पराक्रमी बायको होती. तिचे बहुतेक गुण या लामध्यें उतरले होते. कोर्सिका बेटांतील लोक अपणावरचें फ्रेंच लोक च्या अमलाचें जूं फेंकून देऊन स्वतंत्र होण्यास झटत होते, त्या ळेस ज्या लढाया झाल्या; त्यांतही नवऱ्याबरोबर रणांगणांत जा असे. हिच्या तिसाव्या वर्षी हिचा नवरा वारला, तोंपर्यंत हिर तेरा मुलें झालीं. पैकीं पांच लहानपणींच मेलीं. बाकी राहिलेल्य पैकीं वडील मुलगा जोजेफ यास पुढें नापोलियन यानें स्पेन देशाच्य गादीवर बसविलें. दुसरा मुलगा नापोलियन. बाकी तीन मुलांचीं नांवें लुशिअन, लुईस आणि जेरोम, अशीं होतीं. शिवाय तीन मुली होत्या त्यांची नावें इलिझा, कागेलाईन आणि पालाईन अशीं होतीं.

पुढें नापोलियन वैभवास चढला, त्यावेळेस पुष्कळ आजंवी लोक, नापोलियन, परंपरेनें राजवंशापासून उत्पन्न झाला आहे अशी वंशावळीची माहिती सांगत असत, परंतु हें त्यास अगदीं आवडत नसे. तो ह्मणे मांतीनाती येथें जो मीं प्रथम जय मिळविला तोच माझ्या मोठेपणाचा आरंभ होय. पुढें नापोलियन यानें आस्त्रियाच्या बादशाहाच्या कन्येशीं लग्न केलें; तेव्हां एके समयीं त्याचा सासराही आपले पूर्वज मोठे होते अशा अर्थाचें भाषण करीत होता. तेव्हां नापोलियन ह्मणाला 'माझ्या वंशाचा रोदोल्फ मीच आहें.' रोदोल्फ हा आस्त्रियाच्या बादशाही वंशाचा स्थापन करणारा मूळ पुरुष होता.

नापोलियन याच्या लहानपणच्या पुष्कळ गोष्टी प्रसिद्ध आहेत. त्याची लहानपणची आवडती खेळावयाची वस्तु एक पितळेची तोफ होती. समुद्रकांठीं एक लहानशी गुहा होती; तेथें तो पुष्कळ वेळां एकटाच जाऊन विचार करीत बसतअसे. तो लहानपणापासून मातोश्रीस फार मान देत असे, व तीविषयीं मोठी कृतज्ञता मनांत बाळगीत असे. तो ह्मणे तिच्या शहाणपणाच्या व चातुर्याच्या वागविण्यामुळेंच माझ्या अंगांतं शौर्यादि गुण उत्पन्न झालें आहेत. तो खात्रीनें ह्मणे कीं, मूल चांगलें किंवा वाईट निघणें हें आईच्या स्वभावावर व वागविण्यावर आहे. सेन्तहिलीना येथें असतां त्यानें आपल्या लहानपणाविषयीं असें ह्मटलें आहे कीं, 'मी लहानपणीं फार हट्टी होतों. मला कोणाचें भय वाटत नसे. मी भांडखोर व खोडकर असें. याला मार, त्याला चिमटे घे, असें मी लहानपणीं करीत असें. तेणेंकरून घरांतील सर्व माणसांस माझें भय वाटे. माझी आई मात्र मला मोठ्या काळजीनें जपत असे. ती मला कोणतीही हलकट गोष्ट करूं देत नसे. जेणेंकरून मन मोठें आणि उदार होईल असें मुलाचें वर्तन असण्याविषयीं ती फार जपे. तिला खोटसाळपणाचा तिटकारा असे. कोणीं हुकूम मोडला तर ती फारच संतापे. तिनें कोणत्याही अपराधावद्दल मुलांची क्षमा केली नाहीं.'

कित्येक धर्मनिष्ठ ग्रंथकारांचें असें ह्मणणें आहे कीं, असें उ-

त्तम शिक्षण असतां नापोलियन याच्या अंगांत महत्वाकांक्षादि जे दोष उत्पन्न झाले त्याचें कारण हें कीं, त्यास इतर शिक्षणाप्रमाणें धर्माचें शिक्षण लहानपणीं मिळालें नाहीं. ही गोष्ट कांहीं अंशीं खरी आहे, कारण धर्माच्या शिक्षणास बाळपण हा उत्तम काल होयः असो. नापोलियन याची बुद्धिमत्ता लोकांस लहानपणापासून कळूं लागली. त्याच्या आप्तांपैकीं एक संभावित वृद्ध मनुष्य होता. तो मरूं लांगला तेव्हां या सर्व भावंडांस जवळ बोलावून ह्मणाला 'जोजेफ तूं वडील आहेस खरा पण कुटुंबाचा मुख्य नापोलियन होईल यांत संशय नाहीं. हें माझें बोलणें ध्यानांत ठेव.' हे शब्द नापोलियन कधीं विसरला नाहीं.

नापोलियन लहानपणापासून बोलण्यांतही मोठा हुशार होता. एके दिवशीं एका बागेंतील कांहीं अंजीर त्यानें घेतले, तेव्हां बागेच्या धन्यानें तुझ्या आईला सांगतों असें भय घालून त्याचा हात धरिला. तेव्हां नापोलियन असें कांहीं त्याला बोलला कीं, त्यानें लागलींच त्यास सोडून दिलें..

फ्रान्स देशांत पूर्वीपासून युद्धकला शिकणें हें मोठें भूषण आहे असें मानितात. ह्यामुळें नापोलियन याच्या बापानें त्यास ब्रिनी येथील युद्धकला शिकण्याच्या शाळेंत पाठविलें. नापोलियन हा मोठेपणीं सांगत असे कीं, शाळेंत जाण्याकरितां फ्रान्स देशास जावयास निघालों त्यावेळेस मला आईच्या वियोगाचें फारच दुःख झालें. ब्रिनी येथील विद्यालयांतील विद्यार्थ्यांची चांगली सोय नव्हती; तरी तेथें राहण्यास नापोलियन यास फार आवडत असे. तो फ्रान्स देशाचा बादशहा झाल्यावर सुद्धां असें म्हणे कीं, मी ब्रिनी येथें सुखी होतों. शाळेंत आला तेव्हां नापोलियन यास इताली देशांतील मात्र भाषा येत होती. कारण त्यावेळेस कोर्सिका बेट फ्रान्स देशास जोडून थोडीं वर्षें झालीं होतीं. परंतु पुढें तो लौकरच फ्रेंच भाषेंत निपुण झाला. तो पहिल्यानें ब्रिनी येथें आला तेव्हां अगदीं मितभाषी व एकलकोंडा होता. त्यास फ्रेंच भाषा चांगली येत नव्हती, हें या गोष्टीचें कारण

असावें, असें कित्येक म्हणतात. नापोलियन गरीब असल्यामुळें त्याच्याशीं तेथील विद्यार्थी उद्धटपणाची वागणूक करीत, त्यामुळें त्यास त्यांचा तिटकारा येत असे. हा लातिन भाषा वगैरे पुष्कळ विषय शिकत असे; तरी युद्ध कलेस उपयोगी अशा विषयांत याची फारच हुषारी असे. गणितशास्त्र शिकविणाऱ्या गुरूस तो फारच आवडत असे. नापोलियन फारच रागीट असे. एकेदिवशीं एका गुरूनें त्यास कांहींएका अपराधावद्दल लहानशी शिक्षा केली. त्या अपमानामुळें त्यास इतकें वाईट वाटलें कीं, तो ओकून बेशुद्ध झाला. तेव्हां इतक्यांत तेथें गणितशास्त्राचा गुरू आला. त्यानें सांगितलें कीं, याचा स्वभाव अद्याप लोकांस कळला नाहीं. असें म्हणून त्यानें त्यास शांत केलें. कोर्सिका बेट फ्रेंच लोकांनीं आपल्या राज्यास जोडिलें त्यावेळेस तेथील प्रसिद्ध व पराक्रमी पुरुष **पओली** यानें स्वदेशप्रीति धरून स्वतंत्र होण्याविषयीं फार यत्न केला, परंतु तो व्यर्थ गेला. एकदां त्याविषयीं कांहीं निंदेचें भाषण शाळेचा मुख्य अधिकारी बोलला, तेव्हां नापोलियन यास राग येऊन तो म्हणाला कीं 'तो मोठा मनुष्य होता, त्याची स्वदेशावर फार प्रीति असे. माझा बाप त्याच्या हातारवालचा असून त्यानें त्याचा पक्ष सोडिला, हें फारच वाईट केलें'. या शाळेंत असतां **बोरीन** या नांवाच्या मुलाशीं त्याचा फार स्नेह जमला. हाच पुढें त्याचा खाजगीकडील कारकून झाला. यानें नापोलियन याचें चरित्र लिहिलें आहे. **पिचेग्रू** म्हणून या शाळेंत एक नापोलियन याचा शिक्षक होता. हा पुढें नापोलियन याच्या विरुद्ध कट झाला त्यांत मुख्य होता. नापोलियन याचें धैर्य व दृढनिश्चय याविषयीं याची इतकी खातरी होती कीं, पुढें फ्रान्स देशांत बोर्बोन वंशाच्या राजघराण्यास पदच्युत करण्याकरतां लोकांनीं बंड केलें, त्या वेळेस नापोलियन यास राजाच्या पक्षास मिळवून घेण्याविषयीं यत्न करण्यास त्यास कोणीं सांगितलें तेव्हां तो म्हणाला 'या गोष्टीचा यत्न करणें व्यर्थ आहे. मला लहानपणापासून त्याचा स्वभाव माहीत आहे. तो ज्या पक्षास मिळाला त्यास कधीं सोडणार नाहीं'.

एके वेळीं त्या शाळेपासून जवळच एका खेडेगांवांत कांहीं मौज होती ती पाहण्यास जावें असें तेथील कित्येक विद्यार्थी व नापोलियन यांच्या मनांत आलें. शिक्षक लोकांनीं तर तेथें जाण्याची मनाई केली होती. तेव्हां नापोलियन यानें शाळेजवळ वाग होता त्याचे पाठीमागें भित होती तिला असें युक्तीनें भोंक पाडिलें कीं, सर्व मुलें कोणास न समजतां बाहेर गेलीं. हें पाहून तेथील लोकांस मोठें आश्चर्य वाटलें. नापोलियन यास लहानपणापासून युद्धाची आवड असे. त्याचे खेळ सुद्धां सर्व लढाईसारखे असत. एकदां त्यानें शाळेंतील मुलांच्या टो ळ्याकरून आपण मुख्य होऊन पंधरा दिवस खोटी लढाई चालविली तींत शत्रूला वेढा घालणें, हल्ला करणें, वगैरे कामांत त्यानें पुष्कळ यु क्ति दाखविल्या. शाळेस सुटी असतांना नापोलियन एकवेळ कोर्सि का बेटांत गेला होता. तेथें तो प्रख्यात शूर पओली यास वारंवार भेटे. पओली यासही तो फार आवडे. तो म्हणे 'नापोलियन, तूं आलीकडील वीरांसारखा नव्हस. *प्लुयूतार्क यानें ज्या वीरांचीं चरित्रें लिहिलीं आहेत त्यांसारखा तूं आहेस'.

नापोलियन यास पंधरावें वर्ष लागलें नाहीं तोंच ब्रिनी येथून पारिस येथील प्रसिद्ध युद्धशाळेंत पाठविलें, हें त्यास मोठें भूषणप्रद झालें. त्याच्या गुणांविषयीं ब्रिनी येथील त्याच्या शिक्षकांनीं लिहिलेला लेख फार उत्तम आहे. त्यांत त्यांनीं असें लिहिलें कीं, नापोलियन शरीरानें दृढ असून निरोगी आहे. वर्तणूक चांगली, स्वभाव गरीब. धीट, व कृतज्ञ, नियमितपणा मोठा, गणितामध्यें फारच हुशारी, इति हास भूगोलाचें बरेंच ज्ञान, लातिन भाषेचें ज्ञान साधारण, समुद्रावरील आरमारावर हा उत्तम कामगार होईल. हा पारिस येथील शाळेंत जाण्यास योग्य आहे'.

पारिस येथील शाळेंत फ्रान्स देशांतील श्रीमंत सरदारांचीं मुलें होतीं. तीं खुशाल मौजाकरीत पण हें नापोलियन यास आवडत

* हा एक प्राचीन नामांकित ग्रन्थकार होता. याने ग्रीस्देशांतील प्रसिद्ध पुरुषांची चरित्रें फारच मनोवेधक रीतीनें लिहिलीं आहेत.

नसे. हा जात्या मोठा नियमित असून दुसऱ्यांच्या नादीं लागणारा नव्हता. दुसरा साधारण गरीब तर श्रीमंत मुलांच्या नादीं लागून कर्धांच बिघडला असता. तसें न होतां उलट असें झालें कीं, त्यानें शाळेच्या अधिकाऱ्यांस स्वतः एक अर्ज केला, त्यांत त्यानें असें सुचविलें कीं, येथील विद्यार्थ्यांचें वागणें शिपायीपणास अगदीं प्रतिकूळ आहे. यांस साधें अन्नमात्र द्यावें. व यांस कोणी चाकर, हुजऱ्या वगैरे असूंनये. स्वतःचे कपडे स्वच्छ ठेवणें वगैरे आवश्यक काम ज्याचें त्यानें करावें. या अर्जाचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तथापि नापोलियन याचा दृढ निश्चय, व नियमितपणा इत्यादि गोष्टी लोकांनीं शिकण्यासारख्या त्याच्या अंगीं पूर्णपणें होत्या असें स्पष्टपणें दिसून येतें.

सतरा वर्षें पुरीं झाल्यावर नापोलियन याचें शिक्षण संपून त्यानें शाळा सोडिली. या संधीसच त्याचा बाप चाळपुळी होऊन मरण पावला. याच रोगानें पुढें नापोलियन याचा शेवट झाला. शाळेंत असतांना नापोलियन हा विलक्षण बुद्धिमान् आहे असें त्याच्या सर्व शिक्षकांस माहीत होतें, त्यावरून हा मोठ्या पदास खचित चढेल असें त्यांनीं भविष्य केलें होतें. नापोलियन याच्या चरित्रामध्यें ज्या कित्येक चांगल्या गोष्टी आहेत, त्यांपैकीं ही एक आहे कीं ज्यांच्या शिक्षणापासून त्यास ज्ञान प्राप्त झालें, त्यांस आपणास वैभव प्राप्त झाल्यावर तो विसरला नाहीं. उत्तम रीतीनें त्यानें सर्वांचे उपकार फेडिले.

नापोलियन रूपवान् होता. त्याचे डोळे मोठे पाणीदार होते. त्याचा बांधा मोठा सुबक होता. त्याच्या अंगीं चपळपणा व तरतरी फार असे. फुका डामडौल मिरविण्याचा त्यास फार तिटकारा असे. तथापि प्रसंग पडेल तेव्हां लोकांस प्रिय होण्याचा गुण त्यामध्यें मोठा वर्णनीय होता. बाळपणापासून अभ्यासी, उद्योगी आणि दृढ निश्चयाचे पुरुष नापोलियन यासारखे जगांत फारच थोडे असतील, यांत संशय नाहीं.

शाळा सोडल्यावर यास लौकरच फ्रान्स देशांतील लष्करांत अधिकाऱ्याची जागा मिळाली. त्यावेळेस त्याचें राहणें वालन्स शहरीं होतें. तेथील लोकांस तो थोड्याच दिवसांत प्रिय झाला. तेथें असतां एका सभेनें अशी जाहिरात लाविली कीं, कोणत्या प्रकारचें राज्य व कायदेकानू असले म्हणजे मनुष्य सुखी होतील, या विषयावर उत्तम निबंध लिहील त्यास बक्षीस मिळेल. त्याप्रमाणें नापोलियन यानें निबंध लिहून पाठविला, तो उत्तम ठरून त्यास बक्षीस मिळालें. हा निबंध छापून प्रसिद्ध झाला नव्हता. पुढें नापोलियन राज्यपदावर बसल्यावर एका मोठ्या कामदारास या निबंधाचा हस्तलेख सांपडला, तो त्यानें खुप करण्याकरितां बादशाहास दाखविला. तो हातांत घेऊन दोन तीन पत्रें वाचून नापोलियन यानें 'सर्व गोष्टी एकाच्यानें होत नाहींत.' असें म्हणून तें पुस्तक जाळून टाकलें. याचें कारण असें सांगतात कीं, हा निबंध लिहिला त्यावेळेस नापोलियन हा लोकसत्ताकराज्य चांगलें म्हणणारा होता. परंतु यावेळेस आपणास बादशाही प्राप्त झाल्यामुळें त्याचीं सर्व मतें निबंधाच्या उलट झालीं होतीं, म्हणून त्यानें हा निबंध जाळून टाकला. वालन्स शहरीं नापोलियन होता, त्यावेळेस फ्रान्स देशांतील इतर लोकांप्रमाणें लष्करांतील लोकांत सुद्धां राज्यसत्तेविषयीं दोन पक्ष झाले होते. कांहीं लोक राजसत्ताकराज्य असावें असें म्हणणारे होते, आणि कांहीं लोक प्रजासत्ताकराज्य चांगलें असें प्रतिपादन करणारे होते. नापोलियन यानें प्रजासत्ताकराज्य आवडणाऱ्यांचा पक्ष स्वीकारला. पुढें नापोलियन पदच्युत झाल्यावर म्हणत असे कीं, त्यावेळेस मी सैन्यामध्यें मोठा कामदार असतों तर राजाचा पक्ष घेतला असता, परंतु मी यःकश्चित् अप्रसिद्ध असल्यामुळें लोकांच्या पक्षास मिळालों. आपण यःकश्चित् सैन्यांतील कामदार होतों, हें सांगण्यास नापोलियनास अगदीं लाज वाटत नसे. एके दिवशीं कित्येक मांडलिक राजे बसले असतां बादशाहानें आपणाविषयीं कांहीं एक गोष्ट सांगितली. त्यावेळेस 'मी ज्यावेळेस पलटणींत होतों,' येथून त्यानें आरंभ केला.

सैन्यामध्यें चाकरीस असतां पुष्कळ दिवस नापोलियन यास अधिक पगाराची जागा मिळाली नाहीं. तो राजा झाल्यावर जे लोक पुष्कळ दिवस मोठी जागा न मिळाल्यामुळें कुरकुरत असत, त्यांस तो ही गोष्ट सांगे. एकेसमयीं बादशाहा सैन्याची तपासणी करीत असतां एक कामगार ह्मणाला, ' मीं एवढाले पराक्रम केले; पांचवर्षें झालीं, तरी अझून माझी दाद लागत नाहीं. ' त्यावर बादशाहा ह्मणाला ' माझी सातवर्षांत दाद लागली नाहीं तरी मीं अवसान सोडिलें नाहीं. '

लष्करांत चाकरीस असतां नापोलियन फुरसत सांपडेल तेव्हां ग्रंथ लिहिण्यांत आपला वेळ घालवी. त्यानें कोर्सिका बेटाचा इतिहास लिहिला होता परंतु कांहीं कारणांमुळें तो छापला गेला नाहीं. नापोलियन याच्या लिहिण्याच्या शक्तीविषयीं अलिसन् ह्मणून एक विद्वान् इतिहासकार, तो असें ह्मणतो कीं. ' नापोलियन हा अर्वाचीन काळीं पहिल्या प्रतीचा विजयी योद्धा झाला नसता तर तो मोठा विद्वान्, विचारी, व पहिल्या प्रतीचा ग्रंथकार झाला असता. ' सेंतहिलीना येथें हद्दपार झाल्यावर नापोलियन स्वतः आपले लेख वाचून ह्मणत असे कीं, ' काय चमत्कार आहे ! असें चांगलें लिहिलें असतां मला लिहितां येत नाहीं, असें लोकांच्यानें कसें ह्मणवेल कोण जाणे ? '

नापोलियन सैन्यांत कामदार असतां एका स्त्रीशीं त्याचें प्रेम जडलें होतें. परंतु त्यानें तिचा नाद लौकरच सोडून दिला. तारुण्याची योग्यता नापोलियन यास उत्तम कळत होती. त्यानें तो उत्तम काळ क्षणभर सुद्धां फुकट दवडिला नाहीं. तो रानांत वनांत, मंडळीबरोबर, कोठेंही गेला तरी, त्याचें लक्ष वृक्षवनस्पतींची शोभा, आणि फलपुष्पाचें सौंदर्य, यांजकडे जात नसे. लढाईला जागा कोणती चांगली, सैन्यास जाण्यास सोपा मार्ग कोणता, वगैरे विचार नेहमीं त्याचे मनांत घोळत असत. याप्रमाणें नापोलियन यास महत्वास चढण्यास आरंभ होण्यापूर्वीच्या गोष्टी झाल्या. या नंतर जी गोष्ट त्याच्या अंगचे शौर्यादि गुण पुढें येण्यास कारण झाली, तीविषयीं थोडा संक्षेपानें मजकूर लिहितों. ह्मणजे पुढील वृत्तांत चांगला

कळेल. . नापोलियन स्वतः महाशूर खरा, परंतु प्रसंगाशिवाय शौर्य दिसत नाहीं. नापोलियन याच्या शौर्याच्या प्रसिद्धीस जी गोष्ट कारण झाली, ती फ्रान्स देशांतील राज्यक्रांति होय.

भाग ३ रा.

इसवी सनाच्या अठराव्या शतकांत फ्रान्स देशाची स्थिति फारच वाईट झाली होती. बहुतेक लोक नीतिभ्रष्ट झाले होते. जमीनदार व श्रीमंत हे शेतकरी, व मजुरी करून पोट भरणारे गोरगरीब यांस फार त्रास देत. कायदेही मोठ्या जुलुमाचे असून गरिबांस त्रासदायक होते. रस्ते वगैरे करण्यास सार्वजनिक खर्च लागावयाचा तो सरकारी कामदार पाहिजे त्यापासून वाटेल तितका जबरीनें घेत इत्यादि कारणांनीं गरीब लोकांची दुर्दशा होऊन शेतकीचे वगैरे उद्योग व धंदे सर्व बसले. पुष्कळ जमीन ओसाड पडली. त्यामुळें दुष्काळ पडत चालला. सरकारानें मिठावर फार कर बसविला. त्यामुळें गरीब लोक मिठाची जकात चुकविण्याकरितां फार लबाड्या करीत. सुमारें चार पांच हजार माणसें वर्षास या अवश्य लागणाऱ्या पदार्थाचे संबंधानें तुरुंगांत जाऊं लागलीं. या शिवाय दुसरे कर पुष्कळ होतेच. न्यायाच्या कामांत तर फारच अव्यवस्था होती. गुन्हेगारांच्या शरीरास पीडा देण्याची फार वहिवाट होती. एका वेळीं एका वेडगळ मनुष्यानें राजाच्या अंगावर शस्त्र टाकिलें; त्यावरून त्याच्या अंगास तापलेल्या लोखंडानें भोंकें पाडून त्यांत शिशाचा रस ओतून शेवटीं त्याचें शरीर मस्त झालेल्या घोड्याकडून फाडविलें. हें राक्षसी कृत्यापेक्षां दुष्ट कर्म ऐकून युरोपांतील सर्व लोकांच्या अंगावर कांटा आला. मनास वाटेल तेव्हां पाहिजे त्या मनुष्यास पकडून तुरुंगांत टाकण्याचा राजास अधिकार होता. त्यामुळें पदरच्या दुष्ट लोकांनी आपलें हित साधण्याकरितां पाहिजे त्या माणसावर किटाळ आणावे

असें होऊन पंधरावा लुई याच्या राज्यांत पंधरा हजार लोक पकडले गेले, असें एका ग्रंथकारानें लिहिलें आहे. एकाद्या वेळेस पैशाची गरज लागली ह्मणजे पैसे घेऊन राजानें पाहिजे त्या माणसास पकडण्याचा हुकूम द्यावा. यामुळें लोकांनीं पैसे खर्चून आपला सूड उगविला. वाटेल तेव्हां न्यायाधीशास अधिकारावरून काढण्याचा राजास अधिकार असल्यामुळें न्यायाधीशांची स्वतंत्रता मोडून बहुत अन्याय होंऊं लागले. लांच खाऊन न्यायाधीश न्याय करूं लागले, त्यामुळें गरीबांस न्याय मिळेनासा झाला. कित्येक वेळां तर न्यायाधीशानें पक्षकारांस उघड विचारावें कीं, तुमच्या वतीनें खटल्याचा निकाल झाल्यास काय द्याल!

राज्यक्रांतीच्या पूर्वी लोकांची अशी स्थिति असून राजघराण्यांतील मनुष्यांचें असें आचरण होतें कीं, लोक त्यांचा अतिद्वेष करीत असत. खजिन्यांतील पैसा त्यांच्या यथेच्छ वर्तणुकीनें नाहींसा झाला. या प्रकारच्या भयंकर गोष्टी होत असतां राजा स्वतः निर्लज्जपणाच्या दुर्वर्तनांत काळ घालवी. त्याच्या व्यभिचारास तर सीमाच नाहींशी झाली. त्याचा लोकांस इतका निरस्कार आला होता कीं, एका वेळेस रात्रीस शहरांतील कांहीं मुलें नाहींशीं झालीं. त्यावेळेस अशी वदंता उठली कीं, राजा दुराचरणानें क्षीण झाला आहे त्यास कोणी दुष्टानें सांगितलें कीं, मनुष्याच्या रक्तानें स्नान करावें ह्मणजे अंगांत शक्ति येते; त्यामुळें ह्या कामाकरितां हीं मुलें तिकडे गेलीं असावीं; ही बातमी सर्वांस खरी वाटली. पंधरावा लुई व त्याचा बाप यांच्या राज्यांत या दुष्ट व्यसनास व इतर खर्च मिळून राजघराण्यानें वीसकोट रुपयांची धूळधाण केली असें ह्मणतात. या सर्व दुष्ट कृत्यांचें प्रायश्चित्त पुढें राजघराण्यास भोगावें लागलें.

राजघराण्याची व गरीब लोकांची वर सांगितल्याप्रमाणें स्थिति असून देशांतील बडे लोक, जहागीरदार, जमीनदार, वगैरे श्रीमान् लोकांचीसुद्धां अगदीं वाईट स्थिति होती. गरीब लोकांस त्रासदायक

असे नानाप्रकारचे हक्क त्यांस होते. त्यांवर सरकारच्या करां ओझें पडत नसे. सर्व मोठमोठ्या सरकारी मुलकी व लष्करी जा त्यांसच मिळत. फ्रान्स देशांत त्यावेळेस दोन प्रकारचे बडे लो होते; नवे व जुने. जुने बडे लोक होते ते व्यापार करणें वगैरे गो हलकेपणाच्या समजत, त्यामुळें सर्व रोजगारावर टपलेले असत; ऐश्वर्य जाऊन दरिद्रदशा आल्यामुळें पैसा मिळविण्याकरितां स कारी कामांत मोठमोठे अन्याय करीत. दुसऱ्या प्रकारचे बडे लो हलक्या कुळांतले असून पैशामुळें किंवा दुसऱ्या प्रकारचीं कांहीं लंगडीं करून राजाच्या मेहेरबानीनें सरदारांत शिरलेले होते. यां दरबारांत फार अंमल असे. त्यामुळें तेथें नानाप्रकारचे अन्याय हो

कोणत्याही देशांत लोकांमध्यें नीति वाढण्यास धर्माची स्थि चांगली पाहिजे. फ्रान्स देशांत राजा, प्रजा, बडे लोक, हे सर्व घडलेले असून धर्माची स्थिति तर फारच वाईट होती. त्यावेळे फ्रान्स देशांत सर्वमान्य धर्म रोमनक्याथोलिक होता. त्यांतील पा लोकांचें आचरण फारच वाईट होतें. बहुतेक धर्माधिकारी दु चारी आणि मनांत नास्तिक, असे झाले होते. त्यामुळें त्यांस लो मनापासून पूज्य मानीत नसत. प्रोतेस्तांत मताचे लोक होते, त्यां फारच इजा सोसावी लागे. लोक तर अज्ञान व धर्मभोळे इतके हो कीं, लंबकांचीं घड्याळें सुरू झालीं तेव्हां त्रितनी म्हणून एक प्रां आहे त्यांतील लोकांनीं यांपासून पाप लागेल असें समजून बंड के फ्रान्स देशांतील भयंकर राज्यक्रांतीस जीं कित्येक कारणें झालीं त्यां पैकीं धर्माधिकाऱ्यांचें वाईट आचरण हें एक होय.

धर्माधिकाऱ्यांचें वर सांगितल्याप्रमाणें आचरण असल्यामु धर्मावरची श्रद्धा उडून लोक नास्तिक होऊं लागले. देशांतून खिस्ती धर्म समूळ नाहींसा करण्याविषयीं कित्येक विद्वान् म्हणविणारे न स्तिक लोक यत्न करूं लागले. 'त्या लुच्चास (येशूखिस्तास) तु वून टाका'. असें हे लोक उघडपणें म्हणत. वाल्टेअर व रौसा णून दोन मोठे ग्रंथकार झाले, त्यांच्या ग्रंथांमुळें पुष्कळ लोकांचीं

विघडलीं. देशांत अनेक चावट ग्रंथ प्रसिद्ध होऊं लागले.

देशांत अशी स्थिति झाली असून तितक्यांत कित्येक अमेरिकेंतील सैन्यांत चाकरीस असलेले लोक आले. अमेरिकेंतील लोकांनीं इंग्लिश लोकांच्या अंमलाचें जूं फेंकून देऊन स्वतंत्र होऊन लोकसत्ताकराज्य स्थापिलें, याविषयीं पुष्कळ प्रकारच्या गोष्टी प्रसिद्ध करूं लागले. राजसत्ताक राज्यापेक्षां प्रजासत्ताकराज्यांत लोकांस फारच सुख असतें, याचा अनुभव अमेरिकेंत दृष्टीस पडत आहे, वगैरे लोकांच्या मनांत सरकाराविषयीं वाईट आणून देणाऱ्या अनेक गोष्टी ते बोलूं लागले. अमेरिकेंत वसाहत करण्यास सगळे लोक नवे गेलेले तेथें सर्वांनीं सारखे राहून लोकसत्ताकराज्य स्थापणें सुलभ होतें. परंतु जेथें शेंकडों वर्षांपासून राजा, प्रजा, बडे लोक, मध्यम लोक, अशी व्यवस्था झाली आहे, तेथें एकदम सर्व गोष्टी बदलणें दुर्घट आहे, असें मनांत न आणून अविचारी लोक राजघराण्याचा द्वेष करून लोकसत्ताकराज्याची इच्छा करूं लागले. पूर्वी फ्रेंच लोकांत आपल्या राज्यव्यवस्थेविषयीं प्रीति व राजनिष्ठा इतकी असे कीं, व्हर्सेलिस येथील राजवाड्याच्या भिंतीवर त्यांनीं असा लेख कोरला होता; 'पृथ्वीवर फ्रान्स देशासारखा देश नाहीं. पारिससारखें शहर नाहीं. आणि लुई सारखा राजा नाहीं'. इंग्लंदांतील राज्यव्यवस्थेची त्यावेळेस लोक फारच थट्टा करीत. परंतु यावेळेस असें झालें कीं इंग्लिशांच्या सर्व गोष्टी फ्रेंच लोकांस आवडूं लागल्या. केवळ राज्यव्यवस्थाच नव्हे, पण इंग्लिश लोकांसारखा पोषाक करणें, इंग्लिश लोकांचे ग्रंथ वाचणें, इंग्लंडांतील घोडे विकत घेणें, इंग्लंडाहून चाकर मनुष्यें आणणें, या गोष्टी सर्वांस आवडूं लागल्या.

वर लिहिल्यावरून कळेल कीं, फ्रान्स देशाच्या संबंधानें जे अनर्थ व रक्तस्राव झाले, त्यांचीं मुख्य कारणें राजा, बडे लोक, व धर्माधिकारी, यांचें दुराचरण; करांच्या वगैरे जुलुमानें आलेलें लोकांचें दारिद्र्य; न्यायाच्या कामांत पक्षपात; आणि नास्तिकपणा; हीं होत. याप्रमाणें देशाची स्थिति झाली असतां, पंधरावा लुई राजा मरून

सोळावा लुई राज्यावर वसला. हा राजा मोठा दयाळू, नीतिमान् विद्वान्, सुस्वभाव, निर्व्यसनी व प्रजेचें हित इच्छिणारा, असा होता; परंतु अशा बिघडलेल्या राज्याचें आकलन करण्यास जो एक गुण पाहिजे, तो त्याजमध्यें अगदीं नव्हता. तो गुण कोणता तर जी गोष्ट खरी व चांगली आहे, ती तडीस नेण्याचा दृढ निश्चय. देशाची चांगली स्थिति असती तर हा राज्यास भूषण झाला असता, परंतु अशा वेळेस वर सांगितलेला गुण अंगीं नसल्यामुळें बिघडलेल्या दुष्ट प्रजेनें त्याचा घात केला. सर्वांच्या कल्याणाचा इच्छा हें त्याच्या क्षणिकतेचें एक कारण होतें. कोणतीही चांगली गोष्ट असली तरी तिला वाईट म्हणणारे मतलबी लोक सर्व ठिकाणीं असतात. तसेंच मनुष्य भोळसर असला म्हणजे त्यास वाईट गोष्टी चांगल्या करून दाखविणारे लबाड लोकही पुष्कळ असतात. असे लोक त्यावेळेस दरबारांत पुष्कळ होते. राजानें प्रजेच्या हिताचा एकादा उपाय योजिला म्हणजे यापासून अमुक अमुक तोटे आहेत यापेक्षां अमका दुसरा उपाय योजिला तर चांगला, असें कोणी मतलबी लबाड कामदारानें सांगितलें म्हणजे राजाचें मन निरभिमानी असल्यामुळें त्यानें तें करावें. तें खरेंच वाईट असलें म्हणजे लोकांस आवडत नसे व या गोष्टीचें खरें कारण लोकांस ठाऊक नसल्यामुळें राजानेंच हें केलें असें त्यांस वाटे. या गोष्टींनीं राजाचा कृपाळूपणा न कळून लोक त्यास दुष्ट समजूं लागले. यामुळें सर्व प्रजा असंतुष्ट झाली. लुई यास जवळच्या लोकांचें अंतःकरण जाणण्याचें चातुर्य अगदीं नव्हतें. लुई याच्या उदाहरणावरून ही गोष्ट सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारखी आहे कीं, मनुष्याच्या, विशेषेंकरून ज्याच्या हातीं हजारों लोकांच्या कल्याणाचीं कलासूत्रें आहेत त्याच्या, मनांत केवळ चांगले उद्देश असून उपयोग नाहीं; ते तडीस नेण्याचें सामर्थ्य व दृढनिश्चय पाहिजे, नाहीं तर ते असून नसल्यासारखेच आहेत. लुई यास विद्येची फार आवड असे. तो नेहमीं राज्याच्या कामास अवश्य लावण्याचा वेळ भूगोल, यंत्रशास्त्र, यांचे ग्रंथ वाचण्यांत घा-

लवी. यापासूनही त्याचें फार वाईट झालें. यावरून हेंही समजलें पाहिजे कीं, कितीही चांगली गोष्ट असली तरी अवश्य कर्तव्य कृत्य सोडून ती करणें हें हितावह होत नाहीं. लुई याची बायको मेरी आंटाइनेटी ही चांगली सुशिक्षित, सुस्वभाव, व परोपकारी होती; परंतु राज्यावर बसल्यावर ती ऐश्वर्याच्या सुखांत निमग्न होऊन अनेक प्रकारचे खर्च करूं लागली. त्यामुळें राजाच्या खर्चास आठ वर्षांत चवतीस कोट रुपये लागले.

लुई राज्यावर बसल्यावर त्यास जीं संकटें येत चाललीं त्यांतलें पहिलें संकट राज्याच्या खजिन्यांत पैशाचा तोटा हें होय. खजिन्यास दोन अर्ब रुपये कर्ज झालें. बडेलोकांवर कर वगैरे न बसविल्यामुळें वसुलांत दिवसेंदिवस तूट येत चालली. त्यावेळेस इंग्लंदांतील पार्लमेंट सभेसारख्या फ्रान्स देशांत लोकांच्या प्रतिनिधींची व बडे लोकांची अशा सभा होत्या. परंतु इंग्लंदांतील सभांप्रमाणें राज्यप्रकरणांत त्यांचा अंमल चालत नसे. अशा बिकट प्रसंगीं राजानें तर्गो म्हणून एक महा पंडित होता, त्यास आपला मुख्यप्रधान नेमिलें. हा मोठा दूरदर्शी, विचारी, चतुर, असा होता. त्यानें सुचविलेल्या सर्व व्यवस्था अमलांत आल्या असत्या तर फ्रान्स देशांत इतके अनर्थ झाले नसते. त्यानें गरीब लोकांवरील जुलुमाचे कर बंद केले. बडे लोकांपासून कर घेण्याचें ठरविलें. फौजदारी व दिवाणी कायदे सुधारण्याचा यत्न केला. गुन्हेगार लोकांस हाणमार करण्याचें बंद केलें. प्रोतेस्तांत मताच्या लोकांस सरकारी जागा देण्याची मनाई होती ती मोडून टाकिली. या सर्व गोष्टी राजास आवडल्या. त्यानें पूर्वीच्या राजानें अन्यायानें तुरुंगांत घातलेले कैदी सोडून दिले. आपला स्वतःचा खर्च पुष्कळ कमी केला. त्यामुळें पुष्कळांचे रोजगार कमी झाले. या गोष्टींनीं ज्यांचें नुकसान झालें, ते राजाच्या व नवीन प्रधानाच्या नांवानें खडे फोडूं लागले. दरबारांतल्या बडे लोकांनीं नानाप्रकार करून राजाचें मन वळवून त्यास तर्गो यास कामावरून दूर करण्यास लाविलें. राजाच्या अंगीं दृढनिश्चय नव्हता, हें वर सांगितलेंच आहे.

तथापि त्यास तर्गो याची थोग्यता चांगली समजत होती. त्यास कामावरून काढल्यावर तो म्हणाला 'मी आणि तर्गो यांच्याप्रमाणे फ्रान्स देशावर कोणाचीही प्रीति नाहीं.' तर्गो यास घालविल्याच नेक्कर नांवाच्या प्रसिद्ध मनुष्याची मुख्य प्रधानाच्या जाग्यावर नेमणूक झाली. हा प्रधान पैशाच्या व्यवस्थेच्या कामांत फार हुशार होता. तर्गो यानें योजिलेल्या राज्यप्रकरणीं कित्येक सुधारणा यानें अंमलांत आणिल्या. त्यामुळें ज्यांचें नुकसान झालें ते याच्या नांवानें पुनः गवगवा करूं लागले. त्यामुळें त्यासही कांहींएक नफ्याशिवाय श्रम करून शेवटीं आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागला. यानंतर कालोन नांवाचा मनुष्य प्रधान झाला. हा फारच उधळ्या होता. पूर्वीच्या दोन प्रधानांनीं केलेल्या चांगल्या व्यवस्था सर्व यानें मोडून टाकिल्या. हा राजाच्या खाजगीकंडील मंडळीस प्रिय झाला कारण कोणीं कितीही पैसा मागितला तरी, हा देत असे. राणीनें कोणाची रोजगाराविषयीं शिफारस केली कीं, याच्याजवळ जाग तयार आहेच. एके दिवशीं राणी म्हणाली कीं, 'मी कांहीं म्हणणा होतें परंतु तीं गोष्ट होणें फार कठीण आहे.' 'त्याबर कालोन म्हणाला 'आपल्या तोंडांतून येऊं द्या मात्र, म्हणजे झालें म्हणून समजा. ध डण्यास अशक्य असलें तरी होईल.' या गोष्टींनीं पैशाची फारच तूं पडली. तेव्हां पूर्वीच्या प्रधानांप्रमाणें हाही बडे लोकांपासून कर द्वे ण्याच्या वगैरे गोष्टी अंमलांत आणण्याचा यत्न करूं लागला. त्या मुळें तोही अप्रिय झाला. शेवटीं त्यानें देखील राजीनामा दिल यानंतर दुसरा एक प्रधान अठरा महिने कामावर होता. तो याच प्रमाणें वाईट असल्यामुळें त्याच्यानें काम निभेना. शेवटीं त्याच्या सूचनेवरून पुनः नेक्कर यास प्रधानाच्या अधिकारावर नेमिलें. नेक्क कामावर येतांच त्यानें पुनः खर्जिन्याची बरीच व्यवस्था केली.

नेक्कर इतका हुशार होता तरी त्यासही राज्यव्यवस्थेंत सुधार होणें कठीण असें वाटूं लागलें. कारण चोंहींकडे पराकाष्ठेची अव्यवस्था होती. खजिन्यांत पैसा फारच कमी म्हणजे सुमारें एक लक्ष आणि

कांहीं हजार इतका मात्र होता. त्यामुळें राजा, बडे लोक, लोकांचे मुखत्यार, यांची इंग्लंदांतील पार्लमेंत सभेप्रमाणें सभा भरविण्याची युक्ति नेक्कर यानें काढिली. या सभेंत राजा, बडे लोक, व लोकांचे मुखत्यार, यांनीं राज्याच्या व्यवस्थेविषयीं विचार करावा, असें ठरलें. या सभेस देशांतल्या विद्वान् लोकांसही आमंत्रण केलें होतें. ही सभा नांवानें फ्रान्स देशांत पूर्वीपासून होती; परंतु तिचा राजाच्या करण्यावर कांहीं दाब नसे; असें मागें सांगितलेंच आहे. शंभर दीडशें वर्षांत या सभेनें कांहीं काम केलें नव्हतें. नेक्कर यानें ही सभा भरवून लोकांकडील प्रतिनिधि यांची संख्या पुष्कळ ठेविली, ही त्यानें मोठी चूक केली व हीच राज्यक्रांती होण्यास बहुतांशीं कारण झाली, असें पुष्कळ ग्रंथकारांचें मत आहे. कारण त्यामुळें राजा व बडे लोक यांच्या विरुद्ध हलक्या लोकांस अधिकार फार मिळाला. जो तो स्वतंत्रतेविषयीं उत्सुक झाला. राज्यव्यवस्थेविषयीं वर्तमानपत्रांतून अनेक प्रकारचे लोकांचीं मनें बिघडविणारे स्वतंत्रतेविषयीं मजकूर येऊं लागले. फ्रान्स देश तर या वेळेस स्वतंत्रतेस अगदीं अयोग्य होता. धर्माधिकारी वगैरे लोकांचें आचरण व नीती वर सांगितलीच आहे. लोक तर इतके अडाणी होते कीं, शेकडा दोघांतिघांस-सुद्धां वाचतां येत नसे. नेक्कर यास त्याच्या मित्रांनीं सांगितलें कीं, लोकांस फार अधिकार देणें हें राज्यास अपकारक आहे. त्यावर तो म्हणाला 'मनुष्याचें अंत:करण इतकें दुष्ट असेल असें मला वाटत नाहीं.' सज्जन असतात ते आपल्या अंत:करणावरून लोकांच्या मनांची परीक्षा करून फसतात. मनुष्याचें अंत:करण किती दुष्ट आहे, हें इतिहासावरून सहज कळण्यासारखें होतें. तारीख ५ मे १७८९ या दिवशीं ही बडी राज्यप्रकरणीं सभा भरण्याचें ठरलें. याच्या पूर्व दिवशीं राजा व प्रजा या सर्वांनीं **नात्रिदेम** नांवाच्या देवळांत मोठ्या थाटानें जाऊन प्रार्थना केली. धर्मोपदेशकानें देशाच्या सुखाविषयीं उत्तम व्याख्यान दिलें.

नेमल्याप्रमाणें व्हर्सेलिस येथील राजवाड्यांत सभा भरली. हीं-

न लोकांकडील सहारों प्रतिनिधि होते. यांत पुष्कळ अडाणी, अशिक्षित, दुष्ट, असे लोक होते. राजानें प्रारंभी भाषण केलें त्यांत आपल्या प्रजेचें हित व्हावें याशिवाय माझी दुसरी कांहीं आशा नाहीं, असें त्यानें स्पष्टपणें मनोभावानें म्हणून दाखविलें. हें ऐकून सर्व जनांस आनंद झाला. परंतु प्रतिनिधींपैकीं जे लबाड होते, त्यांस चांगलें वाटलें नाहीं. इतकेंच नव्हें, ते उलटे खट्टू झाले. त्यांस वाटे, राजानें असें म्हणावें कीं, माझा हक्क नाहीं; परंतु प्रजेनें मला अधिकार दिला आहे, म्हणून मी राजा आहें. लोकांच्या मुखत्यारांनी **मिराबो** यास आपल्या पक्षाचा मुख्य केलें. हा मोठा बुद्धिमान् पण दुराचारी असा विलक्षण मनुष्य होता. त्याची वक्तृत्वशक्ति फारच मोठी होती. कसल्याही अडाणी लोकांची गर्दी असली तरी तो सर्वांस आपल्या भाषणानें एकदम गप्प करी.

सभेचें काम सुरू झाल्यावर कोणीं कसें मत द्यावें वगैरे गोष्टी विषयीं वादविवाद होऊन पुष्कळ घोंटाळा झाला. कित्येकांचें म्हणणें असें होतें कीं, इंग्लंदांतील पार्लमेंत सभेप्रमाणें बडेलोक व मुखत्यार यांच्या सभा वेगळ्या असाव्या, म्हणजे परस्परांवर दोघांचा दाब राहून व्यवस्था चांगली होईल. मुखत्यारांचे म्हणणें असें होतें कीं, एकच सभा असावी. एकच सभा असली म्हणजे आपले लोक पुष्कळ असल्यामुळें बहुमतानें आपणास पाहिजे ती गोष्ट करितां येईल; असा ह्या म्हणण्यांत मुखत्यारांचा मतलब होता. शेवटीं एक सभा असावी असें ठरून कायदे करण्यास सुरवात झाली. कांहीं दिवस मुखत्यारांनीं विशेष गडबड केली नाहीं. परंतु एक महिना लोटल्यावर एकाएकीं त्यांनीं 'राष्ट्राची सभा' असें नांव धारण करून बड्या लोकांस न विचारितां एकदम कामाची सुरवात केली. हें पाहून राजानें असा जाहीरनामा लाविला कीं, 'तीन दिवसांनीं मी स्वतः येऊन सर्व कामाचा उलगडा करीन तोंपर्यंत सभा बंद आहे.' या जाहिरनाम्यास न जुमानितां मुखत्यार सभेचें काम चालविण्याचे उद्देशानें सभेच्या जागीं गेले; तों तेथें सभागृह बंद असून बाहेर शिपा-

यांचा पहारा आहे, असें त्यांनीं पाहिलें. ते असे निराश होऊन परत जात असतां थट्टेनें राजाचे खाजगीकडील कांहीं लोक त्यांस हंसले. त्यामुळें त्यांस चेव येऊन ते जवळच दुसऱ्या इमारतींत गेले; आणि तेथें सभा भरून सर्वांनीं अशी शपथ वाहिली कीं, राज्यव्यवस्था सुधारल्याशिवाय सभा बंद ठेवावयाची नाहीं. तिसऱ्या दिवशीं सभा भरल्यावर राजानें भाषण केलें, त्यांत त्यानें तर्गोनें योजिलेल्या कित्येक सुधारणा करावयाच्या असें सांगितलें. या वेळेस पुष्कळ गोष्टी राजानें प्रजेच्या म्हणण्याप्रमाणें केल्या. आपल्या प्रजेच्या हिताकरितां मीं जें केलें आहे, तितकें कोणत्याही राजानें आपल्या प्रजेकरितां केलें नसेल, असें म्हणून भाषण संपवून उद्यांपासून बडेलोक व मुखत्यार यांनीं वेगळाल्या ठिकाणीं बसून विचार करावा, असें बोलून कचेरी बरखास्त, असें सांगितलें. बडेलोक व धर्माधिकारी लागलेच उठले, परंतु मुखत्यार उठले नाहींत. व्यवस्थापकानें आतां येथें बसण्यास राजाचा हुकूम नाहीं असें सांगितलें, तेव्हां मिराबो म्हणाला " आपल्या धन्याला, सांग कीं आम्ही लोकांच्या हुकुमानें येथें आलों आहों. शस्त्रानें घालविल्याशिवाय आम्ही जाणार नाहीं." दुसऱ्या दिवशीं कित्येक बडेलोकही मुखत्यारांस मिळाले. हें पाहून कित्येक दरबारी मनुष्य लष्करी शिपायांकडून जबरीनें मुखत्यारांस घालविण्यास सांगूं लागले. त्यांस राजा म्हणाला ' एकाही मनुष्याचा जीव घेण्यास मी कारण होणार नाहीं. ' असें म्हणून त्यानें बडेलोकांस मुखत्यारांच्या सभेंत जाऊन बसण्यास सांगितलें. इकडे याप्रमाणें चाललें असतां पारिस शहरांत पुष्कळ भयंकर गोष्टी होऊं लागल्या. सुतार, लोहार, शिंपी, वगैरे सगळे हलके लोक जमून राज्यप्रकरणीं रस्त्यांत वादविवाद करून हलक्या व बंडखोर लोकांच्या मनांत नानाप्रकारचे कुतर्क आणून देऊं लागले. वर्तमानपत्रें वगैरे यानीं तर इतका कहर केला कीं, साठ दाहा दिवसांत शंभरदीडशें पुस्तकें राज्य प्रकरणाविषयीं प्रसिद्ध झालीं.

याप्रमाणें अवस्था झाली तेव्हां चंचल मनाच्या राजास लोक अनेक प्रकारच्या मसलती सांगूं लागले. तेव्हां आज त्यानें मुखत्यारांचें म्हणणें कबूल करावें, उद्यां बडे लोकांच्या सांगण्यावरून त्यांच्याविरुद्ध करावें, असें होऊं लागलें. शेवटीं त्यानें एका लबाड मनुष्याच्या सांगण्यावरून नेक्कर यास कामावरून दूर केलें. नेक्कर यावेळेस फारच लोकप्रिय झाला होता. त्यास दूर करितांच गवगवा होऊन लोक उघड बंडाळी करूं लागले. शेवटीं हजारों बंडखोर लोक जमून त्यांनीं, **बास्ताईल** नांवाच्या फार जुन्या पारिस येथील किल्ल्यावर हल्ला केला. त्यांनीं तेथील ठाणेदार व शिपायी यांस कापून काढून तेथील पदार्थ संग्रहालय वगैरे सर्व उंची वस्तु उध्वस्तकरून टाकिल्या. याच किल्ल्यांत पूर्वीच्या राजांनीं भयंकर अनर्थ केले होते, त्यांच्या कांहीं खुणा सांपडल्या त्यांमुळें या जागेचा लोकांस फार संताप आला होता.

याप्रमाणें सुधारलेल्या फ्रान्स देशांतील रक्ताच्या प्रवाहाचा झरा सुरू झाला. अमर होण्याकरितां विष खावयाचें त्याप्रमाणें राजाच्या जुलुमांतून सुटून स्वतंत्र होण्याकरितां लोक पट्टिपूंचे गुलाम होऊन पराधीन होण्याचीं कृत्यें करूं लागले. सर्व मनुष्यें सारखीं असें मानणाऱ्या सुधारलेल्या लोकांनीं देशबांधवांच्या रक्तांच्या नद्या उत्पन्न केल्या ! शिवशिव ! काय अनर्थ हा !! यावरून सर्वांनीं ध्यानांत आणण्यासारखी ही गोष्ट आहे कीं, लहान मुलास स्वतंत्रता दिली तर तें जसें आपला नाश करून घेतें त्याप्रमाणेंच राष्ट्रास स्वतंत्रतेची योग्यता आल्याशिवाय ती प्राप्त करून घेण्याचा यत्न केल्यास त्यापासून थोडी बहुत स्वतंत्रता असते तीही नाहींशी होऊन लोकांचा नाश होतो. स्वतंत्रतेची वल्ली नीतिरूप चांगल्या भूमींत उगवून धर्मनिष्ठारूप उदकाच्या सेचनानें सुशिक्षित लोकांच्या मनोवृक्षावर हळूहळू चढली पाहिजे. अनीतिरूप वाईट भूमींत उगवून नास्तिक्याच्या घाणेरड्या खतानें माजून अशिक्षित लोकांच्या मनोवृक्षावर चढल्यास ती त्याचा नाश करून शेवटीं आश्रय नाहींसा झाल्यामुळें आपणही नष्ट होते

ईल. झाड माजलें ह्मणजे तें खच्ची केलें तर त्यास फळें येतात, नाहीं-तर तें वांझ होऊन जवळच्या इतर वृक्षांस देखील मारून टाकितें. त्याप्रमाणें फ्रान्स देशांतील स्वतंत्रतेची इच्छा माजून तिनें सर्व राष्ट्राचा नाश केला. असो.

वास्ताईल किल्ल्याची अवस्था राजास मध्यरात्रीस कळली. तेव्हां तो ह्मणाला, 'बंड झालें' त्याजवळ एक सरदार होता तो ह्मणाला 'बंड कशाचें राज्यक्रांतीची वेळ आली.' दुसरे दिवशीं सभेंत जाऊन नेक्कर यास पुन्हा कामावर आणितों ह्मणून राजानें सांगितलें. नंतर राजा व्हर्सेलिस येथून पारिस येथें गेला. वाटेंत त्याच्या भोंवतालीं हजारों भिकारी लोक हातांत शस्त्रें घेऊन चालूं लागले, तेव्हां ज्या आपलपोटी मतलबी दुष्ट लोकांनीं मुखत्यारांच्या विरुद्ध राज़ास मसलती दिल्या होत्या ते लोक हीं सर्व चिन्हें पाहून स्वदेश सोडून परदेशास जाऊं लागले. त्यामुळें राजास कोणाचें साहाय्य नाहींसें झालें. 'कठिण समय येतां कोण कामास येतो' हें कवीनें म्हटलें आहे तें खरें आहे.

केवळ पारिसमध्येंच बंडाळी झाली असें नाहीं. प्रांतांतील शेतकऱ्यांनीं सुद्धां आपल्या आसपासच्या सरदारांवर शस्त्र धरिलें. त्यांनीं कित्येकांस ठार मारिलें, कित्येकांचीं घरें जाळिलीं; कित्येकांस विहिरींत फेंकिलें आणि कित्येकांस जाळून टाकिलें. बायकांचे गळे दाबून मानांवर कुऱ्हाडी ठेवून जुलुमानें त्यांची मालमत्ता लुटिली, तेव्हां सर्व देशांतील रस्ते पळणाऱ्या लोकांनीं भरून गेले. सावकार लोकांस धाक पडला, सर्व व्यापार बंद झाले. त्यांमुळें दुष्काळ पडला. तेव्हां सरकारानें धान्य विकत घेऊन ठिकठिकाणीं लष्करी पाहाऱ्यांत ठेवून लोकांस वांटण्याची तजवीज केली. या वेळेस राजानें आपल्या पदरचा पुष्कळ पैसा लोकांकरितां खर्चिला. शेवटीं खजिन्याचें दिवाळें निघण्याची वेळ आली, तेव्हां नेक्कर याच्या सांगण्यावरून लोकांनीं पदरचे पैसे दिले.

याप्रमाणें देशाची स्थिती असतां मुखत्यारांनीं एक अविचाराची

गोष्ट केली ती अशी कीं, अमेरिकेंत लोकसत्ताक राज्य झालें त्यावेळेस तेथील सरकारानें लोकांचे हक्क म्हणून एक लेख छापून प्रसिद्ध केला होता. त्या लेखाप्रमाणें लेख छापण्याचें ठरवून शेवटीं एक लेख प्रसिद्ध केला. त्याचा सारांश खालीं लिहिल्याप्रमाणें.

मनुष्याच्या व प्रजेच्या हक्कांबद्दल फ्रान्स देशांतील राष्ट्रसभेनें प्रसिद्ध केलेला जाहीरनामा.

मनुष्यांचे हक्क न समजणें अथवा त्यांस तुच्छ मानणें अथवा ते चालविण्याची हयगय करणें हीं प्रजेच्या दुःखाचीं व राज्याच्या अव्यवस्थेचीं मुख्य कारणें आहेत. असें समजून राष्ट्राच्या सभेंत जमलेले फ्रान्स देशांतील लोकांचे प्रतिनिधि यांनीं खालीं लिहिलेले मनुष्याचे स्वाभाविक, जन्मतः प्राप्त झालेले आणि हरण करण्यास अयोग्य, असे हक्क जाहीर करण्याचें ठरविलें आंहे. कारण कीं, हक्क नेहमीं लोकांच्या डोळ्यांपुढें असले म्हणजे त्यांचें लक्ष सतत आपल्या हक्कांकडे व कर्तव्यांकडे राहील; व यामुळें कायदे करणें ते अमलांत आणणें हे सरकारचे अधिकार राज्यांतल्या व्यवस्थेच्या उपयोगाकरितां आहेत, असें क्षणोक्षणीं ध्यानांत आल्यामुळें त्या लोक अधिक मान देतील आणि यापुढें प्रजेचे हक्क वर सांगितलेल्या सुलभ व निर्विवाद कारणांवरून ठरलेले असल्यामुळें ते राज्यव्यवस्था आणि सार्वजनिक सुख हें राखण्यास उपयोगीं पडतील.

याकरितां राष्ट्रसभा, परमेश्वरासमक्ष त्याचा प्रसाद आणि कृपा यांची आशा धरून हे मनुष्याचे व प्रजेचे अलंघ्य हक्क ठरवून प्रसिद्ध करिते.

१ आपल्या हक्काचे संबंधानें मनुष्य जन्मतः सारखे असून पुढें तसेच राहतात. यासाठीं लोकांतील लहानमोठेपणा, सार्वजनिक उपयोगासाठीं मात्र असावा.

२ स्वातंत्र्य, मालमत्ता, संरक्षण, आणि जुलुमाचा प्रतिकार हे मनुष्याचे स्वाभाविक जन्मतः प्राप्त झालेले हक्क आहेत, त्यांचें रक्षण करणें हा सर्व राजकीय प्रकरणांचा हेतु होय.

३ राज्यसत्तेचें मुख्य प्रभवस्थान राष्ट्र होय. याकरितां राष्ट्रानें योजना करून दिलेला नाहीं असा कोणताही अधिकार एका मनुष्यास अथवा कांहीं मनुष्यांस प्राप्त होत नाहीं.

४ जीपासून दुसऱ्यास कांहीं अपकार होत नाहीं, अशी कोणतीही गोष्ट करण्यास मोकळीक असणें ही राजकीय स्वतंत्रता होय. दुसऱ्यांस तेच आपले हक्क यथेच्छ चालविण्यास हरकत होऊं नये, एवढ्यापुरता मात्र मनुष्यास आपले स्वाभाविक हक्क चालविण्यास प्रतिबंध असावा. हा प्रतिबंध कायद्यानेंच ठरला पाहिजे.

५ लोकांस अपकारक कृत्य असेल तेवढें मात्र कायद्यानें बंद करावें. जें कायद्यानें बंद केलें नाहीं, त्यास कोणाचीही हरकत असूं नये. कायद्याप्रमाणें केलेंच पाहिजे असें नसेल तें करण्यास कोणावर जुलूम होऊं नये.

६ कोणताही कायदा चालू होण्यास लोकांची संमति पाहिजे, याकरितां तो करण्यास स्वतः किंवा मुखत्यारांच्या मार्फत मत देण्याचा सर्व प्रजेस अधिकार आहे. संरक्षण करणें असो, किंवा शिक्षा करणे असो, कायदा सर्वांस सारखा लागू असावा. कायद्याच्या दृष्टीनें सर्व सारखे असल्यामुळें आंगचे सद्गुण व बुद्धि यां शिवाय दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा भेद न धरितां सर्व लोक आपापल्या योग्यतेप्रमाणें सर्व सन्मान, सर्व अधिकार, व रोजगार, मिळविण्यास सारखे पात्र आहेत.

७ कायद्यानें ठरलेल्या गोष्टी व रीति यां शिवाय कोणत्याही गोष्टीकरितां कोणत्याही रीतीनें कोणत्याही मनुष्यास आरोपी ठरवूं नये, पकडूं नये, किंवा अडकेंत ठेवूं नये. जे कोणी जुलुमानें हुकूम चालू करितात, किंवा चालू करण्यास सांगतात; अमलांत आणितात, किंवा आणवितात, त्या सर्वांस शिक्षा व्हावी. कायद्याप्रमाणें बलावणें झालें अथवा पकडलें तर प्रत्येक मनुष्यानें तें मानिलें पाहिजे. अडथळा करील तर तो शिक्षेस पात्र होईल.

८ उघड रीतीनें आवश्यक आहेत तेवढ्यामात्र शिक्षा कायद्य
ठरवाव्या. यां शिवाय कोणत्याही शिक्षा कायद्यानें देऊं नये.
न्द्याच्यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या कायद्याप्रमाणें मात्र मनुष्यांस शि
व्हावी. याशिवाय कोणासही शिक्षा होऊंनये.

९ गुन्हा शाबीद होईपर्यंत प्रत्येक मनुष्य निरपराध आहे अ
समजलें पाहिजे. याकरितां आरोपितास सुटून जातां येऊं
इतक्यापुरती आवश्यक असेल तीशिवाय त्यास कोणतीही पीडा
देण्याची तजवीज कायद्यानें केली पाहिजे.

१० कायद्यानें स्थापित केलेली लोकस्थिति विघडत नसेल
कोणत्याही मनुष्यास त्याच्या मताकरितां पीडा होऊंनये. हो
धर्मसंबंधाच्या मतास सुद्धां लागू असावी.

११ आपापले विचार व मतें मोकळेपणानें एकमेकांस क
वावीं हा मनुष्याच्या उत्तम हक्कांपैकीं एक हक्क आहे, यासाठीं प्र
मनुष्यानें आपले विचार मोकळेपणानें बोलावे, लिहावे, अथवा छा
प्रसिद्ध करावे, परंतु ज्या गोष्टीमध्यें त्यानें स्वतंत्रतेचा गैर उपयोग क
असें कायद्याप्रमाणें ठरेल तीविषयीं त्यानें आपल्या शिरावर जो
म घेतली पाहिजे.

१२ मनुष्याच्या व प्रजेच्या हक्कांच्या संरक्षणाकरितां दे
फौज अवश्य पाहिजे. ती फौज ज्याच्या ताब्यांत आहे त्या
एकट्याच्या हितासाठीं आहे असें नाहीं. ती सामाजिक हितास
आहे असें समजावें.

१३ सामाजिक सैन्याच्या खर्चाकरितां, व राज्यव्ययस्थे
खर्चाकरितां, सर्वांनीं खर्च दिला पाहिजे. यासाठीं सर्व लोकांपा
त्यांच्या सामर्थ्याप्रमाणें तो सारखा घेतला पाहिजे.

१४ प्रजेवर कर बसविण्याची आवश्यकता, तो कोणत्या
माकडे किती खर्च करणें त्याचें प्रमाण, तो वसूल करण्याची र
व तो किती दिवस असावा, या गोष्टींविषयीं स्वतः किंवा मुखत्या
च्या मार्फत स्वतंत्र मत देण्यास प्रत्येक मनुष्यास अधिकार आहे.

१५ मुखत्यारांच्या कामाचा तपास करण्यास त्यांस नेमणाऱ्या सर्व लोकांस अधिकार आहे.

१६ ज्या लोकसमजांत वेगळाले अधिकार ठरून लोकांच्या हक्कांचें संरक्षण होण्याची तजविज झालेली नाहीं, त्यांत राज्यव्यवस्था केली पाहिजे.

१७ प्रत्येक माणसाचा मालमत्ता बाळगण्याचा हक्क अलंघ्य व ईश्वरदत्त आहे. यासाठीं तो कोणाचाही घेऊं नये. परंतु जेथें सार्वजनिक उपयोगाकरितां तो घेतला पाहिजे असें उघड दिसेल तेथें कायद्याप्रमाणें ठरवून आणि तोटा भरून देऊन घेतला पाहिजे.

या लेखा विषयीं एका ग्रंथकाराचें ह्मणणें आहे कीं, ' मनुष्याचा स्वाभाविक सारखेपणा नाहीं ही गोष्ट सिद्ध करण्याचें अगदीं कठीण नाहीं. असा सारखेपणा जगांत कोठें आहे ? आंगबळ किंवा बुद्धिमत्ता या गोष्टी ईश्वरानें सर्वांस सारख्या दिल्या आहेत, असें दिसत नाहीं. यांचा मनुष्यांत फारच भेद दिसतो. याप्रमाणेंच अधिकार व ऐश्वर्य यांचा भेद; जगांत दोन मनुष्यांत शक्ति, उद्योग आणि बल ह्यांचें अंतर आहे तोंपर्यंत अवश्य असला पाहिजे. आज जगांतील संपत्ति सर्वांस सारखी वांटून दिली तरी थोड्या घटकेंतच बरोबरी मोडून जाईल. कारण आळशी व अविचारी आहेत त्यांपेक्षां विचारी, उद्योगी, व दूरदर्शी, यांजवळ ती अधिक राहणारच. कायदे सर्वांस सारखे असून ते निःपक्षपातानें चालविणें ह्याच काय तो सारखेपणा उत्तम सरकारास आपल्या प्रजेस देतां येईल. '

नंतर राष्ट्रसभेनें राज्यव्यवस्थेचे नियम करण्याचें काम हातीं घेतलें. इंग्लंदांतील राज्यव्यवस्थेप्रमाणें प्रतिनिधि किंवा वडे लोक यांनीं केलेली गोष्ट मोडण्याचा अधिकार राजास असावा असें कित्येकांचें ह्मणणें होतें. परंतु राजाशीं विरुद्ध झालेल्या लोकांस तें आवडलें नाहीं. त्यानीं अशी सूचना करणाऱ्यांची हुर्योहुर्यो करून टाकिली. दिवसेंदिवस दुष्काळ अधिक पडत चालला. त्यामुळें असल्या लोकांस पुढील अनर्थाचें बीजारोपण करण्यास चांगली सवड सांपडली.

लोकांच्या दुःखास राजा व बडे लोक कारण, असें ते उघड बोलूं लागले. कित्येक तर राजवाड्यावर हल्ला करण्याविषयीं उघड बोलूं लागले. त्यामुळें राजानें राजवाड्याभोंवतालीं एक पलटण आणून ठेविली. लष्करी लोकांनीं कांहीं फाजिलपणा केल्यामुळें लोक फारच चवताळले. थोड्याच दिवसांनीं एक मजुरी करणारी बाई ढोलकें वाजवून भाकरभाकर ह्मणून रस्त्यांतून ओरडूं लागली. तिला अनेक पुष्कळ बायका मिळाल्या. सभेच्या ठिकाणीं जाऊन त्यांनीं खुब गर्दी केली. सभा बंद होती त्या वेळेस एक अध्यक्षाच्या खुर्चीवर बसली, दुसऱ्या सभासद झाल्या आणि वादविवाद करूं लागल्या. शेवटीं तेथून हांकून दिल्यावर त्या राजवाड्यांत गेल्या. मजूरी करणारी बाई राजाजवळ बोलण्यास पुढारी झाली होती, ती राजापुढें येतांच भयानें गर्भगळित झाली आणि खालीं पडली. तिच्यानें कांहीं बोलवेना. राजानें ममतेनें गोड बोलून सर्वांस परत लावून दिलें. परंतु बाहेर आल्यावर पुढारी बाई होती तिला बखेडेखोर लोकांनीं फार त्रास दिला. शेवटीं रात्रीस त्यांनीं राजवाड्यावर हल्ला केला. भिंती आणि दरवाजे, फोडून आंत राजा निजला होता तेथें जाऊन ते उभे राहिले. राजानें त्यांस शांत करण्याकरितां मी पारिस येथें येतों ह्मणून सांगितलें. दुसरे दिवशीं राजास घेऊन मुद्दाम हळूहळू लोक पारिस येथें चालले. त्यांनीं राजवाड्यावर हल्ला केला त्यावेळेस राजाचे पहारेकरी मारिले होते त्यांचीं डोकीं भाल्याच्या टोंकांवर लावून उंच करून राजापुढें चालविलीं. पलटणी फितूर होऊन लोकांस मिळाल्या होत्या, त्या बरोबर चालल्या. हलकट लोक नानाप्रकारचीं घाणेरडीं गाणीं ह्मणू लागले. राजानें बरोबर सामानाच्या पन्नास गाड्या घेतल्या होत्या. त्यांकडे पाहून लोक ह्मणत 'धीर धरा. आतां भाकरीला काय तोटा, आतां आह्मी भाकरी वाला, भाकरी वाली, व त्याचा पोर, यांस घेऊन आलों.' शहरांत आल्यावर लोक त्यास सामोरे गेले. त्यांस, तुह्मांवर मी मोठा विश्वास ठे-

वून येथें आलों आहें, असें राजानें सांगितलें. त्यामुळें थोडे दिवस शहरांत कांहींशी स्वस्थता दिसूं लागली.

कांहीं दिवस गेल्यावर पुनः बखेड्यास प्रारंभ झाला. खजिन्याचें दिवाळें वाजलें. तीनवर्षांत खजिन्यास पन्नास कोटरुपये नवें कर्ज झालें. यामुळें राष्ट्रसभेनें एक उपाय काढिला तो हा कीं, मठ, देवळें, वगैरे धर्मसंबंधाच्या ठिकाणीं जें द्रव्य आहे तें राज्यव्यवस्थेस घ्यावें. या गोष्टीनें धर्माधिकाऱ्यांच्या पोटावर पाय आला, यामुळें त्यांस फारच राग आला. त्यांपैकीं एक सभेस म्हणाला, 'तुम्हांस स्वतंत्रता पाहिजे परंतु न्याय नको, हें चमत्कारिक आहे.' यावर मिराबो म्हणाला, 'तुम्हीं बैल मोकळा सोडिला, आतां त्यानें शिंगें मारिलीं तर बोलूं नका' याच धर्माधिकाऱ्यानें बंड होण्यापूर्वी राज्यप्रकरणीं लोकांच्या मनावर वाईट ग्रह होणारीं मतें प्रगट केलीं होतीं. शेवटीं पुष्कळ घोंटाळे होऊन एकदां नवे नियम तयार झाले. शपथ घेऊन त्यांप्रमाणें वागण्याचें राजानें कबूल केलें. राष्ट्रसभेंतील लोकांनीं त्या नियमांस अनुसरण्याच्या शपथा घेतल्या. नंतर कोणाच्या सूचनेवरून पलटणींतील शिपाई, शाळेंतील मुलें वगैरे सुद्धां देशांतील सर्व लोकांकडून शपथा घेवविल्या. ही एक शपथ घेण्याची थट्टाच कांहीं दिवस चालली होती. सर्व लोक नव्या नियमांस भुलून स्वतंत्रता मिळाली म्हणून आनंदित झाले. सर्वांनीं राष्ट्रसभेचे आभार मानिले. फ्रेंच लोकांच्या उतावीळपणास सीमाच नाहीं. त्यांनीं लागलीच या दिलेल्या नव्या राज्यव्यवस्थेकरितां प्रार्थना करून ईश्वराचे आभार मानण्याकरितां एक मोठी सार्वजनिक जागा पारिस शहराजवळ तयार करण्याचा बेत केला. सर्व लहान मोठे, भिकारी, व बडे लोक, बायकांमुलांसुद्धां एकेठिकाणीं एका कुटुंबांतल्या माणसांप्रमाणें स्वतः काम करूं लागले. राजा सुद्धां एक दिवस तयारी पाहण्यास गेला. त्याबरोबर लष्करी लोक खांद्यांवर कुदळ्या घेऊन चालूं लागले. लोकांच्या मनाची स्थिति इतकी चमत्कारिक झाली होती कीं, एक मनु-

ष्य तेथें आला आणि मोठ्या त्वरेनें आंगरखा काढून खणूं लागला. त्यास दुसरा ह्मणाला 'आपलें घड्याळ संभाळ बरें.' त्यावर तो ह्मणाला, 'घड्याळाला काय भय आहे, आपल्या भावाचा कोणी संशय घेतो काय ?' शेवटीं नेमलेल्या दिवशीं समारंभ झाला. त्यावेळीं चारलक्ष लोक जमले होते. राजाराणी बसल्यावर चालीप्रमाणें धर्माध्यक्षाचें भाषण संपल्यावर राजा व प्रजा यांनीं राज्यव्यवस्थेस अनुसरण्याची शपथ वाहिली. किल्ल्यावरून तोफांचे आवाज काढून सर्व देशांत ही बातमी प्रसिद्ध केली. या समारंभाच्या वेळेस एकाएकीं विलक्षण मोठा पाऊस आला. त्यामुळें समारंभाचा जरा बिघाड झाला. पुढें सातआठ दिवस या ठिकाणीं लोक मौजा करीत होते. या स्वतंत्रतेचा परिणाम असा झाला कीं, पुढें आदितवार आला त्या दिवशीं पारिस शहरांत जिकडे तिकडे नाच, तमाशे, होऊं लागले.

वरील समारंभ झाल्यावर थोड्याच दिवसांनीं **नान्सि** येथील फौजेनें बंड केलें. तें मोठ्या पंचाइतीनें मोडलें. परंतु त्यांतील लोक मेले त्यामुळें हलक्या लोकांत फार गवगवा झाला. सरकारानें दुष्टपणानें त्यांस मारिलें असें ते लोक ह्मणूं लागले. कित्येक वर्तमानपत्रकर्ते भलभलता मजकूर लिहीत त्यामुळें हलके लोक फरच बिघडले. **मारात्** ह्मणून एक दुष्ट राक्षसी वर्तमानपत्रकर्ता होता. 'शांतपणें विचार करून पाहतां असें दिसतें कीं, दोन लक्ष बडे लोकांचीं डोकीं कापल्याशिवाय स्वतंत्रता मिळावयाची नाहीं;' असें मजकूर छापून तो प्रसिद्ध करी. दुष्काळ मोडण्याचा उपाय तो असा सांगे कीं, दुकानें फोडून व्यापाऱ्यांस त्यांच्या दुकानां समोर फांशीं द्यावें. अशा भयंकर मजकूराचा दुष्ट परिणाम लागलाच अशिक्षित लोकांच्या मनावर होऊन देशाची भयंकर स्थिति झाली. त्यामुळें भय वाटून लोकप्रिय प्रधान **नेक्कर** हा कामाचा राजीनामा देऊन परदेशांत जाऊन राहिला. कांहीं दिवस हा लोकांस इतका आवडला होता कीं, त्यांनीं त्याच्या दाराजवळ 'सन्मान्यप्रधान' अशीं अक्षरें

लिहून पितळेचा पत्रा टांगला होता. याप्रमाणेंच दुसरे हजारों श्रीमान् लोक परदेशीं निघून गेले. देवळांचें द्रव्य राज्यव्यवस्थेस घ्यावें असें राष्ट्रसभेनें ठरविल्याबरून जे धर्माध्यक्ष नव्या नियमांस राजी नव्हते, तेही परदेशास गेले. या गोष्टींनीं राजाचा सर्व आश्रय नाहींसा झाला. तो मोठ्या संकटांत सांपडला. परदेशास गेलेले लोक फ्रान्स देशावर स्वारी करून बंडाळी मोडण्यास इतर राजांस सांगूं लागले. राजाही आपणास संकटांतून सोडविण्यासाठीं सैन्य पाठविण्याविषयीं दुसऱ्या देशांच्या राजांशीं गुप्तपणें पत्रव्यवहार ठेवूं लागला. त्यामुळें लोकांस फारच राग आला. शेवटीं लोकांच्या मूर्खपणाच्या त्रासानें व आपमतलबानें **मिराबो** राजास मिळाला. राजानें त्यास दरमहा आठ हजारांचें वेतन करून दिलें ! नंतर **मिराबोनें** राजाच्या रक्षणाविषयीं केलेले सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. पुढें त्यास लौकरच मृत्यूनें गांठिलें. **मिराबो** राजास मिळाला तरी त्याची लोक प्रियता विशेष कमी झाली नव्हती. त्याच्या मरणानें सर्वांस वाईट वाटलें. त्याच्या प्रेतावरोबर एक लाख लोक गेले होते ! याप्रमाणें या नास्तिक पण पराक्रमी पुरुषाचा शेवट झाला.

मिराबो मेल्यानंतर आश्रय नाहींसा झाल्यामुळें राजा तारीख २० जून सन १७९१ यादिवशीं रात्रीस गुप्तपणें पळून गेला. त्यास वाटलें कीं दूरच्या प्रांतांत गेलें म्हणजे तेथील लोकांची मदत आपणास मिळेल. परंतु दुर्दैवानें बंडखोर लोकांनीं त्यास ओळखून पकडून परत आणिलें; आणि जाहीरनामे लाविले कीं, राजास जो कोणी मुजरा करील, त्यास फांशीं दिलें जाईल. राजा पळून जात होता हाच त्याजवर गुन्हा ठेवून त्यास पदच्युत करून लोकसत्ताकराज्य स्थापण्याचा लोकांनीं बेत केला. हलके लोक राणीस व खाजगीकडच्या लोकांस फारच त्रास देऊं लागले. एका वेळेस राणी खिडकींत उभी होती तेव्हां खालून एका शिपायानें असें म्हटलें कीं 'तुझे डोकें कापून टाकिलें तर मला बरें वाटेल.' याप्रमाणें त्यानीं दुसऱ्याही पदरच्या लोकांस पुष्कळ पीडा दिली.

राजा परत आल्यावर राष्ट्रसभेनें एक कायदे करणारांची सभा नेमिली. या सभेंतील सभासद राष्ट्रसभेंतील सभासदां पैकीं असूं नयेत असा नियम केला होता. त्यामुळें कायदे करण्यास जो अनुभव व ज्ञान पाहिजे, तो अनुभव आणि ज्ञान ज्यांस आहे असे लोक या सभेंत असण्याची सवडच राहिली नाहीं. सभेंतील सर्व सभासद लोकसत्ताक राज्य असावें असें इच्छिणारे होते. त्या वेळेस **जाकोबिन्स्** ह्मणून एक भयंकर मसलती लोकांची मंडळी फ्रान्स देशांत होती. हे लोक नानाप्रकारच्या खऱ्या खोट्या राजाच्या जुलुमाच्या बातम्या हलक्या लोकांत उठवीत. त्यामुळें सर्व प्रजा बिघडून गेली आणि राजास पदच्युत करण्याविषयीं उघड बोलूं लागली. तारीख २० जून सन १७९२ रोजीं हलके लोक सुमारें तीसहजार राष्ट्र सभेजवळ आले. त्यांनीं राजास पदच्युत करावें असा सभेस अर्ज केला. आणि तेथून लागलींच राजवाड्यांत जाऊन जुलुमानें आंत शिरून आंतल्या लोकांस ते फारच पीडा देऊं लागले. राजाच्या खासगी खोलींत इतकी गर्दी झाली कीं, राजास वाटलें आतां आपण ठार मरतों, परंतु इतक्यांत तो उंचावर चढला, त्यामुळें वांचला. या वेळेसही तो लोकांशीं मोठ्या मनानें व शांतपणानें वागला. अमुक गोष्ट कर असें लोक ह्मणूं लागले तेव्हां तो ह्मणाला ' बाबांनो, असें करण्याची ही जागा नाहीं व ही वेळही नाहीं. ' एकजण ह्मणाला , ' लुई, भिऊंनको. ' तेव्हां राजा त्याचा हात धरून आपल्या उरावर ठेवून ह्मणाला, ' पहा बरें, मी भीत आहें किंवा नाहीं. ' रात्रीस आठ वाजण्याच्या सुमारास गर्दी कमी झाली, तेव्हां राजाच्या कुटुंबांतील माणसें एकमेकांस भेटलीं. वरील गर्दीच्या वेळेस एक तरुण मनुष्य तेथें होता. तो ह्मणाला, ' या करंट्यांपैकीं पांचशें कापून काढिले तर बाकीचे लागलींच पळून जातील. ' हेच गृहस्थ **नापोलियन बोनापार्त**. या गोष्टी आपल्या हातूनच पुढें होणार हें त्यावेळेस याच्या स्वप्नींही नव्हतें.

वर सांगितल्याप्रमाणें बंडखोर लोकांस चिथविण्याचा उद्योग

मतलबी लोकांनीं चालविला होता. शेवटीं तारीख ९ माहे अगष्ट रोजीं रात्रीस **तुलरीस** नांवाच्या राजवाड्यास बंडखोर लोकांनीं वेढा घातला. राजासही पुढील अनर्थाचीं कांहीं चिन्हें पूर्वी दिसलीं होतीं, यासाठीं त्यानें आठशें विश्वासू लढाऊ शूर लोक आपल्या रक्षणाकरितां वाड्याजवळ ठेविले होते. राणीनें खिडकींतून बंडवाल्यांची गर्दी पाहिली तेव्हां धैर्य धरून राजाच्या हातांत पिस्तूल देऊन आपण विश्वासू फौजेस धैर्य देऊन या बंडखोरांचा पराजय करावा असें सांगूं लागली; तथापि आपल्या प्रजेवर शस्त्र उगारावें हें राजास योग्य वाटेना. अहाहा ! काय थोरपणा हा ! अशा पित्याप्रमाणें पालन करणाऱ्या राजाचा लोकांनीं असा द्वेष करावा ! शिव शिव ! काय अनर्थ हा !! मनुष्याच्या दुष्टपणास सीमा नाहीं. असो. कुटुंबांतील माणसें घेऊन मोठ्या अडचणीनें राजा राष्ट्रसभेच्या जागीं गेला. राजा हातांतून सुटला असें पाहून राजाचें संरक्षण करणाऱ्या शिपायांवर हल्ला करून अति निर्दयपणें बंडखोरांनीं त्यांस कापून काढिलें.

राजा राष्ट्रसभेंत गेला तेव्हां तेथील कित्येक दुष्ट सभासद त्यास आंत घेण्यास हरकत करूं लागले. त्यांच्या मनांतलां हेतु होता कीं, येथें आश्रय मिळाला नाहीं तर आतांच बंडखोर लोक याला तुडवून टाकितील. शेवटीं वादविवाद होऊन एका बाजूस बसण्यास त्याला जागा दिली. नंतर कांहीं वेळानें त्यास एका तुरूंगांत पाठविलें. याप्रमाणें संकटानें ग्रस्त झाल्यावर राजानें दंडवत घालून परमेश्वराची प्रार्थना केली. तो म्हणाला, ' परमेश्वरा, तुझी परीक्षा फार भयंकर आहे. तींतून पार पडण्यास आम्हांस धैर्य दे. ज्या हातानें आम्हांस वारंवार सुख दिलें आहे, त्या हातास जसा आम्ही मान देतों, त्या प्रमाणेंच आम्हांस शिक्षा करून शुद्ध करणाऱ्या हातासही मान दिला पाहीजे.' नंतर राजास पदच्युत केलें आहे असा राष्ट्रसभेनें जाहीरनामा लाविला.

वर सांगितलेल्या गोष्टी होण्यापूर्वी **प्रुशिआ** व इतर कांहीं देशां-

तले राजे, व फ्रान्स देशांतून बाहेर गेलेले लोक, यांनीं लुई राजाला सोडविण्याकरितां फ्रान्स देशावर स्वारी करण्याचा बेत केला. तारीख १० अगष्टच्या गर्दी नंतर थोड्याच दिवसांनीं प्रुशिअन लोकांनी **ह्लोंग्वी** हें फ्रान्सदेशच्या सरहद्दीवरील ठाणें घेतलें. नंतर कांहीं दिवसांनीं दुसरें **वरडम** नांवाचें ठाणें घेतलें. जमलेली फौज पारिस शहरावर चाल करूं लागली तेव्हां फ्रेंच लोकांनीं युद्धाची विलक्षण तयारी केली. राजास परदेशचे लोक मदतीस येतात हें ऐकून लोक संतापानें आंधळे झाले. राजाच्या पक्षाचे असतील अशा संशयानें त्यांनी चारपांच हजार स्वदेश बांधवांची कत्तल केली. एकेवळीं त्यांनीं संशयानें चोवीस धर्माधिकाऱ्यांचे तुकडे केले. कायदे करणाऱ्या मंडळीपैकीं कित्येक कमी दुष्ट होते त्यांनीं हे अनर्थ होऊं नयेत म्हणून कांहीं यत्न केला; परंतु तो व्यर्थ झाला. ज्या कोणाचा राजास अनुकूल असण्याविषयीं संशय आला, त्याला ठार केलाच. याप्रमाणें हजारों लोक मृत्यूच्या तडाक्यांत सांपडले. हे सर्व वाचल्या बरोबर अंगावर कांटा येण्यासारखे अनर्थ, ख्रिस्ती शकाच्या अठराव्या शतकासारख्या सुधारणेच्या काळांत, पृथ्वीचा सुधारलेला भाग जो युरोपखंड, त्यांतील पूर्ण सुधारलेल्या देशांत, सर्व सुधारणेचें फळ जें स्वतंत्रता तिच्या नांवानें झाले. भलत्याचवेळीं भलत्याच उपायांनीं चांगल्या गोष्टी इच्छणाऱ्यांनीं या गोष्टी पक्क्या ध्यानांत ठेवण्या सारख्या आहेत. दोन मनुष्यांच्या स्वभावामध्यें जसें फार अंतर असतें तसेंच दोन देशांच्या लोकांत अंतर असतें. ही गोष्ट सृष्टीमध्यें मोठी लक्षांत आणण्याजोगी आहे. इंग्लंद आणि फ्रान्स हे दोन्ही देश सुधारणेच्या कामांत अग्रगण्य. दोहोंतीलही लोक विद्वान् व शूर सारखेच. दोन्हीही हिंदुस्थानांत राज्य स्थापण्यास यत्न करित होते. इंग्लिश लोकांचा विचारानें धिरे धिरे पण खात्रीनें हातीं घेतलेलें काम तडीस नेण्याचा स्वभाव आणि फ्रेंच लोकांचा उतावीळ स्वभाव आहे: ह्या उतावीळ स्वभावामुळें फ्रेंचलोकांचें फार नुकसान झालें. इंग्लिश लोकांस पहिल्या **चार्लसाच्या** वेळेस राजाच्या कराचा वगैरे जुलूम वाटला,

त्यावेळेस त्यांनीं आपल्या राजाचा वध केला. परंतु त्यांच्या विचारी स्वभावामुळें राज्यक्रांतीच्या वेळेस प्रजेस पीडा होते ती झाली नाहीं. फ्रेंच लोकांनीं उतावीळ होऊन पूर्वीच्या राजांच्या जुलुमांकरितां दयाळू राजाची व त्याबरोबर निरपराध प्रजेची कत्तल केली. दुप्लीच्या वेळेस हिंदुस्थानांत फ्रेंच लोकांचें महत्व पुष्कळ असून तें सर्व नष्ट होऊन त्यांचें नांव देखील येथें राहिलें नाहीं. इंग्लिशांस आरंभीं राज्याची बगैरे आशा नव्हती परंतु त्यांनीं धिम्मेपणानें व शांतपणानें हिंदुस्थानांत सार्वभौमत्व स्थापून आपल्या देशास अनेक फायदे करून घेतले. यावरून हें लक्षांत येईल कीं, राज्यकर्त्ते व स्वदेशाभिमानी अशा पुरुषांच्या अंगीं मोठें शाहाणपण, मोठा विचार, मोठा धिम्मेपणा, हे गुण असणें आवश्यक आहे, नाहींतर ते आपला व लोकांचा नाश करून घेतील.

वर सांगितलेले अनर्थ झाल्यावर राष्ट्रसभेनें फ्रान्स देशांत लोकसत्ताकराज्य झालें असे जाहीरनामे लाविले, आणि प्रजेवर जुलूम केल्याबद्दल न्यायसभेपुढें राजाची चौकशी चालविली. राजावर पुष्कळ खोटे दोषारोप केले त्या सर्वांचीं उत्तरें राजानें धैर्यानें दिलीं,परंतु तारीख १० अगष्ट रोजीं प्रजेचा रक्तपात केल्याचा खोटा दोषारोप राजानें ऐकिला तेव्हां त्यास मोठाच गहिंवर आला. राजानें वकील देण्याची परवानगी मागितली ती दिल्यावर राजानें एका प्रसिद्ध वकिलास आपला खटला चालविण्यास सांगितलें. त्यानें निर्लज्जपणानें नाहीं म्हणून सांगितलें. नंतर राजाज्या पूर्वीच्या एका प्रधानानें उपकार स्मरून संकटकाळीं त्यास सोडूंनये असें मनांत आणून दुसरे उत्तम वकील मदतीस घेऊन काम चालविलें. वकिलांनीं उत्तम भाषणेंकरून राजा निर्दोषी आहे, असें सिद्धकरून दाखविलें, तथापि सभेंतील लोकांच्या पक्षपातानें राजा बहुमतानें दोषी आहे असें ठरलें. नंतर राजास देहांत शिक्षा करावी अथवा जन्मठेप द्यावी अथवा हद्दपार करावें याविषयीं सभेंत वादविवाद सुरू झाला. त्यांतही देहांत शासनाची शिक्षा ठरली. देहांत शासनाविषयीं मतें देणाऱ्यांत राजाच्या जवळ

चा एक आप्त होता. त्याचें क्रूर कर्म पाहून तशा विवडलेल्या लो कांच्याही अंगावर शाहारे आले. शिक्षा कांहीं दिवसांनंतर अमलांत आणावी याविषयीं पुष्कळांनीं खटपट केली, तथापि चोवीस तासां च्या आंत राजाचा शिरच्छेद करावा असें शेवटीं ठरलें- ही गोष्ट ऐकून राजाच्या कुटुंवांतील माणसांची काय अवस्था झाली असेल! हें मनांत आणणें देखील फार भयंकर आहे. राजा, राणी, राज पुत्र, व राजकन्या, हीं एकत्र दुःख सागरांत निमग्न डोऊन मृतप्राय बसलीं. त्यांच्या मुखावाटे शब्दसुद्धां उमटेना. त्यांची ती अवस्था पाहून तशा लोकांपैकींही कित्येकांच्या छात्या दुःखानें फुटल्या. तारिख २१ जान्युआरी सन १७९३ रोजीं राजास शिरच्छेदाच्या जागीं नेलें. राजाचें त्यावेळेचें धैर्य पाहून त्याच्या शत्रूंससुद्धां आश्चर्य वाटलें. वधस्थानीं गेल्यावर त्यास लोकांस कांहीं सांगावयाचें होतें, पण शत्रूंनीं वाद्यें वाजविण्यास सांगून तोही त्याचा मनोरथ भग्न के ला नंतर लागलींच शिरच्छेद करणाऱ्यानें राजाचें डोकें तोडून उंच करून दाखविलें! शिवशिव! असें हें अतिनीच, अति क्रूर आणि मनुष्यपणास अयोग्य, ऐकून सुद्धां पाषाणहृदय मनुष्यास देखील द्रव आणणारें कृत्य पाहून **जाकोबिन्स्** नांवाच्या इर्द्रीतील लोकांस वरें वाटलें. 'काम झालें' असें म्हणून एकमेकांस ते टाळी देऊं लागले. दांतन् म्हणून एक मनुष्य होता तो म्हणाला, 'युरोपांतले राजे ज मून आम्हांस भय घालितात, त्यांपुढें आम्ही हें राजाचें डोकें फेंकून देतों.' याप्रमाणें सोळावा लुई या गुणवान् दुर्दैवी राजाचा अंत झाला. त्यावेळेस त्याचें वय अठतीस वर्षांचें होतें. त्यामध्यें क्षणिकबुद्धि हा मोठा दुर्गुण होता. हाच बहुतांशीं त्याच्या नाशास कारण झाला, असें बहुतांचें मन आहे. असो.

राजाचा वध झाल्यावर आपण पुढारी होऊं असें कित्येक दुष्टांस वाटत होतें. परंतु महापापाचें फळ कधीं कधीं फार त्वरित येतें, त्याप्रमाणें राष्ट्रसभेत अनेक पक्ष, व अनेक मतभेद होऊन शत्रुत्व वाढून यादवीप्रमाणें परस्परांच्या नाशाची लोक तजवीज करूं

लागले. त्यांत मागें सांगितलेले **मारात्**, **दांतन्**, व आणखी एक **राबिस्पियर** म्हणून मनुष्य होता, हे तीन स्वदेशबांधवांच्या रक्तांच्या नद्या वाहविण्यास कारण झांले. मनुष्याचें मन कसें पालटतें यास **राबिस्पियर** हें एक अप्रतिम उदाहरण आहे. हा पूर्वी न्यायाधीश होता, त्यावेळेस एका मनुष्यास देहांत शिक्षा करण्याची वेळ आली म्हणून यानें आपल्या कामाचा राजीनामा दिला. अंगीं वक्तृत्वशक्ति चांगली असल्यामुळें राज्यक्रांतीच्या वेळेस यास मोठा अधिकार मिळाला, तेव्हां ज्यांस उपमा नाहीं, अशीं अत्यंत घोर कर्में यानें केलीं. हजारों मनुष्यांचे प्राण यानें विनाकारण घेतले.

वर सांगितल्याप्रमाणें राज्यक्रांति झाल्यावर पारिस शहरांत मोठा दुष्काळ पडला. त्यामुळें लोकांनीं आणखी बंडें केलीं, पुष्कळ कत्तली झाल्या. **जिरांदिस्त्** व **माउंतेन्** हे दोन पक्ष होते. त्यांपैकीं **जिरांदिस्त्** पक्षाचे बहुतेक लोक नाहींतसे झाले. विरुद्ध पक्षाचा **मारान्** याच्या लिहिण्यानें देशांत फार रक्तपात झाला असें वाटून दुरून एक बाई संतापून **पारिस** येथें आली. तेथें आल्यावर कांहीं निमित्तानें **मारात** याच्या घरीं जाऊन त्याच्या पाठींत सुरी खुपसून तिनें त्याचा जीव घेतला; आणि हजारों मनुष्यांचे जीव वांचविण्या करितां व.देशास शांतता देण्याकरितां दुष्ट राक्षसास मारिलें; असें चवकशीच्या वेळेस उत्तर देऊन धैर्यानें फांशीं गेली. याप्रमाणें दोघांसही कृतकर्माची शिक्षा झाली.

जिरांदिस्त् पक्षाचा विध्वंस झाल्यावर **माउंतेन्** पक्षाचे लोक फारच अनर्थ करूं लागले. त्यांनीं हजारों दुष्ट न्यायाधीश नेमून लोकांची चौकशी चालविली. न्यायाधीशांनीं पाहिजे त्या कृत्यास अपराध म्हणून पाहिजे ती शिक्षा करावी. 'लोकसत्ताकराज्य चालणार नाहीं' एवढें म्हटलें तरी मनुष्यास मोठी शिक्षा होई. **फोकिअर** म्हणून एक सरकारी कामदार होता, त्यास मनुष्य हें नांवसुद्धां देतां येत नाहीं. जुन्या कल्पित कांदबरींतील गोष्टींतल्या दुष्ट राक्षसां-

स मार्गे सारणरा हा प्राणी होता. त्याच्या दुष्टपणाची गोष्ट खरी सु-
द्धां वाटणें कठिण. तरुण, रूपवान्, शूर, गुणवान्, कुलीन, ज्ञानारे-
अशा हजारों मनुष्यांस त्यानें मृत्यूच्या मुखांत दिलें! कोणीं कशीही
विनवणी केली तरी त्याच्या पाषाणहृदयास दयेचा द्रव येत नसे.
आरोपी गुन्हेगार ठरला ह्मणजे यास आनंद होई, आणि दोषमुक्त
झाला तर त्यास पराकाष्टेचें दुःख होई. तो ह्मणे, मनुष्यांच्या दुःखाशिवा
य कोणत्याही गोष्टीनें मला मौज वाटत नाहीं. त्या दुष्ट न्यायाधीशांनीं
राणीलाही न्यायसभेपुढें आणून अनेक खोटे दोषारोप करून चौकशी
चालविली. राजा मेल्यावर तिला मुलांसहवर्तमान सक्त कैदेंत ठेवि-
लें होतें. तेथें लोकांनीं तिचे फार हाल केले. तिला नानाप्रकारच्या
शिव्या द्याव्या, खावयास अगदीं वाईट थोडें अन्न द्यावें, नेसावया-
स जाडें भरडें वाईट वस्त्र, जवळ लहानसा दिवा, याप्रपाणें तिचे हा-
ल केले. सुग्रास अन्न, उत्तम रेशमी वस्त्रें, सोन्यारुप्याचे दिवे, असें
ज्या महाराणीचें ऐश्वर्य, तिची ही दशा! शिवशिव! ऐहिक ऐश्वर्य कि-
ती क्षणभंगुर आहे! असो. चवकशीच्या वेळेस जे जे खोटे भयंकर
आरोप केले, ते सर्व ती शांतपणें ऐकत होती, तरी नवऱ्याचें नांव नि-
घालें ह्मणजे तिचा गर्हिवर रहात नसे. शेवटीं तिलाही फांशीची शि-
क्षा ठरून तारीख १६ अक्टोबर सन १७९३ रोजीं तिचा वध केला.
राजपुत्रास एका चांभाराचे स्वाधीन केलें. चांभारानें विचारिलें कीं,
या लांडग्याच्या पोराचें काय करूं? कापून काढूं, विष घालूं, किंवा
उपाशीं मारूं? असें विचारिलें तेव्हां, कांहीं नाहीं तुला पाहिजे तें तूं
कर, ह्मणून सांगितलें. नंतर हा राजबाल नानाप्रकारच्या मारांच्या व
भुकेच्या हालांनीं वेडा होऊन मरण पावला. एवढ्या लहान वयांत
देखील तो मोठा सद्गुणी होता असें दिसत होतें. त्या दुष्ट चांभारानें
एके दिवशीं त्यास विचारिलें, 'कदाचित् तूं पुन्हा फ्रान्सच्या गादीवर
बसलास तर माझें काय करशील,' राजपुत्र ह्मणाला, 'मी तुला माफी
देईन.' नंतर जे अनेक प्रसिद्ध लोक प्रथम लोक सत्ताकराज्य
असावें असें ह्मणत होते, ते या भयंकर परिणामास वाईट ह्मणूं

लागले, ह्मणून त्यांवर ही कांहीं तरी दोष आणून त्यांस देखील त्या दुष्ट न्यायाधिशांनीं देहांत शासनें दिलीं. या काळास इतिहासामध्यें ' भयाचें राज्य ' असें ह्मटलें आहे. या प्रमाणें रक्तस्रावाचें काम सुरू असतां नास्तिकपणाचा कळस होत चालला. मोठमोठ्या सभांतून वक्ते ' मी नास्तिक आहें ' असें ह्मणूं लागले. कित्येक धर्माधिकाऱ्यांनीं धर्म, देव, वगैरे हीं सर्व थोतांडें आहेत, आजपासून हा आह्मी खोटसाळ धंदा सोडून दुसऱ्या चांगल्या मार्गास लागतों ह्मणून राष्ट्रसभेस लिहून पाठविलें. त्यांची लोक फार रतुति करीत. जिकडे तिकडे समता आणि स्वतंत्रता या शब्दांचा पोकळ घोष होऊं लागला. देवळांच्या मालमत्ता होत्या त्या लुटून फस्त झाल्या. देवळें व्यापारांच्या जागा झाल्या. देवळांतल्या घांटा ओतून त्यांच्या तोफा केल्या. मोठाल्या इमारतींवरून, ' मृत्यू हाच मोक्ष.' अशीं अक्षरें लिहिलीं. लग्न ही एक इतर व्यवहारासारखीच गोष्ट आहे, यांत धर्मसंबंध कांहीं नाहीं असें ठरलें. त्यामुळें पाहिजे तेव्हां घटस्फोट होऊं लगले. आदितवार धर्मसंबंधाचा दिवस मोडून प्रत्येक दहावा दिवस सुटीचा व विश्रांतीचा ठरला. याप्रमाणें अनेक गोष्टी घडल्या त्या लिहिण्यासहुद्धां कंटाळा येतो.

वस्तुतः याग्रंथाच्या संबंधानें वरील राज्यक्रांती विषयींचा लेख जरा लांब झाल्यामुळें विषयांतरासारखें वाटेल. परंतु तसें केल्याशिवाय उपाय नाहीं. **नापोलियन** याविषयीं परस्परांस अगदीं विरुद्ध अशीं अनेक मतें आहेत. कित्येक त्यास मोठा शूर, मोठा दयालु, मोठा बुद्धिमान्, मोठा पराक्रमी, मोठा शहाणा, असें ह्मणणारे आहेत. कित्येकांचे मतें **नापोलियन** याची उगीच लोक मोठी स्तुति करितात. कित्येक तो फार दुष्ट होता असें ह्मणतात. याकरितां **नापोलियन** याचें चरित्र चांगलें समजण्यास व तो कसा होता हें मनांत आणण्यास त्या वेळच्या देशस्थितीचा व लोस्थितीचा पूर्ण विचार केला पाहिजे. नाही तर एक तर्फी मनाचा कांहीं तरी ग्रह होईल. यासाठीं प्रसंगानें वर सांगितलेली गोष्ट थोडयांत सांगून मग प्रकृत विषयाकडे वळूं.

फ्रान्सदेशांतून बाहेर गेलेले लोक लुई राजास सोडविण्याकरितां फ्रान्स देशावर स्वारी करण्यास सांगतहोते; हें मागें लिहिलेच आहे. इकडे फ्रेंच लोकांनीं असें केलें कीं, कोणत्याही देशांतलें लोक राजाच्या जुलुमांतून सुटून स्वतंत्र होण्यास इच्छित असल्यास फ्रेंच लोक त्यांस साहाय्य करितील, अशा अर्थाचा युरोपांतील सर्व भाषांत जाहीर नामा प्रसिद्ध केला. तेव्हां इतर देशांत सुद्धां लोक बिघडून बंडें होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. तेव्हां जे युरोपांतील राजे फ्रान्स देशाच्या कामांत हात घालीत नव्हते, ते सर्व स्वसंरक्षणाकरितां एकत्र झाले. **रशिया, स्पेन, आस्त्रिया, प्रुशिया, सार्दीनिया, नेपल्स,** आणि **इंग्लंद,** इतकीं राज्यें एकत्र होऊन फ्रान्स देशाशीं लढाया करूं लागलीं. या ज्या सर्व लढाया झाल्या, त्याच **नापोलियन** याच्या वैभवरूप सूर्याच्या उदयास्तास कारण होत. यांत वरील देशांपैकीं कित्येकांचा **नापोलियन** यानें अगदीं चुराडा केला. **नापोलियन** यापासून कांहीं तरी मोठी पीडा झाल्याशिवाय यापैकीं एकही देश सुटला नाहीं. या गोष्टी पुढें येतीलच, असो.

युरोपांतील सर्व राष्ट्रांशीं फ्रेंच लोकांस लढाई करण्याचा प्रसंग आला तरी ते हटले नाहींत. सर्व देशांतील पुरुष, बायका, मुलेंसुद्धां युद्धाच्या तयारीस लागलीं. हत्यारें व दारूगोळा तयार करण्याकरितां शेंकडों कारखाने घातले. पैशाचा तोटा आल्यामुळें सरकारानें कागदाचें नाणें सुरू केलें. जे लोकसत्ताक राज्यास प्रतिकूल होते, त्यांचें द्रव्यहरण केलें. शिवाय प्रसंग पडेल तेव्हां लोकांनीं सैन्यास लागेल तो जिन्नस पुरवावा असेंही ठरविलें. देशांत धुमाळी चालली असल्यामुळें कोणाचा जीव केव्हां जाईल याचा नियम नव्हता, त्यामुळें लढाईतच काय होईल तें होवो, असें म्हणून सर्व लोक लढाईस जाण्यास तयार होते. यामुळें सर्व देश जसा मोठाथोरला लष्कराचा तळच आहे कीं काय, असें दिसूं लागलें. जे कित्येक प्रांतांतले व शहरांतले लोक राजपक्षास अनुकूळ असल्यामुळें परकीय राजांनीं येऊन देशांतली बंडाळी मोडावी असें इच्छित होते, त्यांवर शस्त्र धर-

ल्यामुळें फ्रेंच लोकांत परस्पर लढाया उत्पन्न झाल्या. या लढायांतही लोकसत्ताक राज्याची इच्छा करणाऱ्यांनीं स्वदेश बांधवांची मोठी कत्तल उडविली. एका प्रांतांतील लोक धैर्यानें लढल्यामुळें संतापून शत्रूंनीं त्यांच्या अनेक गांवांस बाहेरून आग लावून हजारों मनुष्यें, गुरेंढोरें वगैरे, जागच्या जागीं जाळून टाकिलीं. याचप्रमाणें **लिआन्स** या प्रसिद्ध शहरावर कहर गुदरला. तेथील लोकांनीं लोकसत्ताक राज्याच्याविरुद्ध वर्तणूक केल्यामुळें राष्ट्रसभेनें, तें शहर फस्त करून टाकावें, असें ठरविलें. याकारणानें तेथें असे अनर्थ झाले कीं, ते वाचण्यास सुद्धां क्षणभर वाघाच्या मनासारिखें क्रूर मन केलें पाहिजे. **ग्युलताईन** म्हणून जें देहांत शिक्षा करण्याचें यंत्र फ्रान्स देशांत चालू होतें, ज्याच्या योगानें हजारों मनुष्यांचे प्राण गेले, तें सुद्धां पुरेनासें झालें. तेव्हां आणखी एक यंत्र एका दुष्ट मनुष्यानें तयार केलें. त्याच्या योगानें एकदम शेंकडों मनुष्यें उभीं करून कापून काढण्यास सांपडत. **लिआन्स** शहर फस्त केलें, तेव्हां तेथें जे दोन अधिकारी होते, त्यांस दैत्य, राक्षस, यांचीसुद्धां उपमा देतां येत नाहीं. कारण दैत्यास आपल्या लोकांची तरी करुणा असते. माणसें मारण्याच्या गर्दीत यांच्या कडलेच दोन शिपायी मारण्याच्या यंत्राशीं कोणीं चुकून बांधिले. हें एका अधिकाऱ्यास कळलें तेव्हां तो म्हणाला 'हः त्यांत काय, दोन माणसांची बिशाद काय, ते आज मेले तर त्यांस उद्यां मरावयास नको.' **नांतीस** या शहरीं असाच अनर्थ झाला. तेथल्या अधिकाऱ्यानें कत्तलीस कंटाळून नवीन तोड काढिली ती अशी कीं, पुरुष, बायका, मुलें, शें दोनशें एकदम गलबतांत भरावीं आणि **लायर** नदींत नेऊन मध्य रात्रीस भराभर आंत फेंकून द्यावीं. हा अनर्थ इतका माजला होता कीं, या दुर्दैवी प्राण्यांच्या मरणकालच्या ओरडण्यानें भोंवतालच्या प्रांतांतले लोक जागे होत. या नदींत इतकीं माणसें मेलीं कीं, तींतील पाणी नासून मासेसुद्धां मरून गेले. याप्रमाणें ज्यांस घोर, भयंकर, क्रूर, अंगावर कांटा आणणारे, राक्षसी, हीं विशेषणेंसुद्धां पुरत नाहींत, असे अनर्थ पाहून लोक कंटाळले.

आतां आहों परंतु क्षणानें काय होईल कोणजाणें, असें सर्वांस वाटूं लागलें. त्यामुळें लोकांच्या मनाची स्थित्ति पुन्हा बदलली. जे नास्तिक, दुष्ट, घातुक, मनुष्य आपल्या लिहिण्यानें व बोलण्यानें रक्तपातास कारण झाले होते, त्यांचें खरें स्वरूप कळून हेच देशाचे शत्रु आहेत, असें लोकांस वाटूं लागलें. कधीं कधीं या हातावरचें फळ या हातावर, असें होत असतें; त्याप्रमाणें या दुष्ट लोकांत परस्पर भांडणें लागून एकामागून एक सर्व असामी जे न्यायाधीश त्यांनीं नेमिले होते, त्यांच्या हातूनच देहांतशिक्षा पावले. **मारात्, दांतन् राबिस्पियर**, या तिघांपैकीं **मारात्** यास एका बाईनें पाठींत सुरी भोंसकून मारिलें हें मागें सांगितलेंच आहे. एकेवेळेस **दांतन्** यानें पुष्कळ मनुष्यें विनाकारण मेलीं, असें **राबिस्पियर** याजवळ झटल्यामुळें **राबिस्पियर** यास राग येऊन त्यासही त्यानें देहांतशिक्षा करविली. कांहीं दिवस लोक **राबिस्पियर** यास वाघासारखे भीत होते. तो म्हणेल तो कायदा असें झालें होतें.

फ्रेंच लोक इतके कांहीं विलक्षण आहेत कीं, हजारों मनुष्यें पारिस शहरांत मरत होतीं तरी नाटकगृहांत नाटकांची गर्दी चालूच होती. चार घटकेनें फांशी जाणारे लोकसुद्धां तुरुंगांत खुशाल गाणें वजावणें करीत वसत. शेवटीं दुष्काळानें व **राबिस्पियर** याच्या जुलुमानें लोक फार त्रासले. सुंदर **पारिस** शहर स्मशानासारिखें व त्यांतील आनंदी लोक सुतक्यांसारखे दिसूं लागले. जवळ चांगलें वस्त्र असलें तरी कोणी आंगावर घेईना. कारण अमक्याजवळ पैसा आहे असें कळलें कीं, त्यावर कांहीं तरी किटाळ येऊन डोकें जाण्याचा प्रसंग यावयाचाच. याप्रमाणें कित्येक शेटसावकार मेले. व त्यांमुळें बाकीचे दिवाळीं काढून भिकारी होऊन बसले. शेवटीं राबिस्पियर यासही आपल्या जीवाचें भय वाटूं लागलें. लोक शिरच्छेदास भिऊन त्यास हितकर्त्ता, अवतारी, अशीं विशेषणें देत, तथापि नास्तिक्याचा भयंकर परिणाम त्यास कळूं लागला. त्यामुळें कांहीं तरी धर्म असणें अवश्य आहे, असें त्यास वाटूं लागलें. दिव

मेंदिवस लोकांसही त्याचें पूर्ण स्वरूप कळूं लागलें. सुमारें सव्वा महिन्यांत बारा तेराशें माणसांस देहांत शिक्षा झाल्या. रक्त वाहून जाण्याकरितां चर खणिला होता. **राबिस्पियर** याच्या खिशांत कांहीं कागदपत्र होते ते राष्ट्रसभेंतील एका सभासदास सांपडले. त्यांत कोण-कोणास फांशी देण्याचा उद्योग करावयाचा तें लिहिलें होतें. त्यामुळें सभेंत गवगवा होऊन **राबिस्पियर** यास पकडिलें. त्यानें जीव वांच-विण्याकरितां लोकांचीं पुष्कळ आर्जवें केलीं तरी तीं व्यर्थ झालीं. तुरुंगांत असतां आत्महत्या करावी ह्मणून त्यानें अंगावर पिस्तूल उ-डवून घेतलें, तेंही चुकलें. शेवटीं तो, त्याचा भाऊ, व त्याचे मित्र, यांस देहांत शिक्षा ठरली. तुरुंगांतून शिरच्छेदाच्या जागीं त्यास चाल-विलें तेव्हां लोक नानाप्रकारच्या शिव्या त्यास देत होते. त्यानें डोळे मिटून धरिले होते. त्यामुळें एक बाई जवळ जाऊन ह्मणाली, 'तूं माझ्या आप्तांचा प्राणनाश करणारा आहेस ह्मणून तुझ्या मरणानें म-ला आनंद होतो. फ्रान्स देशांतील प्रत्येक आईच्या व प्रत्येक बा-यकोच्या शिव्या खात वधस्थानीं जा.' दुसरा एक मनुष्य ह्मणाला, 'राबिस्पियर देव आहे बरें देव आहे.' **राबिस्पियर** याच्या मरणाने केवळ फ्रान्स देशासच नव्हे, परंतु सर्व युरोपखंडास आनंद झाला. याप्रमाणें स्वतंत्रतेकरितां फ्रेंच लोकांनीं केलेल्या उद्योगाचा भयंकर परिणाम होऊन शेवटीं **नापोलियन बोनापार्त** यानें राजसत्ताकराज्य स्थापिलें, याविषयीं वर्णन पुढें येईल.

भाग ४ था

फ्रान्स देशांतील राज्यक्रांतीच्या घोंटाळ्यांत **नापोलियन** यानें लोकांचा पक्ष स्वीकारिला हें मागें सांगितलेंच आहे. **नापोलियन** हांच्या पक्षाचा होता तरी, तो मागें सांगितलेल्या दुष्टलोकांच्या नाच कृत्यांस वाईट मानीत असे. या वेळेस तो अगदीं गरिबींत हो-

ना. एकदां त्यास पैशाची इतकी अडचण पडली होती कीं, त्या आपलें घड्याळ गहाण टाकिलें. त्यावेळेस याचा वेत असा होत कीं, लोकांचीं घरें आपण भाड्यानें घेऊन अधिक भाड्यानें लाव कांहीं पैसा मिळवावा. या वेळेसच **कोर्सिका** बेटांतील लोक फ्रें लोकांच्या अमलांतून सुटून स्वतंत्र झाले. त्यामुळें **नापोलियन** या स्वदेशाशीं लढाई करावयास जावें लागलें. त्या लढाईंत त्याचे वरेच हा झाले. कांहीं दिवस त्यास नुसतें घोड्याचें मांस खाऊन रहावें ला लें. या लढाईंत **नापोलियन** याच्या आंगचें युद्धकौशल्य वरें दिसून आलें. फ्रान्स देशांत बंड झालें तेव्हां मागें सांगितलेला **पओली** इंग्लंदच्या मदतीनें **कोर्सिकाबेट** पुनः स्वतंत्र करण्यास पहात हो ता. **नापोलियन** यानें आपणास मिळावें ह्मणून त्यानें पुष्कळ खट पट केली, परंतु ती व्यर्थ गेली. **नापोलियन** ह्मणे, **कोर्सिकाबेट** फारच लहान, त्यास स्वतंत्र राहतां येणार नाहीं. **इंग्लंद** किंवा **फ्रान्स** यांपैकीं कोणाच्यातरी अमलांत रहावें लागणार तर फ्रान्सच्या अमलांत राहण्यांत त्याचें हित आहे. शेवटीं **बोनापार्ता**च्या सर्व कुटुंबास **कोर्सिका** येथून घालवून लाविलें. **नापोलियन** याची आई व बहिणी पुष्कळ दिवस दरिद्रावस्थेंत **मार्सेल्स्** या शहरांत राहि त होत्या.

तूलों शहरांतील लोकांनीं लोकसत्ताकराज्यांत बंड केलें होतें, हें मागें सांगितलेंच आहे. त्या लोकांस इंग्लिश लोकांची मदत होती. व त्यांची जागाही लढाईस सोईची होती. **तूलों** येथील बंडखोरांचा पराभव करण्यास राष्ट्रसभेनें फौज पाठविली. तींत **नापोलियन** होता. **तूलों** येथें पुष्कळ मोठाल्या हद्दाया झाल्या तरी ते लोक हटले नाहींत. मुख्य अधिकारी होते त्यांच्यापुढें **नापोलियन** याचें कांहीं चालेना त्यामुळें वेढा पुष्कळ दिवस लांबणीवर पडून शेवटीं उठणार होता, परंतु **नापोलियन** यानें धैर्यानें व युक्तीनें इंग्लिश लोकांस पळावयास लावून शहर हस्तगत केलें. या भयंकर युद्धांत **नापोलियन** याच्या मांडीस गोळी लागली; तेव्हां **ब्यूरन**

नांवाच्या शूर मनुष्यानें त्यास उचलून नेलें. तूलों येथील जयाचें सर्व यश **नापोलियन** यास असतां राष्ट्रसभेस लढाईची हकीकत कळविणाऱ्यांनीं त्याचें नांवसुद्धां लिहिलें नाहीं. जे अधिकारी भिऊन पळण्याच्या बेतांत होते, तेच आपलीं नांवें पुढें करूं लागले. तथापि शेवटीं **नापोलियन** याचा पराक्रम राष्ट्रसभेस कळला. तूलों येथें मागून जे भयंकर अनर्थ झाले, त्यांत **नापोलियन** याचा कांहीं संबंध नव्हता. त्याच्या हातीं असतें तर त्यानें असे घोर अनर्थ होऊं दिले नसते. पण त्याचें कांहीं चालेना. पुष्कळ रहिवासी लोक घरेंदारें सोडून इंग्लिशसैन्याबरोबर पळून गेले. बाकीच्यांची हकीकत मागें आलीच आहे. राजपक्षाच्या लोकांचीं कांहीं माणसें पळून जात होतीं, त्यांस पकडून सैन्यांतील लोक ठार मारण्यास तयार होते. त्यांस **नापोलियन** यानें सांगितलें कीं, माझ्या ताब्यांत द्या, उद्यां त्यांस पुष्कळ लोकांदेखत देहांत शासन करूं. असें म्हणून त्यांस आपले ताब्यांत घेऊन रात्रीस हळूच युक्तीनें पळवून लाविलें. यावरून **नापोलियन** क्रूर नव्हता असें दिसतें. या लढाईतच **नापोलियन** युद्धाची तयारी करीत असतां त्यास कांहीं मजकूर लिहून पाठवावयाचा होता म्हणून त्यानें एका **जूनो** नांवाच्या हातारवालच्या कामदारास हाक मारून तो त्यास लिहावयास सांगितला. तो लिहीत असतां तोफेचा गोळा जवळ येऊन पडला, त्यामुळें पुष्कळ धूळ उडाली. हें पाहून तो हंसून म्हणाला, 'बरेंच झालें, वाळू घालावयास नको.' हें बोलणें ऐकून **नापोलियन** यास आश्चर्य वाटलें. पुढें त्यानें **जूनो** यास मोठ्या पदास चढविलें. या लढाई नंतर **जूनो** यानें आपल्या बापास असें लिहिलें कीं, 'आमच्या नव्या सेनापतीसारखे मनुष्य जगांत फारच थोडे उत्पन्न होतात. असला मनुष्य शेकडों वर्षांनीं पृथ्वीवर एकादा जन्मतो.' **डूरोक** म्हणून एक **नापोलियन** याच्या प्रीतींतला सरदार होता, त्याचा व **नापोलियन** याचा याच लढाईंत चांगला परिचय झाला.

तूलों येथील लढाईनंतर **नापोलियन** याची भरभराट होऊं ला-

गली. त्याच्या युद्धकौशल्याची व शौर्याची चोहींकडे कीर्ति झाली; तेव्हां त्यास मोठी जागा देऊन इतालीं देशांत फ्रेंच लोकांचें सैन्य पाठविलें. या सैन्यासही **नापोलियन** याच्या युक्तीनें पुष्कळ ठिकाणीं जय मिळाला. **सार्डीनिया** येथील लोकांचा अगदीं पराभव झाला; व कित्येक शहरें लढाईच्या सामानासुद्धां फ्रेंच लोकांस मिळालीं.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें **राबिस्पियर** यास मारिल्यावर त्याच्या प्रतिपक्षाच्या लोकांस **नापोलियन** याचाही संशय येऊं लागला. कारण **राबिस्पियर** याचा भाऊ व **नापोलियन** यांचा स्नेह होता. या संशयावरून **नापोलियन** यास कैदेंत टाकिलें. फ्रान्स देशाची स्थिति मागें सांगितल्याप्रमाणें असून कोणाचें डाव केव्हां जाईल याचा नेम नव्हता. त्यामुळें आपापल्या घरांत बसलेले लोकही काळजींत असत. असें असून यावेळेस कैदेंत असतां **नापोलियन** यानें कोणते रीतीनें काळ घालविला, तें कळल्यावर कोणासही विलक्षण आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाहीं. एकेदिवशीं तुरुंगाचा अधिकारी **नापोलियन** काय करीत आहे हें पाहण्यास गेला, तेव्हां त्याच्या दृष्टीस असें पडलें कीं, **इतालीं** देशाचा नकाशा पुढें घेऊन त्याचें सैन्य नेण्यास सोईच्या मार्गाची योजना करण्यांत **नापोलियन** याचें मन गढून गेलें आहे! एकेदिवशीं संध्याकाळीं कांहीं चैनपडेना म्हणून एकादें चांगलेंसें पुस्तक वाचायास मिळावें म्हणून **नापोलियन** इकडे तिकडे पाहत होता तों तेथें त्यास एक रोमन लोकांच्या दिवाणी कायद्याचें पुस्तक सांपडलें. तेंच त्यानें लक्षपूर्वक वाचिलें आणि त्यांत ध्यानांत ठेवण्यास कठिण अशा अव्यवस्थित रीतीनें मजकूर जुळलेला आहे असें जेथें वाटलें, तेथें आपल्या सोईप्रमाणें जुळणी करून सर्व कायद्यांचा उत्तम अभ्यास केला. प्रसंगाचा उपयोग करण्याचें हें विलक्षण उदाहरण सर्वांनीं ध्यानांत धरण्यासारखें आहे. **नापोलियन** ह्यानें बादशाहा झाल्यावर जेव्हां विलक्षण मोठें व सर्वोत्कृष्ट कायद्यांच्या संग्रहाचें पुस्तक तयार केलें, तेव्हां हें ज्ञान त्याच्या फार उपयोगीं पडलें. त्यावेळेस **नापोलियन** याची कायद्यांत निपुणता पाहून मो-

ठमोठ्या निष्णात पंडितांस सुद्धां अचंबा वाटला ! शेवटीं तुरुंगांत कंटाळून **नापोलियन** यानें अधिकाऱ्यांस अर्ज केला कीं, 'तुम्ही स्वदेशाभिमानी म्हणविता, आणि तुमच्या देशास उपयोगीं पडणाऱ्या वीराचे असे हाल करितां ?' या अर्जावरून **नापोलियन** मुक्त झाला; आणि पारिस शहरीं गेला. तेथें गेल्यावर त्यास **लाव्हेंदी** येथील बंडवाल्यांवर फौजपाठविली तिचा अधिकार देत होते; परंतु स्वदेशीय लोकांवर शस्त्र धरणें अयोग्य असें समजून ती जागा त्यानें नाकारिली. त्यास तोफखान्यावर मोठी जागा पाहिजे होती ती मिळेना. सैन्यांतील कामदारांच्या नेमणुका करणारा अधिकारी होता त्यास **नापोलियन** याचा पराक्रम माहीत नव्हता; त्यामुळें तो तुमचें वय लहान आहे असें म्हणाला. त्यावर **नापोलियन** यानें खरमरीत उत्तर दिलें कीं, 'रणांगणांतील पराक्रम वयाच्या भरीस घालावा.' या उत्तराचा अधिकाऱ्यास राग येऊन त्यानें फौजेंतील कामगारांच्या पटांतून **नापोलियन** याचें नांव काढून टाकिलें. सैन्यांतील जागा गेल्यामुळें **नापोलियन** याची दारिद्र्यामुळें दुर्दशा झाली. त्याचा भाऊ **जोजेफ** यास एका श्रीमंत व्यापाऱ्याच्या मुलीनें वरिलें, त्यामुळें त्यास पुष्कळ पैसा मिळाला हें पाहून **नापोलियन** म्हणे 'जोजेफ मोठा दैववान् आहे. मला एक लहानसें घर व एका घोड्याची गाडी तरी मिळो म्हणजे माझ्या मोठेपणाचा कळस झाला.' याप्रमाणें अवस्था होऊन तुर्कस्थानच्या फौजेंत तरी जागा मिळवावी असें **नापोलियन** यास वाटूं लागलें होतें. जें महत्व त्यास पुढें प्राप्त झालें, तें यावेळेस त्याच्या स्वप्नींही नव्हतें.

यावेळेस (सन १७९५) राज्यक्रांति होऊन झालेल्या या नवीन लोकसत्ताक राज्यास लोक कंटाळलेले होते. राज्यव्यवस्थेंत सुधारणा व्हावी असें सर्वांस वाटूं लागलें. कित्येकांस तर पुनः राजसत्ताकराज्य स्थापावें असें वाटत होतें. राष्ट्रसभेंतील पुढारी लोकांचा लोक फार धिक्कार करीत त्यामुळें त्यांसही राज्यव्यवस्थेंत उलटापालट करावी असें वाटूं लागलें. राजवंशांतील कोणत्यातरी पुरुषास गादीवर बसवावें तर

पुष्कळ पंचाइती होत्या. लोकसत्ताकराज्याच्या वेळेस नवी तयार झ
लेली फौज होती तिचा राजघराण्याशीं फार द्वेष असे. तसेंच दे
स्थानें, वडेलोक, व राजा, यांच्या मालमत्ता राष्ट्रसभेनें विकल्या ह
त्या, त्या ज्यांनीं घेतल्या होत्या त्यांस मोठा धाक पडला. का
राजघराणें पुन्हा स्थापित झाल्यास या लोकांचा नाश व्हावयाचा,
जे राज्यक्रांतीच्या वेळेस पुढारी होते, त्यांच्या प्राणांशीं गांठ यावय
ची, हें सर्वांस माहित होतें. यामुळें राजसत्ताकराज्य न होऊं देण्या
विषयीं पुष्कळ लोकांची इच्छा होती. लोक तर राज्यव्यवस्थेंत बद
होण्याविषयीं उत्सुक झाले होते. त्यामुळें राष्ट्रसभेंतील लोकांनीं इंग्लं
दांतील प्रतिनिधींची सभा व वडे लोकांची सभा याप्रमाणें दोन नव्या
सभा करण्याचा बेत केला. दोन्ही सभांस परस्परांचा धाक राहू
राज्यव्यवस्था उत्तम चालली असती, परंतु या सभांतील दोन तृतीयां
सभासद पूर्वीच्या सभांपैकीं निवडावे असा ठराव राष्ट्रसभेनें केल्यामु
लोकांस वाटलें कीं, ही राज्यव्यवस्था बाहेरून मात्र वेगळी झाली; पण
दोनतृतीयांश सभासद पूर्वीच्याच सभेंतले असले ह्मणजे बहुमत त्यां
होऊन वस्तुतः सर्व व्यवस्था त्यांच्या मनाप्रमाणें होणार. लोक
त्यांच्या जुलुमास अगदीं कंटाळले होते, त्यामुळें त्यांनीं बंड केलें
त्यामुळें राष्ट्रसभेंतील लोकांस फारच धाक पडला. हें बंड मोडण्या
कोणी तरी शूर व चतुर पुरुष पाहिजे असें त्यांस वाटूं लागलें. शेवटीं
बारास ह्मणून त्यावेळेस मुख्य कारभार करणारा होता त्यास **नापोलि**
यन यानें केलेले पराक्रम माहीत होते; तो इतर कामदारांस ह्मणाला,
मनुष्यास पुढें करा, नाहींतर तो तुमच्याशिवाय आपणच पुढें सरकेल
त्याच्या शिफारसीवरून **नापोलियन** यास सैन्याचा मुख्य अधिकार
दिला. **नापोलियन** यास राष्ट्रसभेनें अधिकार देण्याविषयीं
लावणें पाठविलें तेव्हां आपण कोणत्या पक्षास मिळावें याविषयीं
बराच वेळ विचार करीत होता. शेवटीं कोणता पक्ष बळकट,
णत्या पक्षास मिळालें ह्मणजे आपलें हित होईल, याचा पूर्ण विचा
करून **नापोलियन** यानें राष्ट्र सभेनें दिलेला अधिकार स्वीकारिला

आणि आपणास सुचेल तशी व्यवस्था करण्यास पूर्ण अखत्यार राष्ट्रसभेपासून मागून घेतला. लागलींच त्यानें पारिस शहरापासून कांहीं अंतरावर तोफखाना होता तो हस्तगत करून घेण्यास मध्यरात्रीस एका कामदारास रवाना केलें. बंडवाले येऊन पोहोंचण्यापूर्वी अगदीं थोडा वेळ हा कामदार तेथें पोहोंचला, नाहीं तर मोठी पंचाईत झाली असती. पांच हजार सैन्य घेऊन पारिस शहरांतील मुख्य रस्त्यांत तोफा उभ्या करून **नापोलियन** यानें बंडवाल्यांचा पराभव करून शहराचा बचाव करण्याचा बेत केला. दुसऱ्यादिवशीं बंडवाले पूर्वीप्रमाणें **तुलरीस** या राजवाड्यावर हल्ला करण्यास गेले. परंतु यावेळेस सोळावा लुई याहून वेगळ्या प्रकारच्या मनुष्याशीं गांठ आहे, हें त्यांस माहीत नव्हतें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं तीस हजार बंडवाले हल्ला करण्यास पुढें गेले, परंतु **नापोलियन** याचा हुकूम होतांच जो तोफांचा भडिमार सपाट्यानें सुरू झाला, त्यामुळें सर्वांची त्रेधा होऊन ते वेड्यासारखे चोहोंकडे पळूं लागले. सर्व रस्ते त्यांच्याकडील मेलेल्या आणि जखमी झालेल्या लोकांनीं भरून गेले. चारपांचशें लोक कापून काढिले ह्मणजे बाकीचे पळून जातील, असें पूर्वी **नापोलियन** यानें ह्मटलें होतें तेंच त्याच्या हातून या वेळेस घडलें. **नापोलियन** याच्या फौजेनें पाठलाग करून सर्वांचीं शस्त्रें घेऊन मध्यरात्रीच्या पूर्वी चोहींकडे शांतता केली.

नापोलियन यानें बजाविलेल्या कामगिरीमुळें राष्ट्रसभेनें कृतज्ञ होऊन त्यास सर्व सैन्याचा मुख्य अधिकार कायम दिला. आजपर्यंत **नापोलियन** व्यवस्था करीत असे, तरी नांवाचें सेनापतित्व **बारास** याजकडे होतें. **नापोलियन** दुय्यम सेनापति होता तो आतां मुख्य झाला, त्यामुळें गरीबी जाऊन त्यास एकदम ऐश्वर्य प्राप्त झालें. तो लहान घर सोडून मोठ्या सुंदर वाड्यांत राहूं लागला. त्यानें सैन्याची उत्तम व्यवस्था केली, त्यामुळें त्याची कीर्ति चोहींकडे गाजूं लागली, तरी तो लोकांत फारसा न मिसळतां नेहमीं एकांतवा-

सांत राहून आपला वेळ विद्याभ्यासांत घालवी. यावेळेस एक गो
घडली तिच्या योगानें त्याच्या वर्तनक्रमास भिन्नरूप प्राप्त झालें.

एकेदिवशीं **नापोलियन** कचेरींत बसला असतां दहाबारा वर्ष
चा एक गोजिरवाणा **युजिन** नांवाचा मुलगा एका कामदारानें त्या
जवळ आणिला. त्या मुलाचा बाप राज्यक्रांतीच्या वेळेस सैन्यांत
कामदार होता. त्यास **राबिस्पियर** यानें मारिलें. माझ्या बापाची
तलवार परत द्यावी अशी **नापोलियन** याजपाशीं त्यामुलानें विनंति
केली. विनंति मान्य करून **नापोलियन** यानें तलवार परत देव
विली. तलवार दृष्टीस पडतांच गर्हिवर येऊन मुलगा घळघळां रडं
लागला. हें पाहून **नापोलियन** याच्या पोटांत कळवळा आला. मन
नेनें गोड भाषण बोलून त्यानें मुलाचें सांत्वन केलें. त्यामुळें दुसऱ्या
दिवशीं त्याची आई **जोसेफाईन** ही कृतज्ञता प्रदर्शित करण्याकरि
नां **नापोलियन** याकडे आली. तिची बोलण्याचालण्याची मोहक
ढब व सुंदर रूप पाहून **नापोलियन** अगदीं मोहित झाला.

जोसेफाईन सांगत असे कीं, मी लहान असतां एकावाईनें भ
विष्य केलें होतें कीं, 'ही मुलगी राणीपेक्षांही मोठी होईल. परं
पुनः वैभवापासून च्युत होऊन राहील.' नवरा मेल्यावर **जोसेफाईन**
ही **राबिस्पियर** याच्या मरणापर्यंत कैदेंतच होती. पुढें बाराव
याचा व तिच्या नवऱ्याचा स्नेह असल्यामुळें तिची सुटका झाली
वर सांगितलेला प्रसंग झाल्यावर **नापोलियन** यानें **जोसेफाईन**
हिजकडे आपणास वरण्याविषयीं बोलणें लाविलें. कांहीं दिवस
नाहीं नाहीं म्हणून शेवटीं तिनें **नापोलियन** याचें पाणिग्रहण केलें
नी म्हणे कीं, प्रत्यक्ष पाहण्यापूर्वीच त्याची कीर्ति ऐकून **नापोलियन**
यावर माझी प्रीति बसली होती. **जोसेफाईन** स्वभावतः फार कोमल
अंतःकरणाची व उदार असे. कित्येक वेळांनंतर तिचा उदारपणा
उधळेपण सारखा दिसे. तिची **नापोलियन** यावर पूर्ण प्रीति होती
आपल्या सौंदर्यानें भुलून **नापोलियन** याच्या मनावर पगडा बसवि
घिण्यास पुष्कळ स्त्रियांनीं यत्न केला परंतु त्यानें एकीसही दाद दिली

नाहीं. स्त्रियांच्या स्मितललित मुखांकडे पाहून मन स्वाधीन ठेवणारे पुरुष फार विरळ. कोणत्याही स्त्रीच्या सांगण्यानें **नापोलियन** यानें आपल्या मनांत नसलेली गोष्ट कधीं केली नाहीं. **मॉडम स्टाएल** ह्मणून एक प्रसिद्ध विद्वान् व रूपवान् मागें सांगितलेल्या **नेक्कर** नांवाच्या प्रधानाची मुलगी असे. तिनें **फ्रान्स** देशांतील पुष्कळ मोठमोठ्या लोकांस मोहित केलें होतें. **नापोलियन** आपणाकडेच बोटदारखवील अशा आशेनें तिनें एकेप्रसंगीं त्यास विचारिलें, अत्युत्तम स्त्री कोणती ? यावर **नापोलियन** यानें उत्तर केलें कीं, जिला फार मुलें होतात ती. या भाषणाचें मर्म वाचकांच्या लक्षांत येईलच. **जोसेफाईन** हिचामात्र **नापोलियन** याच्या दृढ मनावर अंमल बसला होता. परंतु ती तो सर्वदां चांगल्या कामांतमात्र उपयोगास लावी. **नापोलियन** एकाद्या वेळेस क्रोधादि रिपूंच्या स्वाधीन झाला ह्मणजे **जोसेफाईन** आपल्या मृदुस्वभावानें युक्तीच्या बोटेनें त्यास शांत करून त्याच्या हातून वाईट कृत्य घडूं देतनसे. **नापोलियन** जवळ नसला ह्मणजे तिला कधीं चैन पडत नसे. यामुळें लांबलांबच्या व धोक्याच्या प्रवासांतही ती त्याबरोबर जाई. **नापोलियन** ह्मणे, मी कितीही दूर एकाटा जावयास निघालों तरी पहावें तों **जोसेफाईन** बरोबर येण्यास तयार आहेच. तुझें कसें येणें होईल ? फार लांब जावयाचें आहे. तुलाफर हाल सोसावे लागतील. असें **नापोलियन** यानें ह्मटलें ह्मणजे तिनें ह्मणावें, अं:, त्यांत कांहीं नाहीं. मला आतां लागलेंच निघालें पाहिजे, असें **नापोलियन** यानें ह्मटलें ह्मणजे ती ह्मणे बरें आहे, 'मी तयारच आहें.' तुला सामान पुष्कळ घ्यावयाचें असेल, असें **नापोलियन** ह्मणाला तर ती ह्मणे, सर्व तयारी आहे. शेवटीं तिला बरोबर घेणें **नापोलियन** यास भाग पडे. याप्रमाणें ही प्रसिद्ध स्त्री मोठी गुणवान् होती. तरी तिच्या अंगीं कांहीं दोषही होते. ती मोठी ऐषआरामी व उधळी असे. एकादे वेळेस नवऱ्यासमुद्धां फसवी. **नापोलियन** यास बरें वाटण्याकरितां त्यापेक्षां वयानें कांही वडील असून माझें वय कमी

आहे म्हणून तिनें सांगितलें. **नापोलियन** फार व्यवस्थेनें खर्च करणारा असे, त्यामुळें वस्त्रपात्रास अधिक खर्च झाला म्हणजे आवडणार नाहीं म्हणून ती त्यास खोटे हिशेब दाखवी.

नापोलियन याचें लग्न झाल्यावर दहावारा दिवसांतच आपल्या नूतन प्रिय पत्नीचा विरह सोसण्याची वेळआली. देशांत स्थता झाल्यामुळें अधिकाऱ्यांनीं **इताली** देशांत लोकसत्ताकराज्य शत्रूंशीं युद्ध करण्याचें ठरवून **नापोलियन** यानें तिकडे जावें योजना केली. वाटेनें जातांना **मार्सेल्स** येथें मातोश्रीची ऊन **नापोलियन** मोठ्या उत्साहानें **नांतीस्** शहरीं फौजेच होता तेथें गेला. यावेळेस **नापोलियन** व त्याची प्रियपत्नी परस्परांस पाठविलेलीं पत्रें छापिलीं आहेत. त्यांवरून परस्परांवर फार प्रीति होती असें दिसतें. **जोसेफाइन** स्व कुशल असे. प्रिय वल्लभाची मूर्ति सतत डोळ्यांपुढें रहावी, तिनें यावेळेस त्याची उत्तम एक तसवीर स्वतः तयार केली. **लियन** याच्या वैभवास प्रारंभ होऊन येथपर्यंत तें हळूहळू आलें. यापुढें त्याची वाढ एकाएकीं वृद्धिंगत झाली, तिचें पुढें येईल.

भाग ५ वा

मुख्य सेनापतित्व प्राप्त होऊन **नापोलियन** इताली देशांत ग गेला, तेव्हां त्याचें वय सव्वीस वर्षांचें होतें. आपणास अधिकार मिळाला हें पाहून त्यास मोठा आनंद झाला. त्याने ली की आपण जे पूर्वी पराक्रम केले, ते दुसऱ्या सेनापतींच्या खालीं असतांना केले, त्यामुळें त्या वेळेस सर्व कीर्तीचा लाभ आप स झाला नाहीं. यावेळेस जे जय मिळतील त्यांचें सर्व यश आ

च आहे. या विचारानें मन उल्हासयुक्त होऊन तो म्हणाला मी तीन महिन्यांत **मिलान** शहरीं जाईन, नाहींतर **पारिस** येथें परत येईन. एक गृहस्थ, तुम्ही फार अल्पवयी आहां, असें म्हणाला, त्यास **नापोलियन** यानें उत्तर दिलें कीं, एकावर्षांत मी फार मोठा होईन किंवा मरून जाईन.

नापोलियन यानें सेनापतित्व स्वीकारिलें तेव्हां, फक्त पन्नास हजार फौज इताली देशांत युद्धास जाण्यास तयार होती. शत्रूचें सैन्य तर पुष्कळपट मोठें होतें. शिवाय **नापोलियन** याच्या फौजेंतील लोकांस वस्त्रपात्र व खाण्यापिण्यास देखील धड नव्हतें. असें असून एकदम **इताली** देशांत घुसून **सुपिक** प्रदेश जिंकण्याचा बेत करून सैन्यास वीरश्री आणण्याकरितां तो म्हणाला, 'शूर हो, तुम्ही भुकावलेले व उघडेवाघडे आहां. लोकसत्ताकराज्याचें तुम्हीं पुष्कळ हित केलें आहे, परंतु तुम्हांस बक्षीस देण्यास तिजोरींत पैसा नाहीं. पृथ्वीवर जो **सुपिक** प्रदेश तेथें तुम्हांस नेण्याकरितां मी आलों आहें. संपन्न प्रदेश, धनाढ्य नगरें, हीं सर्व तुमचीं आहेत. वीरहो, असा लाभ डोळ्यांपुढें असून तुम्ही धैर्य व दृढ निश्चय सोडाल काय?' हें नवीन, तरुण व शूर अशा सेनापतीचें भाषण ऐकून पूर्वीच्या पराजयानें निराश झालेल्या सैन्यांत एकाएकीं मोठी वीरश्री उत्पन्न झाली.

नापोलियन यास वाटलें कीं आपल्याजळ सैन्य थोडें आहे, याकरितां **आस्त्रियांतील** मोठें सैन्य व त्यांस मदत आलेली दुसऱ्या देशांतील सैन्यें यांबरोबर नेहमींच्या चालीप्रमाणें युद्ध करून कांहीं उपयोग नाहीं. शत्रूस मागमूस समजूं न देतां नवीन रस्ता काढून मोठाल्या दौडा करून त्यांवर एकदम छापा घातला पाहिजे, एरव्हीं यांचा पराभव होणार नाहीं. ज्या प्रदेशांत सैन्य जाईल तेथें काय सामग्री मिळेल ती मिळेल, असा भरंवसा धरून बरोबरचे तंबू व बाजारबुणगे सोडून निवडक शूर लोकांच्या टोळीनें दौड करण्यास तयार असलें पाहिजे, एरव्हीं गुप्तरीतीनें एकाएकीं हल्ला करण्यास सांपडणार नाहीं, हें त्यास माहीत होतें. तसेंच पुष्कळ दिवस जय न

आहे म्हणून तिनें सांगितलें. **नापोलियन** फार व्यवस्थेनें खर्च करणारा असे, त्यामुळें वस्त्रपात्रास अधिक खर्च झाला म्हणजे त्यास आवडणार नाहीं म्हणून ती त्यास खोटे हिशेब दाखवी.

नापोलियन याचें लग्न झाल्यावर दहावारा दिवसांतच त्यास आपल्या नूतन प्रिय पत्नीचा विरह सोसण्याची वेळआली. देशांत स्वस्थता झाल्यामुळें अधिकाऱ्यांनीं **इताली** देशांत लोकसत्ताकराज्याच्या शत्रूंशीं युद्ध करण्याचें ठरवून **नापोलियन** यानें तिकडे जावें अशी योजना केली. वाटेनें जातांना **मार्सेल्स्** येथें मातोश्रीची भेट घेऊन **नापोलियन** मोठ्या उत्साहानें **नांतीस्** शहरीं फौजेचा तळ होता तेथें गेला. यावेळेस **नापोलियन** व त्याची प्रियपत्नी यांनीं परस्परांस पाठविलेलीं पत्रें छापिलीं आहेत. त्यांवरून परस्परांची परस्परांवर फार प्रीति होती असें दिसतें. **जोसेफाईन** स्वतः फार कुशल असे. प्रिय वल्लभाची मूर्ति सतत डोळ्यांपुढें रहावी, म्हणून तिनें यावेळेस त्याची उत्तम एक तसबीर स्वतः तयार केली. **नापोलियन** याच्या वैभवास प्रारंभ होऊन येथपर्यंत तें हळूहळू वाढत आलें. यापुढें त्याची वाढ एकाएकीं वृद्धिंगत झाली, तिचें वर्णन पुढें येईल.

भाग ५ वा

मुख्य सेनापतित्व प्राप्त होऊन **नापोलियन** इताली देशांत युद्धास गेला, तेव्हां त्याचें वय सव्वीस वर्षांचें होतें. आपणास एवढा अधिकार मिळाला हें पाहून त्यास मोठा आनंद झाला. त्यास वाटलें कीं आपण जे पूर्वी पराक्रम केले, ते दुसऱ्या सेनापतींच्या हाताखालीं असतांना केले, त्यामुळें त्या वेळेस सर्व कीर्तीचा लाभ आपणास झाला नाहीं. यावेळेस जे जय मिळतील त्यांचें सर्व यश आपलें-

च आहे. या विचारानें मन उल्हासयुक्त होऊन तो ह्मणाला मी तीन महिन्यांत **मिलान** शहरीं जाईन, नाहींतर **पारिस** येथें परत येईन. एक गृहस्थ, तुह्मी फार अल्पवयी आहां, असें ह्मणाला, त्यास **नापोलियन** यानें उत्तर दिलें कीं, एकावर्षांत मी फार मोठा होईन किंवा मरून जाईन.

नापोलियन यानें सेनापतित्व स्वीकारिलें तेव्हां, फक्त पन्नास हजार फौज इताली देशांत युद्धास जाण्यास तयार होती. शत्रूंचें सैन्य तर पुष्कळपट मोठें होतें. शिवाय **नापोलियन** याच्या फौजेंतील लोकांस वस्त्रपात्र व खाण्यापिण्यास देखील धड नव्हतें. असें असून एकदम **इताली** देशांत घुसून **सुपिक** प्रदेश जिंकण्याचा बेत करून सैन्यास वीरश्री आणण्याकरितां तो ह्मणाला, 'शूर हो, तुह्मी भुकावलेले व उघडेवाघडे आहां. लोकसत्ताकराज्याचें तुम्हीं पुष्कळ हित केलें आहे, परंतु तुह्मांस बक्षीस देण्यास तिजोरींत पैसा नाहीं. पृथ्वीवर जो **सुपिक** प्रदेश तेथें तुह्मांस नेण्याकरितां मी आलों आहें. संपन्न प्रदेश, धनाढ्य नगरें, हीं सर्व तुमचीं आहेत. वीरहो, असा लाभ डोळ्यांपुढें असून तुह्मी धैर्य व दृढ निश्चय सोडाल काय?' हें नवीन, तरुण व शूर अशा सेनापतीचें भाषण ऐकून पूर्वीच्या पराजयानें निराश झालेल्या सैन्यांत एकाएकीं मोठी वीरश्री उत्पन्न झाली.

नापोलियन यास वाटलें कीं आपल्याजळ सैन्य थोडें आहे, याकरितां **आस्त्रियांतील** मोठें सैन्य व त्यांस मदत आलेली दुसऱ्या देशांतील सैन्यें यांबरोबर नेहमींच्या चालीप्रमाणें युद्ध करून कांहीं उपयोग नाहीं. शत्रूंस मागमूस समजूं न देतां नवीन रस्ता काढून मोठाल्या दौडा करून त्यांवर एकदम छापा घातला पाहिजे, एरव्हीं त्यांचा पराभव होणार नाहीं. ज्या प्रदेशांत सैन्य जाईल तेथें काय सामग्री मिळेल ती मिळेल, असा भरंवसा धरून बरोबरचे तंबू व बाजारबुणगे सोडून निवडक शूर लोकांच्या टोळीनें दौड करण्यास तयार असलें पाहिजे, एरव्हीं गुप्तरीतीनें एकाएकीं हल्ला करण्यास सांपडणार नाहीं, हें त्यास माहीत होतें. तसेंच पुष्कळ दिवस जय न

झाल्यास लोक ज्या प्रदेशांतून जातील, त्यांतील लोकांस लुटूं लाग तील, असें झालें तर **फ्रेंच** सैन्याचा दुर्लौकिक होण्याचें मोठें भ होतें. पण वर सांगितलेल्या उपायानें हटकून जय मिळेल अशी **नापोलियन** याची खात्री होती. त्यामुळें त्यानें आपला बेत तडीस नेण्याचा निश्चय केला.

यावेळेस **नापोलियन** याचे स्वारी करण्याचे तीन उद्देश होते. पहिला **सार्डिनियाचा** राजा व **आस्त्रियाचा** बादशाहा यांनीं एक मेकांस मदत करण्याचा तह केला होता, तो मोडून टाकावयाचा. दुसरा, **लांबर्दी** प्रांतावर स्वारी करून **आस्त्रिया**च्या फौजेस जर्जर करून बादशहाच्या ताब्यांत **इताली** देशांतले प्रांत होते त्यांतील लोकांस स्वतंत्र होण्यास उत्तेजन देणें. तिसरा, **रोम** येथील पोपाचें माहात्म्य फार असल्यामुळें त्याचा **फ्रान्स** देशांतील राजपक्षाच्या लोकांस आश्रय असे, यासाठीं त्यांचें महत्व कमी करणें. शिवाय तीनवर्षांपूर्वी लोक सत्ताकराज्याचा एक वकील **बासेव्हिली** नांवाचा **रोम** शहरीं होता, त्यास लोकांनीं ठार मारिलें. तेव्हां पोपाच्या सैन्यानें त्याचें रक्षण केलें नाहीं, व पोपानेंही त्यास मारणारांचें शासन केलें नाहीं, म्हणून **फ्रान्स** देशांतील लोकसत्ताकराज्याच्या पक्षाच्या लोकांच्या मनांत पोपाचा सूड उगवावयाचा होता.

जिनोआ शहराजवळ **आस्त्रिया व सार्डिनिया** येथील सैन्याच्या मोठाल्या तीन टोळ्या जमल्या होत्या. पूर्वीपासून **आल्प्स** पर्वतांतून जाण्याच्या ठरींव वाटा होत्या तिकडून न जातां दुसऱ्या वाटेनें जाऊन आपलें सर्व सैन्य एके ठिकाणीं गोळा करून **नापोलियन** यानें शत्रूच्या एका टोळीवर सपाट्यानें हल्ला करून तिचा अगदीं पराभव करून टाकिला. विसावा न घेतां पुनः चोहींकडे पसरलेलें सैन्य एकत्रकरून दुसऱ्या टोळीवर हल्ला करून तिचाही पराभव करून टाकिला. याप्रमाणें थोड्याच वेळांत एकमेकांची बातमी कळण्यास एकमेकांस अवकाश न देतां दोन्ही सैन्यांचा **नापोलियन** यानें पराभव केला. शत्रूंच्या सैन्यांत पुष्कळ मोठमोठे

अनुभविक वीर योद्धे होते, त्यांस लढाईच्या सर्व युक्ति आपणांस माहीत आहेत असें वाटत होतें, परंतु त्या सर्वांस **नापोलियन** यानें पराभूत करून त्यांच्या सैन्यांची दाणादाण करून कित्येकांस रानांत पळावयास लाविलें. या प्रसिद्ध लढाईस **मान्तीनाती** येथील महायुद्ध म्हणतात. ज्या युद्धांत जय मिळाल्याबद्दल **नापोलियन** यास मोठा अभिमान वाटत असे तेंच हें युद्ध. या युद्धाच्यापूर्वी कोणकोणतीं सैन्यें कोणीकडून आलीं, तीं कशीं राहिलीं होतीं, एकमेकांवर कशीं चालून गेलीं, कोणकोत्या जागीं कत्तली झाल्या, वगैरे गोष्टींचें इत्थंभूत वर्णन ग्रंथकारांनीं केलें आहे; परंतु यूरोपांतील स्थलांची चांगली माहिती असल्याशिवाय त्यांत विशेष गोडी वाटणार नाहीं, असें समजून येथें अति संक्षेपानें युद्धाची हकीकत लिहिली आहे. या युद्धांत शत्रूंचे हजारों लोक मेले, कित्येक फ्रेंच लोकांनीं कैद केले, शत्रूंच्या पुष्कळ तोफा व इतर सामान **फ्रेंच** लोकांस मिळालें, कित्येक मोठाले बळकट किल्ले मिळाले, **सार्डिनियाच्या** राज्याच्या फौजेची अगदींच वाताहत झाली. हा राजा सोळावा **लुई** याच्या भावाचा सासरा होता. जांवयाच्या घराण्याची दुर्दशा व आपला असा पराभव पाहून तो निराश होऊन मनांत झुरून थोड्याच दिवसांत मरण पावला. पराभव झाल्यावर **नापोलियन** यार्शी तहनामा झाला, त्यांत **आस्त्रियाच्या** बादशहास व या राजास पुष्कळ अपमान कारक कलमें कबूल करावीं लागलीं.

वर सांगितलेली प्रसिद्ध लढाई झाल्यावर पुन्हा कांहीं दिवस सैन्यास विसावा देण्याकरितां **नापोलियन** स्तब्ध बसला होता, तथापि **इताली** देशांतील अत्यंत सुपीक व सुशोभित जो **लांबर्दी** प्रांत त्यावर त्याची नजर होतीच. सैन्यास उत्तेजन देण्यास तो पुनः म्हणाला 'आजपर्यंत तुम्ही ओसाड प्रदेशाकरितां लढत होतां, यांत तुमच्या अंगचा पराक्रम दिसून आला, परंतु तुमच्या देशास कांहीं उपयोग झाला नाहीं. परंतु या वेळचे तुमचे पराक्रम **हालंद** व **ऱ्हाईन** येथल्या सैन्यांच्या पराक्रमांसारखे आहेत. आजपर्यंत तुम्हांजवळ कांहीं न-

व्हतें, परंतु, आतां तुह्मांस कशाचीही ददात नाहीं. जवळ तोफा नसता तुह्मी लढाया जिंकिल्या, पुलांशिवाय मोठाल्या नद्या ओलांडिल्या. खाण्यापिण्याशिवाय पुष्कळ कष्ट भोगिले, या गोष्टी लोकसत्ताकाच्या फौजेशिवाय कोणाच्यानें व्हावयाच्या नाहींत. शूरहो, तुमच्या दृढनिश्चयावद्दल तुह्मांस शाबासकी दिली पाहिजे. पण अद्याप कांहीं झालें नाहीं. अजून पुष्कळ व्हावयाचें आहे. अद्याप मिलान शहर आपल्या हस्तगत झालें नाहीं.'

या युद्धांत **नापोलियन** यानें विलक्षण चातुर्यानें एवढा अप्रतिम जय मिळविला तरी **फ्रान्स** देशांतील अधिकाऱ्यांस लढाईची हकीकत मोठ्या नम्र भाषेनें लिहून पाठविली. यामुळें त्याचा फारच लौकिक झाला. सर्व यूरोपखंडांत **नापोलियन** याची वाखाणणी झाली. या वेळेस **नापोलियन** याचा कीर्तिचंद्र निष्कलंक होता.

वर सांगितलेले पराक्रम करून **नापोलियन** यानें आपलें नांव गाजविलें तरी तो स्वस्थ बसला नाहीं. अनेक प्रकारच्या युक्ति करून मोठ्या शौर्यानें त्यानें **तूरिन, मिलान, पेव्हिआ,** या शहरांजवळील शत्रूंच्या मोठमोठ्या सैन्यांचा पराभव करून तीं शहरें त्यानें हस्तगत करून घेतलीं. पुष्कळ ठिकाणीं पराभव झाल्यामुळें **आस्ट्रिया**च्या बादशाहास फारच भय वाटलें. त्यानें मोठा चतुर व अनुभवी जुना सेनापति **वर्म्सर** यास नवीन ८०००० सैन्य देऊन **नापोलियन** याशीं लढण्यास पाठविलें. यावेळेस **नापोलियन** याजवळ फक्त ३०००० लोक होते. पूर्वीच्या सेनापतींप्रमाणेंच **वर्म्सर** यानें सैन्याच्या तीन टोळ्या केल्या. **नापोलियन** यास यावेळेसही चांगलीच सवड सांपडली. त्यानें आपलें सर्व सैन्य एकत्र करून एकामागून एक याप्रमाणें सर्व सैन्याचा पराभव केला. थोड्याच दिवसांत आपल्या सैन्याची दाणादाण झाली हें पाहून **वर्म्सर** यासही आश्चर्य वाटलें. तो **मांटुआ** या शहरीं आश्रयाकरितां गेला. पराजयास नभितां **स्त्रिया** सरकारानें दुसरा एक सेनापति नेमून आणखी फौज पाठविली. **नापोलियन** यासही **फ्रान्स** देशाहून फौजेची कुमक आली.

सेनापतीनेंही जुन्या वहीवाटीप्रमाणेंच सैन्याचे भाग केले. ही चूक पुन्हा **नापोलियन** याच्या उपयोगीं पडली. त्यानें पुनः शत्रूंचा पराभव करून **मांटुआ** येथूनही **वर्म्सर** यास पळून जावयास लाविलें. **आर्चडयूक चार्लस** ह्मणून एक शूर तरुण सरदार होता, त्यावरोबर सैन्य देऊन आणखी एकवेळ **आस्त्रिया**च्या सरकारानें **नापोलियन** याचा मोडकरण्याचा यत्न केला, तोही सदर्हूप्रमाणेंच व्यर्थ गेला. आतां आपल्या देशावरच साक्षात् शत्रु स्वारी करणार असें ऐकिलें तेव्हां आणखी तरी पराजय होऊन अप्रतिष्ठा होऊंनये असें मनांत आणून बादशहानें **नापोलियन** याशीं तहाचें बोलणें लाविलें. **नापोलियन** याचा विजयध्वज धूमकेतूसारखा चोंहींकडे व्यापीत चालला, ह्मणें पाहून **इताली** देशांतील मांडलिक राजे अगदीं घाबरून गेले. कित्येकांनीं **नापोलियन** यास शरण जाऊन आपलें रक्षण केलें. **नेपल्स**च्या राजानें **नापोलियन** याशीं स्नेह केला. **रोम** येथील पोपानें **नापोलियन** यास मोठमोठीं शहरें देऊन नम्रपणानें वागून आपलें रक्षण केलें. **व्हेनिस** येथें जुनें लोकसत्ताकराज्य होतें, तेथील लोकही **नापोलियन** याची कृपा संपादण्यास झटत होते, परंतु त्यांचा प्रयत्न व्यर्थ गेला. त्यांचा मुलुख **फ्रान्स** व **आस्त्रिया** यांनीं वांटून घेतला.

यामप्रमाणें **इताली** देशांत महायुद्धें करून **नापोलियन** आपला विजयध्वज प्रस्थापित करीत होता. पर देशांतील लोकांस **इताली** देशांतील स्थलांच्या काठिण्याची कल्पना मनांत आणितां येणार नाहीं. यामुळें या युद्धाचें विशेष विस्तृत वर्णन वाचून फार चमत्कार वाटेल असें नाहीं. याकरितां येवढेंच सांगणें पुरे आहे कीं, **यूरोपांतील** मोठमोठ्या शूर लोकांसही या युद्धांचें आश्चर्य अद्याप वाटत आहे. या-युद्धांत **नापोलियन** याची बुद्धिमत्ता विशेष दिसून आली. तशीच त्याची चपलता, उत्साह, धोक्याचेवेळेस समयसूचकता, एकावर एक अशा अनेक कल्पना, कोणाच्या मदतीशिवाय स्वतःच एकादें महत्कार्य योजून तडीस नेण्याचें सामर्थ्य, हीं दिसून आल्यामुळें **नापो-**

लियन हा कोणी लोकोत्तर मनुष्य आहे, असें लोकांस वाटूं लागलें. **नापोलियन** याचा ठिकठिकाणीं जय होण्यास पुष्कळ कारणें होतीं. त्यानें स्वारी करण्याचे जुने प्रकार सोडून नवेच सुरू केले. युद्धकला पूर्ण सुधारलेली आहे, तींत आणखी कांहीं सुधारणा पाहिजे असें त्यावेळच्या कोणांस वाटत नव्हतें. एका ऋतूमध्यें एक किंवा दोन लढाया मारण्याची चाल होती. हिवाळ्यामध्यें सैन्य एकाठिकाणी तळ देऊन राही. हे सर्व प्रकार **नापोलियन** यानें बदलून टाकिले. मोठमोठ्या मजला करण्याची त्यानें आपल्या सैन्यास संवय लाविली. जय झाल्याबरोबर विश्रांति नघेतां मोठी दौड करून दूरचे शत्रु **नापोलियन** पुष्कळ लांब आहे असें समजून स्तब्ध आहेत तोंच अकस्मात त्यांस गांठून त्यांवर तो हल्ला करी. याप्रमाणें एकामागून एक अशा त्यानें पुष्कळ लढाया मारिल्या. **नापोलियन** यानें लढायांच्या दे खाव्यार्चीं चित्रें तयार करण्यास एक शिल्पकार जवळ बाळगिला हो ता, त्याचासुद्धां एकामागून एक अशा फार लौकर लौकर लढाया झा ल्यामुळें गोंधळ होई. यावरून शत्रूंची किती त्रेधा होत असेल हैं महज ध्यानांत येईल. **आस्त्रियाच्या** फौजेंतील जे लोक कैद के होते त्यांत एक कामदार होता; त्यास आपण ज्यार्शी बोलतों तो ना **पोलियनच** आहे, असें ठाऊक नसल्यामुळें तो म्हणाला ' हा नवी तरुण योद्धा आलेला आहे, यास लढाईचे नियम कांहींच माहीत नाहीत. तो आज आमच्या पुढच्या बाजूस असतो, उद्यां पहावें मागल्या बाजूस आहे. याप्रकारें युद्धाच्या नियमांचा भंग सह करणें कठीण आहे.'

युद्धांमध्यें लोकांस धोक्यांत घालून **नापोलियन** आपण आं काढून घेतो, असें कित्येक लोकांनीं द्वेषभावानें उठविलें होतें, तें कित्ये क बिकट प्रसंगीं **नापोलियन** यानें संकटांत उड्या घातल्या त्यावरू न खोटें ठरलें. या प्रसंगांपैकीं **लोदी** व **आर्कोला** या दोन ठिकाणां नर **नापोलियन** याच्या धाडसाची कमाल झाली. **लोदी** येथी पुलाजवळ पुष्कळ तोफा लावून शत्रूनीं गोळ्यांचा मोठा वर्षाव एकसा

खा चालविला होता. **फ्रेंच** शिपायानीं तोफा घेण्याविषयीं पुष्कळ वेळां मोठ्या धैर्यानें चाल केली, परंतु ती व्यर्थ झाली. पुढें झाले कीं क्षणांत सर्वांची कत्तल होई. शेवटीं **नापोलियन** यानें स्वतः हातांत निशाण धरून एक टोळी बरोबर घेऊन अशी मुसंडी मारिली कीं, एकदम तोफा घेतल्या. पुढें पुष्कळ वर्षांनंतर लढायांची गोष्ट निघाली ह्मणजे, **लोदी** येथील भयंकर लढाई अंसें **नापोलियन** ह्मणत असे. **नापोलियन** याच्या जन्मांत असे प्रसंग फारच थोडे आले होते. या वेळेस मोठ्या चमत्कारानें त्याच्या जिवावरचें संकट टळलें.

आर्कोला येथील पुलाजवळही असाच भयंकर प्रसंग घडला. तेथें दोन तीन दिवस निकरानें लढाई चालली होती. एका प्रसंगी शत्रूनीं भयंकर मारा केला, त्यापुढें टिकाव धरवेना, यामुळें **फ्रेंच** लोक मागें हटण्याच्या बेतांत होते. इतक्यांत **नापोलियन** जयाचें निशाण घेऊन पुढें सरसावला. त्यामुळें योद्ध्यांस धैर्य येऊन ते पुनः लढूं लागले. तथापि पुनः शत्रूनीं असा जबरदस्त हल्ला केला कीं, तेणेंकरून **फ्रेंच** लोकांची धांदलच उडाली. त्या गर्दीत पहिल्यानें आपला सेनापति कोठें आहे, हेंही **फ्रेंच** लोकांस कळलें नाहीं. **नापोलियन** तेथें एक पाणथळ होती तींत सांपडून मरावयाचाच, पण इतक्यांत तो संकटांत आहे असें कित्येक वीरांस कळतांच सेनापतीस तारा अशी आरोळी उठली. योध्यांनीं जिवावर उदार होऊन पुढें घुसून शत्रूंस हटवून त्यास सोडवून आणिलें, हें पाहून **आस्त्रियन** लोकांस **नापोलियन** याच्या नांवाचें अधिकच भय वाटूं लागलें. पुढें **सेतहिलिना** येथें असतांना **नापोलियन** यानें या प्रसंगाविषयीं असें सांगितलें कीं, "पंचवीस स्वारांनीं मी **आर्कोला** येथील लढाई जिंकिली. दोन्ही सैन्यांतील लोक दमले होते. मोठमोठ्या शूर योद्ध्यांसही तंबूंतून बाहेर पडण्याचा कंटाळा आला होता. आमचे सगळे लोक जिकडे तिकडे गुंतले होते. तीनदा युद्ध सुरू करण्याचा यत्न केला. शेवटीं मजपाशीं पंचवीस स्वार होते, त्यांस शत्रूंच्या बाजूकडे जाऊन मोठ्यानीं रणवाद्यें वाजवून हल्ला करण्यास लांगितलें. त्यांनीं तसें करि-

तांच 'फ्रेंच फौज आली.' असा ओरडा होऊन शत्रू पळूं लागले."

आर्कोला येथील लढाईच्या वेळेस मित्रासाठीं आपला जीव दे-
ण्याचें एक विलक्षण उदाहरण घडून आलें. म्यूरन म्हणून एक सैन्या-
तील कामदार नापोलियन याचा अत्यंत स्नेही होता. एका प्रसंगी
शत्रूंकडून कुलुपी गोळा येऊन तो फुटून नापोलियन याच्या आंगावर
उडनार असें पाहून एकदम तो गोळा आणि नापोलियन यांच्यामध्ये
त्यानें उडी घातली. त्यामुळें गोळा त्याच्या आंगावर जाऊन नापोलि-
यन याच्या जिवावरचें अरिष्ट टळलें. नापोलियन यास जन्मपर्यंत
म्यूरन याचें स्मरण झालें म्हणजे वाईट वाटे.

सेनापति असा कृतज्ञ असल्यामुळें सैन्यांतील सर्व लोक त्यावर
अत्यंत प्रीति करीत. ते त्यास आपला जीव प्राण समजून त्याशी
सलगीनें बोलत. कित्येकतर त्यास युद्धाच्या मसलतीसुद्धां सुचवीत;
तोही सूचना योग्य असल्यास लागलेंच त्याप्रमाणें करी. एके प्रसंगी
युद्धांत मान्याचे ठिकाणीं नापोलियन पुढें जाऊं लागला तेव्हां त्याच्या
मागें हिंसडून एक कामदार म्हणाला, 'तुम्ही गेल्यावर आम्हांस या संक-
टांतून कोण सोडविणार? मांटुआ शहराजवळ फ्रेंच फौज असून
शत्रू जवळ असल्यामुळें एक रात्र त्यांस मोठ्या संकटानें काढावी
लागली. सर्व शिपायी जागे राहून पहारा करीत होते. नापोलियन
ही मध्यें देखरेखीकरितां सर्व ठिकाणीं फिरत होता. इतक्यांत एक
हवलदारास झाडाखालीं किंचित् झोंप लागली हें पाहून त्यास न उठवि-
तां त्याची बंदूक घेऊन नापोलियन स्वतः पहारेकऱ्यासारखा अर्धा
तास फिरत होता. इतक्यांत तो हवलदार उठला तेव्हां सेनापतीस पा-
हून तो भयानें घाबरा होऊन नापोलियन याच्या पायां पडूं लागला
तेव्हां नापोलियन म्हणाला, 'गड्या, ही आपली बंदूक घे. तूं पुष्कळ
लढलास आणि लांब चालून आलास यामुळें झोंप आली; याकरितां
तुला क्षमा केली पाहिजे. परंतु या वेळेस क्षणभर दुर्लक्ष केलें तर
सर्व सैन्याचा नाश होईल. मी जागा होतों म्हणून तुझें काम केलें.
आतां तूं सावध रहा.' नापोलियन याच्या हाताखालचे लोक सलगीनें

वागत, तरी त्यांवर त्याचा दाब कधीं कमी झाला नाहीं. एकादे वेळेस पराजय होऊन, शिपायांनीं कुचरपणा केला, असें **नापोलियन** यास वाटल्यास तो म्हणे 'तुम्ही मला नाखुष केलें.' या टोळीच्या निशाणावर 'हे **फ्रेंच** शिपायो नव्हेत' असें लिहावें. 'इतालीं देशांतील मेंन्यांतले हे लोक नव्हेत.' असें झालें म्हणजे शिपायी लज्जेनें रडूं लागून एकवार क्षमा करावी अशी **नापोलियन** याची विनवणी करीत.

नापोलियन मोठा धाडशी होता, तरी आलेलें संकट धाडसानें टळत नाहीं, असें कळलें म्हणजे लवाडी करण्यासही तो मागें पुढें पाहत नसे. एकेवेळेस मोठी लढाई व्हावयाची होती परंतु **फ्रेंच** लोकांची तयारी नव्हती. शत्रु तर अगदीं तयार होते. यावेळेस तहाचें बोलणें लावण्याचें निशाण उभारून **नापोलियन** यानें तें संकट टाळिलें. एका प्रसंगीं थोडे लोक बरोबर घेऊन एका खेडेगांवांत **नापोलियन** राहिला होता, तेथें एकाएकीं **आस्त्रियाचें** मोठें सैन्य येऊन पोहोंचलें. **नापोलियन** जवळ आहे, हें त्या सैन्याच्या मुख्यास माहीत नव्हतें. त्यानें **फ्रेंच** लोकांस आपल्या स्वाधीन होण्याविषयीं सांगून पाठविलें, तेव्हां **नापोलियन** यानें अशी युक्ति केली कीं, आपले सगळे लोक आपल्या भोंवतालीं उभे केले. तनंर शत्रूकडून आलेल्या जासुदाचे डोळे बांधलेले होते त्यांवरचें झांकण काढवून त्यास विचारिलें, तूं कोणाशीं बोलतोस, हें तुला ठाऊक आहे-का ? **नापोलियन** याचें नांव कळतांच तो जासूद गर्भगळित झाला. त्यानें परत जाऊन आपल्या लोकांस सांगितलें कीं, **नापोलियन** सर्व सैन्य घेऊन येथें राहिला आहे. हें ऐकतांच **आस्त्रियन** लोकांची भयानें त्रेधा होऊन ते आपण होऊन **फ्रेंच** लोकांच्या स्वाधीन झाले. नंतर कांहीं वेळानें त्यांस आपली चूक कळली. शत्रूकडचे लोकही पुष्कळ लवाडीच्या युक्ति करीत. **पोपा**च्या मुलखांत लढाई चालली असतां **आंकोना** येथील पाद्री लोकांनीं लोकांस आवेश येण्याकरितां एक युक्ति केली, ती अशी. तेथें **मेरी** म्हणजे येशूख्रिस्ताची आई

हिची मूर्ति होती; तिच्या मागें कांहीं यंत्र ठेवून तिच्या डोळ्यांतून अश्रु वाहतात असें दाखविलें. त्यामुळें लोक निकरानें लढले; तरी शेवटीं तें ठिकाण **फ्रेंच** लोकांनीं घेतलें; तेव्हां त्यांस पाद्री लोकांची युक्ति समजली.

वर सांगितलेली **लोदी** येथील भयंकर लढाई झाल्यावर थोड्याच दिवसांत **नापोलियन** यानें **इताली** देशांतील अत्युत्तम सुपीक प्रांत जो **लांवर्दी** तो जिंकून प्राचीनकाळापासून विख्यात जें **मिलान** शहर तें घेतलें. नंतर **इताली** देशांतील सर्व संस्थानें एकामागूनएक जिंकिली. कित्येक मांडलिक राजे आपण होऊनच **फ्रेंच** लोकांस मिळाले. त्यांनीं असें करूंनये ह्मणून **आस्त्रियाच्या** बादशहानें यत्न केला परंतु तो व्यर्थ गेला. कित्येक प्रांतांतले लोक **फ्रान्स** देशाप्रमाणें आपल्या देशांत लोकसत्ताकराज्य असावें असें इच्छित होते. त्यांस **नापोलियन** यानें स्वदेशांतील राज्याच्या नमुन्यावर प्रजासत्ताकराज्य स्थापून दिलें. त्यांनीं स्वतंत्र असावें असें **नापोलियन** याच्या मनांत नव्हतें. तथापि तो हेतु त्यानें अद्याप बाहेर दाखविला नाहीं.

वर सांगितलेल्या सर्व प्रांतांपासून **नापोलियन** यानें एकंदर सुमारें एक कोट रुपये खंडणी गोळा केली. खंडणीचा पैसा घेऊन शिवाय एक गोष्ट **नापोलियन** यानें केली; ती बद्दल इतिहासकार त्यास दोष देतात. ती अशी. जे राजे त्यानें जिंकीले त्या सर्वांजवळ फार उत्तम अशीं जुनीं चित्रें होतीं. त्यांस तें पूज्य बुद्धीनें जवळ बाळगीत असत. तीं चित्रें त्यानें खंडणीदाखल जुलुमानें घेतलीं. ज्यांत विलक्षण शिल्प कौशल्य आहे, अशा वस्तु निवडण्याकरितां **नापोलियन** यानें आपणा बरोबर उत्तम शिल्पकार घेतले होते. हीं चित्रें फार मौल्यवान् असत. **द्यूकआफ्मोडेना** या संस्थानिकाजवळ **जेरोम्** नांवाचा पुतळा होता. तो **नापोलियन** घेऊं लागला तेव्हां त्यास फार वाईट वाटलें. त्या पुतळ्याबद्दल तो आठलक्ष रुपये देण्यास कबूल झाला होता. **नापोलियन** याच्या लोकांच्या मनांत त्या

पुतळ्याबद्दल पैसे द्यावयाचे होते. ते पैसे घेण्याविषयीं आग्रह करूं लागले, तेव्हां **नापोलियन** ह्मणाला, छि, पैसा कितीही असला तरी तो खर्चून जाईल; परंतु पुतळा नेहमीं **फ्रान्स** देशांत राहील, व यापासून **फ्रान्स** देशांतील कलाकौशल्यास उत्तेजन येईल. **व्हेनिस** शहर जिंकिलें तेव्हां खंडणीबद्दल पैसा व चित्रें घेऊन शिवाय तेथील पुस्तकालयांतून पांचशें हस्तलिखित पुस्तकें घेतलीं. याप्रमाणें पुष्कळ अत्युत्तम पुतळे वगैरे वस्तु **नापोलियन** यानें **फ्रान्स** देशास नेल्या. **फ्रेंच** लोकांनीं या वस्तु आपल्या विजयाचीं चिन्हें समजून एक उत्तम इमारत करून तींत मांडून ठेविल्या. मोठमोठ्या लढाया मारून लाखों रूपयांच्या खंडणीबद्दल पुतळे वगैरे वस्तु द्यावयाच्या, असल्या गोष्टी इकडील राजांच्या युद्धाच्या इतिहासांत फारशा आढळत नाहींत; यामुळें वाचकांस या गोष्टींविषयीं विशेष वाईट वाटणार नाहीं. परंतु युरोपांत ही गोष्ट पुष्कळांच्या मनास खेदकारक झाली. नवीन जिंकलेल्या देशांत **नापोलियन** याचे कित्येक मित्र होते, तेही या गोष्टीमुळें त्याचे द्वेषी झाले. राज्याधिकाऱ्यांचा हुकूम होता ह्मणून **नापोलियन** यानें हें कृत्य केलें, अथवा स्वेच्छेनें केलें हें सांगतां येत नाहीं. तथापि केवळ सोन्यारुप्यासच तो भुलणारा नव्हता. त्यास कलाकौशल्याची फार आवड असे, असें स्पष्ट होतें.

वरील युद्धानंतर **नापोलियन** याच्या अंगचे कित्येक गुण प्रसिद्धीस आले. **आस्त्रियाच्या** बादशाहानें फितूर होण्याकरितां त्यास पुष्कळ लांच देण्याचें कबूल करून **जर्मनी**तील एका सुपीक प्रांताची जहागीरही देतों ह्मणून सांगितलें. तथापि **नापोलियन** यानें ती गोष्ट नाकबूल करून सांगितलें कीं, मला मोठेपणा प्राप्त होणें असेल तर तो **फ्रान्स** देशापासूनच मिळाला पाहिजे. एका प्रसंगीं **नापोलियन** याचा एक मित्र ह्मणाला, आपल्या मेहनतीप्रमाणें आपणास अधिकाऱ्यांनीं बक्षीस दिलें नाहीं, याकरितां अमुक राजा पैसा देत आहे तो आपण घ्यावा. त्यावर **नापोलियन** यानें उत्तर केलें कीं, पैशाकरितां मी त्याचा मिंधा होणार नाहीं. शत्रूकडील लोकांनीं

कित्येक उत्तम उत्तम स्त्रियाही **नापोलियन** यास भुलविण्यास पाठ
ल्या. त्यांच्या मोहक विलासांसही **नापोलियन** याच्या दृढमना
दाद दिली नाहीं. **सेंतहिलिना** येथें असतांना तो म्हणे कीं 'अग
जाळ्यांत न सांपडण्यासारखें माझें मन बळकट होतें. नुटलेला कड
फुलांनीं आच्छादिलेला आहे, असें मला नेहमीं समजत असे.' अहा
हा ! काय मनोनिग्रह हा ! केवढी ही जितेंद्रियता ! अशा दृढ मनाच
नापोलियन राज्यलोभानें अंध व्हावा. काय हा विलक्षण चमत्का
आहे ! अक्कल गुंग होते.

मांटुआ येथें पराजय होऊन **आस्त्रियाचा** सेनापति **वर्मसर**
यानें तहाचें बोलणें लावण्याकरितां **फ्रेंच** लोकांकडे वकील पाठविल
तो अशा प्रसंगाच्या चालीप्रमाणें युक्तीनें म्हणाला कीं, आपण चां
ल्या अटी सांगत असाल तर आमचा सेनापति तह करण्यास कबू
आहे, नाहीं तर तो अजून पुष्कळ दिवस हरणार नाहीं. हें बोल
दुसऱ्या कामदारांशींच चाललें होतें, तें **नापोलियन** यानें दूरून ऐकि
लें. तेव्हां तो पुढें होऊन म्हणाला, 'तुमचा सेनापति शूर आहे
त्यास आम्ही या अटी सांगतों. आज, आठ दिवसांनीं, अथवा
ह्मिन्यानें, कधीं ही तह केला तरी आम्ही त्यास यापेक्षां वाईट अटी
मांगणार नाहीं. त्यास सांगा कीं, सेनापति **नापोलियन रोम**
जाण्यास निघाला आहे.' वकिलानें अटींचा कागद पाहिला
त्यास ज्यांची मुळींच आशा नव्हती, अशा उत्तम अटी **नापोलियन**
यानें सांगितल्या. त्यामुळें लागलाच तह ठरून **वर्मसर** यानें **मांटु**
आ शहर सोडून दिलें. तहाप्रमाणें सर्व शिपायांचीं हत्यारें **फ्रेंच**
लोकांनीं घेतलीं; परंतु मुख्य सेनापतीची तलवार घ्यावयाचे वेळेला
अशा वृद्ध शूराचा पाणउतारा आपण डोळ्यांनीं पहावा, हें यो
नाहीं, असें वाटून **नापोलियन** यानें त्याची तलवार घेण्यास फ
आपला एक कामदार मात्र पाठविला. यावरून **नापोलियन** याच्या
मनाचा मोठेपणा दिसून येतो.

फ्रान्सदेशांतील राज्याधिकाऱ्यांच्या मनांत अशा चांगल्या अटी

कबूल करण्याचें नव्हतें. त्यांच्या मनांत **आस्त्रियाच्या** सेनापतीचीं
फजिती करावयाची होती. परंतु **नापोलियन** यानें लिहून पाठविलें
कीं, शूरशत्रूच्या नांवास व **फ्रान्स** देशांतील लोकसत्ताकराज्याच्या
प्रतिष्ठेस ज्या अटी मला योग्य वाटल्या, त्या मीं सांगितल्या.

नापोलियन मिलान येथें थोडे दिवस राहिला तोंच त्यास
मांटुआ व व्हेनिस या शहरांवर हल्ला करावा लागला. इकडे
फ्रान्सदेशांतील राज्याधिकाऱ्यांस आपल्या सैन्याचा चोहोंकडे जय
होतो हें बरें वाटे, तथापि **नापोलियन** याची कीर्ति त्यांस दुःसह
होऊं लागली. त्यांस वाटूं लागलें कीं, कांहीं वेळानें हा आपली सर्व
सत्ता हरण करील, याकरितां त्यास कांहीं तरी आपल्या दाबांत
ठेवावें, म्हणून त्यांनीं असा हुकूम केला कीं, अर्धें सैन्य घेऊन तुम्ही
पोप व नेपल्सचा राजा यांवर स्वारी करावी, अर्ध्या सैन्यावर
केलरमन् यास नेमिलें आहे, त्यानें **आस्त्रियाच्या** फौजेवर जावें.
हा हुकूम पोहोंचल्याबरोबर **नापोलियन** यानें आपला राजीनामा
पाठवून असें लिहिलें कीं, 'अर्ध्या सैन्यानें **आस्त्रियाच्या** फौजेशीं
आरंभिलेल्या लढाईचा शेवट होणार नाहीं. माझ्याजवळ सर्व सै-
न्य असल्यामुळें इतक्या लढाया जिंकून मी **मिलान** शहरीं आलों.
दोन चांगले सेनापति असण्यापेक्षां एक वाईट बरा.' तेव्हां ज्याच्या
पराक्रमानें एवढाले विजय मिळाले, त्यास सोडून देण्याची अधिकाऱ्यां-
स छाती होईना. शेवटीं त्यानीं पुनः त्यास सर्व सैन्याचा मुख्य अ-
धिकारी नेमिलें. पुढें त्याचा अधिकार काढण्याची गोष्ट कोणीं कधी
काढिली नाहीं.

इतालीदेशांत असतां लोकप्रिय होण्याविषयीं **नापोलियन**
यानें पुष्कळ यत्न केला. तेथील लोकांची व याची भाषा एक अस-
ल्यामुळें तो सर्वांशीं गोडीगुलाबीनें बोले, तथापि पुष्कळ लूट केल्या-
मुळें कित्येक ठिकाणचे लोक अगदीं त्रासले होते. तेथें ३०,००० लोकां-
नीं बंड केलें. **पेव्हिआ** येथील लोकांनीं तर फ्रेंच लोकांस पुष्कल
त्रास दिला. परंतु शेवटीं **नापोलियन** यानें स्वतः त्यांवर हल्ला क-

रून तें शहर घेतलें. शहर स्वाधीन झाल्यावर तेथें फ्रेंच लोकां
भयंकर कत्तल व लूट चालविली होती, परंतु **नापोलियन** या
लोकांची दया येऊन त्यानें कांहीं वेळानें त्यांस मनाई केली;
कित्येक पुढारी लोकांस देहांत शासनें दिलीं, त्यांमुळें **नापोलियन**
याच्या नांवास काळिमा आली. पुढें **आस्त्रियन** लोकांबरोबर ल
ढाई झाली, तींत एका प्रसंगीं **नापोलियन** शत्रूंच्या हातीं लागत हो
ता, परंतु थोड्यांत निसटला. लढाई होऊन शत्रूंस पळवून लावि
ल्यावर तो कांहीं लोकांसहवर्तमान एका ठिकाणीं जेवांवयास बसला
तोंडांत घांस घेणार तों मागून शत्रूंची दुसरी टोळी आली. हें ऐक
तांच तो दुसऱ्या बाजूस वळून घोड्यावर बसून फरारी झाला. या सं
कटांतून सुटल्यापासून **नापोलियन** यानें सतत आपल्या भोंवतीं निव
डक शूर लोकांचा पहारा ठेविला. पुढें **नापोलियन** यानें **व्हेनिस** च्य
लोकांनीं सोळावा **लुई** याच्या भावास आपल्या देशांत राहूं दिलें, ह
दोषारोप ठेवून त्या लोक सत्ताकराज्याचा मुलुख जिंकिला. **नापो**
लियन याच्या भयानें **लुई** याच्या भावास देशांतून बाहेर जाण्या
सांगून **व्हेनिसच्या** अधिकाऱ्यानीं आम्ही **फ्रान्स** अथवा **आस्त्रिय**
यांपैकीं कोणत्याच पक्षास मिळत नाहीं, आम्ही अगदीं उदासीन रा
णार असा निरोप सांगून **नापोलियन** याकडे वकील पाठविल
त्यावर **नापोलियन** यानें सांगितलें कीं **फ्रान्स** व **आस्त्रिया** अ
देशांचा झगडा चालला असतां तुमच्यासारख्या दुर्बल लोकांनीं आ
उदासीन आहों म्हणण्यांत हांशील नाहीं. असें म्हणून त्यानें त्यां
पराभव करून कांहीं मुलुख घेतला. याचप्रमाणें त्यानें **नेपल्स** च्य
राजाचा पराभव करून खंडणी घेतली. शेवटीं त्यानें **पोपा**वरही ध
ड घातली. कांहीं मुलुखावर हल्ला करितांच **पोपा**नें तहाचें बोल
लाविलें. त्यांत **नापोलियन** यानें एक कोट खंडणी रोख, शिवा
शंभर उत्तम चित्रें व पुतळे, आणि सैन्यास सामानाचा पुरवठा व आ
कोना, फेरारा, व **बालोंगा** हीं शहरें व त्याखालील मुलुख इत
मागणें केलें. नंतर त्यानें **टस्कनी** शहराचा समाचार घेण्याचें मनी

त आणिलें. हा संस्थानिक **आस्त्रिया**च्या बादशाहचा भाऊ होता.
हा **नापोलियन** यासीं पूर्वीपासून स्नेहानें वागत होता. त्यामुळें त्याचीं
चित्रें वगैरे घेतलीं नाहींत. परंतु त्याच्या मुलुखांत **लेघोर्न** या शहरीं
इंग्लंदांतील व्यापाराचा माल पुष्कळ होता तो लुटिला, त्यामुळें पु
ष्कळ सावकारांचं नुकसान झालें. इंग्लंदांतील गलबतें भयानें पळून
गलीं. संस्थानिकानें मनांतील दुःख बाहेर न दाखवितां **नापोलियन**
याचा आदरसत्कार केला, तेव्हां **नापोलियन** त्यास म्हणाला, 'तुम
च्या भावास आतां **लांबर्दी** प्रांतांत बोटभरदेखील जागा राहिली
नाहीं.' पुढें पुष्कळ वर्षांनीं या उद्दामपणाच्या गोष्टीविषयीं बोलत
असतां **नापोलियन** म्हणाला, 'खुजा मनुष्य राक्षसानें कवटाळून
धरिला म्हणजे मोठी पंचाईत. तो गुदमरून मरावयाचाच.'

फ्रान्सदेशांतील राज्याधिकाऱ्यांच्या मनांत या सर्व मुलुखांत
आपल्यासारखीं लोक सत्ताकराज्यें असावीं असें होतें, म्हणून ते तसें
करण्याविषयीं **नापोलियन** यास आग्रह करीत; परंतु **नापोलियन**
म्हणे कीं, लोकांस लुटावें आणि आम्ही तुमचे मित्र आहों म्हणून
सांगावें, या दोन्ही गोष्टी एकदम करितां यावयाच्या नाहींत. शिवाय
नापोलियन यास असें वाटे कीं, लोकसत्ताकराज्यापेक्षां **पोपा**सारखे
संस्थानिक असतील तर **फ्रेंच** लोकांस खंडणी मिळविण्यास बरें.
याप्रमाणें **आस्त्रिया** व **इताली** देशांतील सर्व संस्थानें यांचा पराभव
करून सर्वांपासून खंडणी घेऊन **नापोलियन** यानें सर्वांवर आपला
दरारा बसविला.

नापोलियन लिओबेन येथें होता त्यावेळेस त्याचा शाळेंतील
सोबती **बोरीन** हा तेथें आला. यास **नापोलियन** पुष्कळ दिवस
आपला खाजगीकडील कारकून होण्याविषयीं बोलावीत होता. जो
नापोलियन मला लहानसें घर आणि एका घोड्याची गाडी मिळाली
म्हणजे पुरे असें **पारिस** येथें म्हणत होता; तोच या वेळेस मोठ्या
राज्यलक्ष्मीनें युक्त होऊन मोठमोठ्या कामदारांमध्यें मिरवत होता.
आपल्या मित्रास पाहतांच तो पूर्वीप्रमाणें सलगीनें म्हणाला, 'शेवटीं

तर एकदांचा आलासना ?' **बोरीन** मोठा मार्मिक होता. त्यास ज गाची चांगली माहिती होती. पूर्वीप्रमाणें बरोबरीनें नवोलतां त्यां सेनापतीस नम्रतेनें दूरून मुजरा केला. हें मित्राचें वर्तन **नापोलिय**न याच्याही पसंतीस आलें. याप्रमाणें मोठेपणास चढल्यावर **नापो**लियन आपल्या पूर्वीच्या मित्रांविषयीं ममताळू असे, तरी आपणास प्राप्त झालेल्या महत्वास शोभण्यासारखें गांभीर्य ठेवण्याकरितां तें त्यांशीं पूर्वीप्रमाणें फार सलगी करीत नसे.

भाग ६ वा.

पूर्वीच्या भागांत सांगितल्याप्रमाणें **आस्त्रिया**चा पराभव हो ऊन तह होण्याचें ठरलें, तथापि दोन्ही पक्षाचे लोक कांहीं तरी नि मित्त काढून तहाची गोष्ट लांबणीवर टाकीत होते. **जर्मनी**मध्ये **फ्रान्स** देशाची दुसरी फौज होती ती आपल्या मदतीस आणून आ **स्त्रिया**ची मुख्य राजधानी **व्हियेना** शहर यावर हल्ला करण्याचा **नापोलियन** याचा बेत होता. **पारिस** शहरामध्यें सांप्रतची राज्य व्यवस्था मोडून टाकण्याविषयीं राजपक्षीय लोकांची खटपट चालली होती; तिचा काय परिणाम होतो, याची **आस्त्रिया**चा बादशहा वाट पहात होता. **पारिसमध्यें** खटपट चालली आहे हें **नापोलियन** यास कळलें होतें. **व्हेनिस** शहर घेतलें तेव्हां **नापोलियन** यानें खुप करण्याकरितां तेथील लोकांनीं नीचपणाचें एक कृत्य केलें. ते असें कीं, तेथें **फ्रान्स** देशांतील राजपक्षाचा एक गृहस्थ होता त्यास पकडून **नापोलियन** याच्या स्वाधीन केलें. **नापोलियन** यानें त्याच्याजवळचे कागदपत्र तपासले, त्यांवरून त्यास वरील वर्तमान क ळलें. **जर्मनी**कडील **फ्रेंच** फौजेचा सेनापति जो प्रसिद्ध **पिचेग्रू** ती

ही फितूर होऊन राजपक्षास मिळाला आहे, व त्यामुळेंच कित्येक वे ळां त्यानें जयाचे प्रसंग टाळिले, असें वरील कागद पत्रांवरून **नापो**लियन यास कळलें. तें त्यानें **फ्रान्स** देशांतील अधिकाऱ्यांस क ळविलें; आणि राजपक्षाचा मोड करून स्वस्थता करण्यास लागेल तो पैसा पुरवून सैन्याची मदत देतों असें लिहून पाठविलें. हे उपकार फेडण्याकरितां **नापोलियन** यास राज्यकारभार चालविणाऱ्या मुख्य मंडळींत जागा द्यावी असा त्याच्या मित्रांनीं उद्योग केला; परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. कारण राज्याधिकाऱ्यांस वाटलें कीं एकवार **नापोलियन** याचा प्रवेश झाला कीं, आह्मांस एकीकडे ठेवून तोच आपल्या हातांत सर्व अधिकार घेईल. **नापोलियन** यानेंही अजून पुरती वेळ आली नाहीं असें समजून त्याविषयीं आणखी खटपट केली नाहीं. **पिचेग्रू** त्यास देहांत शिक्षा व्हावी असें **नापोलियन** याच्या मनांत होतें, परंतु सांप्रतच्या राज्यस्थितीस कंटाळून पुष्कळ लोक राजपक्षास अनुकूळ झाले होते त्यामुळें असें केलें असतां कदाचित् मध्यांच बखेडा होईल या भीतीनें अधिकाऱ्यांनीं त्यास बडतर्फी दे ऊन दुसरा सेनापति नेमिला. याशिवाय दुसरी शिक्षा केली नाहीं.

पारिसमध्यें चाललेल्या खटपटीपासून फायदा होण्याची निराशा झाली तेव्हां, **आस्त्रिया**च्या बादशहानें **नापोलियन** यास स्वदस्तुरचें पत्र लिहिलें. त्यांत तह टरण्यास इतका उशीर लागला याजबद्दल आश्चर्य प्रदर्शित करून आपल्या निकालावर लाखों लोकांचें नशीब अवलंबून आहे असें लिहिलें. तहाचें बोलणें चाललें असतां कांहीं कलमें **नापोलियन** यानें सांगितलीं तीं **आस्त्रिया**चा वकील कबूल करीना. तेव्हां **नापोलियन** रागावून हातांत एक मौल्यवान् कांचेचें सुंदर पात्र घेऊन म्हणाला, 'इकडे पहा, दोन महिन्यांत या भांड्या प्रमाणें **आस्त्रिया**च्या राज्याचे तुकडे करीन.' असें म्हणून तें भांडें जमिनीवर मोठ्यानें आपटून तो चालता झाला. तेव्हां **आस्त्रिया**च्या मंत्र्यांकलानें पुष्कळ आर्जव करून त्यास शांत केलें. नंतर लौकरच तह ठरला. त्यांत **फ्लांडर्स** वगैरे **आस्त्रिया**चे मुलुख व कांहीं किल्ले

फ्रान्स देशास मिळाले. वास्तविक पाहतां आस्त्रियाच्या मदती करितां व्हेनिसच्या लोकांनीं आपला नाश करून घेतला; असें असून त्यांचा मुलुख दोघांनीं वांटून घेतला. तसेंच अयोनियन बेटें व डाल्माशिआ प्रांत हे फ्रान्स देशास जोडून तेथें फ्रेंच लोकांचें राज्य स्थापिलें. या दोन्ही गोष्टींनीं आस्त्रियाचा आपलपोटेपणा व नापोलियन याच्या लोकांस स्वतंत्र करण्याच्या बोलण्याचा खोटेपणा हीं दोन्हीं सर्व युरोपांतील लोकांस कळलीं.

वर सांगितलेला तह फ्रान्स देशांतील अधिकाऱ्यांस न विचारितां नापोलियन यानें आपल्या मनास वाटेल तसा केला. त्यांत कांहीं कलमें अधिकाऱ्यांस नको होतीं, तीं त्यानें घातलीं व कांहीं पाहिजे होतीं तीं त्यानें काढून टाकिलीं. याप्रमाणें नापोलियन याची स्वतंत्रता पाहून अधिकाऱ्यांस धाक वाटूं लागला. नापोलियन काय करितो हें पाहण्याकरितां ते कोणत्यातरी निमित्तानें लोकपाठवीत त्यांचें नापोलियन चांगलें आगतस्वागत करी, परंतु सर्व राज्याधिकार आपल्या हातीं आहे असें त्यांस दर्शवीत असे. अधिकाऱ्यांस संशय येण्यासारखी आणखी एक गोष्ट झाली, ती अशी कीं, तहाच्या कलमांत 'फ्रान्स देशांत लोकसत्ताकराज्य झालें.' असें आस्त्रियाच्या वकिलानें एक कलम घातलें होतें तें पाहून नापोलियन म्हणाला, 'तें काढून टाका. ही गोष्ट आकाशांत सूर्य आहे, या गोष्टीप्रमाणें स्पष्ट आहे.' तह ठरल्यानंतर एका देवळांत कांहीं समारंभ झाला. तेथें नापोलियन यास बसण्यास उत्तम सुशोभित जागा केली होती. तेथें आस्त्रियाच्या बादशाहाचा वकील जाऊन बसणार होता. परंतु नापोलियन यानें त्याचा हात धरून मांगितलें कीं, तुमचा धनी असता तरी फ्रान्स देशाच्या सत्ताधीशाचा मान घेतल्याशिवाय मी राहिलों नसतों.

आस्त्रियाशीं तह ठरत होता, त्यावेळेस जोसेफाईन नापोलियन यास भेटण्याकरितां इतालीं देशांत आली. ज्या ज्या शहरांतून ती गेली, तेथील लोकांनीं तिचें राणीप्रमाणें आगतस्वागत केलें

त्यावेळेस **नापोलियन मिलान** शहराजवळील **मांटेबेल्लो** या उत्तम किल्ल्यांत राहत होता. लग्न झाल्यावर थोड्याच दिवसांत प्रियेचा वियोग झाल्यामुळें वरच्यावर उभयतांचीं पत्रें परस्परांस येत असत. एके समयीं **नापोलियन** यानें तिला असें लिहिलें कीं, **वर्मूसर** यानें तुला वियोगदुःखानें अश्रु ढाळण्यास लाविलें; त्याचें फळ त्यास भोगावें लागेल. अशा प्रकारचीं चमत्कारिक पत्रें तो पुष्कळ लिही. **जोसेफाईन** हिची रीतभात, चालवर्तणूक, सर्वांस पसंत पडण्यासारखी फार उत्तम व राजपत्नीसहि शोभण्यासारखी होती. तेथें राजे बडेलोक येत ते सर्व तिचा वहावा करीत. तीही सर्वांचें यथायोग्य आदरातिथ्य करी. त्यामुळें **मांटेबेल्लो** येथील राजवाडा असें लोक म्हणूं लागले. गीत, वाद्य, नृत्य, मेजवान्या, यांत तेथील कांहीं तरी नेहमीं सुरू आहेच. **जोसफाईन** हिला बरोबर घेऊन **नापोलियन** यानें पुष्कळ प्रांत पाहिले. सर्व ठिकाणीं राजाराणी यांप्रमाणें उभयतांचा डौल असे. **नापोलियन** अशा आनंदांत असतां त्याच्या एका बहिणीनें पत्र पाठविलें, त्यांत तिनें असें लिहिलें होतें कीं, आम्ही गरीब आहों म्हणून आम्हांस टाकून देऊं नको. किती झालें तरी तूं आमचा भाऊ आहेस. पत्र वाचून **नापोलियन** यास किंचित् वाईट वाटलें.

तेथांतील कांहीं लहानसहान कलमें ठरावयाचीं होतीं, म्हणून **नापोलियन रास्तद्** शहरीं कांहीं दिवस राहिला. तेथें असलेल्या अधिकाऱ्यानीं त्याचा उत्तम मानमर्तब ठेविला. तो तेथें फार दिवस राहिला नाहीं. त्यास वाटलें, कीं तहांतील कित्येक गोष्टींविषयीं वादविवाद होऊं लागला तर आपले फार दिवस मोडतील. त्यास तर **पारिस** येथें जाऊन राज्यप्रकरणीं कित्येक गोष्टी आपणास अनुकूल आहेत किंवा नाहींत, हें प्रत्यक्ष पहावयाचें होतें. त्यानें आपलें जाग्यावें निशाण पुढें लावून दिलें. त्यावर सर्व ठिकाणच्या विजयांचा वृत्तांत संक्षिप्त लिहिलेला होता. तो पाहून एका मनुष्यानें एवढ्याशा अल्प काळांत एवढाले महा पराक्रम केले, हें पाहून लोकांस महदाश्च-

र्य वाटलें. **रास्तद्** येथेंही **नापोलियन** याचा हट्टी स्वभाव दिसून आला. **काउंट्फेर्सेन** म्हणून **स्वित्सर्लंडचा** वकील तेथें होता. त्याने **फ्रान्स** देशांतील राज्यक्रांतीच्या आरंभीं सोळावा लुई व त्याची राणी यांच्या तर्फे पुष्कळ खटपट केली होती. त्यामुळें **नापोलियन** यानें स्पष्ट सांगितलें कीं, अशा उघड **फ्रान्स**देशांतील लोकसत्ताकराज्याच्याविरुद्ध असलेल्या मनुष्याबरोबर आपण राज्यप्रकरणीं भाषण करणार नाहीं. यामुळें **काउंट्फेर्सन** यास तेथून जावें लागलें.

मोठी फौज तयार करून तिचा अधिकार **नापोलियन** यास देऊन **इंग्लंद** देश जिंकावयाचा, असा बेत राज्याधिकाऱ्यांनी केला होता, हें **नापोलियन** यास कळलें होतें. त्यावरून **पारिस**मध्ये आपली गरज आहे, असें निमित्त करून दुसऱ्या अधिकाऱ्यास तहाचें काम संपविण्यास सांगून तो **पारिस** येथें जावयास निघाला. वाटेनें जातांना सर्व ठिकाणीं लोकांनीं त्याच्या नांवास योग्य असा त्याचा मानमर्तब ठेविला. **पारिस** येथें पोहोंचल्यावर राज्याधिकाऱ्यांनींही मोठ्या थाटानें त्याची पहिली भेट घेतली. सर्व शहरचे लोक हा समारंभ पाहण्यास गेले होते. त्यावेळीं **तालेरंद** या धोरणी मनुष्यानें खुबीदार भाषण केलें. त्यांत त्यानें असें म्हटलें कीं **नापोलियन** याची महत्वाकांक्षा लोकसत्ताकराज्यास भयंकर आहे असें नाहीं. त्यास स्वभावतः विद्याभ्यासाची आवड आहे. आपल्या देशाच्या कीर्तीकरितां त्यानें टाकिली पाहिजे. **नापोलियन** यानेंही गौरवाचें भाषण केलें. शेवटीं राज्याधिकाऱ्यांनीं **इंग्लंद**कडे लक्ष असूं द्या असें सुचविलें.

पारिस येथें गेल्यावर **नापोलियन** अगदीं साधेपणानें राहूं लागला. तो मंडळींत अगदीं मिसळत नसे, व आपल्या मनांत काय आहे, हें कोणास समजूं देतनसे. नेहमीं त्याच्या मनांत कांहीं तरी मोठी योजना चालली आहे, असें दिसे. त्याचे घरीं पुष्कळ लोक येत त्या सर्वांचें **जोसेफाईन** उत्तम आदरातिथ्य करी. हलक्या व चैनी लोकांत कधीं मिसळत नसे. तो म्हणे मी आणखी

कांहीं पराक्रम केल्याशिवाय राहिलोंतर मला असें दोनतीनदां पाहिल्यावर मजकडे लोक वुंकून सुद्धां पाहणार नाहींत. एकामागून एक अशी नवी नवी कीर्ति मिळविली पाहिजे. **नापोलियन** यास पाहण्याकरितां जिकडे तिकडे लोकांची गर्दी पाहून **बोरीन** ह्मणाला, इतक्या लोकांचे डोळे तुह्मांकडे लागले आहेत, तुह्मी मोठे भाग्यशाली आहां. त्यावर **नापोलियन** ह्मणाला, मला उद्यां फांशी देण्याच्या जाग्याकडे वोलविलें तरी लोक असेच जमतील ! त्यास मनुष्य स्वभावाची पूर्ण माहिती होती.

पारिस मध्यें एक मोठमोठ्या विद्वान् शास्त्रज्ञ लोकांची सभा असे. त्या सभेनें **नापोलियन** यास सभासद नेमिलें. त्या सभेंत वादविवाद करण्यास तो नेहमीं जात असे. सभेंत भाषण करितांना एके समयीं त्यानें असें बोलून दाखविलें कीं, खरा विजय ह्मटला ह्मणजे ज्ञानानें अज्ञानास जिंकणें हा होय. हा विजयमात्र कोणाच्या अश्रुपातास कारण होत नाहीं. **नापोलियन** यास मान देण्याकरितां **पारिस** येथील लोकांनीं तो राहत होता त्या आळीचें नांव बदलून कोर्सी असें नवीन नांव ठेविलें. अशा आनंदांत असतांही कित्येक गोष्टींमुळें त्याचें मन चिंताक्रांत असे. राज्यकारभार करणाऱ्या कित्येक लोकांस तुमची कीर्ति सोसत नाहीं, त्यामुळें त्यांनीं तुमचा जीव घेण्याचा बेत केला आहे, अशी बातमी त्यास कोणीं सांगितली, त्यामुळें त्यास मोठा धाक पडला होता. शिवाय **जोसेफाईन** उधळेपणानें खर्च करून नानाप्रकारच्या ऐषआरामाच्या वस्तु विकत घेई, हें ही त्यास आवडत नसे.

आस्त्रिया वगैरे देशांशीं झालेला तह जाहीर करावयाचा त्या दिवशीं मोठा समारंभ झाला. त्या वेळेस ज्याच्या पराक्रमानें **फ्रान्स** देशाची इतकी कीर्ति झाली, त्यास डोळ्यांनीं पाहण्याकरितां हजारों लोकांची गर्दी झाली. सर्व लोक त्याच्या नांवानें जयघोष करूं लागले. हें पाहून राज्यांतील पुढारी लोकांस फार वाईट वाटलें. **नापोलियन** यानें

त्यावेळीं आवेशानें भाषण केलें, त्यांत असें सांगितलें कीं, हें सर्व यश फ्रेंच शिपायांच्या पराक्रमांमुळें आहे. **बारास** यानें असें भाषण केलें कीं, **नापोलियन** यास उत्पन्न करण्यांत विधात्यानें आपली सर्व शक्ति खर्चिली आहे. हें ऐकतांच लोकांनीं आनंदाचा घोष केला. तो कारभारी लोकांच्या हृदयांत शंकूसारखा लागला. **इताली** देशांतून आलेले फौजेंतील लोक तर उघड बोलत कीं, या सर्वांस नाहींसे करून आपल्या सेनापतीस राज्यावर बसवावें. **फ्रान्स** देशांत पूर्वी **नापोलियन** यास मोठी जहागीर व इनाम द्यावें अशी वहिवाट चालली होती; परंतु त्याच्या कीर्तीपासून आपला नाश होईल असें मानणाऱ्या कारभाऱ्यांनीं ती गोष्ट करूं दिली नाहीं. कित्येकांस वाईट वाटलें. कारण **नापोलियन** यानें पुष्कळ द्रव्य **फ्रान्स** देशांत पाठविलें असून त्यास इनाम देण्यास सुद्धां कारभारी विसरले नाहींत, हा उघड अन्याय होय; असें सर्वांस वाटूं लागलें. **नापोलियन** याच्या कीर्ती मुळें त्याच्या दोन भावांचा राज्यकारभार त पुष्कळ शिरकाव झाला होता, तरी आपल्या कार्य सिद्धीची वेळ अद्याप येऊन ठेपली नाहीं, असें समजून त्यानें आपलें मन पुनरपि लढाया करून जय मिळविण्याकडे लाविलें.

इंग्लंदावर स्वारी करण्याच्या इराद्यानें **नापोलियन** यानें प्रथमतः **इंग्लंदा**समोरील **फ्रान्स** देशाच्या किनाऱ्यावरील सर्व लढाईच्या जागा तपासून पाहिल्या. यामुळें त्यास या प्रदेशाची पुष्कळ माहिती झाली. तीमुळें पुढें राज्यावर बसल्यावर त्यानें या प्रदेशांत पुष्कळ सुधारणा केल्या. या तपासणीवरून त्यास कळून आलें कीं **इंग्लंदा**वर स्वारी करण्याचा प्रसंग अद्याप आला नाहीं. तो ह्मणजे अशा प्रसंगीं **फ्रेंच** सैन्यास मी धोक्यांत घालणार नाहीं. **इंग्लिश** लोकांची उत्तम तयारी आहे. त्यांबरोबर टक्कर मारण्यास फारच चांगली तयारी पाहिजे. **इंग्लंदा**वर स्वारी करण्याची निराशा झाल्यामुळें त्यानें **आफ्रिके**तील **मिसर**देशावर स्वारी करण्याचा बेत केला. पूर्वीपासूनच त्याच्या मनांत होतें कीं, **माल्टा** बेट घेऊन **मिस**

देश जिंकावा म्हणजे **अमेरिकेंतील फ्रेंच** लोकांचीं ठाणीं इंग्लिशांनीं घेतलीं त्याचा वचपा निघेल, आणि **हिंदुस्थानांतील इंग्लंदा**च्या व्यापारास व राज्यास हरकत करितां येईल. तो म्हणाला, 'युरोपखंड हें वारूळ आहे, आहे. त्यास सर्व वैभव **एशियां**तून प्राप्त झा-

इंग्लंदाची खोड मोडण्याचें राज्याधिकाऱ्यांचे मनांत होतें, परंतु **नापोलियन** सारख्या अनुभविक मनुष्याचें मत प्रतिकूळ अ-ल्यामुळें त्यांस आपला बेत तडीस नेण्याची छाती होईना. **मिसर** देशावर स्वारी करण्यास परवानगी देणेंही न्याय्य नव्हतें; व **नापोलि-**यन गेला असतां **आस्त्रिया**स पुनः अवसान येईल असा धाक होता. तथापि **नापोलियन** देशांत राहिला असतां कदाचित् त्यापासून आ-पल्या अधिकारास धोका येईल; असें मनांत आणून त्यांनीं त्यास स्वारीची तयारी करण्यास परवानगी दिली. शिवाय तिकडे आपल्या लोकांस पुष्कळ द्रव्य प्राप्त होईल अशीही त्यांस इच्छा होती. इंग्लं-दावर स्वारी करण्याची तयारी **नार्मंदी** व **पिकार्डी** प्रांतांत चालली होती, तिकडे **इंग्लिश** लोकांचें लक्ष होतें. याकरितां **नापोलियन** बरोबार तेथें जात असे. परंतु गुप्त रीतीनें त्यानें भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावर कडेकोट तयारी चालविली होती. **फ्रान्स** देशांतील कलाकौशल्य वाढविण्याच्या इच्छेनें **इताली** देशांतल्या राजांपासून चित्रें आणिलीं त्याप्रमाणेंच मिसर देशांत प्राचीन काळच्या वस्तूंचा शोध लावून अर्वाचीन शास्त्रांस उत्तेजन देण्याच्या इच्छेनें **नापोलिय-**न यानें सुमारें शंभर विद्वान् लोक बरोबर घेतले. **पारिस** येथून निघण्यापूर्वी त्यानें आपल्या खाजगीकडील कारभाऱ्यास बरोबर ने-ण्याकरितां भूगोल, प्रवासवर्णन, इतिहास, काव्य, नाटकें, राज्यनीति, वगैरे विषयांचीं पुस्तकें घेण्यास सांगितलें. **कुराण** व **बैबल** वगैरे धर्मपुस्तकेंही त्यानें बरोबर घेतलीं.

तूर्तां शहराजवळ सर्व लढाऊ गलबतांची कडेकोट तयारी झाली. प्रत्यक्ष कारभारांत आपणास वर्चस्व मिळण्याच्या खटपटींत **नापोलिय-**

न यानें बरेच दिवस घालविले; तरी सध्या वेळ आली नाहीं, अ
पाहून तो मिसर देशावर स्वारी करण्यास जाण्याकरितां तूलो शह
गेला. **तूलो** येथें गेल्यावर त्यानें योद्ध्यांस वीरश्री आणण्याकरि
भाषण केलें; तेव्हां त्यांस सांगितलें कीं, रोमन लोकांनीं **कार्थेज** येथी
लोकांवरोवर जमिनीवर व पाण्यावर लढाया केल्या. **इंग्लंद** हे
फ्रान्स देशाचें **कार्थेज** आहे. स्वतंत्रता देवीच्या नांवानें मी तु
ह्मांस समुद्र उल्लंघून दूरच्या देशांत नेणार. तेथें तुह्मांस थंड यूरोप
खंडांत कधीं प्राप्त न होणारी कीर्ति व संपत्ति प्राप्त होईल. अग
लहान प्रतीच्या शिपायांसमुद्धां सात एकर जमीन इनाम मिळाली पाहिजे
जमीन कोठली हें तो कांहीं बोलला नाहीं. तथापि आजपर्यंत त्या
दिलेलें वचन कदापि खोटें झालें नव्हतें, त्यामुळें हें भाषण ऐकू
सर्वांस आनंद होऊन ते मोठ्या उत्साहानें निघाले.

नूलों येथें लढाऊ गलबतांची तयारी चालली हें **इंग्लिश** सरका
रास कळलें होतें, आणि तीं गलबतेंही आपल्या देशावर स्वारी होणा
तिच्याच मदतीकरितां आहेत असें त्यास वाटत होतें म्हणून **नापो**
लियन याचा मुख्य उद्देश त्यास कळला नाहीं, तथापि त्यानें प्रसि
पराक्रमी **नेल्सन** याच्या हाताखालीं लढाऊ गलबतें देऊन त्यास ति
कडे पाठविलें होतें. **नेल्सन** याच्या देखत गलबतें हांकारणें म्हणजे
मोठी पंचाईत हें **नापोलियन** यास ठाऊक होतें; परंतु एके रा
(ता १ मे सन १७९८) तुफान झाल्यामुळें **नेल्सन** यास गलबतें
लांब न्यावीं लागलीं; तितक्यांत जलदी करून सर्व गलबतें हांकारण्या
स **नापोलियन** यानें हुकूम केला. प्रातःकाळीं आकाश निरभ्र
होऊन वारा चांगला लागल्यामुळें सर्व लोकांस आनंद झाला. ते ना
पोलियन याच्या नशीबाची तारीफ करूं लागले. एकंदर सर्व गल
बतें मिळून चाळीस हजार उत्तम फौज होती. शिवाय दुसरे अधि
कारी होते. **नापोलियन** जाईल तेथें जय ठेविलेला आहे अशी
वांची खात्री होती.

भाग ७ वा

तूलों येथून गलबते हांकारून **नापोलियन** निघाला तो प्रथम **माल्टा** हें **इंग्लिशांचें** ठिकाण घेण्यास गेला. तेथील ठाणेदारास **फ्रान्स** देशांतील अधिकाऱ्यांनीं अगोदर यत्न करून फितूर करून ठेविलें होतें. त्यामुळें उगाच थोडी झटापट झाल्यासारखी होऊन **फ्रेंच** लोकांनीं तें सर केलें. तेथें मोठा किल्ला आहे त्यांत शिरतेवेळेस **नापोलियन** म्हणाला, येथें आपले मित्र होते म्हणून बरें झालें नाहीं तर असा अनायासानें आमचा प्रवेश झाला नसता.

माल्टा येथें रक्षणास पुरे इतके लोक ठेवून **नापोलियन** पुढें चालता झाला. **समुद्रांतून** दूर **इताली** देशांतील पर्वतांची शिखरें दिसलीं, त्यावेळेस मागील विजयाची आठवण होऊन त्याच्या मनास विशेष उत्साह प्राप्त झाला. **नापोलियन** याचा धाक इतका असे कीं, तीनशें गलबतें व त्यांवर इतके लोक होते तरी जिकडे तिकडे अगदीं स्वस्थता असे. **नापोलियन** यानें मन अद्वितीय होतें. बरोबर विद्वान् लोक घेतले होते, त्यांबरोबर तो वाटेनें धर्म, राज्य, ज्योतिषशास्त्र, इत्यादि गहन विषयांवर वादविवाद करीत असे.

नेल्सन यास चुकावून गेला तरी **नापोलियन** यास त्याचा मोठा धाक होता. **नेल्सन** यास **फ्रेंच** लोकांचीं गलबतें गेलीं असें कळतांच त्यानें मिसर देशाकडे **नापोलियन** गेला असा तर्क केला. जवळ फौज थोडी होती, तरी **फ्रेंच** गलबतांचा पाठलाग करण्याचा निश्चय करून तो त्यांच्या अगोदर **नाईल** नदीजवळ आला. वाटेनें एका प्रसंगीं दोन्ही सैन्यें अगदीं सात आठ कोसांच्या अंतरानें जवळ भिडलीं होतीं. तेव्हांच लढाई व्हावयाची, परंतु धुकें असल्यामुळें तीं एकमेकांस दिसलीं नाहींत. **नापोलियन** **अलेक्झांद्रिया** शहराकडे येईल असें समजून **नेल्सन** तेथें आला, परंतु तेथें कोणी नाहीं, असें पाहून तो दुसरीकडे गेला. तो गेल्याबर दोनदिवसांनीं **फ्रेंच** लोकांचीं गलबतें तेथें आलीं. तेथें दुसरीं कोणाचीं गलबतें नाहींत, असें पाहून **नापो-**

लियन यानें सैन्यास जमिनीवर ताबडतोब उतरण्याचा हुकूम केला. इतक्यांत दूर क्षितिजाकडे एक गलबत दिसूं लागलें तें शत्रूंचें असेल असें वाटून तो म्हणाला, 'देवा, मला सहा तास पाहिजेत. तेवढे देणार नाहींस काय?' तें गलबत **इंग्लिशां**चें नव्हे असें कळतांच उतरण्याची जलदी करण्यास त्यानें सांगितलें. त्यावेळेस रात्र असून तुफान होतें, म्हणून हातारखालचे कामगार सकाळपर्यंत वाट पाहण्याविषयीं आर्जव करीत होते, तरी त्यानें एकिलें नाहीं. त्यामुळें बंदरांत उतरतांना पुष्कळ माणसें दर्यांत पडून बुडून मेलीं. याप्रमाणें **मिसर** देशांत **अलेक्झांड्रिया** शहराचे पूर्व बाजूस सुमारें पांच कोसांवर **फ्रेंच** लोक सन १७९८ जुलई तारीख २ या दिवशीं उतरले.

या वेळेस **मिसर** देश **यूरोपांतील तुर्कस्थाना**च्या अमलाखालीं होता. **तुर्कस्थान** व **फ्रान्स** यांमध्यें तंटा नव्हता. यामुळें **अलेक्झांड्रिया** येथील अधिकाऱ्यांची लढाईची तयारी नव्हती. तथापि त्यांनीं थोडा वेळ टिकाव धरिला. परंतु त्यांचें कांहीं चालूं नदेत **फ्रेंच** लोकांनीं तें शहर सर केलें. दोनशें **फ्रेंच** लोक त्या झटापटींत मेले. **तुर्क** लोकांचा पुष्कळ नाश झाला. शहर सर केल्यावर **फ्रेंच** लोकांनीं तेथें बरीच लूट केली.

मिसर देशांत प्रवेश करण्यापूर्वी **नापोलियन** यानें आपल्या लोकांस सांगितलें; 'आतां ज्यां लोकांबरोबर आपण राहणार ते मुसलमान आहेत. त्यांच्या धर्मांतील पहिली गोष्ट ही आहे कीं, ईश्वर आहे; व **महमद** हा त्याचें ज्ञान करून देणारा आहे. त्यांच्या उलट बोलूं नका. जू (इस्रायल.) आणि **इताली** देशांतील लोकांशीं तुम्ही वागलां असेंच यांच्याशीं वागा. जू लोकांच्या व **इताली** देशांतील लोकांच्या धर्माधिकाऱ्यांस मान दिला त्याप्रमाणेंच त्यांच्या काझींस व इमामांस द्या. **रोमन** लोकांचें सैन्य कोणत्याही धर्माच्या लोकांस पीडा करीत नसे. **यूरोपां**तील रितीभातींहून वेगळ्या रीतिभाती येथें आमच्या दृष्टीस पडतील, त्याप्रमाणें वागण्याची आम्हांस संवय केली पाहिजे. हे लोक आमच्यापेक्षां वेगळ्या

आपल्या बायकांस वागवितात. जो कोणी दुसऱ्याच्या वस्तूकडे कपटदृष्टीनें पाहतो तो दुष्ट होय. लुटीनें कोणाची भरभराट होत नाहीं. तीमुळें अप्रतिष्ठा होते. पुढील लाभाची हानि होते. आणि ज्यांशीं लेहभाव ठेविला असतां आपलें कल्याण व्हावयाचें ते आपले शत्रु होतात.' **महमदानें** स्वबुद्धीनें जगांत एवढी अदलाबदल करून टाकिली, हें पाहून **नापोलियन** यास आश्चर्य वाटे. तो दैववादी होता. आपणास सुद्धां महमदासारखें करितां येईल असें त्यास वाटे.

अलेक्झांद्रिया शहर घेतल्यावर **नापोलियन** यानें **मिसर** देशच्या लोकांस जाहीर केलें कीं, लोक तुम्हांस सांगतील कीं, मी तुमचा धर्म बुडविण्याकरितां आलों आहें, त्यांवर तुम्ही विश्वास ठेवूं नका. त्यांस सांगा कीं, तुमच्या हक्कांचें रक्षण करावें, तुम्हांवर जुलूम करणाऱ्यांस शिक्षा करावी, याकरितां मी आलों आहें. **मेमलुक** लोकांपेक्षां ईश्वर, महमद, व कुराण, यांविषयीं माझ्या मनांत अधिक पूज्यबुद्धि आहे; **काजी** व **इमाम** हो, मी तुम्हांस खात्रीनें सांगतों कीं, आम्हीही खरे मुसलमान आहों. **पोप** व **माल्टा** येथील लोक यांची आम्हीं खोड मोडिली नाहीं काय? आमच्याशीं चांगले वागतील, ते निष्पट सुखी होतील. **मेमलुक** यांच्या बतीनें लढतील त्यांचा विध्वंस होईल.

मिसर देश नांवानें **तुर्कस्थान**च्या अमलांत होता, तरी वास्तविक सत्ता **मेमलुक** लोकांच्या हातांत होती. हे लोक मोठ्या जहागीरदारांप्रमाणें असत. त्यांच्या ताब्यांत **मिसर** देशाचे वेगळाले भाग होते. या लोकांत एकमेकांत पुष्कळ तंटे होत व हे **तुर्कस्थान**च्या सरकाराशींसुद्धां बखेडे करीत. यांजवळ घोडेस्वार फार चांगले असत. हे लोक कंठक असून युद्धांत मोठे कुशल व शूर असत. त्यांच्यामध्यें अशी चाल असे कीं, एक अधिकारी मेला, म्हणजे सर्वांत श्रेष्ठ व शूर असेल त्यानें त्याच्या गादीवर बसावें. **नापोलियन** म्हणे, '**मेमलुक** लोकांचे स्वार व **फ्रेंच** लोकांचें पायदळ हे एकत्र झाले तर जगास जिंकितील.' हे लोक प्रजेस फार पीडा देत. यामुळें

सुपीक जमिनींत शेती करणारे शेतकरीसुद्धां अन्नास मोताद असत.

तारीख ७ जुलई सन १७९८ या दिवशीं **नापोलियन** अले
क्झांद्रिया येथून **केरो** शहरास जाण्यास निघाला. तयारी क
ण्यास अवकाश न देतां, मुसलमान लोकांशीं भिडावयाचें असा त्या
उद्देश होता. **नाईल** नदीवर कांहीं फौज ठेवून सैन्य पुढें चालूं
गलें. तेथील हवा फार वाईट. नानाप्रकारचे जीवजंतु मनुष्य
फार त्रास देतात. तापलेल्या वाळूनें कित्येकांच्या डोळ्यांस विक
होतो. पाण्याचा दुष्काळ. पाणी कोठें सांपडलें नरी तें फार वाई
एके वेळेस असें झालें कीं, दूर उत्तम स्वच्छ पाण्याचें सरोवर दिस
त्यामुळें तान्हेनें व्याकूळ झालेले **फ्रेंच** लोक आनंदी होऊन ति
पाणी पिण्यास निघाले. परंतु पुष्कळ लांब गेले तरी कांहीं ना
तेव्हां हें मृगजळ आहे असें त्यांस समजलें. **मिसर** देशांत उष्ण
फार असल्यामुळें मृगजलाचा चमत्कार पुष्कळवेळां दृष्टीस पड
वाटेंत माणूस, जनावर, झाड, वगैरे कांहीं दृष्टीस पडावयाचें नाहीं
असा प्रदेश पाहून सैन्यांतील मोठमोठ्या सोसक शूर लोकांचेंही धै
खचूं लागलें. कित्येक म्हणूं लागले कीं, आम्हांस सात एकर जमी
देणार ती हीच काय ? **नापोलियन** याचें मन व शरीर दोन्ही वि
क्षण दृढ होतीं. त्यानें तिळमात्र अवसान खचलें असें दाखवि
नाहीं. उष्णतेमुळें इतर लोक अंगावरचा पोषाक टाकून
टाकीत. दिवसास निदान तीन तास तरी त्यांस निजावें ला
नापोलियन यानें आपल्या वर्तनक्रमांत तिळमात्र बदल केली नाहीं
फ्रान्स देशांत जसा तो पोषाक करी तसाच येथेंही करी.
च्या कपाळावर घामाचा बिंदुदेखील येत नसे. रात्रीस सर्वांच्याम
गून निजे व सकाळीं सर्वांच्या अगोदर उठे. **नापोलियन** स्व
इतका सोसकपणा ठेवी तरी लोक फार त्रासले. कित्येक तर बखे
करण्याचा बेत करूं लागले. यांमुळें त्यांस दाबांत ठेवण्याची ना
पोलियन यास पंचाईत पडली. **सेन्तहिलिना** येथें असतांना त्यां
एकवार असें सांगितलें कीं, 'मी एकदां एकाएकीं एका टोळींत गले

आणि तोमध्यें एक फार उंच मनुष्य होता, त्यास रागानें म्हणालों तूं वरवेड्याविषयीं बोलत आहेस संभाळ. नाहीं तर मला आपलें कर्तव्य करावें लागेल. इतका उंच आहेस तरी दोन तासांच्या आंत तुझ्या अंगावर गोळी घालावी लागेल, त्या वेळेस तुझी उंची कांहीं उपयोगीं पडणार नाहीं. '

कांहीं दिवस शत्रू कोठें दिसले नाहींत. परंतु पुढें कोठें कोठें कांहीं टिकाणीं लहानलहान टोळ्या आढळूं लागल्या. एकादा फ्रेंच शिपायी लांब गेला आणि शत्रूंच्या हातीं लागला, तर ते लागलीच त्यास ठार करीत. त्यामुळें फ्रेंच लोकांस फार जपावें लागे. ते लोक निशाण मारण्यांत आणि घोड्यावर बसण्यांत हुशार असल्यामुळें फ्रेंच लोकाच्या पायदळास हुरून पुष्कळ त्रास देत. यामुळें यांस रात्रीस फार सावध रहावें लागे. थोडा वारा सुटला तरी वाळू उडून डोळ्यांत शिरे व उन्हानें डोळे दिपून जात. या गोष्टींनीं फ्रेंच लोक फार त्रासले. बरोबर विद्वान् लोक पुष्कळ होते, त्यामुळें त्यांस वाटे, कदाचित् ही मोहीम एकाद्या शास्त्रीय विषयाच्या शोधाकरितां नसेल कशावरून ? भोंवतालीं फौज व मध्यें हे लोक असत. चालू झाले म्हणजे मिसर देशांतील गाढवांवर बसत. तेव्हां ' पैस, गाढवानां रस्ता द्या ' अशी शिपायी लोक त्यांची यट्टा करीत.

प्रथम एकदोन झटापटी झाल्या, त्यांत मुसलमान लोकांनीं बराच दिकाव धरिला; परंतु फ्रेंच लोकांच्या युद्ध कौशल्यापुढें त्यांची सरशी होईना. शेवटीं जुलईच्या २१ व्या तारखेस फ्रेंच लोक मिसर देशांतील प्रसिद्ध भव्य इमारतीं (पिरमिद्-मनोरे) जवळ जाऊन थडकले. तेथें तुर्क लोकांचें सैन्य तयार होतें. नापोलियन यानें सैन्यास उत्साह आणण्याकरतां भाषण केलें. लागलींच दोन्ही सैन्यांची लढाई सुरू झाली. हें युद्ध थोडावेळ परंतु मोठें तुंबळ झालें. मुसलमान लोक मोठ्या त्वरेनें बीरशब्द करीत शत्रूंच्या अंगावर घुसले. शत्रूपुढें कांहीं चालेना तेव्हां वेडे होऊन त्यांच्या अंगावर घोडे घालून हातांतलीं शस्त्रें त्यांच्या डोक्यांवर मारूं लागले. ज-

खमी होऊन खालीं पडत ते सुद्धां रांगत जाऊन शत्रूकडील कोणी सांपडल्यास त्याचे पाय कापीत. शेवटीं **फ्रेंच** लोकांच्या भडिमारानें मुसलमान लोकांकडील बहुतेक लोकांचा खल्लास झाला. कित्येकांनीं **नाईल** नदींत उड्या घातल्या. यामुळें **मिसर** देशाचा खालचा भाग व **केरो** शहर **फ्रेंच** लोकांनीं जिंकिलें. या लढाईचा परिणाम असा झाला कीं, **नापोलियन** याचें नांव ऐकून लोक भयानें कांपूं लागले. त्यास 'सुलतानकबीर' असें म्हणूं लागले. त्याच्या बंदुका म्हणजे ईश्वराच्या क्षोभाचीं चिन्हें त्यांपुढें कोणाचें चालावयाचें नाहीं असें त्यांस वाटूं लागलें.

फ्रेंच लोकांनीं नानाप्रकारचे हाल व संकटें सोशिलीं; त्यांबद्दल वक्षीस मिळण्याचा प्रसंग आला. **तुर्की** लोक लढाईस गेले तरी आपला पैसा जवळ बाळगितात, यामुळें रणांगणांत मेलेले व पाण्यांत बुडालेले या सर्वांचीं प्रेतें **फ्रेंच** लोकांनीं शोधिलीं, त्यांत त्यांस फार द्रव्य सांपडलें शिवाय शहरांतील व आसपासच्या गांवांतील जे लोक घरेंदारें सोडून गेले होते, त्यांच्या घरांतही विपुल द्रव्य सांपडलें. बरोबरच्या विद्वान् लोकांनींही जुन्या प्राचीन इमारतींतील वस्तूंचा मोठ्या श्रमानें शोध करून त्यांत चांगल्या उपयुक्त वस्तु सांपडल्या त्या बरोबर घेतल्या. **नापोलियन** स्वतः त्या भव्य इमारतींच्या (पिरमिद) मध्यभागीं गेला तेथें त्यानें पुनः 'एक ईश्वर आहे आणि **महमद** त्याचें ज्ञान करून देणारा आहे' हें वाक्य म्हटलें. बरोबर कांहीं मुसलमान होते, त्यांस याचे श्रद्धेविषयीं संशय होताच, ते मोठ्या गांभीर्यानें म्हणाले, ईश्वर दयाळू आहे, तुम्ही मोठ्या शास्त्र्यां प्रमाणें बोलतां.

केरो येथें जय मिळाल्यावर आठ दहा दिवसांनीं **अलेक्झांद्रिया** येथें **फ्रेंच**लोकांवर मोठेंच संकट आलें. भूमध्यसमुद्रांत **फ्रेंच** गलबतांचाशोध करून पुनः **नेल्सन मिसर** देशाचे किनाऱ्यावर आला, तों **फ्रेंच** लोकांचीं गलबतें तेथें होतींच. नंतर **अबुकीर** नांवाच्या अखा नामध्यें दोन्ही सैन्यांचें एक अहोरात्र भयंकर युद्ध झालें. त्यांत फ्रेंच

लोकांचा अगदीं पराभव झाला. त्यांचीं मोठमोठीं गलबतें जळून गेलीं. कित्येक **इंग्लिशांनीं** घेतलीं. कांहीं फुटकीं गलबतें मात्र बाहेर पडून गेलीं. तीन हजार **फ्रेंच** लोक जिवंत राहिले. बाकी समुद्रांत टेवलेलें सर्व सैन्य नाहींसें झालें. याप्रमाणें गलबतें नाहींतशीं झाल्यामुळें **फ्रेंच** लोकांचा आधार तुटला. पुनः **फ्रान्स** देशांतून गलबतांची कुमक येईपर्यंत **मिसर** देशांत जें कांहीं मिळेल तेवढ्यावर निर्वाह केल्याशिवाय दुसरा उपाय नाहींसा झाला.

नेल्सन येण्यापूर्वीं **नापोलियन** याचा बेत असा होताकीं, **फ्रान्स** देशांत परत जाऊन **मिसर** देशांत **फ्रान्स** देशाचें कायम राज्य स्थापन करण्यास सैन्य वगैरे जें आवश्यक साहित्य लागेल तें आणावें. दुसरा कोणी पाठविला तर अधिकारी त्याचें ऐकणार नाहीं, हें त्यास माहित होतें. शिवाय त्याचे मनांत असें होतें कीं, **मिसर** देशाकडे **इंग्लिशांचें** मन लागलें आहे तों एकदम खुद्द **इंग्लंदा**वर स्वारी करावी. परंतु **अबुकीर** येथील लढाईचा परिणाम ऐकून तो श्वास टाकून म्हणाला, **फ्रान्स** देशाच्या नशिबीं जमिनीचें राज्य आहे, व **इंग्लंदच्या** नशिबीं समुद्राचें स्वामित्व आहे.

अबुकीर येथें झालेल्या अनर्थाचें दुःख त्यानें शूरास योग्य अशा धैर्यानें सोसलें. लढाईतून जिवंत सुटलेल्या लोकांचें आणखी एक पलटण तयार करून सर्व सैन्याचा चांगला बंदोबस्त करून जिंकलेल्या देशाची भरभराट होईल अशारीतीनें तो राज्यव्यस्था करूं लागला. मुसलमान लोकांस बरें वाटण्याकरितां तो त्यांसारखा पोषाकसुद्धां करूं लागला, पण बरोबरीचे लोक हंसूं लागले, त्यामुळें त्यानें तें सोडून दिलें. त्यानें जी राज्यव्यवस्था केली, तीवरून हा पुरुष मोठा चिलक्षण अप्रतिम बुद्धिमान, युक्तिमान् व उद्योगी होता असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. आपणास **मिसर** देशाचें राज्य पाहिजे असें कोणत्याही रीतीनें न दाखवितां त्यानें तेथील लोकांस असें सांगितलें कीं, **मेमलुक** लोकांच्या जुलुमापासून सोडवून कायदेकानु व न्याय यांची व्यवस्था करून तुर्कस्थानच्या बादशाहाच्या स्वाधीन हा देश क-

रवा, एवढ्याकरितांच आम्ही आलों आहों. नंतर त्यानें काझी मौलवी यांच्या दोन मंडळ्यास्थापून त्यांच्या अभिप्रायामाणें सर्व व्यवस्था चालेल असें ठरविलें. मेमलुक लोक जुलुमानें कर वगैरे पुकळ घेत असत, त्यामुळें नापोलियन यानें बसविलेल्या करांविषयीं कांस वाईट वाटलें नाहीं. कारण ते पहिल्यापेक्षां जास्त नसून ते सूल करणें व कोणीं किती कर द्यावा; वगैरे गोष्टींची तजवीज रलेल्या देशाप्रमाणें योग्य व न्याय्य अशी त्यानें केलीहोती. द्यांस सर्वांनीं मान द्यावा, याविषयीं त्यानें मनापासून पुष्कळ केले. त्यांमुळें पुष्कळ दिवस झोटिंगबादशाहींत असलेल्या कांस मोठें आश्चर्य वाटलें. एके समयीं कोणी मनुष्यानें एका शेतकऱ्याचा खून केला, तेव्हां नापोलियन मोठ्या काळजीनें करणाऱ्याचा शोध करूं लागला. तेव्हां एक मुसलमान हंसून ह्मणाला सुलतानकबीर साहेबांचा हा कोणी आप्त आहे काय? हें नापोलियन ह्मणाला, छे, असें नाहीं. यापेक्षां मोठें कारण तें हें कीं, परमेश्वरानें ज्या लोकांचें राज्य माझ्या हातीं दिलें त्या लोकांतील तो मनुष्य आहे. मक्केस जाणाऱ्या प्रवाशांच्या णाकरितां जे त्यानें उपाय केले, त्यांमुळें मुसलमान लोक फारच झाले. त्यामुळें कुराणाविरुद्ध असतांही त्यांनीं फ्रेंच लोकांस खंड देणें हें कायदेशीर आहे असा जाहीरनामा लाविला. याप्रमाणें नापोलियन राज्यव्यवस्था करीत असतां बरोबरचे पंडित व शिल्पकार यांनीं मोठ्या श्रमानें शास्त्रीय विषयांचा शोध लावण्याचा यत्न चालविला होता. या श्रमांचा सर्व यूरोपखंडांतील विद्वान् लोकांस उपयोग झाला. मिसर देशाची प्राचीन भाषा, विद्या, कलाकौशल्य, राजनीति, वगैरे गोष्टींविषयीं जे पुढें विलक्षण शोध लागले, त्या सर्वांस या लोकांचे श्रम हें मुख्य कारण होय. केवळ मौजेच्या शास्त्रीय विषयांचाच त्यांनीं शोध केला असें नाहीं. सेनापतीच्या हुकुमानें प्राचीन काळच्या त्या देशांतील शेतकीच्या वगैरे सुधारणेविषयींही त्यांनीं पुष्कळ शोध केला. नाईल नदीचें पाणी आणण्याकरितां नालमी

बाच्या राजांनीं बांधलेले कालवे शेंकडों वर्षें रद्दी पडले होते ते पुनः रुस्त केले. देशांत शेतकीचें काम जारी सुरूं झालें. लोकांची माल- ता सुरक्षित राहूं लागली. आलीकडे **मिसर** देशांत ज्या सुधारणा ल्या आहेत, त्यांस **नापोलियन** यानें केलेली व्यवस्था मुख्य कार- होय, असें इतिहासकारांचें मत आहे. एकवार मात्र केरो शहरीं हानसें बंड झालें होतें, तें **नापोलियन** यानें तेव्हांच मोडून टा- केलें. याशिवाय जिंकणाऱ्या परकीय लोकांचें सैन्य देशांत असतां- शांतता व सुबत्ता सर्व ठिकाणीं होती. असे दिवस **मिसर** दे- स पुष्कळ दिवसांत आले नव्हते. याप्रमाणें **नापोलियन** यानें १७९८ हें वर्ष **मिसर** देशांत घालविलें. तो निजावयास गेला ी झोंप न आल्यास कांहीं पुस्तक वाचण्याकरितां एक मनुष्य बि- न्याजवळ नेहमीं तयार असे ! कांहीं **मेमलूक** संस्थानिक दूरच्या तांत कांहीं लोक घेऊन बखेडा करीत होते, त्यांचा पाठलाग करून सर देशाचा बरचा भागही **फ्रेंच** लोकांनीं जिंकिला. **मिसर** दे- त असतां बरेच दिवस **नापोलियन** यास **फ्रान्स** देशांतील वर्त- न कळत नव्हतें. परंतु शेवटीं **आस्त्रियानें** पुनः **फ्रेंच** देशाशीं ल- सुरू केली; तसेंच **मिसर** देश **फ्रेंच** लोकांनीं जिंकिला, हें ऐ- तुर्कस्थानचे लोक चवताळून मोठें सैन्य घेऊन **फ्रेंच** लोकांचा प- राभव करण्यास येणार, वगैरे बातम्या आल्या त्यामुळें त्याचें मन अ- स्थिर झालें. तथापि सख्यांच लढाईचा प्रसंग येण्यासारखा नव्हता तोंच **नापोलियन** तांबडा समुद्र व भूमध्य समुद्र यांस जोडणाऱ्या ल्या संयोगीभूमीकडे गेला. तिकडे जाण्यांत त्याचे दोन उद्देश ते. एक, वरील दोन समुद्र जोडितां येतील कीं नाहीं हें पाहण्या- चे दुसरा, **सिरिया** देशाकडून तुर्की लोक **मिसर** देशावर आले त्यांशीं टक्कर देण्यास कोणतें ठिकाण चांगलें हें पहावयाचा. ल्या संयोगीभूमीजवळ असतां एके ठिकाणीं **नापोलियन** पाण्यांत ा मरत होता, परंतु युक्तीनें बचावला. एके ठिकाणीं पाण्यांत अ-

सतां तेथें भरतीचें पाणी भराभर वाढूं लागलें, तेव्हां कोणीकडे जा
तें कळेना. सर्व मंडळी घोड्यावर वसलेली होती. त्यावेळीं नापो
लियन यानें अशी युक्ति केली कीं, आपण मध्यें राहून भोवताल
बाकीच्या लोकांचें कडें केलें, आणि सर्वांस चालावयास सांगितलें
आणि सांगितलें कीं, ज्याचा घोडा पोहूं लागेल त्यानें थांबावें.
वींचे घोडे पोहूं लागून ज्याचा घोडा चालत असेल तो खरी वाट
समजावें. या युक्तीनें सर्व पाण्यावाहेर पडून बचावले.

केरो येथें परत आल्यावर **नापोलियन** यानें हिंदुस्थानांत
पुमुलतानास एका विश्वासू जासुदाबरोबर पत्र पाठविलें. या
कांहीं वर्षांपासून फ्रान्स देशांतील राज्याधिकाऱ्यांशीं टिपूनें इंग्लंड
स हिंदुस्थानांतून घालवून देण्याकरितां पत्रव्यवहार चालविलाच हो
नापोलियन यानें त्यास असें लिहिलें कीं, 'मी अजिंक्य सैन्य घेऊ
तुह्मांस इंग्लिशांचे जुलुमांतून सोडविण्यास तांबड्या समुद्रापर्यंत
लों आहें, हें तुह्मीं ऐकिलेंच असेल. तुमच्या देशांतील राज्यस्थि
कशी काय आहे, हें मला आपण कळवावें, अशी माझी फार इच्छा
आहे. **मस्कत** व **मक्का** यांच्या मार्गानें तुह्मांस मनुष्य पाठवितां
ईल. **सुएझ** अथवा **केरो** येथें तुमचा कोणी विश्वासू चतुर मनु
मला भेटण्यास आला तर फार चांगलें होईल. परमेश्वर तुमचें रा
वाढवून शत्रूंचा नाश करो.' वरोवर असलेल्या एका मनुष्यानें
लिहिलें आहे कीं, या वेळेस **नापोलियन** पुष्कळ वेळां सर्व दिवस
एशिया खंडाचा नकाशा पहात असे.

रोडस् येथें तुर्की लोकांचें मोठें सैन्य **मिसर** देशावर जल
र्गानें स्वारी करण्याकरितां तयार होत आहे, असें **नापोलियन**
एकिलें. तेव्हां त्यापूर्वीच **सिरिया** देशावर हल्ला करावा या हेतूनें
पंधराहजार लोक **केरो** शहराजवळ ठेवून व दुसऱ्या ठिकाणीं
लोक ठेवून व वरोवर दहाहजार निवडक लोक घेऊन तारीख १
हे फेब्रुआरी सन १७९९ इसवी रोजीं त्या देशाकडे निघाला.
मार्गक्रमण केल्यावर त्यानें तारीख १५ फेब्रुआरी या दिवशीं

शि हा किल्ला घेतला. तेथील लोकांनीं कांहीं वेळ जोर धरिला
परंतु पुढें टिकाव धरवेना. तेव्हां आम्हांस दुखापत केल्याशिवाय जा-
ऊं दिल्यास पुनः सैन्यास मिळणार नाहीं, अशी कबुलात करून ने
शत्रूंच्या स्वाधीन झाले. नंतर **नापोलियन** यानें **फिलिस्तैन** लो-
कांचें प्राचीन शहर **गाझा** हें घेतलें. तेथें कांहीं एक अडथळा झाला
नाहीं. परंतु पुढें **जाफा** शहर घेण्यास गेला तेथें मात्र तुर्की लोकां-
नीं मोठ्या धैर्यानें युद्ध केलें. शेवटीं मोठा हल्ला करून फ्रेंच लोकां-
नीं शहर घेतलें. तीन हजार तुर्क लोक लढाईंत मेले. तीन तासप-
र्यंत फ्रेंच शिपायांस शहर लुटण्याची परवानगी होती. तेवढ्या वेळां-
त तेथें त्यांनीं भयंकर अनर्थ केले. **नापोलियन** स्वतः म्हणे कीं, या
प्रमाणें दुसऱ्या कोणत्याही शिपायांनीं क्रूरपणा केला नाहीं. सुमारें
चाराशें लोक हत्यारें ठेवून शत्रूंच्या स्वाधीन झाले. ज्या अधिकाऱ्या
नें त्यांस कैद केलें, त्या अधिकाऱ्यास **नापोलियन** पुष्कळ रागें भरला.
कारण शिपाई लोक कुरकूर करूं लागले कीं, आपणाजवळचा पुरवटा
मरत आला आहे; या इतक्या रानटी लोकांस खावयास कोठून आ-
णावें? शेवटीं सर्व मुख्य अधिकारी जमवून कैद केलेल्या लोकांचें
काय करावें यावद्दल **नापोलियन** यानें विचार केला, त्यांत असें ठरलें
कीं, यांवर दया करण्याचा मार्ग राहिला नाहीं. शेवटीं तीन दिवसांनीं
सर्व कैदी मैदानांत नेऊन वेगळाल्या टोळ्या करून गोळ्या घा-
लून व शस्त्रांनीं सर्वांची त्या दुष्ट फ्रेंच लोकांनीं कत्तल केली. गाय
पोघास मान देते, त्याप्रमाणें त्या विचाऱ्यांनीं निमूटपणें देहांत शासन
भोगिलें. इतक्या कैद्यांस दावांत ठेवण्यांस पाहारेकरी नव्हते, व सो-
डून दिल्यास पुनः सैन्यांत शिरणार नाहीं असें त्यानीं कबूल केलें होतें
म्हणजे हे लोक होते; वगैरे **नापोलियन** याच्या कैवाऱ्यांनीं या दुष्ट कृ-
त्याबद्दल शोकण घालण्याकरितां पुष्कळ पुळपुळीत सबबी काढल्या
आहेत. तथापि **नापोलियन** याच्या हातून जीं त्याच्या नांवास कलं-
क आणणारीं कृत्यें घडलीं त्यांपैकींच हें एक असें पुष्कळांचें मत आहे.

जाफा येथून **नापोलियन** **एकर** शहर घेण्यास गेला. हें रा-

हर सिरिया देशाचें नाक आहे. एवढें घेतलें म्हणजे सर्व देश हि किला, असें त्यास वाटत होतें. तो म्हणे हें शहर मिळालें कीं तो कीं लोक बरोबर घेऊन इकडून कान्स्तांतिनोपलवर स्वारी करून यून आद्रियानोपलच्या मार्गानें जाऊन व्हिएना शहर घेऊन आहि याचा पराभव करून मी त्या वाटेनें फ्रान्स देशास परत जाईं तुर्कस्थानच्या अंमलांतून सोडवून स्वतंत्रराज्य स्थापून देतों म्ह त्यानें तेथील अधिकाऱ्यास निरोप पाठविला, परंतु त्याचा कांहीं उ योग झाला नाहीं. इतक्यांत तेथें इंग्लिशांचा सेनापति सिड्नी स्मिथ हा लढाऊ गलबतें घेऊन आला. त्यामुळें तुर्की लोकांस ठीच मदत मिळाली. तेथें पुष्कळ निकराच्या लढाया झाल्या; फ्रेंच लोकांचें कांहीं चालेना. दोन महिने वेढा घालून झाले शहर हातीं आलें नाहीं, व केरो येथून निघून पुष्कळ दिवस झा यामुळें लौकर परत जाण्याचीही जरूर होती; म्हणून सैन्य जाफ येथें परत नेण्याचा नापोलियन यानें बेत केला. आजपर्यंत फ्रें लोकांचा असा हिरमोड कधीं झाला नव्हता. यामुळें या प्रथम रिभवाचें नापोलियन यास फार वाईट वाटलें. या पराजया सिड्नीस्मिथ मुख्य कारण होय.

या वेळेस सैन्यांत मोठा रोग उत्पन्न झाला. सांत आल्याबरो बर सर्वांस मोठा धाक सुटला. दुखणेकरी होते त्यांस तर वांचण्या ची आशा नाहींशी झाली. चांगले होते ते रोग्यांपाशीं जाण्या भिऊं लागले. नापोलियन मात्र रोग्यांजवळ जाऊन गोड बो त्यांचें सांत्वन करी आणि भित्रेपणाबद्दल इतरांस रागें भरून रोग्यां घाणेरडीं क्षतें आपल्या हातानें धुऊन स्वच्छ करी. जाफा जाण्येवेळेस नापोलियन यानें एक गोष्ट केली असें म्हणतात, ती गली किंवा वाईट याबद्दल युरोपखंडांत ग्रंथकारांचा पुष्कळ दिवस वादविवाद चालला होता. ती गोष्ट ही कीं, कित्येक लोक अ मरणोन्मुख अजारी होते; त्यांस बरोबर घेण्याची सोय नव्हती नसेच टाकून जावें तर सूड उगविण्याकरितां तुर्की लोक तशा स्थि

न सुद्धां अनेक भयंकर दुःसह यातना करतील त्या नव्हाव्या म्हणून नापोलियन यानें लौकर प्राणोत्क्रमण होण्याकरितां त्यांस औषधांत अफू देवविली. तो म्हणे माझा प्रत्यक्ष मुलगा असता तरी त्यास अशा यातनांपासून सुटण्याकरितां असेंच केलें असतें व मी अशा स्थितींत असतां मला कोणी असें करील तर त्यानें मित्रत्वाचें उत्तम कर्तव्य बजाविलें असें मी समजेन. अफू फार थोड्या असामीस दिली होती, परंतु शत्रूंनीं ही संख्या बरीच फुगविली. नापोलियन याजबरोबर या वेळेस असलेले कित्येक लोक तर ही गोष्ट खोटी म्हणतात.

जाफा येथून केरो येथें परत जातांना वाटेंत पुष्कळ हाल झाले. फ्रेंच लोकांनीं वाटेवरल्या मुलखांतील लोकांस पुष्कळ त्रास दिला. बरोबर जखमी व अजारी फार होते, त्यांचे फार हाल होत. उन्हाळा फार त्यामुळें लोक तान्हेनें व्याकूळ होत. शत्रु तर मागून पाठलाग करीतच होते. कोणी मागें राहिला म्हणजे शत्रूंच्या हांतून ठार व्हाव-याचाच. स्वसंरक्षणाची वेळ आली म्हणजे मनुष्याचें मन कितो कठोर होतें याचें उदाहरण या वेळेस फ्रेंच फौजेंत चांगलें दृष्टीस पडे. जखमी व आजारी लोक होते त्यांतून एकाद्यास थकल्यामुळें पुढें पळतां येत नाहींसा झाला म्हणजे तो विनवण्या करीत असतां त्यास बरोबरचे लोक टाकून पुढें चालते होत. कित्येक तर आमच्या मि-त्रांनें आतां तळ दिला असें म्हणून त्याची थट्टा करीत. नापोलियन यानें मात्र उदार पुरुषास योग्य असें या वेळेस आचरण केलें. त्यानें हुकूम केला कीं, सर्व घोडे आजारी लोकांस बसावयास द्यावे. असा हुकूम झाल्यावर थोड्याच वेळानें एका चाकरानें आपणांस कोणता घोडा ठेवावयाचा असें विचारिलें. त्यावर नापोलियन यानें रागानें उत्तर दिलें कीं, मूर्खा, तुला हुकूम माहीत नाहीं काय ? कित्येकांनीं पायीं चालावें आणि सर्वांच्या पुढें मी चालावें. चल, निघ येथून, याप्रमाणें बोलून तो शेवटपर्यंत चालत गेला. वाटेनें आजारी मनुष्यांजवळ जाऊन गोड बोलून त्यांचें सांत्वन करी. वाटेंत एकवार

कांहीं आरब यास मारण्याकरितां झाडींत लपून राहिले होते. त्या-
नीं त्यावर गोळी घातली परंतु ती त्यास न लागतां जवळून गेली.
गोळी घालणाऱ्यास फ्रेंच लोकांनीं मारिलें. शेवटीं तारीख १४ मी
जून १७९९ रोजीं पुनः केरो शहरीं नापोलियन गेला. तेथील
लोकांस आपला पराजय झाला, हें त्यानें कळविलें नाहीं.

केरो येथें गेल्यावर लौकरच त्यानें ऐकिलें कीं, कान्स्तांतिनो
पल येथून मोठें सैन्य नाईल नदीवर आलें आहे, शिवाय मिस
देशचे कांहीं लोक त्या सैन्यास मिळाले आहेत. हें ऐकतांच दमेक
यास केरो येथील सर्व कामकाजाचा अधिकार देऊन मोठ्या त्वरे
नापोलियन अलेक्झांद्रिया येथें गेला. तारीख २४ रोजी
अलेक्झांद्रिया येथें जाऊन पोहोंचला, तों फ्रेंच फौज अबुकीर
आखाताजवळ शत्रूंच्या हल्ल्याची वाट पहात तयार होती. उंचावर
शत्रूंची मान्याची जागा वगैरे पाहून नापोलियन, मुरात् हा अधि
कारी जवळ होता, त्यास म्हणाला, काय होईल तें होईल, उद्यांच्या
लढाईवर जगाच्या नशीबाचा निकाल आहे. मुरात् म्हणाला,
फौजेच्या नशीबाचा तर खरा.

दुसऱ्या दिवशीं सकाळींच लढाईस सुरुवात झाली. पहिल्यां
तुर्की लोकांनीं कांहीं वेळ टिकाव धरिला; परंतु फ्रेंच लोकांपुढें कां
चालेना तेव्हां घाबरून भयानें वेड्यासारखे लढूं लागले. त्यां
सर्व घोंटाळा झाला. शत्रूंच्या हातीं सांपडूंनये म्हणून हजारों लोक
नीं समुद्रांत उड्या टाकिल्या. त्यांच्या पगड्यांनीं समुद्र भरून गे
लढाईत व समुद्रांत मिळून एकंदर बारा हजार लोक पडले.
हजार शत्रूंच्या स्वाधीन झाले. मुस्ताफा म्हणून त्यांचा सेनापति
होता. त्यास नापोलियन याच्यासमोर आणिलें तेव्हां नापोलियन
म्हणाला, नशीबानें आज तुमचा पराजय झाला तरी तुम्ही मोठ्या
धैर्यानें लढलां; हें मी तुमच्या सुलतानास कळवीन, यावर मुस्ताफा
उत्तर केलें, एवढे श्रम घेऊं नका, तुमच्यापेक्षां माझ्या धन्यास मा
झांगली माहिती आहे.

सिड्नीस्मिथ यानें नापोलियन यास जर्मनींतील वर्तमान प-
त्रांचे अंक वाचावयास पाठविले; त्यांवरून त्यास कळलें कीं, आ-
स्त्रियानें इतालीं देशांतलीं संस्थानें परत घेतलीं. हें वर्तमान ऐकिल्या-
वर नापोलियन व्यवस्था करण्याकरितां आणखी एकवार तारीख ९
ऑगष्ट रोजीं केरो येथें गेला. तेथें काय करावयाचें तें करून फ्रान्स
देशास परत जातों हें सैन्यास कळूं न देतां निघून तारीख २२ अगष्ट
रोजीं गलबतांत बसण्याकरितां किनाऱ्यावर येऊन पोहोंचला. जे
कामगार व विद्वान् परत न्यावयाचे होते, त्यांस तेथें येण्यास अगोदरच
त्यानें हुकूम पाठविला होता. याच दिवशीं, मी स्वदेशास जातों,
क्लेबर यास मीं आपल्या जागीं नेमिलें आहे, असें त्यानें जाहीर-
नाम्यानें सर्व सैन्यास कळविलें. सेनापति आपणास सोडून गेल्या-
बद्दल सैन्यांतले लोक रागावले होते; परंतु क्लेबर यानें सर्वांची सम-
जून केली. शिवाय कोणत्या कारणानें मला परत जावें लागलें हें
चांगल्या रीतीनें सांगण्याकरितां मुद्दाम किती एक चतुर मनुष्यांस
नापोलियन यानें सांगितलें होतें. जाते वेळेस त्यानें क्लेबर यास
एक खदस्तूरचें पत्र लिहिलें, त्यांत असें लिहिलें कीं, तारीख १०
जून पर्यंतचीं इंग्लंदांतील वर्तमानपत्रें तुम्हांस पाठविलीं आहेत.
त्यांवरून तुम्हांस कळेल कीं, इतालीं देश शत्रूंनीं आम्हांपासून परत
घेतला. मांटुआ तुरीन, वगैरे शहरांस शत्रूंचे वेढे पडले आहेत.
देवानें कृपा केली तर आक्टोबर महिन्यापूर्वीं युरोपांत जावें
असो माझी इच्छा आहे. तूर्तां येथें आमचीं लढाऊ गलबतें आ-
ल्यावर मिसर देशांतील सैन्यास मदत करण्यास आणखी लोक
व लढाईचें सामान आम्हांस पाठवितां येईल. नंतर सरकार तुमच्या-
शीं पत्र व्यवहार ठेवील; आणि मी सरकारी व घरगुती नात्यानें वार-
वार तुम्हांस बातमी कळविण्याची तजवीज करीन. शिवाय त्यानें
क्लेबर यास असें सांगितलें कीं, मे महिन्यापर्यंत तुम्हांस मदत न
आल्यास मिसर देश सोडून द्यावा लागला तरी सोडावा. नंतर
त्यानें राज्यकारभार कसा चालवावा याबद्दल क्लेबर यास पुष्कळ

प्रकारें सांगितलें होतें. त्यांत हें विशेषतः सांगितलें होतें कीं, ख्रिस्ती लोकांचें मन दुखवूं नये, तथापि ख्रिस्ती आणि फ्रेंच लोक हे एक आहेत असें मुसलमानांस कळूं न देण्याविषयीं तजवीज ठेवावी. शेवटीं असें सांगितलें होतें कीं, जें सैन्य मी आज तुमच्या स्वाधीन करितों त्यांतील लोक माझीं मुलें आहेत, असें समजावें. सर्व वेळ मोठ्या संकटकाळीं सुद्धां त्यांनीं मजवर मोठी प्रीति केली, ही त्यांची वृद्धि कायम राखा. तुमची योग्यता समजून मी तुम्हांवर प्रीति करितों, यामुळें मीं तुम्हांस हा अधिकार दिला आहे. याप्रमाणें तजवीज करून तारीख २२ रोजीं **नापोलियन** गलबतांत बसला येते वेळेस शेंकडों छानदार गलबतांची माळ समुद्रांत लांब लागली होती ती यावेळेस नाहींशी झाली. मोडकीं थोडीं गलबतें होतीं, तीं हांकारून तो चालता झाला. किनाऱ्यावर पोहोंचविण्यास आलेल्या लोकांस फार वाईट वाटलें. कित्येक चाकर लोक तर हळूच न कळतां गलबतांत बसले. या सफरींत **नापोलियन** याचें मन फार काळजींत असें. कारण **इंग्लिश** लोकांचीं लढाऊ गलबतें नेहमीं भूमध्य समुद्रांत फिरत असत. त्यांची गांठ पडली तर टिकाव धरण्यासारखी याची तयारी नव्हती. इतका काळजींत असे तरी मन स्वस्थ ठेवून तो **बैबल, कुराण, होमर** याचें काव्य, हे ग्रंथ वाचीत असे. व प्राचीनकाळच्या गोष्टी व **एशिया** खंडांतील रीती भाती यांविषयीं संभाषण करी. कधीं कधीं भूमितीचे सिद्धांत सोडवी. व कधीं मंडळींत खेळावयास बसे. तारीख ३० रोजीं त्याची जन्मभूमि **अजेशिओ** येथें त्यानें वरवा केला. त्यास इतके लोक भेटावयास आले कीं, तो म्हणे, आमांचा पाऊस पडला. शेवटीं वारा चांगला लागल्यामुळें व लोकांस भेटण्याचा कंटाळा आल्यामुळें पुनः तारीख ७ अक्टोबर रोजीं गलबतें हांकारिलीं. वाटेंत एकवार **इंग्लिश** गलबताची गांठ पडली, तेव्हां सगळे लोक भ्याले. परंतु **नापोलियन** यानें स्वस्थ राहून सर्व तजवीज केली. त्यामुळें त्या संकटांतून निभावून तारीख ९ अक्टोबर रोजी

गलबतें फ्रान्स देशांतील फ्रेजस् या अखातांत आलीं. नापोलियन आला असें कळतांच अनेक प्रकारचे लहान मोठे लोक व सरकारी कामगार त्यास भेटण्यास गेले. दूर देशांतून गलबतें आलीं म्हणजे त्यांवरील लोकांचे संपर्कानें देशांत रोग येईल म्हणून कांहीं दिवस त्यांवर जाऊं नये असा नियम होता, तरी गलबतांवर लोकांची गर्दी-जमे. ते म्हणत आस्त्रियांतील लोकांपेक्षां रोग आम्हांस बरा वाटतो. त्यांस वाटे नापोलियन असला कीं जय मिळावयाचाच. अबूकीर येथील जयाच्या वृत्तांतानें तर त्यांस विलक्षण उत्साह प्राप्त झाला. यामुळें नापोलियन मोठ्या थाटानें बंदरांत उतरला. लोकांचीं मनें पाहून अधिकाऱ्यांच्या हुकमाशिवाय मिसर देश सोडून आल्याचें त्यास भय होतें तें सर्व नाहींसें झालें. पारिस येथें जातांना वाटेंत सर्व ठिकाणीं मोठ्या सन्मानानें लोकांनीं याचा आदरसत्कार केला. तारीख १६ अक्टोबर रोजीं तो आपल्या घरीं पोहोंचला;

भाग ८ वा.

नापोलियन पारिस येथें पोहोंचला तेव्हां राज्याधिकारी लोकांस अगदीं अप्रिय झाले होते. त्यांचें वजन दिवसानुदिवस अगदीं नाहींसें होत चाललें होतें. त्यामुळें अधिकाऱ्यांनींही आनंद प्रदर्शित करून सन्मानपूर्वक त्याचा सत्कार केला. आपलें सैन्य सोडून कां आला ? असें विचारण्यास कोणाची छाती होईना. नंतर सर्व लोकांनीं नापोलियन यास मोठा खाना दिला.

पूर्वीप्रमाणें यावेळेसही नापोलियन फारसा लोकांत मिसळला नाहीं, तरी तो लोकांशीं मोठ्या सौजन्यानें व गोडीगुलाबीनें वागे. जेव्हां इताली देशांत गेलेल्या फौजेंतला कोणी मनुष्य भेटला तर ओ-

ळखून लागलाच प्रेमानें त्याचा हात धरी. **मिसर** देशांत असतांना **जोसेफाईन** हिच्या वर्तनाविषयीं लोकांनीं अनेक प्रकारच्या कंड्या उठविलेल्या **नापोलियन** याच्या कानीं आल्या होत्या. त्यामुळें त्याचें मन क्रुद्ध झालें होतें. **फ्रेजस** येथें पति आला असें कळतांच त्यास भेटण्याकरितां ती **पारिस** येथून निघाली. परंतु उभयतां वेगळाल्या रस्त्यानें गेल्यामुळें वाटेंत चुकामूक पडली. नंतर **पारिस** येथें आल्यावर तिची भेट झाली, तेव्हां **नापोलियन** तिजविषयीं अगदीं उदासीन झाला. परंतु खरी स्थिति मित्रांनीं कळविल्यावर उभयतांमध्यें पूर्वीप्रमाणें प्रेम झालें. अशा प्रसंगीं कुटुंबांत भांडण उत्पन्न करणें हें फार वाईट असें **नापोलियन** यास माहीत होतें. या वेळेस सर्व प्रकारचे लोक राज्याधिकाऱ्यांस कंटाळले होते. यामुळें **नापोलियन** यानें राज्यकारभारांत हात घालावा असें सर्वांचें होतें. त्यावेळेस दोन पक्ष प्रबल होते. एका पक्षाचा मुख्य आधार **सीयेस्** हा होता. व दुसऱ्याचा **बारास** हा होता. दोघेही **नापोलियन** याची मदत मिळावी म्हणून इच्छा करूं लागले. तथापि **नापोलियन** यानें **सीयेस्** यासच हाताशीं धरिलें. पूर्वी **नापोलियन** त्याचा फार त्रास करीत असे. याशिवाय **लुशिअन बोनापार्त** त्याचा भाऊ व शहरचा बंदोबस्त राखणारा मुख्य अधिकारी **फोके** यांचीही **नापोलियन** यास पूर्ण मदत होती. **लुशिअन** हा यांवेळेस पांचशें प्रतिनिधींची सभा होती तिचा अध्यक्ष होता. शिवाय ज्या लोकांची मदत अवश्य पाहिजे होती त्यांचीं मनें जोसेफाईन आर्जवें करून वळवीत होती. यामुळें **नापोलियन** याच्या घरीं लोकांची गर्दी होऊं लागली. **मिसर** देशांतून परत आल्यावर **इतालि** देशांतील सैन्यांतले अधिकारी वारंवार याच्या घरीं येऊं लागले. यामुळें हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत कांहीं तरी फेरफार होणार असें लोकांस वाटूं लागलें.

नापोलियन यास राज्यकारभार करणाऱ्या मंडळींत जागा मिळावी असें प्रथमतः त्याचे मित्रांचे मनांत होतें. **नापोलियन**

पिस येथें आल्यावर घोडेस्वारांच्या तीन पलटणांनीं, आपली कवाईत पाहण्याविषयीं त्यास अर्ज केला. त्यांची विनंति कबूल करून दिवस कोणता तो मागाहून कळवूं म्हणून त्यानें सांगितलें. दुसऱ्या फौजांच्या अधिकाऱ्यांनींही कांहीं तरी निमित्तें काढून याप्रमाणेंच अर्ज केले. सर्वांस वरल्याप्रमाणेंच उत्तरें मिळालीं. शेवटीं एके दिवशीं **नापोलियन** यानें सर्व सैन्यास सकाळीं सहा वाजतां तयारीनें आपल्या घरापाशीं येण्याचा हुकूम केला. हा हुकूम बेगळाल्या सैन्यांवरील अधिकाऱ्यांस परस्परें माहीत नव्हता; तरी सर्वांचीं मनें **नापोलियन** यानें अनुकूल करून घेतलीं होतीं.

नेमिलेल्या दिवशीं सर्व सैन्यें सांगितलेल्या ठिकाणीं हजर झालीं. **बर्नादोते** म्हणून एक सैन्याचा मोठा अधिकारी होता, त्यास **नापोलियन** वश करण्यास पाहत होता, परंतु तो वश झाला नाहीं. ज्या दिवशीं **नापोलियन** यानें सांगितलेल्या जागीं सैन्यें आलीं त्याच दिवशीं **तुलरिस्** या राजवाड्यांत प्रतिनिधि लोकांची एक सभा भरली. यांत **नापोलियन** याचे मित्र होते त्यांनीं **तुलरिस्** राजवाड्यांतून सभा दुसरे ठिकाणीं न्यावी व **फ्रान्स** देशाच्या सर्व सैन्याचा अधिकार **नापोलियन** यास द्यावा, अशा दोन सूचना केल्या. ह्या सूचना मान्य होऊन **नापोलियन** यास अधिकार द्यावा असें ठरलें. **नापोलियन** ही बातमी ऐकतांच कांहीं लोक घेऊन सभेच्या जागीं गेला आणि म्हणाला, सर्व राष्ट्राचें शहाणपण तुम्हांमध्यें आहे. लोकसत्ताकराज्याचे सेनापति बरोबर घेऊन, त्यांचें पाठबळ तुम्हांस आहे, असें सांगण्याकरितां मी आलों आहें. मागील दाखले पाहण्यांत आतां तुम्हीं वेळ घालवूंनये. अठराव्या शतकाच्या शेवटीं गोष्टी झाल्या त्यांप्रमाणें इतिहासांत कांहीं आढळत नाहीं. तसेंच अठराव्या शतकाप्रमाणें हल्लीं कांहीं नाहीं. तुम्हीं शहाणपणानें योग्य तजवीज केली. आतां तुमची फौज आपल्या कामास लागेल.

वरील गोष्टीस जे प्रतिकूळ होते, त्यांस बोलावणें न पोहोंचण्याची तजवीज केली होती, तरी वरील भाषण ऐकून कित्येक लोक

कुरकुरूं लागले. तेव्हां **नापोलियन**, 'मी देवावर व युद्धदेवतेवर भरंवसा ठेवून येथें आलों आहें, जे मजवर प्रीति करितात त्यांनी मजबरोबर यावें;' असें ह्मणून चालता झाला. **नापोलियन** यास मुख्य अधिकार मिळाला हें ऐकून सैन्यांतील सर्व लोकांस आनंद झाला. तथापि यावेळेस अधिकार देण्याचें कारण काय हें त्यांस कळेना.

राज्याधिकाऱ्यांस ही बातमी कळली. त्यांत **मौलिन्स** ह्मणून एक अधिकारी होता, त्यानें फौज पाठवून **नापोलियन** यास पकडावें ह्मणून सूचना केली, परंतु फौजेंतील लोकच त्यास हंसूं लागले. **नापोलियन** तुलरिस् येथें गेला. त्याच्या अधिकाऱ्यानें हुकूम केल्याबरोबर राज्याधिकाऱ्यांच्या सैन्यांतले लोकही तिकडे गेले. **बारास** यानें **नापोलियन** याचें मन वळविण्याकरितां आपला एक कामगार पाठविला; त्यास **नापोलियन** रागानें ह्मणाला, 'ज्या **फ्रान्स** देशाची भरभराट करून त्यास तुमचे स्वाधीन केलें, त्याची तुम्हीं काय केलें? शांतता होती तेथें लढाई. **इताली** देशांतील संपत्ति बदल कर आणि जुलूम! विजय कालचे माझे लाख सोबती कोठें आहेत? ते नाहींतसे झाले.' म्यां तुला एवढ्या वैभवास चढविलें असें ह्मटलें तर **नापोलियन** यास राग येईल, हें **बारास** यास मनांत होतें. त्यास खुष करण्याकरितां त्यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला, त्यांत असें लिहिलें कीं, स्वतंत्रतेच्या कामांत उपयोगीं पडण्याकरितां मीं अधिकार पत्करला होता. हल्लीं लोकसत्ताक राज्याचें सूत्र तरुण व अजिंक्य सेनापतीच्या हातीं आलें हें पाहून मी आनंदानें राजीनामा देतों. नंतर दुसऱ्या अधिकाऱ्यांनीही आपल्या कामाचे राजीनामे दिले. याप्रमाणें अधिकाऱ्यांच्या मंडळीचा अंत झाला.

वरील गोष्टी झाल्या त्याच दिवशीं दहावाजतां दुसरी पांचसें लोकांची सभा या नांवाची मंडळी होती ती जमली. आपली बसण्याची जागा पालटण्याचा ठराव एकाएकीं झाला हें ऐकून त्यांस

आश्चर्य वाटून मोठा राग आला. ठराव रद्द करून तेथेंच बसण्याचें साधन त्यांपाशीं नव्हतें, त्यामुळें ते लोकसत्ताकराज्याचा जय असो असें मोठ्यानीं ह्मणत चालते झाले. त्यांनीं दुसरे दिवशीं सभेच्या जागीं बरखेडा करण्यास लोकांस उत्तेजन दिलें. **नापोलियन** त्या दिवशीं तुलरीस् येथेंच राहिला. सर्व सैन्यांतील लोक हत्यारबंद होऊन तयारींत होते. **मुरात्** हा शूर लोकांची मोठी एक टोळी घेऊन सभेची नवी जागा **सेन्तक्लाउद** येथें बंदोबस्तांकरितां गेला. दुसऱ्या दिवशीं सकाळींच दोन्ही सभांचे लोक तेथें जमले. **नापोलियन** पक्षाच्या विरुद्ध पक्षाचे लोक होते त्यांस सभेच्या जागेभोंवती हत्यारी लोकांचा गराडा पाहून भय वाटलें. कांहीं वेळानें तयारी झाल्यावर सभेच्या जागेचे दरवाजे खुले होऊन काम सुरू झालें. सभेंत मोठ्या कडाक्यानें वादविवाद सुरू झाला. अध्यक्ष **नापोलियन** पक्षास अनुकूळ होताच. सभेंत जाऊन **नापोलियन** त्याच्या परवानगीनें बोलूं लागला. तो ह्मणाला, 'लोक हो, तुम्ही ज्वालामुखीपर्वतावर आहां. कोणत्याही शूरानें जें खरें असेल तें मन मोकळें करून बोलावें. सभेनें मला काम सांगण्यास बलाविलें, तेव्हां मी घरीं बसलों होतों. मीं त्यांचा हुकूम मानिला. मीं आपले शूर लोक जमविले. तुम्हांस स्वदेशांतील मुख्य समजून ही देशांतील फौज तुमचे चाकरीकरितां तयार केली. असें असून आम्हांवर लोक नानाप्रकारचीं तुफानें घेतात. ते मला **क्रॉम्वेल** व **सीझर** यांची उपमा देतात. मला अधिकार मिळविण्याची इच्छा असती तर तसा प्रसंग मीं याच्यामागेंच आणिला असता. मी तुम्हांस शपथपूर्वक सांगतों कीं, मजपेक्षां अधिक स्वदेशाभिमानी **फ्रान्स** देशांत दुसरा कोणी नाहीं. आपणांस हल्लीं चोहोंकडून संकटांनीं वेष्टिलें आहे. समता

* इंग्लंदांत राज्यक्रांति झाली तेव्हां ओलिव्हर क्रामूवेल हा लोक पक्षाचा सेनापति होता. परंतु पहिल्या चार्लस राजाचा वध झाल्यावर कांहीं दिवस पाळें सर्व राजसत्ता बळकाविली होती.

आणि स्वतंत्रता या दोन्ही हितकारक गोष्टींकरितां आपण इतकी दुःखे भोगिलीं आहेत, तर त्यांस तरी धोक्यांत घालूंनये. एक गृहस्थ मध्येंच म्हणाला, 'आणि राज्यव्यवस्था हो'? हें ऐकून **नापोलियन** म्हणाला, राज्यव्यवस्था आजपर्यंत तीनदां मोडली. सर्वपक्षांतले लोक राज्यव्यवस्थेप्रमाणें चालावें असें म्हणतात, परंतु प्रसंग आला म्हणजे आपणच तिला सोडून वागतात. याकरतां ती रहात नाहीं तर निदान तिचे वरील दोन आधार यांचें तरी रक्षण केलें पाहिजे. माझा सर्व भरंवसा फक्त तुम्हांवर आहे. कित्येक लोकांच्या मनांत भयाचें राज्य पुनः सुरू करून रक्तपात करावयाचा आहे. मी येथें आहें, आणि माझे अनर्थापासून तुमचें रक्षण करीन. मी सरदार सभेच्याबाहेर आहेत. त्यांच्या तलवारी चमकत आहेत जर कोणी भलतेंच बोलेल तर आम्ही त्यांचा उपयोग करूं.' बरोबर पुष्कळ लोक होते, ते **नापोलियन** याचा विजय असो, म्हणत होते, त्यांस घेऊन **नापोलियन** तेथून चालता झाला.

दुसऱ्या सभेंत याहून वेगळ्याच प्रकारचा प्रसंग झाला. गेला तरी हरकत नाहीं, परंतु राज्यव्यवस्था मोडूं द्यावयाची नाहीं राज्यव्यवस्था मोडणाऱ्यांस कापून काढा; असें लोक त्या सभेंत बरळूं लागले. **लुशिअन बोनापार्त** अध्यक्ष होता, तो सभेंतील शेवटी मोडण्यास पुष्कळ यत्न करूं लागला, तरी कोणी ऐकेना. एका सभासदानें अशी सूचना केली कीं, लोकसत्ताकराज्याच्या तिसऱ्या वर्षीं ठरलेली राज्यव्यवस्था कोणीं मोडूं नये; अशी सर्वांनीं शपथ घ्यावी. ही सूचना मान्य होऊन सर्वांनीं शपथा घेतल्या. निरुपाय झाल्यामुळें **नापोलियन** याचा भाऊ व इतर मित्र यांनींही शपथा घेतली. नंतर **बारास** याचा राजीनामा सभेंत वाचिला, तो लोकांनीं धिक्कारपूर्वक ऐकिला. नंतर सैन्यांतले चार कामदार बरोबर घेऊन **नापोलियन** सभेंत आला. दरवाजे उघडे होते त्यामुळें त्याच्यामागें पुष्कळ हत्यारबंद शिपाई आहेत असें दिसत होतें. बरोबरचे चार कामदार दरवाज्यानजवळ राहिले, **नापोलियन** मात्र स्वतः एकटा सभेच्या

मध्यभागीं गेला. तेव्हां लोक, 'कायद्याच्या पवित्र ठिकाणीं नाग्या तलवारी! हा राजद्रोही आहे असा जाहीरनामा लावा; याकरितां त्यां इतके विजय मिळविले काय?' असें म्हणूं लागले. पुष्कळ सभासद उठून त्याच्या अंगावर धांवले. एकानें तर त्यावर कट्यार उगारली. **नापोलियन** यावर जिवावरचें संकट आलें असें पाहून बाराबारीं राहिलेले कामदार आंत शिरले. त्यांनीं **नापोलियन** यास उचलून आणिलें. यावेळेस तो भांबावून बेशुद्धासारखा झाला होता. **नापोलियन** यास जखम लागणार होती, परंतु मध्यें आपण आड येऊन एका कामदारानें आपणावर घेतली. त्यामुळें **नापोलियन** यानें पुढें त्यास पुष्कळ बक्षीस दिलें. मोठ्या लढाईच्या दिवशीं **शुद्धी** **नापोलियन** याचें मन स्वस्थ असे, तरी असे प्रसंग त्यास फार न आल्यामुळें तो रागानें अगदीं गोंधळून गेला. तो बाहेर आल्यावर म्हणाला., मी त्यांस विजय आणि कीर्ति द्यावयास गेलों आणि त्यांनीं मजवर कट्यारी उगारिल्या. सभेंतील एक कामदार जवळ येऊन त्यास म्हणाला, **आर्कोला**, येथें यापेक्षां मोठा धोका होता. स्वस्थ रहा, थोड्या वेळेंत ही गडबड नाहींशी होईल. नंतर **नापोलियन** सैन्यांतील लोकांकडे वळून त्यांस म्हणाला, जय आणि कीर्ति ही मीं तुम्हांस प्राप्त करून दिली, म्यां तुम्हांवर विश्वास ठेवावा काय! हें एकून 'होय, होय, आम्ही शपथपूर्वक सांगतों कीं **बोनापार्तांचा** जय असो.' असा सर्व सैन्यांतील लोकांनीं जबाब दिला.

नापोलियन निघून गेल्यावर इकडे सभेंत फारच गडबड झाली. सर्व लोक **नापोलियन** यास शिक्षा असावी असें बोलूं लागले. ह्या सूचनेस मतें घेण्यापूर्वीं मी कांहीं आपल्या भावाच्या वतीनें बोलतों, असें अध्यक्ष **लुशिअन बोनापार्त** म्हणूं लागला. परंतु त्याचें कोणी एकेना. तेव्हां तोही आपल्या जाग्यावरून उठला. पुन्हा लष्करांतील कांहीं लोक आले आणि त्यासही घेऊन गेले. बाहेर गेल्यावर सर्व शिपायी लोक अगदीं खबळून गेले आहेत, असें पाहून सर्वांस दिसण्याकरितां **लुशिअन** घोड्यावर बसला, आणि मोठ्यानें

BL ... *book M... *Wai*

बोलूं लागला. तो [illegible] सेनापति **बोनापार्त** व **फ्रान्स** देशांतील वीरहो, पांचशें लोकांच्या सभेचा अध्यक्ष तुह्मांस हुकूम करितो कीं सभेंत बखेडेखोर लोक हत्यारें घेऊन आले आहेत, ते सभेच्या कामास अडथळा करितात, याकरितां तुह्मीं त्यांचा बंदोबस्त करावा. पांचशें लोकांची सभा मोडली. अध्यक्षाचा हुकूम अमलांत आणण्यास **नापोलियन** यानें एका कामदारास सांगितलें. तो हत्यारबंद लोक घेऊन सभेंत गेला; आणि लोकसत्ताकराज्याचा जय असो असें ह्मणत लोक तेथें बसले होते त्यांस त्यानें सांगितलें कीं, तुह्मीं येथून निघून जावें, असा सेनापतीचा हुकूम आहे. कित्येक लोक गेले, कित्येक धिटाईनें तसेच राहिले; तेही हत्यारबंद शिपायी पुढें होतांच निराश होऊन जिकडून वाट सांपडली तिकडून निघून गेले. प्रतिकूळ पक्षाचे कित्येक लोक होते त्यांवर गोळ्या घालून मारून टाकण्याविषयीं कित्येकांनीं **नापोलियन** यास सुचविलें, परंतु त्यानें तिकडे लक्ष दिलें नाहीं.

लुशिअन यानें पुन्हा अनुकूळ लोक होते त्यांस बोलावून सभेचें काम सुरू केलें. त्याप्रमाणेंच दुसऱ्या सभेंत अनुकूल सभासद होते त्यांनीं तिकडे चालविलें. शेवटीं दोहों सभेचा एका मतानें ठराव होऊन जाहीरनामा लागला कीं, बखेडेखोर लोकांनीं हत्यारें हातांत घेऊन सभेंत फार गर्दी केली त्यामुळें पुढील फेब्रुआरीपर्यंत सभा बंद ठेवणें प्राप्त आहे. तोंपर्यंत **नापोलियन बोनापार्त, सीयेस्** व **ड्यूकास्** यांस राज्यकारभार पाहण्यास नेमिलें आहे.

याप्रमाणें लोकसत्ताकराज्याचा शेवट झाला. लढाईची तयारी होती, तरी रक्तपाताशिवाय ही शांतता झाली. **आब्बेसीयेस्**, ता**लेरंद**, वगैरे जे लोक या कृत्यास अनुकूळ होते त्यांस असें वाटत होतें कीं, **नापोलियन** सर्व लष्करी खात्याचामात्र कारभार करील बाकी सर्व मुलकीसंबधी वगैरे राज्यकारभार आपल्या हातीं राहील परंतु दुसरे दिवशीं तिघे नवीन कारभारी एकेठिकाणीं जमले, तेव्हां वादविवाद होऊं लागला त्यांत केवळ लष्करी खात्याविषयींच नाहीं

पण मुलकी वगैरे सर्व खात्यांचा बंदोबस्त व सुधारणा करण्याकरितां **नापोलियन** यानें असे योग्य अनेक उपाय सुचविले कीं ते सर्वांस पसंत पडावेच. **नापोलियन** याची सर्व कामांत ही पुरी माहिती पाहून **सीयेस्** यास मोठें आश्चर्य वाटलें. घरीं गेल्यावर लोक त्यास भेटावयास आले, त्यांस तो ह्मणाला, तुह्मांस धनी मिळाला बरें. **बोनापार्त** सर्व गोष्टी आपण स्वतः करील. त्याच्या आंगीं तशीच करामत आहे. सतत भांडणें सुरू करावीं, यापेक्षां तो सांगेल तसें ऐकावें हें बरें.

गोहिअर व **मौलिन्स्** ह्मणून पूर्वींचे दोन कारभारी होते. त्यांस राजीनामा देण्याविषयीं **नापोलियन** यानें मोकळीक दिली. ते गेल्यावर त्याच दिवशीं **नापोलियन लक्सेम्बर्ग** नांवाच्या राजवाड्यांत जाऊन राहिला.

मागें सांगितलेली बंडाळी पाहून पुनः अराजक व भयाचें राज्य होतें कीं काय, ह्मणून **फ्रान्स** देशांतले लोक अगदीं घाबरून गेले. कसें तरी राज्य होऊन शरीर आणि मालमत्ता सुरक्षित राहो असें लोकांस वाटूं लागलें. पंडितांनीं मोठ्या शहाणपणानें राज्यव्यवस्थेचे नियम केले, तरी केवळ त्यांपासून परिणामीं कांहीं उपयोग होत नाहीं, असें सर्वांच्या अनुभवास आलें होतें. **बोनापार्त** कांहीं तरी चांगली व्यवस्था करील असें लोकांस वाटत होतें, त्यामुळें त्यास फारशीं विघ्नें आलीं नाहींत. त्यानें ही कोणास विनाकारण पीडा न करितां राज्य व्यवस्था नीट करून देशांत स्वस्थता करण्याचा यत्न चालविला. पहिल्यानें खजिन्याची अव्यवस्था होती ती मोडून टाकण्याचें काम त्यानें हातीं घेतलें. श्रीमंत लोकांपासून जबरीनें कर्ज घ्यावयाचा परिपाठ पहिल्या कारभाऱ्यांनीं घातला होता, तो त्यानें मोडून टाकिला. त्यानें उत्पन्नापेक्षां खर्च अधिक न होऊं देण्याविषयीं पुष्कळ यत्न केला. **फ्रान्स** देशांतून बाहेर गेलेले लोक जर दुसऱ्या देशांत **फ्रान्स** देशाविरुद्ध खटपटी करतील, तर त्यांबद्दल देशांत राहिलेले त्यांचे आप्त जबाबदार आहेत असें समजून

त्यांस शिक्षा करण्याचा जुलुमाचा कायदा होता तो मोडून टाकिला, यामुळें सर्वांस आनंद झाला. पुष्कळ लोक प्रतिकूळ असतां ही धैर्य धरून **नापोलियन** यानें सर्व देवालयें पुनः धर्मसंबंधी कामाकडे दिली. तो ह्मणे, देशांत शांतता पाहिजे असेल तर लोकांस प्रार्थनेचीं साधनें दिलीं पाहिजेत. ज्या **पाद्री** लोकांनीं नवीन राज्यव्यवस्थेस अनुकूल असण्याविषयीं शपथा घेतल्या, त्यांस त्यांचीं पूर्वीचीं कामें सांगितलीं. यामुळें वीस हजार **पाद्री** लोक तुरुंगांत होते ते मोकळे झाले. **क्याम्बेसेरीस्** ह्मणून एक उत्तम विद्वान् वकील व न्यायाधीश होता, त्यानें या कामांत **नापोलियन** यास पुष्कळ मदत केली. याप्रमाणें दुसऱ्या पुष्कळ सुधारणा झाल्या. पूर्वीच्या कारभाऱ्यांनीं ज्या लोकांस अन्यायानें हद्दपार केलें होतें, त्यांस देशांत येण्याची परवानगी मिळाली. यामुळें **कार्नोत्** वगैरे पुष्कळ विद्वान् लोक परत आले. त्यांपैकीं कित्येकांस **नापोलियन** यानें मोठमोठीं कामें दिलीं. लष्कर खात्याची चांगली सुधारणा केली. कित्येक प्रांतांतून बंडें होतीं, त्यांच्या मुख्यांस हळूच युक्तीनें वळवून **नापोलियन** यानें जिकडे तिकडे शांतता केली. कित्येक बखेडेखोर लोक **पारिस**मध्यें आडून लपून राहिले होते, ते लोकांस पुनः चिथावीत होते. त्यांस हद्दपार करावें असें कित्येक कामदार **नापोलियन** यास सांगत होते, परंतु त्यानें तसें केलें नाहीं. त्यास धाक दाखविण्याकरितां, 'असें करील त्यास हद्दपार केलें जाईल' असा जाहीरनामा मात्र लाविला.

अपापल्या पक्षाचा अभिमान सोडून नवीन राज्यव्यवस्थेचे नियम करण्याकरितां सर्व पक्षांच्या विद्वान् लोकांस **नापोलियन** यानें बोलाविलें; व ज्यांनीं श्रम केले त्यांस त्यानें योग्य बक्षिसें ही दिलीं. **सीयेस्** यानें राज्यव्यवस्थेच्या नियमांचा मसुदा तयार केला होता. त्यांत लष्करी खात्याकडे एक, व मुलकी, न्याय, वगैरे खात्यांकडे एक असे दोन मुख्य प्रधान नेमावे, यांच्या हातीं सर्व सत्ता रहावयाची. यावर एक मुख्य प्रतिनिधि नेमावयाचा, त्याचा मानमात्र मोठा, परंतु त्याच्या हातांत सत्ता कांहीं नाहीं. अशा प्रकारचे बोंठाळ्याचे

यम होते, ते **नापोलियन** यास पसंत पडले नाहींत. तो ह्मणाला, एकाच्या हातांत पैसा व एकाच्या हातांत फौज या दोहों प्रधानांचें एकमत होईल कसें? शिवाय नुसता पगार घेऊन डुकरासारखें लठ्ठ पडावें दुसरें काम कांहीं नाहीं, असा मुख्य प्रतिनिधि तरी होतो कोण? मी तर कधीं होणार नाहीं. नंतर दुसरा मसुदा तयार झाला. त्यांत लोकांनीं प्रतिनिधि नेमणें, कायदे करणें, दिवाणी, फौजदारी, वसूल, वगैरे सर्व गोष्टींचे उत्तम नियम होऊन दोन दुय्यम कारभारी हातासालीं देऊन **नापोलियन** यास मुख्य कारभारी नेमण्याचें ठरलें. **भाव्वेसीयेस्** आणि **डयूकास्** यांनीं राजीनामे दिले. नंतर **क्याम्बेसेरीस्** व **लेब्रन्** या दोघांस **नापोलियन** याच्या हाताखालीं जागा मिळाल्या.

वर सांगितलेले राज्यव्यवस्थेचे नियम दिसण्यांत सुंदर आहेत, सगळी एकंदरींत त्यांचा रोंख **नापोलियन** याच्या हातांत सर्व सत्ता असावी असा आहे; असें लोकांस दिसूं लागलें. नवीन नियम लोकसत्ताक राज्याच्या मूलतत्वांस अनुलक्षून व मालमत्ता, स्वतंत्रता, आणि समता, हीं मनांत आणून केले आहेत, असा कारभाऱ्यांनीं जाहीरनामा काढिला, व लोकांचीं मतें घेतलीं. देशांत कशी तरी स्वस्थता राहो असें लोकांस झालें होतें, त्यामुळें बहुतेक सर्व लोकांनीं नवीन व्यवस्थेस मान्यता दिली.

नवीन व्यवस्थेप्रमाणें कामास सुरवात होतांच प्रथम **तुलरीस्** राजवाडा सरकारचें मुख्य ठिकाण करण्याचा **नापोलियन** यानें बेत केला. तारीख १९ फेब्रुआरी सन १८०० या दिवशीं त्यानें मोठ्या थाटमाटानें व डामडौलानें **फ्रान्स** देशच्या राजांच्या राहण्याचे ठिकाणीं प्रवेश केला. राजघराण्याचें आपल्याही मनांत शत्रुत्व आहे, असें दाखविण्याकरितां त्यानें **ब्रूटस्** याचा पुतळा राजवाड्यांत ठेव-

* हा जूलीयस् सीझर् यास मारणाऱ्या मंडळीचा मुख्य होता. मोठा नीतिमान् व सीझराच्या प्रीतींतला हा होता तरी लोकसत्ताकराज्याचा महाभक्त असल्यामुळें या कृत्यास तो प्रवृत्त झाला.

प्यास सांगितलें. **फ्रान्स** देशांतील राजवंश बंद झाला आतां पुनः तो स्थापित व्हावयाचा नाहीं असें प्रसिद्ध ठिकाणीं लिहिण्यास सांगितलें याच वेळेस **अमेरिकेंतील** प्रसिद्ध पुरुष **जार्ज वाशिंग्तन** मेला. त्याच्या सन्मानार्थ दहा दिवस सैन्यांतील निशाणें पाडून ठेवण्यास सांगितलें; व राजाच्या जुलुमाचा नाश करणारा व स्वदेशास स्वतंत्रता देणारा थोर पुरुष वगैरे पुष्कळ विशेषणें देऊन त्याच्या स्तुतिपर एक जाहीरनामा प्रसिद्ध केला.

याप्रमाणें लोकसत्ताक व राजसत्ताक या दोन्ही पक्षांस आवडणारीं कृत्यें करून **नापोलियन** लोकप्रिय होण्याचा यत्न करीत होता यामुळें दोघांसही त्यापासून हित होण्याची आशा होती. राजघराण्यांतील पुरुषांनीं एका परदेशाच्या वकीलाच्यामार्फत **नापोलियन** यास वश करण्याकरितां दोन मनुष्य पाठविले. त्यांनीं गुप्त रीतीनें **नापोलियन** याची गांठ घेतली. त्यांनीं सांगितलें कीं, खरोखर तुमच्या मनांत काय उद्देश आहे तो सांगा. कायदेशीर राजास गादीवर बसविण्याचें तुमच्या स्वाधीन आहे. आह्मांप्रमाणेंच तुमचें मत असेल तर तुह्मी सांगाल तें ऐकण्यास आह्मी तयार आहों. यावर **नापोलियन** यानें उत्तर दिलें कीं, **बोर्बोन** वंशाचें राजघराणें स्थापण्यात पुनः हजारों मनुष्यांची कत्तल करावी लागेल. मी मागील अपराधाबद्दल क्षमा करितों. परंतु पुनः राजघराण्यांतील पुरुषांशीं व **फ्रान्स** देशाच्या परकीय शत्रूंशी संबंध ठेवणाऱ्यांबरोबर मी कोणत्याही कामांत बोलणार नाहीं. हें ऐकतांच **नापोलियन** कधीं वळावयाचा नाहीं, अशी त्या मनुष्यांची खात्री झाली; तरी राजघराण्यांतील पुरुषांची पुरती निराशा झाली नाहीं. कारण त्यांस आशा लागण्यासारख्या कांहीं गोष्टी पुनः ऐकूं लागल्या. राजघराणें द्वेष्य होय अशाचा कोठें सरकारी कागदांत लेख होता तो काढून टाकिला. लावा लुई याचा वध झाला, तो दिवस सणाचा समजावयाचा नियम होता तो मोडून टाकिला. हा नियम न मोडण्याविषयीं असतां **आव्वेर्सीयेस्** सणाला, लुई जुलमी राजा होता.

नापोलियन म्हणाला, ' नाहीं नाहीं, तो जुलमी नव्हता. जर तो जुलमी असता तर मी एक भिकार कामगार असतों, व तूं पाद्री असता वाटे कीं, त्या गोष्टी आपणास हितावह आहेत, परंतु दूरदर्शी असत ते यांचा रोख कोणीकडे आहे तें समजत असत.

एकमेकांचा अनिष्टेप करणाऱ्या लोकांस एकत्र करून आपला उद्देश साधण्याचें काम फार कठिण आहे. त्याकरितां नापोलियन पास फार जपावें लागे. आपला उद्देश समजून सगळे लोक एक झाले तर आपणास धोका आहे असें समजून तो कामगारांमध्यें एकी होऊं देत नसे. त्यामुळें एकमेकांचा परस्परांवर डोळा असल्यानें सर्वांची कामें उत्तम होत. यासाठीं तो दोन्ही पक्षांतल्या हुशार लोकांस मोठ्या जागा देत असे. कोणी म्हणाला कीं तालेरन्द् अप्रामाणिक मनुष्य आहे. त्यावर तो म्हणाला, असो, पण तो परदेशांत वकीलपाठविण्यास फार उत्तम हुशार आहे. आपण त्यापासून नेहमी काम घ्यावें. दुसरा कोणी म्हणाला, कार्नोत् लोकसत्ताकराज्याच्या पक्षाचा आहे. त्यावर नापोलियन म्हणाला, कसाही असो, परंतु तो फ्रान्स देशाची तुटातुट व्हावी असें कधीं इच्छिणार नाहीं. माझ्या कामास असा दुसरा मनुष्य मिळणार नाहीं. फोके यास फौजदारी खात्याचा मुख्य अधिकार दिला, तेव्हां दोन्ही पक्षाचे लोक म्हणाले कीं, अशा दुष्ट व लुच्चा मनुष्यास हें काम सांगणें ठीक नाहीं. त्यावर नापोलियन म्हणाला, या कामावर फोकेच योग्य मनुष्य आहे. बरवेडे व लुच्चेगिऱ्या यांनीं फ्रान्स देशास दुःख दिलें आहे त्यांची माहिती त्यासच आहे. आपणास मनुष्य नवे उत्पन्न करितां येत नाहीं. जसे सांपडतील त्यांवर निर्वाह केला पाहिजे. हुशार मनुष्याचा वाईटपणा काढून टाकण्यास सांपडेल परंतु नवीन हुशार मनुष्य करणें कठीण. ह्याप्रमाणें सर्व हुशार मनुष्यांस जागा देऊन एकमेकांच्या धाकांत सर्वांस ठेवून आपला मतलब साधणें हें मोठ्या शहाणपणाचें काम आहे. यावद्दल नापोलियन याची पु-

एकळ लोक स्तुति करितात. **नापोलियन** याच्या हातांत सर्व
ज्यकाभार आल्यापासून सर्व पक्षांचे लोक निर्भय झाले. आपल्य
पूर्वीच्या कृत्यांबद्दल दंड होईल असें भयवाटत होतें, तें सर्व नाहींसें
झालें. **बोर्बोन** वंशाचे राजे गादीवर येण्याचा संभव नाहींसा झा
ल्यामुळें राजघराण्याच्या विरुद्ध पक्षाचे लोक निर्भय झाले. पु
राजसत्ताकराज्य होण्याचा संभव दिसूं लागल्यामुळें राजपक्षाच्य
लोकांस कांहींसें बरें वाटलें. जिकडे तिकडे शांतता होऊन राज्यक्र
तीमुळें झालेलीं दुःखें नाहींतशीं होत चाललीं. कायद्याच्या दृष्टीनें सर्व
फ्रेंच लोक सारखे असें होऊन त्याप्रमाणें वहिवाट सुरू झाल्यामुळे
सर्वांस न्याय सारखा मिळून मालमत्तेचें व जीवाचें रक्षण होऊं लाग
लें. कर सर्वांवर योग्यरीतीनें बसविल्यामुळें जुलूम कमी झाला
सरकारी जागा बुद्धिमान् व योग्य मनुष्यांस मिळूं लागल्या.

नापोलियन तुलरीस राजवाडयांत रहावयास गेल्यावर **मुरात्**
यानें त्याची बहीण **क्यारोलाईन** हिला वरण्याविषयीं बोलणें लावि
लें. **मुरात्** याचें शौर्य व बुद्धिमत्ता सर्वांच्या मनांत भरली होती, तरी
तो हलक्या कुळांत जन्मलेला असल्यामुळें **नापोलियन** याच्या म
नांत हा संबंध व्हावा असें नव्हतें. तथापि **जोसेफाईन** हिच्या
आग्रहामुळें त्यानें रुकार दिला.

भाग ९ वा.

स्वदेशांतील व्यवस्था झाल्यावर परदेशाकडे **नापोलियन** मा
मन लाविलें. पूर्वी **आस्त्रिया**च्या बादशाहाचा पराभव करून
मुलूख मिळविला होता तो सर्व बादशहानें परत घेतला. यामुळें फ्रें
लोकांच्या पराक्रमाची किर्ति **युरोपखंडांत** थोडथोडी कमी होत

नली होती परंतु **नापोलियन** शत्रूंचा पराभव करील असें सर्वांस वा
टूं लागलें; व परदेशाशीं चालू असलेलीं भांडणें शेवटास जाऊन तह
झाल्याशिवाय राज्य सुरळीत चालणार नाहीं असें **नापोलियन** यास
ही वाटत होतें.

इकडे **आस्त्रिया**च्या बादशहाचे साथी दुसरे राजे होते त्यांनीं
बादशहास सोडून दिलें. त्यामुळें त्यास कोणाचा आश्रय नाहींसा झा
ला. लढाई चालवावी किंवा बंद करावी याविषयीं **इंग्लंद**च्या प्रधा
नांचा पक्का निश्चय नव्हता. इतक्यांत **नापोलियन** यानें स्वदस्तुरचें
पत्र **इंग्लंद**चा राजा तिसरा **जार्ज** यास लिहिलें. त्यांतील हांशील
येणेंप्रमाणें.

'**फ्रेंच** राष्ट्राच्या इच्छेनें मला लोकसत्ताकराज्याचा मुख्य अ
धिकार प्राप्त झाला आहे. याकरितां आपलें काम पाहूं लागून तुह्मां
स स्वतः पत्र लिहिण्याचें मनांत आणिलें आहे.

आठ वर्षें जगांत चोहोंकडे लढाईनें अनर्थ करून दिले आहेत;
ही लढाई सतत चालावी अशी आपली इच्छा आहे काय? याची तोड
काढण्यास कांहीं सबड नाहीं काय? आपलें रक्षण आणि स्वतंत्रता
राखण्यास पाहिजे त्याहून अधिक बल ज्यांस आहे, अशीं **यूरोपा**ती
ल दोन फार सुधारलेलीं राष्ट्रें व्यापारापासून होणारा फायदा, देशांतील
भरभराट, आणि शांततेचें सुख, यांस टाकून केवळ पराक्रमाच्या की
र्तीकरितां भांडत सुटतात हें आश्चर्य नव्हे काय? शांतता ही देशास
अवश्य पाहिजे, तींतच त्याची कीर्ति आहे, असें त्यांस कां वाटत
नाहीं? हे विचार नवीन आहेत असें आपल्या मनास वाटणार नाहीं.
कारण आपण स्वतंत्र राष्ट्रावर केवळ त्यास सुखी करण्याच्या इच्छेनें
राज्य करितां. नेहमींच्या अशक्त राजांनीं आपलें भय गुप्त ठेवण्याच्या
व सशक्तांनीं एकमेकांस फसविण्याच्या ठरीव चाली सोडून मीं हें तु
ह्मांस लिहिलें आहे. यांचें कारण आपणास दिसून येईल कीं, पुनः
एकवार जिकडे तिकडे शांतता व्हावी अशी माझी मनापासून खरी
इच्छा आहे, व ही माझी इच्छा पूर्ण होईल असा मला विश्वास आहे.

फ्रान्स आणि **इंग्लंद** यांनीं आपल्या शक्तीचा गैर उपयो
केला, तरी त्यांचा नाश लौकर व्हावयाचा नाहीं, हें खरें, तथापि
आपणास सांगतोंकीं, ज्या युद्धाग्नीच्या ज्वालांनीं चोहोंकडे अ
केला आहे तो विझवून टाकणें हें सुधारलेल्या राष्ट्रांचें सुदैव होय.'

या पत्राचें उत्तर **इंग्लंद**च्या राजाचा परराज्यसंबंधी प्रधान
ग्रानव्हिल् यानें पाठविलें. त्यांत त्यानें असें लिहिलें कीं, 'आप
राज्याचें, आपल्याशीं सख्य ठेवणाऱ्या राजांचें, आणि यूरोप खण्डाचें
संरक्षण व्हावें, याशिवाय लढाई करण्याचा राजाचा दुसरा उद्देश
हीं नाहीं. शांतता करण्याचा प्रसंग आला म्हणजे तो घालविणार
जाणार नाहीं, पण तसा प्रसंग हल्लीं आहे असें राजास वाटत नाहीं.
राज्यक्रांति झाल्यापासून **फ्रान्स** देशच्या सरकारांतून शांततेविषयी
वारंवार सूचना येतात, परंतु त्याचें वर्तन बोलण्याहून अगदीं वेगळें
आहे. **स्वित्सर्लंद, इताली, हालंद, जर्मनी, मिसर**, यांपैकीं कोणत्या देशास **फ्रान्स** सरकारानें स्वस्थ ठेविलें आहे ? लढाई बंद होण्याचें कारण नाहींसें होईपर्यंत ती चालू असली पाहिजे. **फ्रान्स** देशांतील पदच्युत केलेल्या राजवंशास पुनः स्वस्थानीं आणणें **यूरोपां**तील दुसऱ्या राजांच्या मनांत विश्वास उत्पन्न करण्यास वाव
ला उपाय आहे. **फ्रान्स** देशांतील राज्यव्यवस्थेंत हात घालण्याचा
राजाची इच्छा नाहीं, तथापि असें दिसतें कीं, पूर्वीच्या **फ्रान्स**
शांतील राज्यव्यवस्थे प्रमाणेंच हल्लींच्या व्यवस्थेंतही विश्वास
ण्यासारखें कांहीं दिसत नाहीं.'

हें उत्तर **इंग्लंद**ांतील पार्लमेंत सभेस मान्य झालें. उत्तर पोहों
चतांच **नापोलियन** यानें फौज तयार करण्यास हुकूम केला. त्याची
तह करण्याविषयीं **आस्त्रिया**च्या दरबाराशींही बोलणें लाविलें, परंतु
तिकडेही तह होण्याचा रंग दिसेना; तेव्हां **नापोलियन** म्हणाला
मी लढाई करण्यास फार उत्सुक असतों असें मला आतां पुष्कळ
लोक म्हणतील काय ? शत्रूंनीं नेहमीं अगोदर युद्धास आरंभ केलेला
आहे हें दाखवितां येईल.

इंग्लंदच्या लढाऊ गलबतांशीं झगडा करण्याचें कठीण असें मनून त्यानें प्रथमतः **आस्त्रिया**चा पराभव करून आपण **मिसर** देशांत गेल्यावर परत घेतलेला **इतली** देशांतील मुलुख पुनः जिंकण्याचा निश्चय केला. ही मोहीम कोणत्यारीतीनें करावी याविषयीं त्यानें जो बेत केला, त्याचें लोकांस अद्याप मोठें आश्चर्य वाटत आहे. यावरून त्याची युद्धकौशल्यांत अवर्णनीय बुद्धिमत्ता आहे, अशी पुनः खचें यूरोपखंडाची खात्री झाली.

आस्त्रियन लोकांची फौज **इतली** देशांतून **फ्रान्स** देशांत येण्याच्या सर्व वाटा धरून बसली होती. त्यांस पुढें येऊं न देण्याविषयीं **फ्रेंच** लोकांची थोडी फौज तेथें होती. आपल्या पराक्रमानें लोकांस चकित करून टाकल्याशिवाय आपले हेतु सिद्धीस जाणार नाहींत असें **नापोलियन** यास माहीत होतें. याकरितां त्यानें असा विचार केला कीं, प्राचीन काळीं **हानिबाल** या महा योद्धयानें ज्याप्रमाणें **कार्थेज** येथून **स्पेन** देशांत येऊन **इतली** देशांत प्रवेश केला, त्याप्रमाणें **आल्प्स**पर्वतांतून **इतली**देशांत **आस्त्रिया**च्या फौजेच्या मागील बाजूस आपली फौज नेऊन तिला दोन्ही सैन्याच्या कचाटींत आणावें.

वरील बेत मनांत आणून **आल्प्स** पर्वतांतून सैन्य नेण्यास मार्ग शोधून काढण्यास एक हुशार कामदार त्यानें पाठविला. तो कामदार पर्वतांतील सर्व वाटा पाहून आला; आणि अशा विकट जागांतून सैन्य नेणें अति दुर्घट आहे, असें सांगून बोलत होता इतक्यांत **नापोलियन** यानें विचारिलें कीं ही गोष्ट संभाव्य आहे कीं नाहीं, तें एकदम सांगा. त्या कामदारानें होय म्हटल्याबरोबर आपला बेत तडीस नेण्याविषयीं **नापोलियन** याचा निश्चय झाला.

नापोलियन याच्या खाजगीकडील एका कामदारानें असें लिहिलें आहे कीं, 'एके दिवशीं मी सकाळींच **नापोलियन** बसला होता त्या खोलींत गेलों. तेथें पाहतों तों **इतली** देशाचा एक मोठा नकाशा

शा पुढें पसरून **नापोलियन** त्यामध्यें टांचण्या टोंचीत आहे. क
हीं टांचण्यांच्या बुडास काळ्या खुणा करी व कांहींच्यास तांबड्या
करी. याप्रमाणें तो कोणकोणत्या ठिकाणांतून सैन्य न्यावयाचें
मनांत ठरवीत होता. पुढें चार महिन्यांनीं हें विजयी सैन्य बरो
खुणा केलेल्या जागीं आलें, तेव्हां मला मोठें आश्चर्य वाटलें.'

आल्प्स पर्वतांतील ज्या मार्गानें सैन्य नेण्याचें **नापोलियन**
यानें योजिलें तो मार्ग फार विकठ होता. मोठमोठाले कडे तुटले
असून ते नेहमीं बर्फानें आच्छादित असत. त्यामुळें चालण्याचे इ
कें कठीण होतें कीं, जरा पाय निसरला कीं, कड्येलोट होऊन जीव
जावयाचा. चोराचिलटाशिवाय या मार्गीतून बहुशः कोणी जा
नसे. **फ्रान्स** देशांत ज्या ज्या ठिकाणीं फौजेची तयारी पाहिजे
होती तेथें व्यवस्था करून मोठें सैन्य घेऊन **नापोलियन** स्वतः य
मार्गानें **इतालीदेशांत** जाण्यास निघाला. रस्ता इतका बिकट हो
तरी घोडे, तोफा, वगैरे सर्व लढाईचीं साधनें त्यानें बरोबर घेतलीं हो
तीं. तोफा मोठमोठ्या लांब लांकडांच्या नळकांड्यांतून घालून शं
रांवर मनुष्यें लागून ओढून नेत. याप्रमाणें गाड्यांचें सामानसुद्धां व
गळें करून मनुष्यांनीं खांद्यांवर वाहून नेलें ! रस्त्यांत एकादे वेळ
मोठी अडचण येऊन लोक थांबले म्हणजे त्यांस उत्तेजन देण्याकरितां
घोड्यावर बसून **नापोलियन** स्वतः सर्वांच्यापुढें चालूं लागे ! ए
ग्रंथकार असें लिहितो कीं, यावेळेस सैन्यांतील लोकांनीं जे श्रम
शिले, त्यांचें वर्णन होणें नाहीं. मागले लोक घाबरतील म्हणून पु
लोक दम खाण्यासमुद्धां उभे राहत नसत. पुढल्या लोकांच्या
यांनीं खरबीत झालेल्या बर्फाच्या चिखलांत गुढघे टेंकीत मागल्य
लोकांस चालावें लागे. एकेवेळीं कित्येक लोक कड्यावरून मो
धोरला बर्फाचा दगड पडून मेले. कित्येक ठिकाणीं तर पुढें रस्त्या
चा मागमूसमुद्धां दिसत नसे. अशा संकटांतून सुमारें चाळीस
जार फौज घेऊन **नापोलियन** जात होता. सन १८०० क्या
महिन्यांत या मोहिमेस सुरुवात झाली.

आल्प्स पर्वताच्या माथ्यावर सेंतबर्नार्द ह्मणून एक मठ आहे, तेथें कित्येक ख्रिस्ती साधु राहतात. ते तेथें येणाऱ्या प्रवाशांचें बर्फांत गहून जातात, त्यांस संकटांतून सोडविण्यास हे लोक फार यत्न करितात. त्यांपाशीं एका चांगल्या जातीचे हुशार कुत्रे असतात; त्यांच्या गळ्यांत कांहीं खाण्याचे पदार्थ व चिठ्ठी बांधून वाट चुकलेल्या प्रवाशांचा शोध लावण्यास पाठवितात. या कुत्र्यांनीं शेंकडों मनुष्यांचे प्राण वांचविले आहेत ! नापोलियन मोठें सैन्य घेऊन इटालीवर स्वारी करून जात आहे असें तेथील लोकांस कळलें होतें. त्यामुळें त्यांनीं सैन्यांतील सर्व लोकांस थोडथोडें सत्कारपूर्वक खावयास दिलें. या पाहूणचाराबद्दल नापोलियन यानें त्यांचे आभार मानिले. त्यानें तेथें थोडी विश्रांति घेतली. तेवढ्या वेळांतसुद्धां मठांतील कांहीं फार प्राचीन पुस्तकें होतीं तीं वाचिलीं ! याशिवाय वाटेंत कोठें कोठें रानटी लोक असत ते आपल्या हातून होईल ती मदत करण्यास तयार असत. एक गरीब शेतकरी मनुष्य नापोलियन यानें बराबर दारविण्यास एका ठिकाणाहून घेतला होता. तो नेहमीं त्याबरोबर चाले. नापोलियन त्याशीं पुष्कळ वेळ गोष्टी सांगत असे. कारण त्याच्या भाषणाच्या साधेपणाचें नापोलियन यास आश्चर्य वाटे. सेंतबर्नार्द या ठिकाणीं नापोलियन यानें त्यास निरोप दिला. निरोप देण्याच्यापूर्वी तुला काय काय पाहिजे ह्मणून नापोलियन यानें त्यास विचारिलें, व त्यानेंही ज्या वस्तु पाहिजे होत्या त्यांचीं नांवें सांगितलीं. नापोलियन यानें सेंतमोरीस येथील अधिकाऱ्यास लहानसी चिठ्ठी दिली. तींत त्यानें मागितलेल्या वस्तु व आणखी कांहीं पैसा त्यास देण्याविषयीं लिहिलें होतें. नापोलियन यानें उदार होऊन पांढऱ्यावर काळें केलेला एकलहानसा कागदाचा तुकडा दिला, त्यामुळें आपणास इतके पदार्थ प्राप्त झाले हें पाहून त्या रानांत राहणाऱ्या मनुष्यासही मोठें आश्चर्य वाटलें.

सेंतबर्नार्द येथून निघाल्यावर कित्येक ठिकाणीं वाट फारच

विकट लागली. एका वेळेस तर स्वतः **नापोलियन** यास सुद्धां शेंदे नगें हात बसून उतरावें लागलें. **नापोलियन** सर्वांशीं ममतेनें वा नरी त्याचें वजन कमी होत नसे. सर्व लोक त्याच्या धाकांत अ न हें मागें सांगितलेंच आहे. पुढें वाट विकट दिसल्यामुळें सैन्य थांबलें म्हणजे त्यानें नुसतें वर पाहिलें कीं पुनः चालू होई! याप्रमा मार्ग क्रमून **चातिल्लोन** या ठिकाणीं **आस्त्रियन** लोकांचें पांच हजा सैन्य होतें त्यावर **फ्रेंच** लोकांच्या एका टोळीनें मागमूस न समज देतां हल्ला केला. त्यांस वाटलें कीं, हे लोक आकाशांतून आपणा पडले कीं काय कोणजाणे!

फ्रेंच लोकांस वाटत होतें कीं, आपण आतां वाटेच्या संक तून पार पडलों. परंतु **सेंतवार्द** या ठिकाणीं त्यांचा एवढा महा यास व्यर्थ जाण्यासारखा प्रसंग गुदरला. **सेंतवार्द** हा किल्ला चावर असून त्याच्या आलीकडे एक नदी आहे. त्यामुळें ती जा घेण्याकरितां **फ्रेंच** लोकांनीं केलेला प्रयत्न व्यर्थ जाऊन पुढें त्यां कांहीं उपाय चालेना; तेव्हां सगळे लोक घाबरून गेले. **नापोलियन** मागें राहिला होता त्यास ही बातमी कळतांच तो त्वरा करून तें आला. अशा विकट प्रसंगीं धैर्य न सोडतां पार पडण्याची कां नरी युक्ति त्यास हटकून सुचावयाचीच. उंच उंच शिखरांवर च चोहोंकडे नीट लक्षपूर्वक पाहून अमुक बाजूनें चाल केली अस आपण किल्ला सर करूं असें त्यास वाटलें; तेव्हां तिकडून चाल क ण्यास त्यानें हुकूम केला. **नापोलियन** यास सुद्धां ही वाट का बिकट आहे हें ठाऊक होतें. तथापि त्यास असें वाटलें कीं, उ मैन्यानें **सेंदवर्नार्द**चा मार्ग उल्लंघिला, तें या मार्गातून जाण्यास ह पार नाहीं. त्यानें स्वतःयोजना केलेल्या उंच जागीं मोठ्या श्रम एक तोफ चढविली. तिचा मारा असा उत्तम साधला कीं, त्याम किल्ल्यांतील लोकांचें धैर्य सुटत चालले. त्यांस असें वाटत होतें व **फ्रेंच** लोक गनांत पारध करणाऱ्यासुद्धां जेथें जाण्यास कठिण प नें अशा शेरडें जाण्याच्या वाटेनें येत आहेत तर त्यांपाशीं तोफा न

नोत. त्यांनीं ही **फ्रेंच** लोकांवर गोळ्यांचा वर्षाव केला, तरी शेवटीं ते किल्ला सर करून पुढें चालूं लागले. या वेळेस **नापोलियन** श्र मानें इतका थकला कि, वाटेंत एके ठिकाणीं विसावा घेण्यास बस ला तेथें त्यास गाढ झोंप लागली. **इव्हिआ** शहरापर्यंत **फ्रेंच** लोक गेले तरी **आस्त्रियन** लोकांस त्यांचें इतकें भय वाटत नव्हतें. परंतु **नापोलियन** याचा सरदार **लान्ने** यानें दोन दिवस तुंबळ युद्ध करून त्या शहरांत प्रवेश केला. नंतर **नापोलियन** यानें **तूरिन** शहराकडे चाल करण्यास सुरुवात केली. वाटेंत एके ठिकाणीं दहा हजार **आस्त्रियन** लोक होते, तेथें एक निकराची लढाई झाली; तींत ही श- त्रूंचा पराजय होऊन **फ्रेंच** लोकांस पुष्कळ सामानांचा पुरवठा मिळाला.

इकडे **आस्त्रिया**चा सेनापति **मेलास्** हा **फ्रान्स** देशांत प्रवेश करण्याविषयीं निकरानें लढत होता, तों त्यास अपल्या पाठीमागें दु- सऱ्या वाटेनें येऊन **फ्रेंच** लोकांनीं धुमाकूळ केला, ही बातमी कळ- ली तेव्हां तेथें कांहीं लोक ठेवून तो **नापोलियन** यास टक्कर देण्या- स परत आला. **मेलास** परत आल्यावर **आस्त्रियन** व **फ्रेंच** यां- च्या अनेक ठिकाणीं अनेक निकरांच्या लढाया झाल्या. त्या सर्वां- चे रत्नंभूत वर्णन वाचण्यांत परदेशीय वाचणाऱ्यांस कंटाळा येण्याचा संभव आहे, याकरितां संक्षेपानें एवढेंच सांगणें पुरे आहे कीं, **मिसर** देशांत गेल्यावर पूर्वी जिंकिलेलीं **इताली**देशांतील **मिलान, तूरि- न, पेव्हिआ**, वगैरे शहरें **नापोलियन** यानें पुनः घेऊन पुर्वी प्र- माणें **इताली**देशांत **फ्रेंच** लोकांच्या नांवाचा दरारा बसविला. **आस्त्रियन** लोकांनीं ही कित्येक ठिकाणीं मोठ्या योग्य धैर्यानें शत्रू- वर हल्ले केले, परंतु दोन्ही बाजूंनीं शत्रूंचा मारा असल्यामुळें त्यांचे कांहीं चाललें नाहीं. कारण **मेलास** जातांच **फ्रान्स** देशाच्या ना- यावर ठेवलेल्या **फ्रेंच** फौजेनें पुढें चाल केली.

देसेक्स् म्हणून एक **फ्रेंच** सैन्यांत अधिकारी होता. हा मोठा शूर असे. हा मात्र आपल्या खालोखाल शूर आहे असें **नापोलि-**

पन यास वाटत होतें. **नापोलियन मिसर** देशांतून आला त्यावेळ
त्यास तेथें ठेवून प्रसंग उपल्यास **फ्रान्स** देशास परत यावें असें
गून आला होता. **नापोलियन आल्प्स** पर्वताच्या वाटेनें इतालि
देशांत जाण्यास निघाल्यावर हा **फ्रान्स** देशीं पोहोंचला. नापो
लियन यानें लौकर येऊन आपणास मिळण्याविषयीं लिहिलेलें प
त्यास पोहोंचलीं. तीं वाचून तो म्हणाला, याला सर्व मिळालें तो
अद्याप याची तृप्ति झाली नाहीं. **नापोलियन** आणि **देसेक्स**
यांचें फार इष्टत्व असे. **सेंतबर्नार्द**च्या वाटेनें **नापोलियन**
असें त्यानें ऐकिलें, ऐन्हां रात्रीचा दिवस करून तो तिकडे जाण्या
निघाला. कारण त्यास वाटे, **नापोलियन** आल्पांस करण्या
कांहींएक होवणार नाहीं. **नापोलियन** याची गांठ पडल्यावर उभ
तांचीं प्रेमभावानें भाषणें झालीं. लागलींच **नापोलियन** यानें त्य
एका मोठ्या टोळीचा अधिकार दिला. **देसेक्स** यानेंही पु
ठिकाणीं शूरांस आश्चर्य देणारे पराक्रम केले. **मारेंगो** या ठिका
मोठा वेळ निकरानें युद्ध चाललें होतें. त्या दिवशीं **आस्त्रियन**
कांनीं फारच गर्दी करून सोडिली; त्यामुळें **फ्रेंच** लोक पळ काढ
च्या बेतांत होते, इतक्यांत **देसेक्स** घोडयावर बसून **नापोलि**
याजवळ गेला, आणि म्हणाला, ' मलावाटतें आज आपला परा
होणार. ' हें ऐकून **नापोलियन** म्हणाला, मला वाटतें आज आप
जय होणार. तुम्ही पुढें घुसा तर खरे मागल्या फौजेची मी व्यवस्थ
करितों. याप्रमाणें म्हणून **नापोलियन** मागें पाय काढणाऱ्या
कांस उत्तेजन देऊं लागला. त्यामुळें पुनः लढाई सुरू झाली.
वेळानें **देसेक्स** गोळी लागून ठार पडला. त्यास पाहून **नापो**
लियन म्हणाला, हाय हाय ! मला रडण्यासदेखील अवकाश **नाहीं**
देसेक्स पडल्यामुळें **फ्रेंच** लोकांस फारच चेव आला. ते जिवावर
उदार होऊन लढूं लागले. त्यामुळें आज आपणांस जय मिळणा
असें **आस्त्रियन** लोकांस वाटत होतें तें सर्व पारडें फिरलें. फ्रें
लोकांनीं त्यांची दाणादाण करून पराजय केला हा पराभव झाल्या

लागलींच **आस्त्रियन** लोकांनीं युद्ध सोडून तहाचें बोलणें लाविलें. **नापोलियन** याच्या मनाप्रमाणें तहार्ची कलमें ठरल्यावर हातारवाल-या कामदार **मासेना** यास फौजेचा मुख्य अधिकार देऊन आपण परत जाण्यास निघाला. तो तारीख २ जुलई सन १८०० या दिव-शीं **पारिस** येथें पोहोंचला.

दोन अडीच महिन्यांत एवढालें पराक्रम **नापोलियन** यानें केले हें पाहून **फ्रान्स** देशांतील लोकांस मोठें आश्चर्य वाटलें. तो परत आलांच पारिस शहरांत लोक आनंदानें मोठमोठे उत्साह करूं लागले. ते शहरांत रात्रीस जिकडे तिकडे रोज दिवेलावून लखलखाट करीत. **फ्रान्स** देशाच्या रक्षण कर्त्यांचें दूरून तरी दर्शन व्हावें म्हणून हजारों लोकांची गर्दी राजवाड्या भोंवतालीं जमे. **नापोलियन** परत ये-ण्यापूर्वी **इताली** देशांत **आस्त्रियन** लोकांनीं **फ्रेंच** लोकांचा पराभव केला, अशी बातमी उठली होती, त्यामुळें लोक खिन्न झाले असतां कांहीं वेळानें स्वतः तोच येऊन खरी बातमी कळल्यामुळें लोक फारच आनंदित झाले. कारण या खोट्या बातमीवरून त्यास अधिकारा-वरून दूर करण्याविषयीं सुद्धां त्याच्या प्रतिपक्ष्यांनीं खटपट चालवि-ली होती.

मेलास याच्या सैन्याचा पराजय झाल्यावर **आस्त्रियन** लोकां-नीं तहाचें बोलणें लाविलें, तेव्हां तहार्ची कलमें सांगून व नोव्हेंबर पर्यंत लढाई बंद करण्याचें ठरवून **नापोलियन** परत आला. पाठी-मागें असें झालें कीं, तह न करण्याविषयीं **इंग्लिश** लोक **आस्त्रिया**-च्या बादशाहास आग्रह करूं लागले. **इंग्लिशां**च्या सैन्याचा अधि-कारी **लार्ड कीथ** यानें **माल्टा** बेट **फ्रेंच** लोकांपासून परत घेतल्यामुळें त्यांस जरा अवसान आलें होतें. या गोष्टीमुळें तह शेवटास जाण्या-चा संभव जरा कमी होत चालला. लढाई बंद ठेवून **नापोलियन** परत आला तेव्हां पुनः **बोर्बोन** घराण्यांतील पुरुषांनीं आपणास राज्य-पदारूढ करण्याविषयीं **नापोलियन** यापाशीं बोलणें चालविलेंच होतें. पुढें जो अठरावा **लुई** नांवाचा राजा झाला, त्यानें **नापोलियन** याम

असें गुप्त पत्र पाठविलें कीं, 'माझें हक्काचें राज्यपद मला दे
तुझी आळस करितां, कदाचित् आलेला प्रसंग तुझी घालवाल ह
मला धाक वाटतो. मजशिवाय तुलांस **फ्रान्स** देश सुखी करतां
णार नाहीं. तसेंच मलाही तुलांशिवाय **फ्रान्स** देशाचें हित करि
येणार नाहीं. यासाठीं जेणेकरून मोठेमोठे अधिकार व मानमर्या
दान होऊन तुझी व तुमचे मित्र संतुष्ट व्हाल, तें मनांत आणू
त्वरा करा.'

या पत्रावर **नापोलियन** यानें असें उत्तर पाठविलें कीं, 'महा
राजांचें पत्र मला पोहोंचलें. तुमची व तुमच्या कुटुंबाची दुर्दशा
पाहून मला मनापासून फार वाईट वाटतें. **फ्रान्स** देशांत पाय ठेव
ण्याची आतां तुझी आशा सोडा. पांच लक्ष मर्दी तुडविल्याशिवाय
तुलांस असें करितां येणार नाहीं. बाकी माझ्या आटोक्यांत अ
तेवढें करून आपली व्यवस्था नीट करण्यास व मागील दुःखें आपण
विसरावीं असें करण्यास शक्य असेल तर मी यत्न करीन.'

दुसऱ्या एका राजघरांण्यांतील मनुष्यानें असें केलें कीं, **नापो
लियन** यास वश करून आपलें काम साधण्यास एक सुंदर स्त्री पाठ
विली. **जोसेफाईन** हिच्याशीं संधान बांधून तिनें राजवाड्यांत
गुप्त प्रवेश केला. परंतु ती कशाकरितां आली, हें **नापोलियन**
याम कळतांच त्यानें तिला एकदम निघून जाण्यास हुकूम केला!

इकडे **नापोलियन** याचा राजपद धारण करण्याविषयीं वेग
आहे असें दिसूं लागल्यापासून त्यास पुष्कळ लोक प्रतिकूळ झाले
होते. नवीन राजा होऊं इच्छिणाऱ्याचा वधकरणें हें पुण्यकर्म
आहे, असें **जाकोबिन** नांवाच्या इटलींतले लोक प्रसंग आला म्हणजे
कित्येक लोकांच्या मनांत भरवीत असत. कित्येक लोकांनीं तर
जसा प्राचीन काळीं **रोमन** लोकांनीं **सीझराचा** सभास्थानीं व
केला, तसा **नापोलियन** याचा ही नाटकगृहांत वध करावा. म्ह
करू केला होता

लोकांनीं **नापोलियन** यास मारण्याची दुसरी युक्ति केली. **नापो-**
लियन ज्या रस्त्यानें नाटकगृहांत जावयाचा होता, त्या रस्त्यावर
कांहीं ठिकाणीं जमिनींत दारू भरून ठेवून निकडून जात असतां त्याम
उडवून द्यावा असा बेत केला. तारीख १० **आक्टोबर** या दिवशीं
त्या दुष्टांनीं आपला बेत तडीस नेण्याचा निश्चय केला. त्या दिवशीं
नापोलियन नाटकास जाणार अशी वातमी होती. दिवसास फार
श्रम करून थकल्यामुळें **नापोलियन** त्या दिवशीं नाटकास जाणार
नव्हता, परंतु **जोसेफाईन** हिचा फार आग्रह पडल्यामुळें गाडींत ब-
सला. गाडींत वसल्यावर त्यास झोंप लागली. नेमिलेल्या ठिकाणीं
गाडी जातांच दुष्टांनीं तें घोर कृत्य करण्यास योजना केलेल्या मनुष्या-
नें वत्ती लाविली. त्याक्षणींच फार्‌दिशीं मोठा विलक्षण अवाज
झाला. अवाज होतांच **नापोलियन** जागा झाला. त्यानें गाडी
फार जलदीनें हांकण्यास सांगितलें. जर गाडी पुढें गेली नसती तर
दुष्टांचा उद्देश सिद्धीस गेला असता. दारू उडाल्यामुळें वीस मनुष्यें
ठार मरलीं. चेपन्न जखमी झालीं. आणि रस्त्याच्या दोन्ही वाजू-
कडील खिडक्या वगैरे फुटून पुष्कळ नाश झाला. एका पळानें **ना-**
पोलियन एवढ्या अनर्थांतून सुटला! दैवाची गति विलक्षण आहे.
हा अनर्थ ऐकून सर्व लोक **जाकोबिन्** लोकांचा फारच द्वेष करूं ला-
गले. कित्येकांस देहांत शिक्षा झाली. कित्येकांस देशांतून हांकून
लाविलें. या अनर्थांतून सुटल्यामुळें **नापोलियन** लोकांस अधिकच
प्रिय झाला.

या प्रमाणें लोकांच्या मनांची स्थिति असतां **नापोलियन** का-
यदेकानू वगैरे सर्व गोष्टी अशा युक्तीनें करूं लागला कीं, त्यांमुळें सर्व
अधिकार आपल्या हातांत यावा. यांपैकीं एक कायदा असा होता
कीं, त्याच्या योगानें **नापोलियन** यास पाहिजे त्या मनुष्यास राज्यद्रो-
हाबद्दल ठरवून देशांतून घालवून देतां यावें. तसेंच फौजदारीखात्याचा मु-
ख्य गत रीतीनें चौकशी असे; त्यामुळें
लोकांस धाक वाटे.

वरील मरणाचा प्रसंग टळल्यानंतर कांहीं दिवसांनीं एक पुस्तक प्रसि
झालें, त्यांत **सीझर, क्रामवेल्**, आणि **नापोलियन**, यांची तुलना क
रून **नापोलियन** हा राज्यपदारूढ होण्यास योग्य आहे असें सुचवि
लें होतें. **नापोलियन** याच्या सर्व मित्रांनीं त्यास सांगितलें कीं. य
वेळेस असें पुस्तक प्रसिद्ध झालें यापासून आपली हानि आहे. तेव्
फोके यास बोलावून असें पुस्तक प्रसिद्ध करूं देण्याबद्दल **नापोलियन**
त्यास पुष्कळ रागें भरला, तेव्हां **फोके** म्हणाला, तुमचा भाऊ **लुशिअन**
याचा यांत संबंध आहे, असें कळल्यावरून मीं या कामाकडे लक्ष्य
रविलें नाहीं. यावर **नापोलियन** म्हणाला, **लुशिअन** यास पकडू
तुरुंगांत कां ठेविलें नाहीं? असें म्हणून तो रागानें चालता झाल
फोके यानें **नापोलियन** याचा खासगी कारभारी **बोरीन** या
कानांत सांगितलें कीं, पुस्तक लिहिणारास शिक्षा कशी करावी? लु
शिअन यानें मला हस्तलेख दाखविला, त्यावर **नापोलियन** या
आपल्या हातानें पुष्कळ ठिकाणीं खोडून शुद्ध केलें होतें. लुशि
अन यास हें वर्तमान कळलें तेव्हां तो **नापोलियन** याकडे गेला.
आणि आपणास तोंडघशीं देण्याबद्दल त्यास दोष देऊं लागला, तेव्हां
नापोलियन म्हणाला, याचा अपराध तुझ्याकडे आहे. लिहिणारा
चा पत्ता लागूं द्यावयाचा नाहीं, हें तुझें काम होतें! **फोके** यानें अ
पलें चातुर्य दाखविलें, हें तुला विशेष बाधक झालें. नंतर **लुशिअन**
हा **नापोलियन** याच्या हातारवालीं मोठी जागा होती ती सोडून
फ्रान्स देशाचा वकील या नात्यानें **स्पेन** देशांत गेला.

फ्रान्स देशांत अशा गोष्टी चालल्या होत्या यामुळें **आस्त्रिया**च्या
बादशाहा तह ठरविण्याचें लांबणीवर टाकीत होता. लढाई बंद हो
ऊन पांच महिने झाले तरी तह ठरेना, तेव्हां **नापोलियन** यानें पुन्हा
लढाई सुरू करण्यास वेगळाल्या ठिकाणच्या सर्व सैन्यांच्या अधिकाऱ्
ज्यांस हुकूम केला; त्यामुळें पुष्कळ ठिकाणीं मोठालीं युद्धें होऊन जेथें
तेथें **आस्त्रियन** लोकांचा पराभव होत चालला. सर्व ठिकाणीं परा
जय करून वेगळाल्या तीन टोळ्यांनीं तीन बाजूंनीं **आस्त्रिया**च्या

राजधानीवर चाल करण्याचा **नापोलियन** यानें बेत केला, तेव्हां
दशाहा फार घाबरला. त्यानें आपल्या संमतीशिवाय तह करण्या
पर्यी **इंग्लंद**चा आग्रह होता तो सोडून तहाचें बोलणें लावून तह
ग्यावर तारीख ९ फेब्रुआरी सन १८०१ रोजीं सही केली. या तहा
बादशाहास पुष्कळ अपमानकारक गोष्टी कबूल कराव्या लागल्या.
यामणें **फ्रेंच** लोकांचा जय झाला हें ऐकून **इंग्लंद**च्या राजाचा मु
ख्य प्रधान **पिट्** याच्या मनास मोठा धक्का बसला. **फ्रेंच** लोकांचा
पराभव करण्याविषयीं त्याची निराशा झाली. पुढें **यूरोप**खंडाचा
नकाशा होता त्याकडे पाहून जवळ एक मनुष्य होता त्यास तो म्ह
ला, तो नकाशा गुंडाळून ठेवा, आतां त्याची कांहीं गरज नाहीं.

आस्त्रियाशीं तह झाल्यामुळें एकट्या **इंग्लंदा**चा मात्र **फ्रान्स**
देशाशीं शत्रुभाव राहिला. कारण ज्या दुसऱ्या राजांनीं पूर्वी **फ्रा**
न्स देशाशीं लढाई करण्यास **इंग्लंदा**शीं तह केला होता, त्या सर्वांनीं
आपलें आंग काढून घेतलें. पूर्वीच्या लढाईंत दहाहजार **रशियन**
लोक कैद केले होते, ते सोडून रशियाचा बादशाहा **पाल** याशीं **नापो**
लियन यानें स्नेह केला. **नेपल्स्ची** राणी **आस्त्रिया**च्या राज
ची बहीण होती. पूर्वी फ्रेंच लोकांनीं **नेपल्स्चें** राज्य जिंकिले
होतें तें **नापोलियन मिसर** देशांत गेल्यावर **इंग्लिशां**चा सेनापति
नेल्सन यानें **फ्रेंच** लोकांपासून घेऊन ज्याचें त्याला दिलें होतें.
तें जाण्याची वेळ आली तेव्हां **नेपल्स्**च्या राणीनें **रशिया**च्या बा
दशाहास **नापोलियन** यापाशीं मध्यस्थी करून भीड खर्चण्यास
सांगितलें. त्याच्या मर्जीकरितां **नापोलियन** यानें **नेपल्स्** परत
घेतलें नाहीं. आपल्या राज्यपद स्वीकारण्याच्या पुढील उद्देशास
पोपाचें साहाय्य अवश्य पाहिजे असें मनांत आणून त्याचा सर्व
प्रकारें त्याकडे ठेविला. **पोपा**चें महत्व वाढविण्याकडे **नापो**
लियन याची प्रवृत्ति झाली, हें पाहून **फ्रेंच** लोकांस व इतर **प्रशिया**,
डेन्मार्क, स्वीदन, वगैरे यूरोपांतल्या देशांतील लोकांस आश्चर्य
वाटलें.

नापोलियन.

यातमाणें सर्व लहान मोठ्या राजांस आपल्याकडे वळवून सर्वांमळून इंग्लंदचा पराभव करावयाचा असा **नापोलियन** यानें केला. हें एक या (एकूणविसाव्या) शतकाच्या प्रारंभी लदावर महत्संकट आलें होतें. हा प्रसंग पुष्कळ कारणांनीं बिट झाला होता. पीक चांगलें न आल्यामुळें देशांत महर्गता झाली होती. राजाचा अनुभवी राज्यकार्यधुरंधर प्रधान जो पिट् त्यानें राजीनामा नुकताच दिला होता. असा कठिण प्रसंग असतां शत्रूंस मस्त न होतां कोणाच्या मदतीशिवाय प्रबल शत्रूंशीं टक्कर देण्याचा इंग्लिश लोकांनीं निश्चय केला. हें त्यांच्या स्वदेशप्रीतीचें उत्तम उदाहरण होय. अशी स्वदेशप्रीति त्या लोकांच्या आंगीं असल्यावर त्यांचा देश वैभवास कां न चढावा ?

आपल्या देशाचा पराभव करण्यास तयार झालेलीं सैन्यांचीं गलबतें एकत्र होण्यापूर्वीच त्यांवर हल्ला करावा या हेतूनें **नेलसन** यानें आपल्या सैन्याचीं गलबतें **बाल्तिक** समुद्रांत नेऊन तेथें वेगळ्या ठिकाणीं **देन्मार्क**, **स्वीदन**, वगैरे देशांच्या फौजांचा पराभव करून टाकिला. इकडे **रशियाचे** बादशाहास **सेंतपितर्सबर्ग** येथें मारकऱ्यांनीं मारिलें, त्यामुळें **नापोलियन** यानें रचलेला सर्व व्यूह फुकट गेला

नापोलियन यानें **मिसर** देशाची राज्यव्यवस्था पाहण्यास क्लेबर यास ठेविलें होतें. हा मोठा चतुर पुरुष होता. उत्तम रीतीनें राज्य केल्यामुळें तेथील लोक त्यास न्यायी **सुलतान** म्हणत. परंतु त्यास अकस्मात् कोणीं मारिलें त्यामुळें त्याचें काम करण्यास कोणी चतुर पुरुष राहिला नाहीं. त्यामुळें **इंग्लिश** लोकांचा सरदार आबरक्रांबी यानें **मिसर** देश **फ्रेंच** लोकांपासून घेतला.

मिसर देशाची हकीकत ऐकून **नापोलियन** म्हणाला, इंग्लंदावर समूर चालून जाण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. लागलीच त्यानें या कामाकरितां एक लाख फौज तयार केली. इंग्लिश लोकांनींही खुब कंबरकोट तयारी केली. **बाल्तिक** समुद्राकडील

इंग्लिश लोकांचा जय ऐकून **नापोलियन** यास लढाई न होतां तह होईल तर बरें असें वाटूं लागलें होतें. तसेंच **आस्त्रियाशीं** तह करावयाचा होता. यामुळें तहाचें बोलणें सुरू होऊन पुष्कळ जिकीरीची वाटाघाट होऊन शेवटीं तारीख १० आक्टोबर सन १८०२ रोजीं ह्लनाम्यावर **एमिन्स्** येथें सह्या झाल्या. या तहास **एमिन्स्** येथील तह असें ह्मणतात. हा तह इतिहासांत प्रसिद्ध आहे. तहाचे वेळीं **माल्टा** बेटाविषयीं पुष्कळ जिकीर पडली होती, व पुढें तंटाही त्या बेटावरूनच उत्पन्न झाला.

भाग १० वा

एमिन्स्, येथील तह फार दिवस कायम राहील असें दोन्हीही राष्ट्रांतील लोकांस वाटत नव्हतें, तथापि तो झाल्यामुळें सर्वांस आनंद झाला. दहा वर्षें **इंग्लिश** लोकांस **यूरोपखंडांत** प्रवास करण्याची बंदी झाली होती ती मोडल्यामुळें राज्यक्रांतीच्या घालमेलीपासून घडलेल्या नवीन गोष्टी डोळ्यांनीं पाहण्याकरितां हजारों लोक **फ्रान्स** देशांत गेले. मुद्दाम प्रतापी **नापोलियन** यास पाहण्यास मोठमोठे श्रीमान् राज्यकारस्थानी पुरुष गेले. यांपैकीं प्रसिद्ध वक्ता **फॉक्स** यांचा **नापोलियन** यानें फार सत्कार केला. इतर लोकांचाही **फ्रान्स** देशांतील लोक चांगला सत्कार करीत. **एमिन्स्**, येथील तह झाल्यावर **नापोलियन** यानें **फ्रान्स** देशांतील राज्यव्यवस्था सुधारण्यास जे लोकोत्तर श्रम केले, ते पाहून सर्वांस आश्चर्य वाटूं लागलें. **नापोलियन** याची श्रम करण्याची शक्ति विलक्षण होती. कित्येक

दिवस झोंप घेतल्याशिवाय तो रात्रंदिवस सारखें काम करीत असे. त्यामुळें त्याजपाशीं कोणी खासगी कारकून फार दिवस ठरत नाहीं. झाला. **बोरीन** व तो यकल्यावर नेमिलेले कित्येक दुसरे कारकून आजारी पडले. **नापोलियन** यांचीं मोठमोठीं कामें गुप्त असल्यामुळें हाताखालीं कोणी दुसरा कारकून घेतल्याशिवाय त्यांस काम करावें लागे. शिवाय **नापोलियन** कोणत्यावेळेस काम पाहण्यास हाक मारील कोण जाणे, त्या धाकामुळें त्याच्या हातारवालच्या कांस नेहमीं तयार असावें लागे. कित्येक वेळांतर त्यांस कांहीं वसपर्यंत झोंप घेण्यास सांपडत नसे. एके प्रसंगीं असें झालें पुष्कळ श्रम केल्यामुळें कारकुनास जरा झोंप लागली. कांहीं झाल्यावर उठून पाहतो तों पत्र अर्धें लिहून पडलें होतें तें **नापोलियन** आपण स्वतः लिहून पुरें करीत होता. भलत्याच वेळेस मनुष्य भूक लागत नाहीं, त्याप्रमाणें झोंपही पाहिजे तेव्हां येणें आपल्या धीन नाहीं. पण **नापोलियन** याची संवय कांहीं विलक्षण पाहिजे तेव्हां एकदम झोंपीं जाण्याचें त्याच्या स्वाधीन असे. एकाद्या विषयांत मन गुंतलें असलें म्हणजे तें एकदम दुसऱ्या शिरत नाहीं, पण **नापोलियन** याच्या मनाची विलक्षण शक्ति पाहिजे त्या गहन विषयांत मन गुंतलें असलें तरी तो विषय तितक्या ठेवून तो दुसऱ्या तशाच गहन विषयावर विचार करूं लागे. तो णे, माझें मन खणांच्या पेटीसारखें आहे. एक खण लावला लागलाच दुसरा उघडावा. त्याप्रमाणें एक विषय ठेवून दुसरा तरी माझ्या मनांत अनेक कल्पनातरंग येऊन धोंटाळा होत श्रम करण्याविषयीं तर त्याची हद्द असे. तो म्हणे, मी किती चालत जाईन, आणि माझी दृष्टि किती दूर पोहोंचेल, या मर्यादा मला ठाऊक आहे, परंतु मी किती उद्योग करीन याची सीमा कळत नाहीं; माझे कित्येक कामदार यामुळें मरून गेले.

घरगुती कामांत देखील त्याची नजर कडक असे. घरखर्च हिशेबसुद्धां तो बारकाईनें तपासून पाही. एका प्रसंगीं एका राजा-

ह्याची रोपनाई केली होती तिला खर्च फार लागला असें त्यास वाटलें. त्यामुळें वाद्यांत फिरत असतां एका पडद्याचा कलावतूचा गोंडा तोडून त्यानें पदरीं आपल्या खिशांत घातला. हें पाहून वरोबरच्या दुसऱ्यास आश्चर्य वाटलें. पुढें बाजारांतून तसला दुसरा गोंडा विकत आणून दोहोंची किंमत ताडून पाहून तूं मला जास्त खर्च सांगितला, असें त्यानें रोशनाई करणाऱ्यास सांगितलें.

एक ग्रंथकार म्हणतो कीं, **नापोलियन** याच्या घरगुती खर्चाच्या अदमासाचा खर्डा कोणीं तयार केलेला व त्यावर त्यानें आपल्या हातानें योग्य सूचना लिहिलेला असा म्यां पाहिला. त्यांत त्यानें खर्डा तयार करणाऱ्याच्या चुका काढून योजिलेल्या कामांस खर्ड्यांत सुचविलेल्या पैशाचा एक तृतीयांश पुरेल, असें दाखवलें होतें. असें होतें तरी **नापोलियन** अगदीं कृपण नव्हता. तो मोठा उदार असे. आपल्या इष्टमित्रांस त्यानें विपुल द्रव्य दिलें. कलाकौशल्यास उत्तेजन देण्याकरितां तो पुष्कळ वस्तु खरेदी करी. त्याच्याजवळ चाकरमाणसेंही फार होतीं.

तो आपणाविषयीं लोकांचें काय मत आहे, हें पाहण्याकरतां मोंग घेऊन कोणास बरोबर घेऊन बाजारांत वगैरे जाई, आणि आपल्याविषयींच लोकांस अभिप्राय विचारी. एके प्रसंगीं त्यानें एका दुकानदाराजवळ आपली खूब निंदा केली. ती ऐकून तो दुकानदार फार रागावला. त्यानें यास दुकानांतून हांकून लाविलें. यामुळें **नापोलियन** यास राग न येतां मोठा आनंद झाला. **नापोलियन** यानें ज्या सुधारणा केल्या त्यांपैकीं कांहीं येथें लिहितों.

राज्यक्रांतीच्या वेळेस जुलुमास त्रासून जे लोक परागंदा झाले, ते नवीन राज्यव्यवस्थेस कबूल असून प्रजाधर्मानें वागतील तर त्यांनीं परत येऊन खुशाल रहावें; राज्यक्रांतीच्या वेळेस हरण केलेली त्यांची मालमत्ता कारभाऱ्यांजवळ असेल ती ज्यांची त्यांस परत मिळेल; असा जाहीरनामा प्रसिद्ध केला. यागोष्टीमुळें पुष्कळ लोक स्वदेशीं परत येऊन स्वस्थ राहिले. राजाच्या वतीनें बंड करणारे,

परदेशच्या फौजेंत चाकरी करणारे, राजाच्या पदरचे, वगैरे मिळू पांचशें लोकांस मात्र पुनः बरखेडा होऊंनये म्हणून हा हक्क दिला न व्हता. **फ्रान्स** देशांतील तुरुंगांत पुष्कळ अव्यवस्था होत्या; त्या सर्व किल्येक तुरुंग स्वतः तपासून त्यानें नाहींतशा केल्या.

नापोलियन यानें रोमनक्याथलिक धर्माची पुनः स्थापना केली. त्यावेळेस **फ्रान्स** देशांत इतकें नास्तिक्य माजलें होतें कीं, तेथें बैबलाचें (ख्रिस्तिशास्त्राचें) पुस्तकसुद्धां विकत मिळत नसे. या कामास त्यामुळेच अडथळे आले. कारण पुष्कळ लोक या गोष्टीस प्रतिकूळ होते. एके दिवशीं या गोष्टीचा वादविवाद होत असतां **नापोलियन** म्हणाला, ख्रिस्तिधर्मावर माझा विश्वास नाहीं; परंतु धर्माचें तत्व मनुष्याच्या अंतःकरणांतून समूळ काढतां यावयाचें नाहीं. व धर्माशिवाय लोकांस सुखी करितां येणार नाहीं. तो म्हणे प्रत्येक गोष्टीवरून ईश्वराचें अस्तित्व सिद्ध होतें, यांत संशय नाहीं. परंतु मी कोठून आलों, मी काय आहें, मी कोठें जाणार, हें माझ्या समजाच्या पलीकडे आहे. ख्रिस्तिधर्मावरून **नापोलियन** याचा विश्वास उडण्यास धर्माधिकाऱ्यांचें दुराचरणही कांहीं अंशीं कारण होय. तो म्हणे. जे आम्हांस धर्मोपदेश करणारे त्यांच्या मुखावाटे निघालेले भलभलते शब्द ऐकिल्यावर, व त्यांचीं अन्याययुक्त आचरणें पाहिल्यावर धर्मा विषयीं आमची खात्री कशी व्हावी ? माझ्या भोंवतालीं पुष्कळ पांढरे लोक आहेत, ते वारंवार म्हणतात कीं, इहलोकच्या सुखावर आमची दृष्टि नाहीं. असें असून त्यांच्या तडाक्यांत कांहीं आलें तरी त्याचा अपहार करण्यास ते मागें पुढें पाहत नाहींत. **नापोलियन** याच्या वरील भाषणांत पुष्कळ तथ्यांश आहे. केवळ ख्रिस्ती धर्मांतीलच नव्हे परंतु सर्व धर्मांतील उपदेशकांनीं त्यापासून बोध घेण्यासारखा आहे विद्वागीकरितां कथा करणाऱ्यानें जीव तोडून संसार क्षणभंगुर आहे म्हणून सांगितलें, तरी **तुकाराम** बाबाप्रमाणें त्याच्यानें लोकांच्या मनांत वैराग्य उत्पन्न करवेल काय ? एके समयीं रात्रीची वेळ असून आकाश निरभ्र सल्यामुळें आकाशांत असंख्य तारे चमकत

होते, तिकडे पाहून **नापोलियन** म्हणाला, हें सर्व कोणीं केलें ? गाल्या रविवारीं मी एकटा येथें फिरत होतों त्यावेळेस देवळांतील घंटेचा आवाज माझ्या कानीं पडतांच माझें अंतःकरण सद्गदित झालें. पूर्वीच्या स्थितीची प्रतिमा माझ्या मनांत उभी राहिली. जर माझी ही अवस्था तर इतर लोकांची काय असेल ? हजारों लोकांची इच्छा पाहून मीं पुनः धर्मस्थापना केली आहे. व्हालने म्हणून एक नास्तिक मनुष्य जवळ होता; तो म्हणाला, असें आहे तर मग उद्यां **बोर्बोन** वंशाचें राजघराणें परत आणा. **नापोलियन** यानें पुनः या गृहस्थाजवळ भाषण केलें नाहीं.

धर्मस्थापना करण्याचें ठरून **पोपाशीं** तह झाला, त्यांत **नापोलियन** याच्या पुढील उद्देशास अनुकूळ अशा पुष्कळ गोष्टी होत्या. धर्माध्यक्ष वगैरे नेमणें किंवा दूर करणें तें मुख्य काम **नापोलियन** याच्या संमतानें करावें, प्रार्थनेमध्यें मुख्य कारभाऱ्याचें नांव आणावें, या सर्व गोष्टी राजसत्ताकराज्याचीं चिन्हें आहेत असें लोकांस दिसूं लागलें. निरुपाय होऊन **पोपास**ही कित्येक गोष्टी कबूल कराव्या लागल्या. पूर्वी राजाचें नांव प्रार्थनेंत निघत असे त्याप्रमाणें **नापोलियन** याचें निघूं लागलें. **नान्त्रिदेम** या देवळांत **नापोलियन** मोठ्या राजकीय थाटानें गेला; तेव्हां पूर्वी राजास मान देत असत त्याप्रमाणें त्यास धर्माध्यक्षांनीं मान दिला. सोळावा लुई यास राज्यावर बसविलें त्यावेळेस ज्या पाद्र्यानें प्रार्थना केली त्यानेंच **नापोलियन** याच्या नावानें प्रार्थना केली. सैन्यांतील या गोष्टी न आवडणाऱ्या कित्येक कामदारांचे मनांत देवळांत जावयाचें नव्हतें; परंतु **वर्दिअर** यानें कांहीं निमित्तानें सर्वांस आपल्या घरीं बोलावणें केलें, व तेथें मंडळी जमल्यावर चला देवळांत जाऊं, असें तो म्हणाला, तेव्हां त्यांस नाहीं म्हणतां येईना. समारंभ आटोपल्यावर **नापोलियन** किंचित् हास्य करून एका गृहस्थास म्हणाला, पूर्वीप्रमाणें गोष्टी होऊं लागल्या, नाहीं बरें ? तो गृहस्थ म्हणला, सर्व होईल, परंतु ज्या गोष्टी तुम्ही पुनः करणार त्या नाहींतशा करण्याकरितां वीसलाख **फ्रेंच** लोक

मेले तेमात्र पुनः येणार नाहींत. याप्रकारचें भाषण करणाऱ्या कित्येक कामदारांस पुढें पश्चात्तापही करावा लागला. याशिवाय लोकांस पदव्या देणें वगैरे पुष्कळ गोष्टी राज्यक्रांतीच्या वेळेस बंद झालेल्या पुनः सुरू झाल्या. चाकरमाणसें, बोलणें चालणें, वगैरे राजवाड्यांतील व्यवस्था पूर्वीच्या राजघराण्याप्रमाणें होऊं लागली. **नापोलियन** फारसा राजकीय डौलानें वागत नसे, तरी प्रसंग पडला म्हणजे भाषण करण्याची त्याच्या आंगांत अशी खुबी होती कीं, त्यानें ऐकणाऱ्यांचें मन वळवून घ्यावेंच.

देशांत सार्वजनिक विद्यावृद्धीविषयीं **नापोलियन** यानें स्तुत्य उद्योग केला, त्यापासून सर्वांस मोठा आनंद झाला. विद्यालयांचा कारभार पाद्री लोकांकडे असे. नवीन रीतीप्रमाणें जिकडे तिकडे शाळा स्थापन होऊन देशांत अनेक विद्वान् उत्पन्न झाले. या कामाकरितां त्यानें सहा हजार सरकारी पगारी विद्यार्थ्यांच्या जागा ठेविल्या होत्या. शाळांतील विद्यार्थी भलभलत्या मौजा करीत ती चाल अगदीं मोडून उत्तम व्यावस्था केली. लोकांचीं मुलें शिकविण्याच्या सरकारी शाळा होत्या त्यांतील विद्यार्थ्यांनीं कपडे वगैरे सामान आपलें आपण तयार करावें असें ठरविलें त्याप्रमाणेंच बडे लोकांच्या मुलींस शिकविण्याच्या शाळा होत्या त्यांत निर्वाहास लागणारे सर्व पदार्थ करण्यास त्यांस शिकवून पाचांचे डामडौल असतील ते बंद करून, या स्त्रिया आपला करण्यास कुशल होतील अशी तजवीज मोठ्या प्रयत्नानें त्यानें केली.

सार्वजनिक इमारती, रस्ते, कालवे, पूल, पदार्थसंग्रहालयें, वगैरे मोठ्या उपयोगार्थी असंख्य कामें योजून **नापोलियन** फार थोड्या वेळांत तडीस नेलीं. यामुळें लोकांस मोठा फायदा होऊन जिकडे तिकडे त्याची वाखाणणी झाली. त्याच्या आश्चर्य चातुर्य पाहून मोठमोठ्या शहाण्या लोकांससुद्धां मोठें आश्चर्य वाटे त्यानें **पारिस** शहरांत फार सुधारणा करून त्यास फारच शोभित केलें.

फ्रान्स देशांतील कायदे सुधारण्याविषयीं **नापोलियन** यानें जे अमर्याद श्रम केले, त्यामुळें त्याच्या नांवास लोक चिरकाल माना डो-लवितील. प्राचीन काळच्या कायद्यांत फारच अव्यवस्था होती. सर्व कायदे जमा करून सर्वांस लागू असें एक कायद्याचें पुस्तक त-यार करण्यास त्यानें मोठमोठ्या विद्वान् लोकांची मंडळी नेमिली होती. तो स्वतः आपण देखील त्या मंडळींत वादविवाद करण्यास बसे. या वेळेस त्याची लोकोत्तर बुद्धिमत्ता दिसून आली. विषय प्रतिपादन क-रणांना मोटमोठ्या कायद्यांत निष्णात अशा पंडितांस देखील सुचाव-याचे नाहींत असे विचार तो प्रगट करूं लागला तेव्हां त्या मंडळीस महदाश्चर्य वाटलें. **फ्रान्स** देशांतील मुख्य मुख्य पंडितांच्या मदतीनें **नापोलियन** यानें तयार केलेलें कायद्याचें पुस्तक '**नापोलियनकों-ड**' या नांवानें अद्याप **फ्रान्स** देशांत चालतें. **नापोलियन** यानें तयार केलेलें कायद्याचें पुस्तक ही केवळ **फ्रान्स** देशासच नाहीं तर सर्व **यूरोपखण्डास** देखील मोठी अमोलिक चीज मिळाली. या ग्रंथाव-रून पुष्कळ देशांतील कायदे सुधारले. मंडळींत वादविवाद करतांना **नापोलियन** अगदीं शांत असे. कोणी आपणाविरुद्ध बोलण्यास सुरुवात लागला म्हणजे तो म्हणे तुम्हांला काय बोलावयाचें असेल तें धैर्याने मन मोकळें करून बोला. येथें परकी कोणी नाहीं.

नापोलियन म्हणे, कायद्यांचीं मूलतत्वें सुलभ न करितां वकील लोक तीं उलटीं घोटाळ्याचीं व कठिण करितात. गणितप्रमाणें का-यद्यांचे सिद्धांत निर्णीत करण्याची त्याची इच्छा असे, परंतु त्यास असें समजून आलें कीं, वकिलांच्यानें ही गोष्ट होणें नाहीं. तथापि ज्यास लिहितां वाचितां येतें, त्यास समजण्यासारख्या सोप्या भाषेनें कायदे तयार करण्यास त्यानें पुष्कळ यत्न केला. असें असून काय-द्यांचा संग्रह तयार झाल्यावर त्यावर वकील लोक टीका ग्रंथ लिहूं लागले. हें ऐकून त्यास फार वाईट वाटलें.

एकादे वेळस त्याच्या मताविरुद्ध बहुमत पडलें म्हणजे तो म्हणे, धिर मला वाटतें माझीच चूक असली पाहिजे. विषयामध्यें त्याचें मन

किती गढून जाई याचें एक चांगलें उदाहरण आहे. तो बोलतां बोल
जवळ कोणी बसलेला असे, त्याची तपकिरीची डबी मागे; आणि
पकीर ओढून डबी खिशांत घाली. एके दिवशीं घरीं आल्यावर जो
सेफाईन हिला याप्रमाणें खिशांत घातलेल्या दहावारा डब्या सांप
ल्या, तेव्हां ती म्हणाली, आतां तुम्हांला डब्यांचा व्यापार करावयास
कीं काय ? ज्या गृहस्थांच्या डब्या आणल्या होत्या त्यांस
लियन यानें अधिक किंमतीच्या डब्या पाठवून दिल्या.
यद्यांच्या संग्रहाचें काम चाललें होतें त्याबद्दल इतके विलक्षण
श्रम करी तरी **नापोलियन** श्रम हरण्याकरितां साखरपाणी
वा लिंबाचें शरबत यांशिवाय दारू वगैरे कांहीं घेत नसे. या
यद्यांचा संग्रहाचा **नापोलियन** याससुद्धां मोठा योग्य अभिमान
तो म्हणे, यामुळें माझें नांव चिरकाळ राहील. ही त्याची आशा
रिपूर्ण झाली. हें काम पूर्ण झाल्यावर शरीर व मालमत्ता
राहून श्रीमंत व गरीब यांस सारखा न्याय मिळूं लागला.

याप्रमाणें **नापोलियन फ्रान्स** देशाची स्थिति सुधारीत होत
तरी आपलें माहात्म्य वाढविण्याविषयीं त्याचा सतत प्रयत्न चालू
ताच. **आस्त्रिया**च्या अमलाचें जूं फेंकून दिलेल्या **इतालि** देशांति
कांहीं प्रांतांतील लोकांस त्यानें लोकसत्ताकराज्य स्थापून देऊन त
राज्यव्यवस्था करून दिली होती. तेथील कित्येक लोकांच्या अ
कूलतेनें **नापोलियन** यास लोकांच्या मुखत्यारांच्या सभेचा अध्य
नेमिलें. ही साडेचारशें मुखत्यारांची सभा नारीख २ जान्युआरी
न १८०२ इसवी रोजीं **लिआन्स्** शहरीं **नापोलियन** यास
कार देण्यास भरली होती. त्या वेळेस **नापोलियन** यानें इतालि
भाषेंत उत्तम भाषण केलें. वरील सभेचा अध्यक्षपणा मिळाल्याम
आल्प्स् पर्वतापलीकडील मुलखाचा सर्व अधिकार त्याच्या हा
आला.

वर सांगितलेला अधिकार मिळाल्यावर **फ्रान्स** देशांतील प्रतिनि
धींच्या सभेंत **नापोलियन** याच्या पक्षाचे लोक होते त्यांपैकीं ए

पृष्ठस्थानें अशी सूचना केली कीं, फ्रेंच लोकांची कृतज्ञता दाखविण्याकरितां **नापोलियन** यास आणखी कांहीं तरी मान दिला पाहिजे. त्यावरून हल्लींची मुदत संपल्यावर आणखी दहा वर्षें **नापोलियन** यास मुख्य कारभारी नेमावें असें सभेंत ठरलें. एवढा मान दिल्याबद्दल आभार प्रदर्शित करून **नापोलियन** यानें सभेस असें कळविलें कीं, लोकांच्या संमतीशिवाय मी ही गोष्ट कबूल करणार नाहीं. यावरून त्याच्या हातारवालच्या कामदारांनीं लोकांची संमति घेण्यास पसंत तयार केलीं; त्यांत दहा वर्षें हे शब्द गाळून **नापोलियन** आहे तोपर्यंत त्यास **फ्रान्स** देशाचा मुख्य राज्यव्यवस्थापक नेमावें कीं काय असा प्रश्न लिहिला. या पत्रकावर बहुतेक सर्व लोकांचीं अनुकूल मतें पडलीं. शें दोनशें लोकांनीं मात्र संमति दिली नाहीं. कोंती यानें प्रतिकूळ मत दिलें; तेव्हां तो असें म्हणाला कीं, यामुळें ही हद्दपार होईन, हें मला ठाऊक आहे. असें होतें, तथापि **नापोलियन** यानें मोठें मन करून यावद्बल त्याचें कांहींएक नुकसान केलें नाहीं. तारीख २ माहे आगस्त सन १८०२ या दिवशीं **नापोलियन** याम **फ्रान्स** देशाचें राज्य चालविण्याचा कुलअखत्यार ताब्यांत मिळाल्याचे जाहीरनामे लागले.

राज्यक्रांतीच्यापूर्वीं बडे लोकांस पदव्या देण्याची चाल होती ती फ्रेंचसत्ताकराज्यांत सर्व लोक सारखे असावे अशा हेतूनें मोडून टाकिली होती. ती चालू करण्यास **नापोलियन** यानें यत्न केला. त्याला या कामास पुष्कळ लोक प्रतिकूळ होते. तो म्हणे, **फ्रेंच** लोकांस स्वतंत्रता व समता आवडते असें मला वाटत नाहीं. तथापि त्यांच्यामध्यें कांहीं एक बदल झाली नाहीं. ते आपल्या पूर्वजांप्रमाणें डामडौली व हलवया मनाचे होते तसे आहेत. कांहीं तरी कीर्तीचा लाभ असल्याशिवाय घर सोडून रणांगणांत कोण येईल? आज दहा वर्षांत या नव्या प्रकारापासून काय फायदा झाला? असें म्हणून त्यानें लष्करी खात्यांत नवीन पदव्या चालू केल्याच.

ताब्यांत राज्यकारभार मिळाल्यावर नवा राजवंश स्थापण्या-

ची इच्छा **नापोलियन** याच्या मनांत होती, तिचीं चिन्हें उघड दिसूं लागलीं. आपणास **जोसेफाईन** हिजपासून संतति होण्याचा आतां संभव नाहीं, असें त्यास वाटूं लागलें. त्यामुळें कायद्यांचा संग्रह करणाऱ्या मंडळीमध्यें, प्राचीनकाळीं रोमन लोकांत दत्तक घेण्याचा कायदा असे तो चालू करण्याविषयीं त्यानें पुष्कळ खटपट केली. हा कायदा असणें जरूर आहे, अशा अर्थाचीं त्यानें उत्तम कोटिक्रमानें परिपूर्ण अशीं पुष्कळ भाषणें केलीं. तो म्हणे कीं, दत्तक घेतलेला मुलगा औरसापेक्षां अधिक प्रिय असावा. आपल्या भावाचा मुलगा दत्तक घेण्याचें त्याचे मनांत होतें. कांहीं दिवसांनीं मुखत्यारांच्या सभेचा असा ठराव झाला कीं, व्यवस्थापत्र करून आपल्यामागें आपला वारस नेमण्यास **नापोलियन** यास अधिकार आहे. या गोष्टीपासून **फ्रान्स** देशांत नवीन राजवंश स्थापण्यास आरंभ झाला. आजपर्यंत सरकारी कागदांवर स्वतंत्रता, समता, लोकसत्ताकराज्य, असें लिहिण्याची वहिवाट होती ती बंद झाली. या गोष्टी लोकांच्या मुखत्यारांच्या सभेंतील पुष्कळ लोक **नापोलियन** यास अनुकूळ असल्यामुळें बहुमतानें होत; व लोकही अराजकास व झोटिंग बादशाहीस त्रासले होते; **नापोलियन** राज्य करूं लागल्यापासून शरीर व मालमत्ता यांचें संरक्षण चांगलें होऊं लागलें, यांमुळें त्यांकडे ते दुर्लक्ष करीत.

यावेळेस **नापोलियन** यानें **एमिन्स्** येथील तह होण्यापूर्वी परराष्ट्रांशीं कित्येक तह केले होते ते प्रसिद्ध केले. त्यांत **तुर्कस्थान**च्या बादशाहानें **फ्रेंच** लोकांस आपल्या देशांत व्यापार करण्याचे सर्व हक्क दिले होते. हे हक्क आजपर्यंत कोणत्याही परराष्ट्रास प्राप्त झाले नव्हते. **रशिया** व **पोर्तुगाल** देशांच्या राजांनींही कित्येक प्रांत **फ्रेंच** लोकांस दिले. त्याचप्रमाणें **स्वित्सर्लंद** देशांत लोकसत्ताकराज्यांत भांडणें चालली होतीं; त्यांत हात घालून तेथेंही **नापोलियन** यानें आपला पगडा बसविला. तेथील पुढारी लोकांस **नापोलियन** यानें असें पत्र लिहिलें कीं. 'फ्रान्सदेश मध्यें पडल्याशिवाय तुमचीं नेहमीं चाललेलीं भांडणें संपावयाचीं नाहींत. तुमच्या कामांत हात न घालण्याविषयीं माझा

निश्चय होता, परंतु तुमची दुर्दशा पाहून तो सोडणें मला भाग पडलें.' याप्रमाणें पत्र पाठवून चाळीस हजार फौज देऊन एका सरदारास त्या देशांत **नापोलियन** यानें पाठविलें. ज्या लोकांनीं बखेडा केला, त्यांस पकडून बंदींत टाकून **नापोलियन** यानें आपल्या इच्छेप्रमाणें त्यांस राज्यव्यवस्था करून दिली. सोळाहजार फौज नेहमीं तयार ठेवण्याचें ठरविलें, व आपणास **स्वित्सर्लंद** देशांतील **राज्यव्यवस्थापक** हा किताब त्यानें घेतला. हा बळजोरीनें दुसऱ्या देशाच्या कारभारांत हात घालण्याचा प्रकार गैर आहे, असें सांगण्यास **इंग्लंदा**नें वकील पाठविला. परंतु **यूरोपां**तील दुसरे राजे यावद्दल कांहीं बोलले नाहींत. **अमेरिके**तील **सेंतदोमिंगो** येथील लोक **फ्रेंच** लोकांच्या अमलाचें जूं फेंकून स्वतंत्र झाले होते. त्यांवरोबर लढण्यास **नापोलियन** यानें आपली बहीण **पालाईन** हिच्या नवऱ्याबरोबर २०००० फौज पाठविली. **फ्रेंच** लोकांनीं तें बेट कांहीं दिवस परत घेतलें. परंतु तेथें त्यांनीं फार कत्तल केली. या क्रूरतेमुळें त्यांच्या नांवास कलंक लागला. शेवटीं रोगाच्या सांतीनें पुष्कळ **फ्रेंच** लोक मेले. त्यामुळें तें बेटही त्यांच्या हातांतून गेलें.

याप्रमाणें **नापोलियन** यांचीं कृत्यें पाहून **यूरोपां**तील राजांस धाक पडत चालला. पुनः कलह होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. तुम्ही स्वतंत्र देशाच्या कारभारांत हात घालितां हें अयोग्य आहे, असें **इंग्लिश** सरकारानें कळविलें तर **नापोलियन** त्यावर एकच उत्तर करी कीं, **एमिन्स्**येथील तहाप्रमाणें तुम्ही अद्याप **माल्टा** बेट सोडून देत नाहीं; हें फार गैर आहे. एक ग्रंथकार असें म्हणतो कीं, **नापोलियन** अक्षरशः **एमिन्स्** येथील तहाप्रमाणें वागत होता. **इंग्लिशां**कडूनच प्रथम **माल्टा** बेताच्या संबंधानें तह मोडण्यास आरंभ झाला.

वरील गोष्टी चालल्या असतां **इंग्लंद** व **फ्रान्स** या देशांतील वर्तमानपत्रांत परस्परांविरुद्ध पुष्कळ मजकूर येऊं लागले. **इंग्लंदां**तील वर्तमानपत्रकर्ते **नापोलियन** याविषयीं फारच वाईट मजकूर छापूं लागले. **फ्रान्स** देशांतील वर्तमानपत्रांतही त्याप्रमाणेंच **इंग्लिश**

लोकांविषयीं अनेक वाईट मजकूर येत. आपल्या नांवास कालि
आणणारे असे खोटे मजकूर तुमच्या देशांतील वर्तमानपत्रकर्त्ते छा
पितात असें **नापोलियन** यानें **इंग्लंदां**तील प्रधानांस लिहिलें. त्
वर त्यांनीं असें उत्तर दिलें कीं, आमच्या देशांतील वर्तमानपत्रां
स्वतंत्रता आहे. आह्मांविषयींही त्यांत वाईट मजकूर येतो. क
यद्याप्रमाणें फिर्याद करणें याशिवाय आह्मांस व तुह्मांस दुसरा म
नाहीं. **पोल्तिअर** ह्मणून एक राजपक्षाचा गृहस्थ **इंग्लंदां**त रा
असे. तो **फ्रेंच** भाषेंत एक पत्र छापी. त्यांत त्यानें **नापोलिय**
यावर निंदेचा असा वर्षाव केला होता कीं, **नापोलियन** यास रा
न आवरून त्यानें त्यावर कायद्याप्रमाणें अब्रू घेतल्याबद्दल **इंग्लंदां**
फिर्याद करविली. या खटल्याची पार्लमेंत सभेंत चवकशी होऊ
पोल्तिअर दोषी ठरला. तथापि खटला चालविण्यास त्याचा
इंग्लंदांतील प्रसिद्ध विद्वान् सर जेम्स् **मॉकिंताश्** हा होता.
पोल्तिअर याच्या तर्फेनें असें उत्तम भाषण केलें कीं, अद्याप त्याचें
इंग्लंदांत पार्लमेंत सभेंत झालेल्या उत्तम भाषणांत गणना होते.
भाषणांत **मॉकिंताश्** यानें **नापोलियन** याच्या महत्त्वाकांक्षादि दो
षांचें असें विवरण केलें आहे कीं, त्यामुळें तें सर्व **यूरोपखंडां**त ही
कर प्रसिद्ध झालें. यामुळें आपल्या वर्तमानपत्रापेक्षां आपल्या
किलाच्या भाषणानें आपला उद्देश चांगला साधला, हें पाहून **पोल्तिअर**
याससुद्धां बरें वाटलें.

याप्रमाणें **इंग्लंद** व **फ्रान्स** या दोन देशांमध्यें चुरस लागून ए
मिन्स् येथील तह मोडून लौकरच लढाई सुरू होणार असें लोकांस
वाटूं लागलें होतेंच. इतक्यांत आणखी कांहीं कारणें झालीं. ना
पोलियन यानें लष्करी खात्यांतील कित्येक हुशार कामदार **इंग्लंदां**
तील बंदरांचे नकाशे घेण्यास गुप्त रीतीनें पाठविले होते. ही बातमी

* हा विद्वान् पुरुष पेशव्यांचें राज्य इंग्लिशांनीं घेतल्यावर थोड्यावर
नंतर मुंबई सरकारांत मोठ्या हुद्यावर होता. हा मोठा वक्ता असून उत्त
ग्रंथकर्ता होता.

इंग्लंदांतील प्रधानांस कळतांच त्यांनीं या कामदारांस ओळखून आ
पल्या देशीं परत पाठविलें.

इकडे आपली राजपद स्वीकारण्याची इच्छा तडीस नेण्याची
खटपट **नापोलियन** यानें चालविलीच होती. राज्याचा मुख्य वा
स **पोलंद** देशांत रहात होता. त्याशीं त्यानें असें बोलणें लाविलें
कीं, तुझी राज्यावरील सर्व हक्क सोडून बेदावा लिहून द्याल, तर तुह्मां
स **इताली** देशांत स्वतंत्रराज्य देतों. त्यावर राज्याच्या हक्कदारानें
राजकुलास योग्य असें उत्तर लिहिलें कीं, 'मी **नापोलियन** यास
त्याच्यापूर्वी झालेल्या लोकांप्रमाणें समजत नाहीं. मी त्याचें शौर्य
व युद्धकौशल्य यांची वाखाणणी करितों. त्यानें राज्यव्यवस्थेंत
जीं चांगलीं कृत्यें केलीं, त्यांबद्दल मी त्याचें कल्याण इच्छितों. त्यानें
माझ्या प्रजेचें कल्याण केलें तें माझें केलें ह्मणून मी समजतों. परंतु
तो माझे हक्क विकंत घेऊन तंटा मिटविण्यास बघत असेल तर त्या
चा समज चुकीचा आहे. माझ्या हक्कांविषयीं कोणी संशय घेईल
तर हें विचारणेंच त्याविषयीं प्रमाण आहे. मी आणि माझें कुटुंब
यांविषयीं ईश्वरानें काय योजना केली आहे, हें मला ठाऊक नाहीं.
परंतु त्याच्या इच्छेनें ज्या कुलांत मी उत्पन्न झालों, त्याच्या कर्तव्यां
विषयीं मी सर्वांशीं अज्ञान आहें असें नाहीं. ख्रिस्तिधर्मावर भरंव
सा ठेवणारास योग्य अशा रीतीनें कुर्डीत प्राण आहे तोंपर्यंत मी तीं
बजावीन. मी **सेंत्लुई** याच्या कुळांत उत्पन्न झालों आहे. पायांत
बेड्या पडल्या तरी मीं आपला मान कसा ठेवावा याविषयीं मूर्ख हो
णार नाहीं. पहिला **फ्रान्सिस्** याच्या राज्याचा वारस मी आहें.'
निदान त्याप्रमाणें मी एवढें तरी ह्मणेन कीं, प्रतिष्ठेशिवाय सर्व गेलें.'

इंग्लंदांतील वर्तमानपत्रें **नापोलियन** याच्याविरुद्ध पहिल्यापे
क्षांही पुष्कळ लिहूं लागलीं. **पार्लमेंत** सभेंतही कित्येक लोक उघड
असें ह्मणत कीं, **इंग्लंदा**चा नाश करावा ही गोष्ट **नापोलियन** या
च्या मनांत रात्रंदिवस घोळत आहे; त्यानें आपल्यावर हल्ला के-

ल्यावर मग लढाई करणें त्यापेक्षां आपणच आरंभ करावा हें चांगलें. याच वेळेस **इंग्लंदांत** एका गृहस्थानें **मिसर** देशांतील प्रवासाचें वर्णन छापून प्रसिद्ध केलें. त्यांत **नापोलियन** याची पुष्कळ निंदा केली होती. तसेंच **फ्रान्स** देशांतील एका गृहस्थानें आपल्या **मिसर** देशांतील प्रवासाचें वर्णन प्रसिद्ध केलें. त्यांत इंग्लिश लोकांची पुष्कळ निंदा केली होती. त्यांत सहा हजार **फ्रेंच** लोक गेले तर आतां **मिसर** देश परत घेतील, वगैरे मजकूर लिहिला होता.

वरील कारणांनीं समजी होण्याचा संभव नाहींसा होत चालला. तेव्हां सन १८०३ च्या फेब्रुआरी महिन्याच्या आरंभींच एके दिवशीं **नापोलियन फ्रान्स** देशांतील **इंग्लंद**च्या वकिलास बोलावून म्हणाला, प्रत्येक वाऱ्याच्या झुळके बरोबर **इंग्लंदा**हून कांहीं तरी शत्रुत्वाचें चिन्ह उडून येतें. मला मारण्याविषयीं ज्यांनीं शपथा वाहिल्या आहेत, अशा दुष्ट मनुष्यांस तुमचें सरकार उत्तेजन देतें. तुमचीं वर्तमानपत्रें माझी निंदा करितात, फिर्याद केली म्हणजे अंमलदार आगीवर तेल पडतें. मला वाटलें तर मी उद्यां **मिसर** देश परत घेईन. कधीं तरी तो **फ्रान्स** देशाच्या ताब्यांत येणारच. परंतु अशा क्षुल्लक कारणाकरितां लढाई करण्याचा माझा उद्देश नाहीं. लढाई करून मला काय मिळणार ? तुम्ही लढाई करण्यास मला भाग पाडिलें तर, मला तुमच्या देशावर स्वारी करावी लागेल. तुमच्याबरोबर समुद्रांत लढाई करण्यासारखें सैन्य मला दहा वर्षांत तयार करितां येणार नाहीं, तरी मी थोड्या दिवसांत चारलक्ष फौज तयार करीन. तुम्ही व आम्ही एक झालों तर जग जिंकूं. आपण कां समजी करूं नये ? यावर **इंग्लंद**च्या वकिलानें असें उत्तर केलें कीं, आपल्या हक्कांचें रक्षण करावें एवढी आमच्या राजाची इच्छा आहे. **फ्रान्स** देशास मिळून लोकांस लुटण्याची त्याची इच्छा नाहीं. असो. णखी एकेदिवशीं परदेशांतील सर्व वकील एकेठिकाणीं जमले असतां **नापोलियन** **इंग्लंद**च्या वकिलाकडे वळून म्हणाला, 'एकून लढाई करण्याचा तुमचा निश्चय झाला ना ?' आमची इच्छा लढाई क

प्याची नाहीं असें इंग्लंदच्या वकिलानें म्हटलें तरी नापोलियन म्हणाला, ' पंधरावर्षें आपली लढाई चालली आहे, आणखी पंधरावर्षें चालू ठेवण्याविषयीं तुमचा निश्चय झाला आहे. ' दुसऱ्या वकिलांकडे. वळून म्हणाला, ' इंग्लिश लोकांची लढाई करण्याची इच्छा आहे. परंतु त्यांनीं पहिल्यानें तरवार उपसली तर मी ती शेवटपर्यंत म्यानांत घालणार नाहीं. ते तहास जुमानीत नाहींत.' इंग्लिशांच्या वकिलास म्हणाला, ' त्या फौजा कशाला ? तुम्ही फौजा तयार केल्या तर मीही करीन. तुम्ही लढलां तर मलाही लढतां येईल. तुम्ही कदाचि. फ्रान्स देशाचा नाश कराल. परंतु त्यास तुमच्यानें हतवीर्य करणार नाहीं.' इंग्लंदचा वकील म्हणाला, 'त्याला त्रास देण्याची किंवा हतवीर्य करण्याची आमची इच्छा नाहीं.' नापोलियन म्हणाला, 'तर मग तहाप्रमाणें वागा. जे तहास मान देत नाहींत, त्यांचा नाश होयो.

त्यांस परिणामाबद्दल यूरोपखंडास जबाब द्यावा लागेल.'

याप्रमाणें झाल्यावर तारीख १८ माहे मे सन १८०३ या दिवशीं इंग्लिश सरकारानें लढाई करण्याचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. यापूर्वीच फ्रेंच लोकांचीं गलबतें सांपडतील तेथें पकडण्याविषयीं हुकूम केला होता. त्यामुळें जाहीरनाम्याची वातमी पारिस येथें पोहोंचण्यापूर्वीच दोनशें गलबतें पकडलीं गेलीं. त्यांवर लाखों रुपयांचा माल सांपडला. याप्रकारें राजाराजांच्या भांडणांत लोकांच्या घरगुतीं मालावर धाड घालणें हा मोठा अन्याय आहे, असें पुष्कळ लोकांचें मत आहे. कारण आपल्या राजाचें दुसऱ्या राजाशीं भांडण लागल्यामुळें निर्वाहार्थ उद्योग करणाऱ्या निरपराध मनुष्यांवर एकाएकीं कहर गुदरूं लागले म्हणजे त्यांचें रक्षण कोणीं करावें ? जाहीरनाम्याची व वरील गलबतें पकडल्याची वातमी कळतांच नापोलियन यानें त्यांचा सूड उगविण्याकरितां असेंच कृत्य केलें. फ्रान्स देशांत राहणारे व प्रवास करणारे इंग्लिश लोक असतील त्यांस पकडण्याविषयीं त्यानें हुकूम दिले. त्यांमुळें दहा हजारांवर लोक पकडले गेले. यांत इंग्लंडांतील पुष्कळ श्रीमान् लोक होते. नापोलियन याच्या

या कृत्यासही पुष्कळ लोक दोष लावितात; तेंही योग्यच आहे.

दोन्ही देशांत तयारी होऊन लढाईची सुरुवात झाली. एमिन्त येथील तहाचे वेळेस फ्रेंच लोकांस दिलेलीं पुष्कळ ठिकाणें इं ग्लिशांनीं परत घेतलीं. इंग्लंडच्या राजाचें जर्मनीमध्यें हानोवर म्हणून एक संस्थान आहे, तें फ्रेंच लोकांनीं घेतलें. हें पाहून यु रोपांतील इतर राजांस वाईट वाटलें; तरी त्यांच्यानें नापोलियन यां च्याविरुद्ध बोलवेना. नंतर नापोलियन यानें खुद्द इंग्लंदावर स्वारी करण्याकरितां एक लक्ष साठ हजार समुद्रांत लढणारी फौज तयार केली. दुसऱ्या देशांच्या बंदरांत इंग्लंदाचा व्यापार अगदीं बंद करून टाकिला. फ्रेंच लोकांची तयारी पाहून इंग्लिश लोकांनींही कडेकोट तयारी केली. सर्व इंग्लिश लोक आवेशानें शत्रूंशीं लढण्यास तयार झाले. असे स्वदेशाभिमानी लोक देशाचें रक्षण करणारे असल्यावर शत्रूंचे पाय त्यास कोठून लागतील ?

लढाऊ गलबतें लांब आतलांतिक् महासागरांत नेऊन दुसऱ्या बाजूनें इंग्लंदावर आणावीं असा नापोलियन याचा बेत होता. परंतु ज्या ज्या बंदरांतून गलबतें बाहेर पडावयाचीं त्या बंदरांकडे इंग्लिशांच्या सैन्याचा नायतीचा डोळा असल्यामुळें तसें करण्यास सांपडेना. तेव्हां दिवसें दिवस इंग्लंदावर स्वारी करण्याकडे दुर्लक्ष होऊं लागलें. नापोलियन मरेपर्यंत असें म्हणे कीं, 'जर गलबतें एकवार बाहेर पडून इंग्लंदास पोहोंचलीं असतीं, तर इंग्लिश लोकांचें कांहीं चाललें नसतें. लागलेंच इंग्लंदांत लोकसत्ताकराज्य केलें असतें.' कसेंही असो इंग्लंदावर ईश्वराची पूर्ण कृपा होती, यांत संशय नाहीं. नाहीं तर हें एवढ्या तडाक्यांतून कसें सुटलें असतें ?

नापोलियन ताबाहयात मुख्य कारभारी झाला तरी तृप्त न होतां नां आपल्या वंशास राजपद मिळविण्याचा त्याचा बेत चालला होता. यामुळें कित्येक लोक असंतुष्ट झाले होते. कित्येकांनीं तर त्याचा जीव घेण्याचा सुद्धां बेत केला होता. त्यांत कित्येक मोठे लोकही होते. परंतु त्यांचें कृत्य नापोलियन यास समजलें. त्यामुळें तो

कसो होऊन त्यांसच शिक्षा झाल्या. यांतील एक मनुष्य एका प्रसंगी शस्त्र घेऊन **नापोलियन** याजवळ पोहोंचला होता, परंतु कांहीं अडचण येऊन त्याचा हेतु तडीस गेला नाहीं. शिवाय **नापोलियन** पहिलीं एकेठिकाणीं राहत नसे, व बरोबर पहारा असल्याशिवाय कोठें फिरत नसे. त्यामुळें या लोकांचा इलाज चालेना.

आपला जीव घेण्याच्या बेतांत **बोर्बोन** वंशाच्या राजघराण्यांतील मनुष्यांचें आंग असावें असा संशय येऊन त्यांस धाक पडण्याकरितां **नापोलियन** यानें जें एक घोर कृत्य केलें, त्यामुळें त्याच्या नांवास मोठा डाग लागला आहे. **ड्यूक दि एंघिन** म्हणून एक राजघराण्यांतील शूर तरुण पुरुष होता. तो यावेळेस परदेशांत होता तरी, **नापोलियन** याचा जीव घेण्याकरितां कट केलेल्या मनुष्यांशीं त्याचा संबंध आहे, असा संशय येतांच त्यास एकदम पकडून **पारिस** येथें आणिलें. तेथें त्याची चौकशी करण्यास **नापोलियन** यानें सैन्यांतील कामदार नेमिले होते. चौकशीच्या वेळीं मला कांहीं एक माहीत नाहीं, असें त्यानें सांगितलें. त्यावर गुन्ह्याची शाबीती होण्यास कांहीं पुरावा नव्हता, तरी न्याय करणारांनीं **फ्रान्स** देशावर शस्त्र धरण्याचा, लोकसत्ताकराज्याच्या नाशाकरितां **इंग्लंद**च्या लोकांशीं मसलत करण्याचा, वगैरे चारपांच दोषारोप करून त्यास दोषी ठरविलें. **नापोलियन** यापाशीं प्रत्यक्ष बोलण्याची परवानगी मिळण्याकरितां त्यानें पुष्कळ आर्जवें केलीं, तरी त्यास परवानगी मिळाली नाहीं.

ही चौकशी मध्यरात्रीस गुप्त चालली होती. आरोपिताचा वकील वगैरे कोणी नव्हता. न्यायाधीशांनीं आरोपितास विचारलेल्या गोष्टींचीं उत्तरें त्यानें मोठ्या धैर्यानें दिलीं. तो म्हणाला, मी आपल्या घराण्याचे हक्क संभाळण्याकरितां हातांत शस्त्र घेऊन **फ्रान्स** देशांत आल्याशिवाय कधीं राहणार नाहीं. याप्रकारचीं कित्येक भाषणें परत घेण्यास न्यायाधीशांनीं त्यास सांगितलें. तेव्हां तो म्हणाला, तुमचा उद्देश चांगला आहे, हें मी समजतों, तरी माझें मत

फिरावयाचें नाहीं. मी मोठ्या धोक्यांत आहें तरी याप्रकारचा संरक्षण करण्याचा उपाय मी कधीं करणार नाहीं. शेवटीं निराश होऊन दोषी ठरवून कोणती शिक्षा द्यावी, हें विचारण्याकरितां त्याचवेळेस **नापोलियन** याकडे न्यायाधीशांनीं मनुष्य पाठविला. **नापोलियन** यानें देहांत शिक्षा असें लिहून पाठविलें. उत्तर आल्यावर कांहीं वेळानें उजाडण्याच्यापूर्वीं शिक्षा अमलांत आणण्याकरितां **द्यूक** यास किल्ल्याच्या खंदकांत नेलें. तेथें दिवस उगवण्याच्यापूर्वींच दुष्टांनीं त्याचा वध केला! आरोपितास देहांत शासन द्यावें असें ठरल्यापासून निदान चोवीस तास तरी मध्यें जावे असा कायदा होता, तो देखील त्या राक्षसांनीं एकीकडे ठेविला. शिवशिव काय घोर कृत्य हें! सुधारलेल्या देशांत काय ही न्यायाची थट्टा हा **द्यूक** मोठा उदारमनाचा, रूपवान् व शूर होता. त्याच्या मरणानें सर्व **यूरोपखंड** हळहळलें. यामुळें **नापोलियन** यास पुष्कळ नवे शत्रु उत्पन्न झाले. त्याच्या मित्रांनीं सुद्धां ह्मटलें कीं, लढाईपेक्षां हें कृत्य मोठें घोर होय. हें करून **नापोलियन** यानें आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला. या **द्यूकास** देहांत शासन न करण्याविषयीं **जोसेफाईन** व **नापोलियन** याची आई यांनीं त्यास पुष्कळ सांगिलें तरी त्यानें ऐकिलें नाहीं. **नापोलियना**सारख्या स्वहिताविषयीं सावध अशा मनुष्यापासून असें घातुक कृत्य होणें ह्मणजे पुढें होणार त्याप्रमाणें बुद्धि होते असें ह्मटलें पाहिजे. तारीख २० मार्च सन १८०४ या दिवशीं हें दुष्ट कृत्य घडलें.

द्यूक दिएंघिन याचा वध ऐकून **युरापां**तील सर्व राजांस फार वाईट वाटलें. **रशियाचा** नवीन बादशाहा **अलेक्झांदर** व **स्वीदन** आणि **डेन्मार्क** या देशांचे राजे यांनीं **फ्रेंच** लोकांशीं लढाई सुरु करण्याचा निश्चय केला. **आस्त्रिया** व **प्रुशिया** येथील राजांचा लढाईचा बेत आंतून चालला होता तरी **नापोलियन** याच्या भयामुळें त्यांच्यानें उघडपणें वरील राजांस मिळवेना.

द्यूक दिएंघिन याचा वध झाल्यापासून राजपक्षाचे लोक होते

त्यांचें धैर्य खचलें. तसेंच लोकसत्ताकराज्याच्या पक्षाच्या कित्येक लोकांस शिक्षा झाल्यामुळें त्यांनींही बरवेडा करण्याचें सोडून दिलें. हा प्रसंग पाहून **नापोलियन** यानें आपला उद्देश तडीस नेण्याचे मनांत आणिलें. **कुरी** म्हणून एक त्याचा मित्र होता, त्यानें एकदिवशीं प्रतिनिधींच्या सभेंत अशी सूचना केली कीं, आतां राज्यव्यवस्थेविषयीं अनेक प्रकारचे कल्पनातरंग सोडून द्यावे. **फ्रान्स** देशाचा जय होऊन जिकडे तिकडे शांतता झाली. देशाच्या खजिन्याची चांगली व्यवस्था झाली. कायद्यांची सुधारणा झाली. यामुळें **नापोलियन** यास राज्यावर बसवून त्याच्या वंशास राज्याची वंशपरंपरेनें **फ्रान्स** देशाची बादशाही द्यावी असें सर्व लोकांची इच्छा आहे. **फ्रान्स** देशाच्या योग्यतेप्रमाणें सर्व लोकांची इच्छा आहे. **फ्रान्स** देशाच्या योग्यतेप्रमाणें म्हटलें म्हणजे **नापोलियन** यास बादशाहा ही पदवी द्यावी,

वरील सूचनेवर दोन तीन दिवस वादविवाद झाला. त्यांत पुष्कळ सभासदांनीं मोठमोठीं भाषणें करून आपलें अनुमोदन दिलें. फक्त **कोनॉत्** हामात्र याविषयीं अगदीं प्रतिकूळ होता. तो म्हणाला, "**नापोलियन** यानें **फ्रान्स** देशाचें रक्षण केलें, ही गोष्ट निःसंशय आहे. त्याबद्दल त्यास मुख्य कारभारी नेमिलें आहे. सर्वांच्या हिताकरितां कांहीं दिवस अमंल करून नंतर **नापोलियन** यानें तो का सोडूंनये ? देशांतील मनुष्याची स्वदेशरक्षणाकरितां मोठी मेहनत असली तरी त्यास कृतज्ञता दाखविण्याची कांहीं मर्यादा नाहीं काय ? **नापोलियन** याच्या श्रमासाठीं त्यास राज्य देणें योग्य आहे असें म्हटलें, तरी त्याच्यामागून कोण कसा होईल, याचा काय निश्चय आहे ? पुनः देशास अशा घोटाळ्यांत कां घालावें ? "

दोन्ही सभांत वादविवाद होऊन बहुमतानें **नापोलियन** यास **फ्रान्स** देशाची बादशाही द्यावी असें ठरलें. **नापोलियन** यास मुलगा न झाल्यास त्यानें भावाचा मुलगा किंवा नातू दत्तक द्यावा. असें न झाल्यास याचे भाऊ **जोजेफ** व **लुईस्** हे गादीचे वारस होतील. **लुशिअन** आणि **जेरोम** यांचीं मात्र नांवें वारसां-

सर्व टिकाणीं **नापोलियन** यास लोक अनुकूल होतेच. **नापोलियन फ्रान्स** देशाचा बादशाहा झाल्यावर **इताली** देशांतील मुलखांतून **आस्त्रिया**चा अंमल घालवून तेथें लोकसत्ताकराज्य **नापोलियन** यानें स्थापिलें होतें; तेथील लोकांनीं आमच्या देशाचें राजपद आपण स्वीकारावें असें त्यास पत्र पाठविलें. त्याप्रमाणें तारीख २६ माहे मे सन १८०५ या दिवशीं **मिलान** शहरीं जाऊन तेथील चालीप्रमाणें 'हा देवानें मला दिला' असें म्हणून **नापोलियन** यानें मस्तकीं मुकुट धारण केला. याप्रमाणें **नापोलियन** याच्या नांवास **फ्रान्स** देशाचा बादशाहा व **इताली** देशाचा राजा अशीं दोन पदें जोडलीं; पण आपणामागें दोन्ही अधिकार एका पुरुषास देऊंनये असा **नापोलियन** यानें ठराव केला. **जोसेफाईन** हिचा आदल्या घरचा मुलगा **युजीन** यास **मिलान** येथें प्रतिनिधि नेमून **नापोलियन** प्रियपत्नीसहवर्तमान **पारिस** येथें परत आला.

भाग ११ वा.

बादशाही प्राप्त झाल्यावर **नापोलियन** यानें **इंग्लंद**च्या राजास तह करण्याविषयीं पुनः पत्र पाठविलें. त्यावर **इंग्लंद**च्या राजाच्या प्रधानानें असें उत्तर लिहिलें कीं, **रशिया**च्या बादशाहाचा व आमचा सल्ला झाला आहे; यासाठीं त्याच्या रुकाराशिवाय आह्मांस तहाचें बोलणें सुरू करितां येत नाहीं.

रशियाचा बादशाहा, **स्वीदन**चा राजा, व **इंग्लंद**चा राजा, यांचा **फ्रान्स** देशाशीं युद्ध करण्याचा तह झाला. **इताली, स्विट्सर्लंद**, वगैरे देशांतून **फ्रेंच** लोकांचा अंमल काढून टाकिल्याशिवाय त्यांशीं तहाचें बोलणें कोणीं करूंनये असें ठरलें. **आस्त्रिया**च्या दरबारांत कित्येक लोक **नापोलियन** यास अनुकूल असल्यामुळें

बादशाहा या कटांत मिळाला नाहीं. **प्रुशिया**च्या राजास कटांत मि-
ळवून घेण्याकरितां **रशिया**चा बादशाहा **बर्लिन** येथें स्वतः गेला.
शेवटीं **नापोलियन इतली** देशाचा राजा झाला, हें ऐकून आस्ति-
याच्या बादशाहानेंही **फ्रेंच** लोकांशीं लढाई सुरू केली. त्यामुळे
नापोलियन यावर एकदम चार पांच शत्रु उठले.

नापोलियन यानें प्रथम **आस्त्रियन** लोकांचा पराभव करण्या-
कडे लक्ष लाविलें. **फ्रान्स**देशावर स्वारी काण्याकरितां झालेल्या
कटाचें वर्तमान ऐकतांच त्यानें **इंग्लंद**ावर स्वारी करण्याकरितां त-
यार केलेल्या फौजेस **आस्त्रिया**कडे चाल करण्यास सांगितलें. वि-
स्तारभयास्तव या युद्धाचें वर्णन लिहितां येत नाहीं, तथापि एवढेंच
सांगणें आहें कीं, या युद्धांतही **नापोलियन** याच्या शौर्यसूर्याच्या
प्रकाशानें सर्वांचे डोळे दिपून गेले.

या प्रसंगीं **आस्त्रिया**च्या फौजेचा सेनापति **माक्** म्हणून होता.
तो **नापोलियन** यासीं गांठ पडतांच घाबरून **अल्म्** शहरा जवळ
वीस हजार लोकांसहवर्तमान शत्रूंच्या स्वाधीन झाला. या पराज-
यामुळें **नापोलियन** याची इतकी कीर्ति झाली कीं, याचा कोठेंही
पराजय व्हावयाचा नाहीं, असें सर्वांस वाटूं लागलें. पराजित झा-
लेले **आस्त्रियन** लोकही शस्त्रें शत्रूच्या स्वाधीन करून **नापोलियन**
याजकडे आश्चर्यानें पाहूं लागले !

नापोलियन याच्या **अल्म्** येथें झालेल्या जयाच्या आनंदांत
थोडेसें विरजण पडलें. **फ्रान्स** व **इंग्लंद** यांचें भांडण चाललें असतां
स्पेन देशच्या सरकारानें कोणाची बाजू धरली नव्हती, तथापि कांहीं
कृत्यांवरून तें सरकार **फ्रेंच** लोकांस अनुकूल असावें असा संशय
येऊं लागला. त्यामुळें **इंग्लिश** सरकारानें या गोष्टीचा निश्च-
करण्याकरितां प्रसिद्ध शूर **नेल्सन** यास मुख्य अधिकार देऊन ल-
ढाईचीं गलबतें पाठविलीं. तेव्हां **स्पेन** देशचे लोक **फ्रेंच** लोकांस
मिळाले. दोन्ही सैन्याचा **नेल्सन्** यानें **त्राफलगार** या प्रसिद्ध ठि-
काणीं अगदीं पराजय केला. या विजयाचें अद्याप **इंग्लिश** लोक

पेंढें भूषण मानितात. 'प्रत्येक मनुष्यानें आपलें कर्तव्य करावें अशी इंग्लंदाची इच्छा आहे' हें प्रसिद्ध वाक्य ह्मणून **नेल्सन्** यानें युद्धास आरंभ केला. या युद्धांत जय झाला, परंतु ज्याच्या योगानें त्यास जय मिळाला तो देशास भूषणभूत शूर मोहरा **नेल्सन्** या लढाईंत पडल्यामुळें सर्व **इंग्लिश** लोकांस पराकाष्ठेचें दुःख झालें. शत्रूचा पूर्ण पराजय झाला हें ऐकून 'परमेश्वराचे उपकार आहेत, म्यां आपलें कर्तव्य बजाविलें' असें ह्मणून या वीरानें देह ठेविला.

त्राफाल्गार येथील युद्धांत **स्पेन** देशचे लोक मनापासून लढले नाहींत ह्मणून पराभव झाला, असें कित्येक ग्रंथ करांचें मत आहे. **त्राफाल्गार** येथें झालेला पराजय ऐकून **नापोलियन** याची इंग्लंद निकण्याविषयीं पूर्ण निराशा झाली. तथापि तो ह्मणे काय करावें, पाहिजेत्यानें सर्व ठिकाणीं स्वतः जावत नाहीं. त्यास वाटे, आपण तेथें असतों तर असा पराभव झाला नसता. त्यास असें वाटण्यास पुष्कळ कारणें होतीं. पुष्कळवेळां त्याच्या शब्दानें उत्तेजित होऊन सैन्यानें मोठाले पराक्रम केले होते. **अल्म्** येथें शत्रूंचा पराजय केल्यावर **नापोलियन** यानें साक्षात् शत्रूची राजधानी जें **व्हिएना** शहर त्यावर चाल केली. **आस्त्रिया**चा बादशाहा पूर्वीच फौज घेऊन **रशिया**च्या बादशाहच्या फौजेस मिळण्यास गेला होता. त्यामुळें तेथें पोहोंचतांच **नापोलियन** यानें एकदम तें शहर तारीख २३ नोव्हेंबर सन १८०५ चा दिवशीं हस्तगत करून घेतलें.

व्हिएना येथील राजवाड्यांत कांहीं दिवस राहून **नापोलियन** **आस्त्रिया** व **रशिया** यांच्या एकत्र मिळालेल्या फौजेशीं टक्कर मारण्यास गेला. ही प्रसिद्ध लढाई **आस्तरलित्झ्** या गांवाजवळ झाली. ही लढाई झाली त्याच दिवशीं **नापोलियन** यास राज्यपद प्राप्त होऊन वर्ष झालें होतें. यामुळें **फ्रेंच** सैन्यांतील सर्व लोक वाढदिवसाच्या आनंदांत होते. या लढाईच्या वेळेस **नापोलियन** यानें मोठें मोठें चातुर्य दाखविलें, त्याबद्दल मोठमोठे रणशूर बहादूर त्याची स्तुति करितात. एक ग्रंथकार असें ह्मणतो कीं, आजपर्यंत जगांत जीं

मध्यें घातलीं गेलीं नाहींत. त्यांनीं हलक्या कुळांतील स्त्रियांशीं लग्न केल्यामुळें **नापोलियन** याचा त्यांविषयीं राग होता. **नापोलियन** याच्या घराण्यांतील सर्व पुरुषांस राजपुत्र म्हणावें असें ठरलें. याप्रमाणें ठराव होऊन लोकांचीं मतें घेण्यास यादी पाठविल्या त्यांवरही पुष्कळ अनुकूळ मतें पडलीं.

तारीख १८ मे सन १८०४ इसवी रोजीं **नापोलियन** यानें बादशाहा हें पद स्वीकारिलें, व आपले वेगळाले प्रधान नेमिले. नवें न व्यवस्थेस विशेष लोकमान्यता यावी, व आपलें महत्व विशेष दिसावें, म्हणून **नापोलियन** यानें राज्याभिषेक करवण्यास रोमन क्याथलिक धर्माचा मुख्य अधिकारी **रोम** येथील **पोप** यास **पारिस** येथें बोलाविलें. तारीख २ माहे दिसेंबर सन १८०४ या दिवशीं **नात्रिदेम** या देवळांत राज्याभिषेकाचा मोठा समारंभ झाला. देशांतील श्रीमान्, विद्वान्, सरदार, सावकार, इत्यादि हजारों लोकांची गर्दी झाली होती. **फ्रान्स** देशचा प्रसिद्ध पराक्रमी **शार्लमेन** बादशाहा याशिवाय आजपर्यंत कोणत्याही राजास **पोपानें** स्वहस्तानें राज्याभिषेक केला नव्हता. **शार्लमेन** यासहि **रोम** येथें राज्याभिषेक झाला. परंतु **नापोलियन** यास राज्याभिषेक करण्यास **पोपास** स्वतः **पारिस** येथें यावें लागलें ! प्रिय पत्नी **जोसेफाईन** हिच्यासहवर्तमान **नापोलियन** सिंहासनाहून झाला. **पोपानें** आशीर्वाद दिल्यावर **नापोलियन** यानें स्वहस्तीं आपल्या व पत्नीच्या मस्तकीं मुकुट घातला. तेव्हां **जोसेफाईन** हिचे नेत्र आनंदाश्रूनें भरून आले ! याप्रमाणें **नापोलियन** याचें सर्वांत मोठा मनोरथ पूर्ण झाला. समारंभ फार सुशोभित केला होता, लोक आनंदघोष करीत होते, तथापि कित्येकांची मुखश्री विरमून गेली होती. कोणत्या रीतीनें आपणास हें वैभव प्राप्त झालें हें मनांत येऊन **नापोलियन** याच्या प्रफुल्लित वदनावरसुद्धां किंचित् खिन्नतेची छाया दिसत होती असें म्हणतात. असें होणें हें स्वाभाविकच आहे.

सर्व ठिकाणीं **नापोलियन** यास लोक अनुकूल होतेच. **नापोलियन** **फ्रान्स** देशाचा बादशाहा झाल्यावर **इताली** देशांतील मुत्सद्यांतून **आस्त्रिया**चा अंमल घालवून तेथें लोकसत्ताकराज्य **नापोलियन** यानें स्थापिलें होतें; तेथील लोकांनीं आमच्या देशाचें राजपद आपण स्वीकारावें असें त्यास पत्र पाठविलें. त्याप्रमाणें तारीख २६ माहे मे सन १८०५ या दिवशीं **मिलान** शहरीं जाऊन तेथील चालीप्रमाणें 'हा देवानें मला दिला' असें म्हणून **नापोलियन** यानें मस्तकीं मुकुट धारण केला. याप्रमाणें **नापोलियन** याच्या नांवास **फ्रान्स** देशाचा बादशाहा व **इताली** देशाचा राजा अशीं दोन उपपदें जोडलीं; पण आपणामागें दोन्ही अधिकार एका पुरुषास देऊं नये असा **नापोलियन** यानें ठराव केला. **जोसेफाईन** हिचा आदल्या घरचा मुलगा **युजीन** यास **मिलान** येथें प्रतिनिधि नेमून **नापोलियन** प्रियपत्नीसहवर्तमान **पारिस** येथें परत आला.

भाग ११ वा.

बादशाही प्राप्त झाल्यावर **नापोलियन** यानें **इंग्लंद**च्या राजास तह करण्याविषयीं पुनः पत्र पाठविलें. त्यावर **इंग्लंद**च्या राजाच्या मधानानें असें उत्तर लिहिलें कीं, **रशिया**च्या बादशाहाचा व आमचा सल्ला झाला आहे; यासाठीं त्याच्या रुकाराशिवाय आह्मांस नहाचें बोलणें सुरू करितां येत नाहीं.

रशियाचा बादशाहा, **स्वीदन**चा राजा, व **इंग्लंद**चा राजा, यांचा **फ्रान्स** देशाशीं युद्ध करण्याचा तह झाला. **इताली, स्वित्सर्लंद**, वगैरे देशांतून **फ्रेंच** लोकांचा अंमल काढून टाकिल्याशिवाय त्यांशीं तहाचें बोलणें कोणीं करूंनये असें ठरलें. **आस्त्रिया**च्या दरबारांत कित्येक लोक **नापोलियन** यास अनुकूल असल्यामुळें

झुन मेले. दोघे बादशाहा उरलेसुरलें सैन्य घेऊन मोठ्या संकटानें पळून गेले. वीस हजार लोक **फ्रेंच** लोकांनीं कैद केले; चाळीस तोफा घेतल्या, व **रशिया**च्या बादशाहाची निशाणें नेलीं. या मर्याईस **फ्रेंच** सैन्यांतील लोक बादशाहांचो लढाई असें म्हणत.

हा पराजय झाल्यावर तहाचें बोलणें लावण्याकरितां **आस्त्रिया**चा बादशाहा स्वतः **नापोलियन** राहत होता त्या ठिकाणीं गेला. **नापोलियन** एका झोंपडींत रहात होता. बादशाहा तेथें जातांच त्यास म्हणाला, तुम्ही आतांशीं दोन महिने आम्हांस असल्या राजधान्यांत रहावयास लाविलें आहे. यावर बादशाहा म्हणाला, तुम्ही त्यांचा असा चांगला उपयोग केला आहे कीं, आतां त्यांच्या परमोईचद्दल तक्रार असण्याचें कारण राहिलें नाहीं.

रशियाच्या फौजेस सुरक्षित आपल्या मुलुखांत परत जाऊं द्यावें असें कबूल करून घेऊन **आस्त्रिया**च्या बादशाहानें **प्रेसबर्ग** येथें **नापोलियन** याशीं तह केला. त्यांत पुष्कळ मुलूख **नापोलियन** याम दिला. मनांतून खोड मोडावयाची होती, तथापि वेळ आली नाहीं, असें समजून **नापोलियन** यानें **जर्मनी**तील **इंग्लंद**च्या राजा-या **हानोवर** प्रांत द्यावयास करून **मुशिया**च्या राजाशीं ही तह के-ला. दुसरीं कित्येक संस्थानें **नापोलियन** यानें आपल्या आप्तांस दिलीं. आपला भाऊ **जोजेफ बोनापार्त** यास **नेपल्स**चें राज्य दिलें. **हालंद**च्या लोकांकडून **लुइस बोनापार्त** यास त्या देशाच्या गादीवर बसविलें. **जर्मनी**तील इतर संस्थानिकांशीं तह केला. त्यांनीं साठहजार फौज तयार ठेवावी असें ठरलें. या गोष्टी झाल्यानंतर **नापोलियन** यानें **फ्रान्स** देशांत लोकसत्ताक राज्याच्या वेळेस मो-डलेल्या पुष्कळ गोष्टी पुनः सुरू केल्या. सैन्यांतील कामदारांस पद-व्या देऊन मोठमोठ्या जहागीरी दिल्या.

आस्तर्लित्झ एथील लढाई झाल्यावर कांहीं महिन्यांनीं **नापो-लियन** यास **मुशिया**ची खोड मोडण्याचा प्रसंग आला. **इंग्लंदा-**

शीं तहाचें बोलणें चाललें होतें त्यांत **नापोलियन** यानें असें कळवि
होतें कीं, **सिसली** आमच्याकडे ठेवाल तर **प्रुशियास** दिलेलें हानोवे
संस्थान आम्ही तुम्हांस परत देऊं. ही बातमी **प्रुशिया** सरकारा
लागतांच त्यास फार राग आला. दुसऱ्या कोणत्या ही देशाची म
न घेतां **प्रुशियन** लोकांनीं उतावीळपणानें **फ्रेंच** लोकांशीं टक्कर मा
प्यास आरंभ केला. त्यांचा राजा व राणी यांनीं लोकांस उ
आणण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. **रशिया**च्या बादशाहाशीं तह हं
ऊन त्याची फौज मदतीस येणार होती, परंतु ती येण्यापूर्वीच **नापोलि**
यन यानें जलदी करून चोहोंकडून **प्रुशिया**च्या फौजेस वेढून टाकि
नाम्बर्ग, जीना, वगैरे ठिकाणीं **फ्रेंच** लोकांनीं मोठ्या शौर्यानें व
क्तीनें पराक्रम करून पंधरा वीस दिवसांत शत्रुंची दाणादाण क
त्यांचें लढाईचें सामान लुटून अनेक शहरें घेऊन अगदीं मोड क
टाकिला. **प्रुशिया**च्या फौजेनें ही पुष्कळ प्रसंगीं मोठें शौर्य दा
विलें, तथापि शेवटीं तिचा पराभव होऊन त्यांचे लाखों लोक रणां
णांत पडले.

प्रुशियन लोकांचा अगदीं पराभव करून **नापोलियन** या
त्यांची राजधानी जें **बर्लिन** शहर त्यांत प्रवेश केला; तेव्हां **युरोप**ख
डांतील सर्व लोकांस मोठें आश्चर्य वाटलें. **नापोलियन** यापुढें को
णाचाही पराक्रम चालावयाचा नाहीं, असें वाटून **फ्रेंच** लोकांच्य
तडाक्यांतून सुटण्याविषयीं सर्वांची निराशा झाली. कित्येक लो
तर **नापोलियन** कोणी तरी लोकोत्तर अवतारी पुरुष आहे असें ह
णूं लागले.

बर्लिन शहर घेतल्यावर तेथें **फ्रेंच** लोकांनीं जयाच्या गर्वानें फु
न लुटीचे वगैरे पुष्कळ अनर्थापात केले. पुष्कळ बड्या लोकांचा
अपमान केला **नापोलियन** यानें मात्र कित्येक प्रसंगीं उदार म
नाच्या पुरुषास योग्य असें आचरण केलें. एक राजघराण्यांतील
गृहस्थ **नापोलियन** याच्या ताब्यांत **बर्लिन** येथें होता. त्यानें **फ्रेंच**
लोक शहरांत काय करितात वगैरे गोष्टी कळविण्याकरितां गुप्त रीती

नें बाहेरील अधिकाऱ्यांशीं पत्रव्यवहार ठेविला होता. **नापोलियन** याम त्यांतील एक पत्र सांपडलें, त्यावरून त्यास पकडिलें. त्याच्या बायकोस माझा नवरा अपराधी आहे हें माहीत नव्हतें; त्यामुळें ती **नापोलियन** यापाशीं जाऊन धैर्यानें माझा नवरा निरपराध आहे, असें म्हणूं लागली. तेव्हां **नापोलियन** यानें पकडलेलें पत्र तिच्या स्वाधीं दिलें. पत्र वाचतांच आपलें बोलणें खोटें झालें हें पाहून ती फार लज्जित होऊन दुःखानें खालीं मान घालून उगीच बसली. हें पाहून **नापोलियन** यास फार वाईट वाटून तो म्हणाला, बाई, तो कागद जाळून टाक म्हणजे पुरावा नाहींसा होईल. **बर्लिन** शहरांतून **नापोलियन** यानें पुतळे व चित्रें वगैरे पुष्कळ जयसूचक चिन्हें **पारिस** येथें पाठविलीं. शिवाय **मुशियन** लोकांपासून खंडणी ही पुष्कळ घेतली. **जीना** येथील लढाईनंतर सहा कोट ऐशी लक्ष रुपये **फ्रेंच** लोकांस द्यावे लागले. शिवाय आणखी पुष्कळ ठिकाणीं **फ्रेंच** लोकांनीं खंडणी घेतली.

मुशियाचा पराभव झाल्यावर **नापोलियन** यास **रशिया** व **इंग्लंद** हे दोन प्रबल शत्रु राहिले. लढाई करून **इंग्लिश** लोकांचा पराजय आपल्याच्यानें होईल असें त्यास वाटेना. त्यामुळें त्यांस पीडा देण्याची त्यानें दुसरीच युक्ति काढिली, ती ही कीं, **इंग्लिश**लोकांचें सर्व वैभव व्यापारमूलक आहे; याकरितां त्यांचा व्यापार बुडवून टाकिला असतां **इंग्लिश** लोक आपल्या आपण नम्र होतील, या हेतूनें कित्येक ठराव त्यानें **बर्लिन** येथें असतांना प्रसिद्ध केले. त्यांपैकीं एक ठराव असा होता कीं, **इंग्लंद** बेट अटकेंत आहे असें समजावें. कोणत्याही संबंधानें कोणत्याही प्रकारचा संबंध त्याशीं ठेवणें हा गुन्हा समजला जाईल. **फ्रान्स** देशाशीं तह असल्या कोणत्याही देशांत **इंग्लंदां**तील मनुष्य सांपडलें असतांत्यास कैद करावें. **इंग्लिश**ांचा व्यापाराचा माल जेथें सांपडेल तेथें जप्त करावा. यामाणें जाहीरनामे लावून ते अमलांत आणण्याकरितां त्यानें **युरोप**खंडाच्या किनाऱ्यावर ठिकठिकाणीं लढाऊ गलबतें ठेविलीं.

अनेक चातुर्ययुक्त युद्धें झालीं असतील त्यांपैकींच हें एक होय. नापोलियन अशा रीतीनें सैन्याची चाल करीत होता कीं, त्याचा काय बेत आहे हें शत्रूंस कळेना. एके प्रसंगीं शत्रूच्या फौजेनें भलतीकडेच चाल केली हें पाहून नापोलियन म्हणाला, चोवीस तासांत आंत ही फौज आपल्या ताब्यांत येणार.

लढाईच्या दिवशीं पहाटेस तासभर झोंप घेऊन फौजेची व्यवस्था पाहण्यास नापोलियन निघाला. कोणास न समजूं देतां तो ठिकाणीं फिरून यावें असा त्याचा बेत होता. परंतु सैन्यांतील लोकांस त्याचा हेतु कळतांच सर्व लोक मोठ्या उत्साहानें त्यास हे म्हणाले, आज आपला राज्यावर बसण्याचा वाढदिवस आहे, त्याच्या योग्यतेप्रमाणें आम्ही पराक्रम करूं. एक म्हातारा कामदार म्हणाला, आपण लढाईपासून दूर रहाल एवढें आम्हांस वचन द्या म्हणजे झालें नापोलियन म्हणाला, तुम्हांस आमची गरज लागेपर्यंत मी मागल्या लोकांबरोबर असतों. या भाषणावरून सेना आणि सेनापति यांचे ध्यें परस्परांवर किती विश्वास होता हें कळून येतें.

आस्तर्लित्झ् येथील महायुद्ध तारीख २ डिसेंबर सन १८०५ यादिवशीं झालें. आकाश निरभ्र असल्यामुळें स्वच्छ उन्ह पडलें होतें. हें पाहून फ्रेंच लोकांस आपला जय खास होतो असें वाटलें होतें. नापोलियन याच्या सैन्याच्या वेगळाल्या टोळ्यांनीं वेगळ्या बाजूंनीं चाल करून रशिया व आस्त्रिया या दोन्ही देशांच्या फौजेस कोंडून एकसारखी कत्तल चालविली. दोन्ही देशांचे बादशाहा आपल्या सैन्यां ची दुर्दशा दूरून पाहत होते. आपल्या लोकांवर गुदरलेले अनेक अनर्थ पाहून त्यांच्या. छात्या फुटून गेल्या असतील यांत नवल काय ? त्यांच्या लोकांस पळण्यास सुद्धां वाट सांपडेना; तेव्हां एका बाजूस लहान लहान तळीं होतीं त्यांचें पाणी थिजून बर्फ झालें होतें, त्यांवरून पळण्यास त्यांनीं आरंभ केला. इतक्यांत फ्रेंच लोकांनीं बरफावर गोळे घातल्यामुळें तें वितळून जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें. त्यामुळें वीस हजार लोक पळापळ

झुन मेले. दोघे बादशाहा उरलेसुरलें सैन्य घेऊन मोठ्या संकटानें पळून गेले. वीस हजार लोक **फ्रेंच** लोकांनीं कैद केले; चाळीस तोफा घेतल्या, व **रशिया**च्या बादशाहाची निशाणें नेलीं. या लढाईस **फ्रेंच** सैन्यांतील लोक बादशाहांचा लढाई असें म्हणत.

हा पराजय झाल्यावर तहाचें बोलणें लावण्याकरितां **आस्त्रिया**चा बादशाहा स्वतः **नापोलियन** राहत होता त्या ठिकाणीं गेला. **नापोलियन** एका झोंपडींत रहात होता. बादशाहा तेथें जातांच त्यास म्हणाला, तुम्ही आतांशीं दोन महिने आम्हांस असल्या राजवाड्यांत रहावयास लाविलें आहे. यावर बादशाहा म्हणाला, तुम्ही त्यांचा असा चांगला उपयोग केला आहे कीं, आतां त्यांच्या मेरसोईबद्दल तक्रार असण्याचें कारण राहिलें नाहीं.

रशियाच्या फौजेस सुरक्षित आपल्या मुलुखांत परत जाऊं द्यावें असें कबूल करून घेऊन **आस्त्रिया**च्या बादशाहानें **प्रेसबर्ग** येथें **नापोलियन** याशीं तह केला. त्यांत पुष्कळ मुलूख **नापोलियन** यास दिला. मनांतून खोड मोडावयाची होती, तथापि वेळ आली नाहीं, असें समजून **नापोलियन** यानें **जर्मनी**तील **इंग्लंद**च्या राजाचा **हानोवर** प्रांत द्यावयास करून **प्रुशिया**च्या राजाशीं ही तह केला. दुसरीं कित्येक संस्थानें **नापोलियन** यानें आपल्या आप्तांस दिलीं. आपला भाऊ **जोजेफ बोनापार्त** यास **नेपल्स**चें राज्य दिलें. **हालंद**च्या लोकांकडून **लुइस बोनापार्त** यास त्या देशाच्या गादीवर बसविलें. **जर्मनी**तील इतर संस्थानिकांशीं तह केला. त्यांनीं साठहजार फौज तयार ठेवावी असें ठरलें. या गोष्टी झाल्यानंतर **नापोलियन** यानें **फ्रान्स** देशांत लोकसत्ताक राज्याच्या वेळेस मोडलेल्या पुष्कळ गोष्टी पुनः सुरू केल्या. सैन्यांतील कामदारांस पदव्या देऊन मोठमोठ्या जहागीरी दिल्या.

आस्टर्लित्झ एथील लढाई झाल्यावर कांहीं महिन्यांनीं **नापोलियन** यास **प्रुशिया**ची खोड मोडण्याचा प्रसंग आला. **इंग्लंदा**-

याप्रमाणें **इंग्लिश** लोकांचा व्यापार बंद केल्यामुळें दररो
निर्वाहास लागणाऱ्या पदार्थांची सर्व गरीब व श्रीमंत लोकांस अडच
पडूं लागली. **नापोलियन** याची करामत विलक्षण होती. लोक
ची अडचण दूर होण्याकरितां **नापोलियन** यानें अनेक तज्ज्ञविद्
योजिल्या. मोठमोठालीं बक्षिसें देऊन देशांतील सृष्टपदार्थविद्या
शास्त्र जाणणाऱ्या विद्वानांस बाहेरच्या देशांतून येणारे पदार्थ दे
उत्पन्न करण्याच्या युक्ति शोधून काढण्यास हुकूम केला. वाहे
रून येणाऱ्या पदार्थांपैकीं साखरेचा खप **फ्रान्स** देशांत फार होत
असे. याकरितां **बीट** नांवाच्या झाडाच्या मूळापासून साखर
उत्पन्न करण्यास त्यानें फार प्रयत्न केला. **फोंतेनब्लो** नांवाच्य
जागेच्या आसपास रानांत **बीट** झाडांची इतकी लावणी करविली
होती कीं, यापासून झालेली साखर सर्व **यूरोपखंडास** पुरेल अशी
त्यास वाटत होतें. **इंग्लिश** लोकांचा माल घेतला असतां सक्त
शिक्षा होई; तरी लोकांचे हाल पुष्कळ होऊं लागल्यामुळें पुष्क
लोक चोरून **इंग्लंदांतून** माल आणीत; व **नापोलियन** याचें काम
दारही तिकडे दुर्लक्ष करीत.

बर्लिन शहर जिंकिल्यावर **नापोलियन** यास तेथें फार दि
वस राहण्यास सांपडलें नाहीं. **मुशियाच्या** बादशाहाच्या मदतीक
रितां मोठें सैन्य घेऊन आलेल्या **रशियाच्या** बादशाहाबरोबर त्यास टक्क
मारावी लागली. बरोबरच्या सैन्यांतले पुष्कळ लोक खपल्यामुळे
आणखी ऐशीं हजार लोक पाठवावे म्हणून **नापोलियन** यानें **पारिस**
येथील अधिकाऱ्यांस लिहिलें; व त्यांनींही भयानें तें कबूल केलें
परंतु लढाई सुरू झाल्यापासून आठदहा महिन्यांत एकंदर दोन अ
च लक्ष माणसें मेलीं, आणि पांच सात लक्ष जखमी झालीं, हा वि
लक्षण अनर्थपात पाहून देशांतील सर्व लोक चिंताक्रांत झाले, व
आतां उपाय काय अशी चिंता करूं लागले.

रशियन लोकांशीं लढण्याकरितां **नापोलियन बर्लिन** येथू
निघून **पोलंद** देशांतून जावयास निघाला. **पोलंदचे** लोक

रणशूर होते. परंतु **आस्त्रिया, प्रुशिया, व रशिया,** या तिघांनीं त्यांवर एकदम धाड घालून अधमपणानें त्यांचा देश बांटून घेतला. त्यामुळें ते लोक फारच संतापले होते. **नापोलियन** आपणास शत्रूंपासून सोडवून स्वतंत्र करील असें समजून ते लोक त्यास शरण गेले. **नापोलियन** याच्या सैन्यांत कित्येक **पोलंद** देशचे कामदार होते; त्यांनीं स्वदेशबांधवांस असें कळविलें कीं, **पोलंद**चे लोक हो, महाप्रतापी अग्रेसर **नापोलियन** तीन लक्ष फौज घेऊन तुमच्या देशांत आला आहे. त्याचा काय बेत आहे याची चौकशी न करितां त्याच्या उदार आश्रयास आपण पात्र आहों असें दाखविण्यास आपण यत्न केला पाहिजे. तुम्ही स्वतंत्र होण्यास पात्र आहां किंवा नाहीं असें तो आम्हांपाशीं बोलला आहे. **पोलंद**चे लोकहो, असें आहे तर आपली हिम्मत दाखवून स्वतंत्र होणें हें तुम्हांकडे आहे. तुमच्या शत्रूंचा सूड उगवून तुम्हांस मुक्त करणारा येथें आला आहे. मुलें रडूं लागलीं म्हणजे आश्रयाकरितां बापापाशीं जातात, त्याप्रमाणें तुम्ही सर्व त्यापाशीं जा. त्याकडे अंतःकरण लावून आपलें बाहुबल त्याचे कामीं लावा. एकूनएक मनुष्य उठा आणि असें दाखवा कीं, स्वदेशापुढें आपल्या शरीराची सुद्धां आम्हांस कांहीं विशाद वाटत नाहीं.

पोलंद देशांत गेल्यावर तेथील हजारों लोक **नापोलियन** याच्या भोंवतीं जमले. स्वतंत्र होण्याच्या आशेनें सर्वांचीं मुखें प्रफुल्लित व अंतःकरणें आनंदयुक्त झालीं होतीं. स्वदेशांतील जुन्या चालीचा पोषाक पुनः सर्वांनीं केला. जुने बडेलोक आपआपल्या घरीं स्वदेशाच्या पराभवानें दुःखाक्रांत होऊन बसले होते ते **नापोलियन** यापाशीं येऊन त्यास म्हणूं लागले, 'आपण मोठमोठीं राज्यें उत्पन्न व नष्ट करणारे, व सर्व जगाचे नियमन करणारे आहां, असें समजून आपला आम्ही सत्कार करितों; आणि आमच्या सर्व आशा परिपूर्ण कराल असा भरंवसा धरितों. आमच्या देशाचें पुनरुज्जीवन झालेंच असें आम्हीं समजतों. कारण आम्हांस आपण महान्यायी व महा

विद्वान् जो **सोलॅन** त्याासारखेच वाटतां. आपण प्रतापी सीझर आहां असें समजून आपल्या हातीं आमचें नशीब आहे असें आह समजतों. '

याप्रमाणें **पोलंद**च्या लोकांस **नापोलियन** यापासून आप कार्य करून घेण्याची इच्छा होती, व तें करण्यास तो समर्थही होता पंतु **पोलंद**च्या लोकांस स्वतंत्र करणें म्हणजे **आस्त्रिया** व **रशिया** या दोन देशाशीं नवा वैरभाव उत्पन्न करणें आहे असें त्यास पक्कें माहीत होतें. त्यामुळें मी तुमचे मनोरथ पूर्ण करीन असें त्यानें **पोलंद**चे लोकांस वचन दिलें नाहीं. त्यास माहीत होतें कीं, जा यांस असें वचन दिलें तर लागलींच **आस्त्रिया**शीं झालेला तह मोडू पुन्हा लढाई सुरू होईल. तसेंच **प्रुशिया**च्या मदतीस आलेल्या **शिया**च्या बादशाहाशीं सुद्धां **नापोलियन** याच्या मनांत तह व्हाव असें होतें. **पोलंद**च्या लोकांकरितां **नापोलियन** लढूं लागता सह न करितां ते अगदीं निकरावर आले असते. याकरितां मी तुम्हांस स्वतंत्र करीन असें स्पष्ट न सांगतां, ' **पोलंद**चें राज्य पुनः स्थापित होईल काय ? हें राष्ट्र आपणास मान आणि स्वतंत्रता प्राप्त करून घे ईल काय ? त्याचें पुनरुज्जीवन होईल काय ? मनुष्यांच्या सर्व कृत्यांचे कलासूत्र ज्याच्या हातांत आहे, असा परमेश्वर मात्र या गुप्त गोष्टींचा निर्णय करील. ' याप्रकारचीं भाषणें तो बोले. यामुळें त्या लोकां सही आशा लागे.

याप्रमाणें होऊन **फ्रेंच** व **पोलंद**चे लोक मिळून **रशियन** लो कांवर चाल करूं लागले. यावेळेस **फ्रेंच** व **रशियन** यांचीं जी युद्धें झालीं, तीं फारच मोठीं व भयंकर होत. दोहींकडचे लोक शू रवे शूर असल्यामुळें **पुलतस्क**, **ईलो**, वगैरे ठिकाणीं असे विलक्षण संग्राम झाले कीं, कोणी कोणास हार जाईना. उभय पक्षास वाटे कीं, आमचीच सरशी आहे. आजपर्यंत सर्व ठिकाणीं **नापोलियन** याचा एकदम जयच होत गेला; त्यामुळें **फ्रेंच** लोकांस असें वाटतं

* प्राचीनकाळीं ग्रीस देशांत प्रसिद्ध कायदे करणारा होता.

होतें कीं, कसाही प्रबल शत्रु असला तरी तो आमच्यापुढें फारवेळ टिकणार नाहीं. परंतु **रशियन** लोकांचें धैर्य पाहून त्यांस असें वाटूं लागलें कीं, आह्मांसही कोणी शेरास सव्वाशेर असे आहेत. एक ग्रंथकार असें ह्मणतो कीं, आजपर्यंत **नापोलियन** यानें ज्या मोठ्या लढाया मारिल्या, त्यांपैकीं **ईलो** एथील लढाईप्रमाणें भयंकर फारच थोड्या असतील. ऐन हिंवाळ्यांत ही लढाई झाली. युद्धप्रसंग संपल्यावर रणांगणीं बर्फावर पन्नास हजारांवर लोक जखमी होऊन पडले होते. ते दुःखानें पाण्याकरितां किंकाळ्या फोडीत; त्यामुळें व त्यांप्रमाणेंच हजारों घोडे घायाळ होऊन रणभूमीवर पडले होते; त्यांच्या ओरडण्यानें रणभूमीचा आसमंतातभाग व्यापून गेला. शिवशिव ! परमेश्वरा, काय अनर्थ हा ! द्रव्याकरितां नव्हे, स्वदेश रक्षणाकरितां नव्हे, केवळ महत्वाकांक्षेमुळें इतक्या प्राण्यांचा नाश ! हरहर ! जळो तें शौर्य ! आगलागो त्या पराक्रमास. ईश्वरा, तुझ्या कृपेनें असे प्रसंग कोणत्याही देशावर न येवोत.

लढाई सुरू होऊन पुष्कळ दिवस झाले. युद्धप्रसंगही पुष्कळ झाले, तरी निकाल कांहींच होईना. त्यामुळें कांहीं विश्रांति घ्यावी असें वाटून **नापोलियन** व **रशियाचा** बादशाहा **अलेक्झांदर** या उभयतांसही तह करावा असें वाटूं लागलें. तह करावयाचा असें ठरून उभयतां बादशाहांच्या भेटीकरितां **नीमेन** नदीवर **तिलसित्** शहराजवळ एक मोठा प्रशस्त सुंदर तराफा तयार करविला. उभयतां बादशाहा होडींत बसून नदीच्या दोन्हीतीरांकडून तराफ्याजवळ चालले. नदीच्या दोहों बाजूंस दोघांचीं सैन्यें थाटानें उभीं राहिलीं होतीं. तोफांच्या आवाजांची गर्जना चालली होती. **नापोलियन** आधीं पोहोंचला. **अलेक्झांदर** येतांच उभयतांनीं मोठ्या प्रेमानें परस्परांस आलिंगिलें. तराफ्यावर उत्तम छत लावून बिछाईत घालून जागा तयार केली होती, तेथें ज्यांनीं लाखों मनुष्यांचा वध करविला, असे हे दोन्ही बादशाहा भावांप्रमाणें एकांतीं गोष्टी सांगत बसले. नंतर **तिलसित्** शहरीं जाऊन तहाच्या ठरावाकरितां ह्मणून उभयतां

बरेच दिवस मजा मारीत राहिले. खाणेंपिणें, गाणेंबजावणें करावें; एकमेकांनीं परस्परांच्या सैन्यांच्या कवाइती पहाव्या; याप्रमाणें चालले होतें. त्यामुळें असें दिसे कीं, सख्या भावांप्रमाणें या उभयतांमध्यें प्रेम आहे.

अलेक्झांदर याच्या आग्रहामुळें **प्रुशिया**च्या राजासही तेथें बोलाविलें. त्याबरोबर त्याची रूपवान् राणी होती तिला आपल्या नवऱ्याचा पूर्वीप्रमाणें मान राहिला नाहीं हें पाहून फार वाईट वाटलें तिच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या. या दुःखानें क्षीण होऊनच पुढें ती मेली. यामुळें तिच्या प्रजेस फार वाईट वाटलें.

तारीख ७ जुलई १८०७ या दिवशीं तहनाम्यावर सह्या झाल्या. **अलेक्झांदर** याच्या आग्रहामुळें **प्रुशिया**च्या राजास पुनः गादीवर बसविलें, आणि जुनें **प्रुशिया**चें राज्य होतें तेवढें त्याकडे ठेविलें इंग्लिश व्यापाऱ्यांचा माल न घेण्याचें त्यानें कबूल केलें. **प्रुशिया**नें नवीन जिंकिलेले **पोलंद**ांतील वगैरे सर्व प्रांत घेऊन तेथें वेगळालीं राज्यें आणि संस्थानें **नापोलियन** यानें स्थापिलीं. त्यांपैकीं एक राज्य त्यानें आपला भाऊ **जेरोम बोनापार्त** यास दिलें. हलक्या कुळांतील स्त्रीशीं लग्न केल्याबद्दल **नापोलियन** याचा या भावावर राग होता, परंतु त्या बायकोचा घटस्फोट करून आपल्या मनाप्रमाणें **वर्टेबर्ग**च्या राजाच्या मुलीशीं लग्न करितों, असें कबूल केल्यामुळें **नापोलियन** यानें त्यास पुनः महत्त्वास चढविलें.

पूर्वी **जोजेफ बोनापार्त** यास **नेल्प्स**चें व **लुईस बोनापार्त** यास **हालंद**चें राज्य दिलें; वगैरे सर्व गोष्टी **अलेक्झांदर** यानें मान्य केल्या. **अलेक्झांदर**ही **नापोलियन** यासारखा महत्त्वाकांक्षी होता. या दोघांनीं असा गुप्त ठराव केला होता कीं, **रशिया**चा आणि **तुर्कस्थान**चा बखेडा झाला असतां त्यांत **नापोलियन** यानें हात घालूंनये. व **फ्रान्सा**चा **स्पेन** व **पोर्तुगाल** यांशीं बखेडा झाला तर **अलेक्झांदर** यानें तिकडे पाहूंनये. शिवाय असें ठरलें होतें कीं, **नापोलियन** याच्या समंतीशिवाय **अलेक्झांदर** यानें

तुर्कस्थानाशीं सल्ला करूनये, व रशियाच्या संमतीशिवाय नापोलिपन यानें इंग्लंदाशीं सल्ला करूनये. याप्रमाणें हा प्रसिद्ध नह करून दोघां बादशाहांनीं सर्व यूरोपखंड आपल्या ताब्यांत आणण्याचा बेत केला होता.

भाग १२ वा.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें रशियाच्या बादशाहाशीं तह करून आणि निकडच्या हद्दीवर बंदोबस्ताकरितां चांगली फौज ठेवून नापोलियन पारिस येथें परत आला. त्या वेळेस ही सरकारी कामदारांनीं व लोकांनीं मोठ्या थाटानें त्याची गांठ घेतली. सर्वांच्या पुर्वी त्याची वारवाणणी जिकडे तिकडे चालली होती. या वेळेस बहुतेक यूरोपखंड त्याच्या ताब्यांत आल्यासारखें झालें होतें. नापोलियन याचें वैभव शिखरास पोहोंचण्याचा हाच काल होय. या पुढें सर्व यूरोपखंडास दिपवून टाकणारा त्याचा वैभवसूर्य अस्ताचलाकडे वळूं लागला.

तिल्सित् एथील तह झाल्यावर इंग्लिश सरकारानें असें ऐकिलें कीं देन्मार्कचीं गलबतें घेऊन पुन्हा इंग्लंदावर स्वारी करण्याचा नापोलियन याचा बेत आहे. यामुळें त्यानें लागलींच बाल्तिक समुद्रांतून कोपेनहेगेन शहराकडे लढाऊ गलबतें पाठवून देन्मार्कच्या फौजेचा अगदीं मोड करून त्यार्चीं पुष्कळ गलबतें घेतलीं. हें ऐकून नापोलियन यास फार राग आला.

पारिस येथें आल्यावर नापोलियन यानें राज्यव्यवस्थेंत कांहीं न्यूनता राहिल्या होत्या त्या काढून टाकण्याच्या कामाकडे आपलें मन लाविलें. देशाचे नवीन प्रांत कल्पून एकेका प्रांतावर एकएक मोठा अधिकारी नेमिला. ज्याचे ज्या प्रांतांत कोणी इष्टमित्र सोयरे-

धायरे नाहींत त्या मनुष्यास **नापोलियन** त्या प्रांताचा अधिकार देई. मोठा हुशार असेल त्यासच **नापोलियन** यापासून अधिकार मिळे. कामास नालायक अशा मनुष्याची **नापोलियन** यानें कोणत्याही का. मावर कधींही नेमणूक केली नाहीं. दुर्मार्गानें द्रव्य मिळविण्याची इच्छा होऊंनये ह्मणून **नापोलियन** यानें कामदारांस पगारही मोठमो ठेविले होते. कर्तबदारीप्रमाणें सर्वांस लौकर बढतीही मिळे; व चूक झाली असतां शिक्षेचें ही मोठें भय असे. मुलकी, दिवाणी, फौजदा. री वगैरे खात्यांची उत्तम व्यवस्था **नापोलियन** यानें केली. इतकें असून ही सर्वांवर **नापोलियन** याचा डोळा असे. एक उत्तम ग्रंथ. कार असें ह्मणतो कीं, मोठमोठ्या लढाया चालू असतां ही **नापोलि. यन** राज्यकारभारांतील सर्व लहान मोठ्या गोष्टी लक्ष लावून पहात असे. **नापोलियन** याकडे या वेळेस जेवढा मुलुख होता, तेवढ्या. च्या अर्ध्याएवढ्या मुलुखावर राज्य करणारे राजे शांततेच्या वेळेस. सुद्धां राज्य कारभाराकडे इतकें लक्ष देत नसतील. राज्य कारभाराचे श्रम पुष्कळ वेळ करून विश्रांति घेण्याच्या वेळेस तो बीजगणित, मि. मिति, यांतील बिकट प्रश्न सोडवीत बसे. त्याचें सर्व कामांत, सर्व कारभारांत, सर्व खात्यांत, चोहोंकडे सारखें लक्ष असे. कोणत्याच गोष्टीची त्यास नावड किंवा कंटाळा नसे. एका वेळेस सरकारी हि. शेबामध्यें कांहीं चूक सांपडली, त्या वेळेस त्यानें असा कांहीं बंदोबस्त केला कीं, जसें सरकारी हिशेबाचें दप्तर चोख राहूं लागलें तसें साव. काराचें ही रहाणे कठीण. अमुक गोष्ट करणें आपल्या योग्यतेस हल. कीपणाचें आहे, किंवा वेळ नाहीं, असें त्यानें कधीं ह्मटलें नाहीं, यामुळें लहान मोठ्या सर्व कामदारांस असें वाटे कीं, आपलें काम बादशाहा केव्हां पाहील कोण जाणे, यामुळें सर्व सरकारी कामदार आपापल्या कामांत सावध रहात.

विद्याखात्याची सुधारणा करून **नापोलियन** यानें शिक्षणपद्धति नवीन सुरू केली ह्मणून मागें सांगितलेंच आहे. युद्धकला शिकवि. ण्याच्या शाळा अशा युक्तीनें स्थापित केल्या होत्या कीं, सर्वांस त्या

गळांत जावें असें वाटावें. शिवाय असा कायदा केला होता कीं, पंचवीस वर्षांच्या आंत पुरुष असेल त्यानें वेळ पडेल त्यावेळेस सैन्यांत लढाईस आलें पाहिजे. कित्येक थोडक्या प्रसंगीं मात्र बदली दिला तर चालें. पहिल्यानें एकवीस वर्षांच्या वयाचे मनुष्य आणवावे, आणखी गरज लागली तर बेचीस वर्षांचे, याप्रमाणें पंचवीस वर्षांच्या वयापर्यंत प्रसंग पडेल तेव्हां मनुष्य बोलवावे असा ठराव केला होता. हा ठराव गरीब व श्रीमंत या सर्वांस सारखा लागू असे. एकुलताएक मुलगा असो, नवीन लग्न झालेला मनुष्य असो, लहान मुलांचा बाप असो, सरकारीं हुकूम येतांच कंबरेस तलवार बांधून पाहिजे तिकडे लढाईस जाण्यास तयार असलें पाहिजे; असा हा कायदा होता. हा कायदा फ्रान्स देशांत सोळा वर्षें चालू होता. या कायद्याप्रमाणें पहिल्यानें एकशें हजार लोक गोळा केले. आपला बादशाहा जाईल तिकडे जय होण्याचाच अशी खात्री असून संपत्ति व मान प्राप्त होण्याची सर्वांस इच्छा असे, व ती पुष्कळ वेळ सफळ ही होई; त्यामुळें लोकही संतोषानें सैन्यांत जात. शिवाय नवीन शिक्षापद्धति सुरू झाल्यापासून सैन्यांतील बहुतेक सर्व लोक शिकलेले होते, त्यामुळें मोठ्या कुलीन घराण्यांतील लोकांस सुद्धां सैन्यांत जाण्यांचें वाईट वाटत नसे. एक ग्रंथकार असें लिहितो कीं, इतके विद्वान्, सुशिक्षित, व कुलीन योद्धे ज्यांत आहेत असें सैन्य आजपर्यंत कधीच कोठें झालें नसेल.

वारंवार लढाया होत त्यांस खर्च फार लागे, व इंग्लंदाशीं व्यापार बंद झाल्यामुळें पैसा उत्पन्न करण्याकरितां **नापोलियन** यास वारंवार नवे कर बसवावे लागत, तरी ते निःपक्षपातानें बसवून योग्य रीतीनें वसूल केल्यामुळें लोकांस विशेष असह्य वाटत नसत. शिवाय देशांत शांतता झाल्यामुळें शेतकीची ही पुष्कळ सुधारणा झाली. रस्ते, पूल, कालवे, वगैरे लोकोपयोगी पुष्कळ कामें **नापोलियन** यानें करविलीं. त्यांमुळें गरीबगुरीबांस मजुरीही पुष्कळ मिळे. तेणेंकरून ते लोक संतुष्ट असत.

राज्यव्यवस्थेंत सुधारणा झाल्यावर **नापोलियन** इंग्लंदचा

व्यापार सर्व यूरोपखंडांतून काढण्याचा ठराव पूर्णपणें अमलांत आण-
ण्याचा यत्न करूं लागला. परंतु त्याचा हेतु पूर्ण होईना. रशिया-
च्या बादशाहानें तिल्सित् येथील तहांत ही गोष्ट अमलांत आणण्या-
चें कबूल केलें होतें. परंतु त्याप्रमाणें वागलें असतां आपल्या देशांती-
ल व्यापाऱ्यांचें नुकसान होईल, हें मनांत येऊन त्याच्यानें ती
गोष्ट सर्वांशीं अमलांत आणवेना. **नापोलियन** यास हें कपट कळले.
परंतु पल्ला दूर असल्यामुळें तह मोडणारास शासन करण्याचा बेत
त्यावेळीं बंद ठेवून आपल्या ठरावास पूर्णपणें अनुकूल न होणाऱ्या ज-
वळच्या दोन राजांस शिक्षा करण्याचें त्यानें मनांत आणिलें.

पोर्तुगाल व **स्पेन** या दोन देशांत इंग्लंदांतला माल फार थो
आणि तेथून इतर देशांत आणि **फ्रान्स** देशांतसुद्धां पसरे. यामुळें नापो
लियन यास फार राग आला. यावेळेस **स्पेन** देशांतील राज्यव्यवस्थेत
फारच घोंटाळा होता. राजा राज्यपदास अगदीं नालायक होता. राणी
अत्यंत दुराचारी होती. एका हलक्या मनुष्याशीं तिचें प्रेम जडल्यामुळें
तो प्रधान होऊन बसला. मग काय विचारावें, ' अबलायत्र प्रबला.
मूर्खोराजा, निरक्षरो मंत्री ' या वाक्याचा तेथें पूर्ण अंमल बसला.
या मूर्ख प्रधानाशीं तह करून **रशानिश** लोकांची फौज मदतीस दे-
ऊन व कांहीं **फ्रेंच** फौज बरोबर देऊन **नापोलियन** यानें आप-
एक सरदार **पोर्तुगाल** देशावर पाठविला. इतक्या लोकांशीं टिकाव
धरण्याची **पोर्तुगाल**च्या राजामध्यें ताकद नव्हती, त्यामुळें **नापो-
लियन** म्हणेल तें कितीही अपमानकारक असलें तरी कबूल क-
ण्याचा निश्चय करून त्यानें **इंग्लंद**च्या वकिलास घालवून दाकिलें.
आणि इंग्लिश व्यापाऱ्यांचा माल जप्त केला; तथापि कांहीं उपयो
झाला नाहीं. शेवटीं **नापोलियन** याच्या तडाक्यांतून आपण सुट
नाहीं, असें समजून **पोर्तुगाल**चा राजा **इंग्लिश**ांच्या साहाय्यानेंच
अमेरिकेंतील आपल्या **ब्रेझिल** देशच्या राज्यांत पळून गेला. हे
राजाचें भित्रेपणाचें कृत्य पाहून देशांतील लोकांनींही विशेष गडबड
केली नाहीं. याप्रमाणें रक्तपात न होतां **पोर्तुगाल** देश **फ्रेंच** लोकांच्या

साधीन झाला. **पोर्तुगाल** देशांत बंदोबस्त केल्यावर **फ्रेंच** लोकांची फौज हळूहळू **स्पेन** देशाकडे चाल करूं लागली. कित्येक ठिकाणें तिनें आपल्या ताब्यांत घेतलीं. तेव्हां आपलीही **पोर्तुगाल** देशाप्रमाणें अवस्था होणार असें **स्पानिश** लोकांस वाटूं लागलें. परंतु दरबारांत आंतल्याआंत भांडणें लागल्यामुळें इकडे कोणीं लक्ष पुरविलें नाहीं. उलटें दरबारांतील वेगळाल्या पक्षाचे लोक **नापोलियन** यास आपणास मदत करण्याविषयीं पत्रें पाठवीत. **नापोलियन** यानें कोणासच निकालाचें उत्तर न देतां पुढें सैन्य चालविलें होतें. शेवटीं **फ्रेंच** लोक अगदीं जवळ आले असें ऐकून **स्पेन** देशाचा राजा भयानें घाबरून आपल्या शेजाऱ्याप्रमाणें **अमेरिकेंत** पळून जाण्याचा बेत करूं लागला. राजाचा पळण्याचा बेत आहे, असें ऐकून देशांतील लोकांनीं त्यास न जाऊं देण्याकरितां बखेडा केला. त्यांनीं **गोडोई** या प्रधानाच्या घरावर हल्ला केला. हें ऐकून मीं राज्य सोडून मुलास गादीवर बसविलें असा राजानें जाहीरनामा काढिला.

राजानें राज्य सोडिलें असें ऐकतांच **फ्रेंच** सरदारानें आपलें सैन्य खुद्द **माद्रिद** शहराजवळ नेलें. राजपुत्र दूर होता; तो तेथें जाऊन राज्यकारभार हातांत घेणार तोंच त्यास हें विघ्न आलें. **फ्रेंच** लोकांची चाळीस हजार फौज तेथें होती. तिचा अधिकारी राजपुत्रास राजा असें कबूल करीना. कारण मीं स्वसंतोषानें राज्य सोडिलें नाहीं, असें राजानें **नापोलियन** यास गुप्तपणें लिहून पाठविलें होतें. इकडे **नापोलियन** स्वतः **स्पेन** देशाकडे येण्यास निघाल्याची बातमी सर्वलोकडे प्रसिद्ध झाली. तेव्हां **फ्रेंच** फौजेच्या अधिकाऱ्यानें राजपुत्रास सांगितलें कीं तुझी बादशाहाची गांठ घेण्यास पुढें जा, म्हणजे तो तुमचें म्हणणें कबूल करील. मी तुमच्या बरोबर येतों. निरुपायामुळें राजपुत्रानेंही हें म्हणणें कबूल केलें. **नापोलियन** जवळच भेटेल असें **फ्रेंच** सरदारानें प्रथम सांगितलें होतें. परंतु आज भेटेल

उद्यां भेटेल असें सांगून त्यास त्यानें वरेंच लांव नेलें. तेथें नापोलियन याची गांठ पडली. **नापोलियन** यानें पहिल्यानें राजपुत्राचें बरेंच आगतस्वागत केलें, परंतु दुसऱ्या मार्गानें राजा, राणी, व प्रधान यांस तेथें आणण्याची तजवीज केली होती. तेथें आल्यावर राणीनें अत्यंत लज्जास्पद नीच कृत्य केलें असें म्हणतात तें वाचण्यासुद्धां लाज वाटते. **नापोलियन** व आपला नवरा यांच्या समक्ष तिनें आपल्या मुलास सांगितलें कीं, तूं राजाच्या पोटचा नव्हेस. शिवशिव ! काय निर्लज्जपणा हा ! **यूरोपांतील** ग्रंथकार वारंवार लिहितात कीं, **एशियाखंडांतील** राजघराणीं दुराचारानें भरलेलीं असतात, परंतु त्यांतसुद्धां असें मासलेदार निस्सीम निर्लज्जपणाचें उदाहरण सांपडणें कठीण शेवटीं **नापोलियन** यानें सर्वांस सांगितलें कीं, तुमचें घराणें पदच्युत झालें. नंतर सर्वांस पेनशन देण्याचा ठराव करून देऊन इतालीं देशांत राहण्याची परवानगी दिली.

देशांतील राज्यव्यवस्थेंत घोंटाळा आहे, तो **नापोलियन** आपल्या वजनानें मोडून टाकील असें **स्पानिश** लोकांस वाटून कांहीं वेळ ते उगीच राहिले होते. परंतु तो राजवरण्यास पदच्युत करून आपल्या देशाची स्वतंत्रता समूळ नाहींशी करणार असें त्यानीं ऐकिलें तेव्हां त्यांच्या आंगचा स्वदेशाभिमान प्रज्वलित होऊन त्यांनीं स्वदेश शत्रूपासून सोडविण्यास जिवावर उदार होऊन यत्न केला. **फ्रेंच** लोकांवर एकदम हल्ला करून त्यांनीं पुष्कळ लोक कापून काढिले. स्वदेशाची स्वतंत्रता नष्ट होते असें ऐकून राजधानीजवळच्या गांवांतील शेतकरीसुद्धां आवेशानें धांवून आले; त्यांनींही शहरांत पुष्कळ धुमाळी केली. परंतु शेवटी **फ्रेंच** लोकांनीं सर्वांचा पराजय करून बंडाळी करणाऱ्या लोकांपैकीं पुढारी लोकांस देहांत शासन केलें. त्यामुळें कांहीं गडबड कमी झाली.

माद्रिदशिवाय इतर शहरींही याप्रमाणेंच गडबड झाली. सर्व लोक अपला देश परतंत्र होतो या संतापानें अंध झाले होते. त्यांनीं ठिकठिकाणच्या **फ्रेंच** लोकांची कत्तल केली. कोणी **फ्रान्स**

देशांतील मनुष्य सांपडला, किंवा स्वदेशांतील असूनही **नापोलियन** याच्या पक्षाचा आहे असें कळलें तर लागलींच त्याची राखरांगोळी झालीच म्हणून समजावें. याप्रमाणें **स्पेन**देशच्या लोकांनीं अत्यंत कृपणा करून पुष्कळ लोकांचे जीव घेतले. त्यांचा सूड उगविण्याकरितां हात फावला तेव्हां **फ्रेंच** लोकांनींही असेच भयंकर अनर्थ केले.

याप्रमाणें **स्पेन**च्या लोकांनीं शत्रूंचा सूड उगवून राजपुत्र **फर्दिनांद** हा **स्पेन** देशचा राजा होय, असे जाहीरनामे लाविले; आणि वेगळाल्या प्रांतांचे कारभार पाहण्यास कारभारी नेमून **फ्रेंच** लोकांचा पूर्ण पराभव करण्याकरितां **इंग्लंदा**ची मदत मागण्याविषयीं बोलणें चालविलें. **स्पेन** देशांत झालेली **फ्रेंच** लोकांची अवस्था ऐकून सर्व **यूरोपखंडां**तील **नापोलियन** याच्या शत्रूंस आनंद झाला. **स्पेन** देश सोडून परत जावें तर, **नापोलियन** जाईल तेथें जय व्हावयाचाच; असा जो आपल्या नांवाचा दरारा आहे तो जाईल; असें वाटून **नापोलियन** यानेंही तसेंच पाऊल पुढें चालविलें. तो आपला भाऊ **लुशियन बोनापार्त** यास **स्पेन**च्या गादीवर बसविणार होता; परंतु लोकांच्या भयानें त्यानें ती गोष्ट कबूल केली नाहीं. या वेळेस **मुरात्** हा **स्पेनदेशां**तील **फ्रेंच** सैन्याचा मुख्य अधिकारी होता. त्याला आपणास ही गादी मिळावी असें वाटत होतें; परंतु **स्पेन** देशच्या लोकांशीं गोडी गुलाबीनें वागून आपलें काम करून घ्यावयाचें तें न घेतां त्यांवर एकदम चाल केल्यामुळें यानें अविचारानें व उतावीळपणानें हा अनर्थ उत्पन्न केला; यामुळें **नापोलियन** यानें तसें केलें नाहीं. **मुरात् यास नेपल्सचें** राज्य देऊन तेथील नवीन बसविलेला राजा **जोजेफ़ बोनापार्त** यास **स्पेन**च्या गादीवर बसविण्याकरितां आणिलें. कित्येक पुढारी लोक फितूर होते त्यांच्या मदतीनें **जोजेफ़** यास **माद्रिद** येथें नेऊन गादीवर बसविलें; तथापि सर्व लोक त्याचा द्वेष करीत. स्वभावतः शांत असल्यामुळें **नेपल्स** येथें तो लोकप्रिय झाला होता. तो तेथें संतोषानें रहाता, पण **नापो-**

लियन याच्या आग्रहामुळें हें नवीन भयप्रद राज्यपद त्यास स्वी-
करावें लागलें.

इकडे स्पेनदेशच्या लोकांनीं मदतीकरितां इंग्लंदच्या राजाशीं बोलणें चालविलें होतें. त्यामुळें राजानें पार्लमेंत सभेस असें कळवि-लें कीं, आपले अतिप्रिय हक्क बुडविण्यास प्रवृत्त झालेल्या विश्वासघा-तीचें व जुलमाचें कांहींएक न चालूं देण्याविषयीं स्पानिश लोकांनीं दाखविलेली राजनिष्ठा व धैर्य हीं पाहून आह्मांस उत्साह उत्पन्न झाला आहे. फ्रेंच लोकांची लूट व जुलूम हीं नाहींतशीं करून टाकण्यास योग्य अभिमानानें प्रवृत्त झालेल्या देशाकडे इंग्लंदास शत्रुत्वानें पहा-तां येत नाहीं. असा देश स्वाभाविक मित्र असें समजलें पाहिजे. या राजाच्या अभिप्रायास पार्लमेंतसभेचें व इंग्लंदांतील सर्व लोकां-चें अनुमोदन पडलें. तेव्हां स्पेनच्या लोकांस साहाय्य करण्याचें ठ-रून मागील लढाईंत कैद केलेले सर्व स्पानिश लोक इंग्लिश सरका-रानें सोडून दिले. स्पेन देशाचा इंग्लिश सरकारापाशीं झालेला तह ऐकून पोर्तुगाल देशच्या लोकांनीं ही त्याप्रमाणेंच स्वसंरक्षणार्थ इंग्लं-दाशीं तह केला.

इंग्लिश लोकांनीं समुद्रावरच्या लढाईंत पुष्कळ वेळां फ्रेंच लोकांचा पराजय केला होता, परंतु त्यांशीं युरोप खंडांत जमिनीवर टक्कर दे-ण्याची चांगली संधि आजपर्यंत आली नव्हती. ती आल्यामुळें त्यांसही बरें वाटलें. या वेळेस दोन लक्ष अत्युत्तम फौज इंग्लिशसरकारापाशीं असून पाहिजे तेव्हां अधिक फौज तयार करण्याची सोय होती. व पुष्कळ देशांतील लोक आंतून त्यास अनुकूळ होते. शिवाय सर्व आर्थर वेलस्ली (ड्यूकआफ्वेलिंग्तन) हा नापोलियन यासीं टक्कर मारण्यास योग्य असा सेनापतिही सांपडल्यामुळें इंग्लंदास सर्व गोष्टी अनुकूळ झाल्या.

स्वतःची व इतर राजांची मिळून नापोलियन यापाशीं एकंदर पांच लक्ष फौज होती. परंतु जिंकलेले राजे पुनः उलटण्याचें भय असल्यामुळें ठिकठिकाणीं ठेवलेली फौज त्यास स्पेन देशाकडे एकवट

कांहीं आणितां येईना. **नापोलियन** यासारखा अद्वितीय पराक्रमी सेनापति व त्याच्या हाताखालीं वीर महावीर असे एकापेक्षां एक मेठे सरदार होते, तथापि सैन्यांतील लोक वेगळाल्या अनेक देशांतले असून भिन्नभिन्न भाषा बोलणारे असल्यामुळें, **इंग्लिशां**च्या सैन्याप्रमाणें त्यांच्यांत ऐक्य नव्हतें. **इंग्लिश** सैन्यही **पोर्तुगाल** देशांत उतरलें. तथापि एक दोन लढायांशिवाय विशेष म्हणण्यासारखें त्याच्या हातून कांहीं झालें नाहीं.

इंग्लंदाशीं तह होतांच तिकडून मदत येण्यापूर्वीच **स्पेन** देशच्या लोकांनीं लढाई सुरू केली. इकडून तिकडून त्यांनीं वाईट बरी कशी तरी फौज गोळा केली. फौजेंत व्यवस्था नाहीं, जवळ पैसा नाहीं, राजपुत्र **फ्रेंच** लोकांच्या अटकेंत, अशा अनेक अत्यंत प्रतिकूळ गोष्टी असून **स्पानिश** लोकांनीं कांहीं दिवस तरी **फ्रेंच** लोकांशीं टिकाव धरिला; यास त्यांचा देशाभिमानच कारण होय.

लढाई सुरू झाल्याबर **झारागोसा** वगैरे कित्येक ठिकाणीं **स्पानिश** लोकांनीं अशीं युद्धें केलीं कीं, **फ्रेंच** लोक पराजित होऊन घाबरूनच गेले. आजपर्यंत **फ्रेंच** फौज अजिंक्य असा लौकिक होता, तो नाहींसा होऊन तिचाही पराजय होतो, असें लोकांस वाटूं लागलें. या लढायांत सर्व ठिकाणीं **फ्रेंच** लोकांचा पराजय झाला असें नाहीं; तथापि शत्रूंचा पराक्रम पाहून एकादे वेळेस त्यांचीही पांचावर धारण बसे. **स्पानिश** लोकांनीं पुष्कळ पराक्रम केले, परंतु त्यांच्यांत बहुनायकी असल्यामुळें त्यांच्या पराक्रमाचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं. याप्रमाणेंच **पोर्तुगाल**च्या लोकांत आपसांत कलह सुरू असल्यामुळें शत्रूंस दहशत पडण्यासारखें त्यांच्या हातून कांहीं झालें नाहीं.

आजपर्यंत कधीं न झालेले असे मोठमोठाले आपल्या सैन्याचे पराभव झाले, **जोजेफ् माद्रिद** येथून निघून गेला, **इंग्लिश**सैन्य **स्पानिश** लोकांच्या मदतीस आलें, वगैरे गोष्टी ऐकून **नापोलियन** याचें मन फारच संतप्त झालें तेव्हां त्यानें दोन लाख फौज घेऊन स्वतः **स्पेन** देशावर तुटून पडण्याचा बेत केला. **पारिस**मधून पलटणें निघाला

तेव्हां त्यांस प्रोत्साहन देण्याकरितां **नापोलियन** यानें भाषण केलें तो ह्मणाला,–

"मित्र हो, **दान्यूब** आणि **विस्तुला** यानद्यांच्या काठांवर ए कामागून एक असे भराभर विजय मिळवून तुह्मी **जर्मनी**मधून आला क्षणभर विश्रांती घेतल्या शिवाय आज मी तुह्मांस **फ्रान्स** देशांतून जाण्यास सांगतों. वीरहो, तुमची मला जरूर आहे. त्या दुष्ट चित्त्यांच्या येण्यानें **स्पेन** आणि **पोर्तुगाल** हे देश अपवित्र झाले आहेत. तुह्मांस भिऊन खचित तो पळत सुटेल. विजयध्वज घेऊन आपणास **हर्क्युलीज्**[2] याच्या खांबांकडे गेलें पाहिजे. तेथें ही आपणास सूड उगवून घेणें आहे. शूर हो, अर्वाचीन काळच्या सैन्यांच्या कीर्तीस तुह्मीं हटविलें, परंतु एकाच मोहिमेंत **ऱ्हाईन**, **युफ्रेतीस**, **इल्लिरिआ** आणि **तेगस** इतक्या ठिकाणीं विजय मिळविणाऱ्या **रोमन** लोकांसारखी कीर्ति तुह्मीं मिळविली आहे काय? चिरकाल राहणारी शांतता आणि सतत स्थिर असणारी भरभराट हें तुमच्या श्रमांचें बक्षीस होईल. समुद्रांत पाहिजे तिकडे जाण्यास सर्वांस मोकळीक होईपर्यंत खऱ्या **फ्रेंच** मर्दानें स्वस्थ बसूंनये; व तो बसणारही नाहीं. बहादरहो, **फ्रेंच** लोकांच्या सुखाकरितां आणि माझ्या कीर्ती करितां जें तुह्मीं केलें, तें माझ्या अंतःकरणांतून कधीं नाहींसें होणार नाहीं."

नापोलियन यानें **स्पेन**देशांत जाण्याची तयारी केली; त्याच्या पूर्वींच **प्रुशिया**, **आस्त्रिया**, वगैरे जिंकलेल्या देशांतील लोकांचीं मनें त्याजवर रुष्ट झालीं होतीं. **आस्त्रिया**च्या बादशाहानें तर फौजेची खूप तयारी चालविली होती. तो **नापोलियन** यास सांगे कीं, तुर्कस्थानच्या सरहद्दीवर पाठविण्याकरितां ही फौज आहे. तथापि **नापोलियन** यास त्यानें स्पष्ट सांगितलें कीं **जोजेफ् बोनापार्त स्पेन**चा राजा आहे, असें मी कबूल करणार नाहीं. या गोष्टीनें संशय

१ पूर्वीं इंग्लंदच्या निशाणावर चित्ता असे. हल्लीं सिंह आहे.
२ जिब्राल्टर सामुद्रधुनीच्या दोहोंबाजूंस मोठाले खडक आहेत त्यांस हें नांव दिलें आहे.

घेऊन गेलेल्या बादशाहाचें मन कसें आहे, हें पाहण्याच्या इच्छेनें **नेपोलेयन** मोठ्या त्वरेनें **एर्फर्त** या ठिकाणीं गेला. **अलेक्झांदर** बिथरला नसल्यास **आस्त्रिया**चा समाचार पाहिजे तेव्हां घेतां येईल असे मनांत आणून तेथें येण्याविषयीं त्यानें **अलेक्झांदर** यास पूर्वी पत्र पाठविलें होतें. उभयतां बादशाहांची गांठ पडून पूर्वीप्रमाणें स्नेहभावानें भाषणें झालीं. उभयतांनीं मिळून तह करण्याकरितां इंग्लंडच्या राजास पत्र पाठविलें. परंतु **जोजेफ् बोनापार्ता**शिवाय **स्पेन** देशच्या राज्यावर कोणाचा हक्क नाहीं, असा दोघांचा आग्रह असल्यामुळें त्यांचें बोलणें मान्य झालें नाहीं.

सैन्य रवाना करून **नापोलियन** **एर्फर्त** येथें गेला होता. तेथून लौकर परत येऊन दोन दिवस **पारिस** येथें राहून सैन्यास मिळण्यास चालता झाला. वाटेंत पुष्कळ ठिकाणीं तुंबळ युद्धें करून शत्रूंचा पराभव करीत **फ्रेंच** लोकांचें सैन्य **माद्रिद** शहराजवळ जाऊन थडकलें. शत्रूंचें सैन्य शहराजवळ आलें असें कळतांच शहरांतील लोक क्षुब्ध होऊन गेले. त्यांच्या आवेशयुक्त वीरध्वनीमुळें चोहोंकडे जशी काय गर्जनाच होत आहे असें वाटे. शरण येण्याविषयीं दोन तीन वेळां **नापोलियन** यानें लोकांस निरोप पाठविला, परंतु कोणी जुमानीना. तेव्हां **फ्रेंच** लोकांनीं मारा सुरू केला. किल्ला, एक राजवाडा वगैरे शत्रूंनीं सर केला. हें पाहून **स्पानिश** लोकांची इतकी त्रेधा उडाली कीं, त्यांच्या मुख्यानें पुढें येऊन आम्ही स्वाधीन होतों म्हणून सांगितलें. नंतर **नापोलियन** यानें **स्पानिश** लोकांचीं हत्यारें घेतलीं. शहरांत चोहोंकडे **फ्रेंच** लोक पसरले. **नापोलियन** शहराबाहेर दोन कोसांवर राहिला. थोड्याच दिवसांनीं जिकडे तिकडे शांतता झाली. **फ्रेंच** सैन्यानें फार उत्तम बंदोबस्त ठेविला. व्यापारधंदे सुरू झाले. नाटकगृहांत नाटकें सुद्धां होऊं लागलीं. नंतर **नापोलियन** यानें सर्व प्रकारची राज्यव्यवस्था केली. दहा असामी मुख्य शिवाय करून सर्वांस क्षमा केली. मेजवानीस येऊन शहरांतील लोकांनीं **नापोलियन** यास सांगित-

ले कीं, जोझिफ़ आमचा राजा असावा अशी आमची इच्छा आहे. यावर **नापोलियन** यानें उत्तर दिलें कीं, मी स्वतः स्पेन देश जिंकिला आहे. कामदार नेमून त्याचा कारभार मला चालविता येईल; परंतु धर्माध्यक्ष व इतर लोक देवळांत जमून प्रजाधर्माने वागण्याची शपथ वहाल तर तुमची इच्छा पूर्ण करण्यास मजकडून हरकत नाहीं.

स्पेन एथील व्यवस्था केल्यावर **पोर्तुगाल** देश जिंकून लिस्बन शहरीं जाण्याचा **नापोलियन** याचा बेत होता, व हा बेत सहज तडीस गेला असता. परंतु **इंग्लिशां**चा सरदार सर् **जान् मूर** हा सैन्य घेऊन **स्पेन** देशांत येत आहे असें कळतांच **नापोलियन** सैन्य घेऊन तिकडे गेला. सर् **जान् मूर** मुख्यत्वेंकरून **स्पानिश** लोकांस मदत करण्यास आला होता, परंतु त्याच्या सैन्याची व्यवस्था नीट नसल्यामुळें त्याचा कांहीं उपाय चालेना. शेवटीं **फ्रेंच** लोक अगदीं जवळ आले असें पाहून त्यानें परत जाण्याचा विचार केला. परत जातेवेळेस त्याच्या सैन्याचे फार हाल झाले. शत्रु पाठीस लागलेले, डोंगरांतून जाण्याचे रस्ते खराब, हवा वाईट, बरोबरचें सामान अगदीं संपलें, यामुळें सैन्यांत अव्यवस्था झाली. सैन्यांतले लोक वाटेंतल्या लोकांस पीडा देत, दारू पिऊन झिंगत, पाहिजे तिकडे जात, तथापि शत्रूंकडील रणवाद्यें वाजतांच ते त्यांस टक्कर देण्यास तयार होत. असें करीत करीत ते ज्या बंदराजवळ जाऊन गलबतांत बसून परत जावयाचे होते त्या बंदराजवळ गेले; तरी फ्रेंच फौज त्यांच्या पाठीशीं होतीच. हें पाहून **मूर** यास वाटलें कीं, शत्रूंस शरण जाणें किंवा लढाई करणें या दोन गोष्टींपैकीं एक केल्याशिवाय आपल्या सैन्यास गलबतांवर चढतां येणार नाहीं. **मूर** महाशूर होता, त्यानें लढाई करण्याचा बेत केला. **इंग्लिश** लोकांनी जिवावर उदार होऊन युद्ध करून **फ्रेंच** लोकांस हटविलें, त्यामुळें त्यांच्या सैन्यास गलबतांवर जाण्यास सांपडलें; परंतु ऐन जयाच्या वेळेस **मूर** गोळी लागून पडला, त्यास पुरून **इंग्लिश** लोक चालते

झाले. हा एवढा शूर होता कीं, शत्रूंस सुद्धां त्याच्या शौर्याचें आश्चर्य वाटलें. त्यांनीं त्याच्या सन्मानार्थ त्याला पुरलें होतें तेथें पडगें बांधिलें. **इंग्लिश** लोकांचें सैन्य मागें पाय काढूं लागलें तेव्हां-च आपण स्वतः सामना करण्यास जाण्यासारखी **मूर**ची योग्यता नाहीं, असें समजून **नापोलियन** अगोदरच परत गेला होता. तो **पाद्रिद** येथें परत न जातां टपालाच्या गाडीनें मोठ्यात्वरेनें **पारिस** येथें गेला; हें ऐकून लोकांस मोठें आश्चर्य वाटलें.

नापोलियन स्पेन देशांतील लढाईंत गुंतला आहे व तेथील लोकांनींही मोठी स्वदेशप्रीति धरून त्यास हार न जाण्याचा यत्न चा-लविला आहे, हें ऐकून **आस्त्रिया**चा बादशाहा **फ्रान्सिस्** यानें पुनः **फ्रेंच** लोकांबरोबर लढाई करून त्यांचा पराभव करण्याचा बेत केला. **फ्रेंच** लोकांची फौज **स्पेन** देशांत सर् जान् **मूर** याच्या फौजेच्यामागें लागली होती तेव्हां, **नापोलियन** यानें हें वर्तमान ऐकिलें. लागलींच **आस्त्रिया**च्या फौजेकडे फौज रवाना करण्यास हुकूम पाठवून तो स्वतः आपण फारच मोठ्या त्वरेनें **पारिस** येथें गेला. सन १८०९ च्या वर्षीं एप्रिल महिन्यांत **आस्त्रिया** व **फ्रान्स** या दोन देशांतील तिसऱ्या लढाईस प्रारंभ झाला. यावेळेस **आस्त्रिया**च्या बादशाहानें पांच लक्ष फौज तयार करविली होती. **फ्रेंच** लोकांची पुष्कळ फौज **स्पेन** देशांत गुंतल्यामुळें **नापोलियन** यास भराभर पुष्कळ फौज एके ठिकाणीं जमविता येईना. तथापि लढाई सुरू करून आपण बोहेमकडून फौज आणून पूर्वीप्रमाणेंच **आस्त्रियन** लोकांची त्रेधा उड-वून टाकूं अशी त्याची खात्री होऊन एकदम त्यानें लढाईस सुरवात केली. प्रियपत्नी **जोसेफाईन** हिला बरोबर घेऊन **नापोलियन** एकटाच **आस्त्रिया**च्या फौजेकडे **फ्रेंच** लोकांचें सैन्य गेलें होतें त्यास मिळण्याकरितां निघाला. वाटेनें **जर्मनी**तील कित्येक शहरीं जाऊन सन १८०९ एप्रिल तारीख १३ या दिवशीं सैन्यास जाऊन मिळाला.

नापोलियन सैन्यास मिळाल्यावर लागलाच युद्धास आरंभ झाला. पहिल्यानें विसाव्या तारखेस **आस्त्रियन** लोकांच्या पन्नास

हजार फौजेशीं कडाक्याचें युद्ध झालें. त्यांत **फ्रेंच** लोकांनीं आस्त्रियन लोकांचा पराजय करून त्यांच्या तीस तोफा घेतल्या. नऊ हजार **आस्त्रियन** लोक रणांगणीं पडले. पुनः बेवीसाव्या तारखेस **आस्त्रियन** लोकांचा सेनापति **आर्चड्यूक् चार्लस्** यावरोबर **नापोलियन** याचें भयंकर तुंबल युद्ध **एक्मल्** या ठिकाणीं झालें. **चार्लस्** याजवळ एक लाख फौज होती. या युद्धांत **नापोलियन** यानें अति विलक्षण युद्ध कौशल्य दाखविलें कीं, युद्धकलेंत निपुण अशा मोठ्या विद्वानांस त्याचें अद्याप मोठें आश्चर्य वाटत आहे. या युद्धांत दोन्ही सैन्यांतील लोक अगदीं हातवाईवर येऊन मोठ्या निकरानें लढत होते. **आस्त्रियन** लोकांनींही मोठें शौर्य दाखविलें. तथापि प्रहर भर मोठी भयंकर कत्तल उडाल्यावर त्यांचें धैर्य खचलें. सैन्यांतील व्यवस्था मोडून लोक भांवावल्यासारखे पळूंलागले. तोफखाना, निशाणें, **फ्रेंच** लोकांच्या हातीं लागलीं. त्यांनीं वीस हजार **आस्त्रियन** लोक कैद केले. **आस्त्रियन** लोक **रातिस्बोन** शहराकडे पळून गेले. तेथें **फ्रेंच** लोकांनीं त्यांचा पाठलाग करून पराभव केला. या शहरास वेढा घालीत असतां **नापोलियन** याच्या पायास जखम झाली. तेव्हां सैन्यांतील लोक भिऊन त्याच्या भोंवतालीं जमले. जेव्हां सरासरी जखम बांधून तो लागलींच घोड्यावर बसला, तेव्हां लोक स्वस्थ झाले. याप्रमाणें पांच दिवसांत **नापोलियन** यानें शत्रूंचें सैन्य आपल्या सैन्यापेक्षां फारच मोठें असून केवळ आपल्या पराक्रमानें व कौशल्यानें त्याची धूळधाण करून टाकिली. चोविसाव्या तारखेस सर्व सैन्य एके ठिकाणीं करून सर्व लोकांस **नापोलियन** यानें मोठीं बक्षिसें दिलीं, आणि खुद्द **आस्त्रिया**ची राजधानी जें व्हिएना शहर त्यावर चाल करण्यास सुरवात केली.

वाटेनें एक दोन ठिकाणीं **आस्त्रियन** लोकांची गांठ पडली तेथें त्यांस हटवून तारीख ९ मे या दिवशीं **नापोलियन** व्हिएना शहराजवळ येऊन पोहोंचला. **नापोलियन** येण्यापूर्वीच **फ्रान्सिस** बादशाहा कुटुंबासुद्धां पळून गेला होता. फक्त त्याची मुलगी **मेरिआ**

लुईसा ही अजारी असल्यामुळें राजवाड्यांत राहिली होती. शहराच्या लोकांच्या मनांत कांहीं गडबड करावयाची होती; परंतु असला प्रयत्न करणें व्यर्थ आहे, असें समजून तेथील अधिकारी शहर शत्रूंस देऊन दहा हजार सैन्यासहवर्तमान निघून गेला. थोडा वेळ लढाई चालली होती, त्यावेळेस **फ्रेंच** लोक राजवाड्यावर गोळे घालीत होते, तेव्हां **नापोलियन** यानें ऐकिलें कीं, राजकन्या अजारी असल्यामुळें आंत राहिली आहे. हें ऐकतांच त्यानें राजवाड्यावर हल्ला करण्याची सैन्यास मनाई केली. तारीख १० मे या दिवशीं **फ्रेंच** लोकांनीं **व्हिएना** शहरांत प्रवेश केला. याप्रमाणें पुनः **नापोलियन** यानें **आस्त्रिया**च्या बादशाहाच्या राजवाड्यांत आपला मुक्काम केला.

या मोहिमेंतील सर्व लढायांचें वर्णन केलें असतां फार विस्तार होऊन त्या रक्तपूरांच्या गोष्टी वाचितांना मनुष्यास कंटाळा येईल, यासाठीं तसें करितां येत नाहीं. तथापि संक्षेपानें सांगितलें पाहिजे. **नापोलियन** स्वतः **व्हिएना** शहराकडे चाल करीत होता त्यावेळेस **पोलंड, इताली** वगैरे देशांत, व **आस्त्रिया**तही अनेक ठिकाणीं **फ्रेंच** आणि **आस्त्रियन** लोकांचीं युद्धें चाललींच होतीं. कित्येक ठिकाणीं **आस्त्रियन** लोकांनीं जयही मिळविला; परंतु **नापोलियन, आस्त्रियन** फौजेचा पूर्ण पराभव करून **व्हिएना** शहराकडे चालला आहे हें ऐकिल्यामुळें लोक निराश होत चालले. कित्येक भागांतले लोक तर स्वदेशाची स्वतंत्रता जाते यामुळें स्वदेशाभिमान धरून **स्पानिश** लोकांप्रमाणें असे पराक्रम करूं लागले कीं, **फ्रेंच** लोकांस मनांत भय वाटूं लागलें होतें. **नापोलियन** ही **व्हिएना** येथें कांहीं सैन्य ठेवून दुसरीकडे लढाया चालल्या होत्या तिकडे गेला. या लढाया एवढ्या मोठ्या भयंकर आहेत कीं, त्या वाचूनसुद्धां अंगावर कांटा उभा रहातो. **दान्यूब** नदीजवळ आणि **टायरोल्** पर्वताजवळ फारच मोठीं तुंबळ युद्धें झालीं. हजारों लोक **फ्रेंच** लोकांनीं कैद केले. कित्येक ठिकाणचे लोक स्वदेश प्रीतीचा चेव येऊन लढूं लागले होते; त्यांच्या पुढाऱ्यांस देहांत शिक्षा दिल्या. शेवटीं **वाग्राम** नांवाच्या

शहराजवळ तारीख ९ जुलई या दिवशीं **फ्रेंच** आणि **आस्त्रियन** लो कांचें फारच मोठें रण होऊन रक्ताचे पूर वहाले. या लढाईंत **आस्त्रियन** लोकांचें सर्व सामान व वीस हजार लोक **फ्रेंच** लोकांच्या हातीं लागले. या युद्धा नंतर **आस्त्रियन** लोक हतवीर्य होऊन तह करण्यास कबूल झाले.

आस्त्रियामध्यें लढाई सुरू असतां इकडे **स्पेन** आणि **पोर्तुगाल** या देशांतील लोक **इंग्लिश** सैन्याच्या मदतीनें लढाई करीतच होते. परंतु **इंग्लिश** सैन्यांत रोग उत्पन्न झाल्यामुळें ते परत गेले. इकडे **वाग्राम** येथें पराभव झाल्यामुळें **आस्त्रिया**चा बादशाहा **नापोलियन** याशीं तह करणार, वगैरे गोष्टी ऐकिल्यामुळें त्या लोकांनीं युद्ध सोडून दिलें.

लढाई संपवून **नापोलियन** **व्हिएना** येथें परत येत असतांना त्याच्या प्राणावर एक संकट गुदरलें; परंतु नशीबानें तो या अपमृत्यू च्या तडाक्यांतून सुटला. **नापोलियन** आपल्या लोकांमध्यें उभा असतां एका पाद्र्याच्या तरुण मुलानें त्यावर कटयार फेंकली. ती **नापोलियन** याच्या पोटांत शिरणार इतक्यांत जवळच्या मनुष्यानें पुढें होऊन तो घाय चुकविला. नंतर **नापोलियन** यानें त्या मनुष्यास असें करण्याचें कारण विचारिलें. तो म्हणाला, म्यां तुला काय पीडा केली? तेव्हां तो मनुष्य म्हणाला, "खुद्द मला त्वां कांहीं पीडा केली नाहीं. परंतु तूं माझ्या देशास त्रास देणारा असून सर्व जगावर जुलूम करणारा आहेस. तुला ठार मारणें हें अब्रूदार मनुष्यास भूषणप्रद होय." नंतर लागलींच या मनुष्यास कृतकर्माच्या प्रायश्चितार्थ देहांतशासन भोगावें लागलें.

लढाई संपल्यावर तहांचीं बोलणीं चाललीं असतां **नापोलियन** मोठ्या डौलानें **व्हिएना** येथें थाटमाट करून रहात होता. येथें असतांना पुनः एकवार **रोम**च्या **पोपा**चें आणि याचें भांडण सुरू झालें. पूर्वी **पोपा**नें निरुपाय होऊन **नापोलियन** याशीं तह केला होता. परंतु धर्मसंबंधाच्या खात्याची पुष्कळ व्यवस्था **नापोलियन** यानें

आपल्याकडे ठेविली होती म्हणून त्यास मनांत वाईट वाटत होतें. फ्रेंच लोकांवर शस्त्र धरण्यास पोर्तुगीज व स्पानिश लोकांस विशेषकरून धर्माध्यक्षांनीं फार उत्तेजन दिलें, त्यामुळें पोपाचेंही त्यांत अंग असावें असें **नापोलियन** यास वाटूं लागलें. शिवाय बर्लिन येथील **इंग्लंद**चा व्यापार बंद करण्याचा जाहीरनामा अमलांत आणण्यास पूर्णपणें मदतकरून **इंग्लंद**शीं लढाई करण्यांत देखील **पोपानें** मदत करावी असें **नापोलियन** यास वाटे, परंतु **पोपा**च्यानें तें होईना, तेव्हां **नापोलियन** यानें **पोपा**चे मुलुख घेतले. शेवटीं **रोम** शहरही घेऊन **फ्रान्स** देशाच्या राज्यास जोडिलें, आणि **पोपास** धर्माध्यक्ष या नात्यानें पेनशन करून देऊन राज्याच्या संबंधानें **पोपास** कोणत्याही प्रकारें हक्क राहिला नाहीं असा जाहीरनामा लाविला. **रोम** येथें राज्यकारभार पाहण्यास कित्येक लोकांच्या **नापोलियन** यानें नेमणुका केल्या. याप्रमाणें होतांच **नापोलियन** यास बहिष्कार घातला आहे, असे **पोपानें** जाहीरनामे लाविले. **पोपाचें** राज्य घेतल्यामुळें **रोम** येथें बरेंवाईट होण्याचा रंग दिसूं लागला, म्हणून **नापोलियन** यानें **पापास फ्रान्स** देशांत नेलें. तेथें **पोप** अटकेंत असल्याप्रमाणें पुष्कळ दिवस होता, तरी **नापोलियन** यानें त्याचा मानमर्तब उत्तम ठेविला होता.

पुष्कळ दिवस तहाच्या ठरावांबद्दल बोलणें चालून शेवटीं तारीख १२ आक्तोबर रोजीं **नापोलियन** व **आस्त्रिया**चा बादशाहा यांमध्यें तह ठरला. बादशाहाला **नापोलियन** यास अनेक ठिकाणचा पुष्कळ मुलुख द्यावा लागला. एकंदर औरसचौरस पंचेचाळीस हजार मैल मुलुख **नापोलियन** यास बादशाहा पासून मिळाला. त्यापैकीं कांहीं त्यानें आपल्या संस्थानिकांस दिला, व कांहीं आपल्या इटाली देशांतील राज्यास जोडिला. **वाग्राम** वगैरे ठिकाणीं **आस्त्रियन** लोकांचे पराभव झाले त्यावरून हा तह **आस्त्रिया**च्या बादशाहास अगदीं प्रतिकूळ होईल असें लोकांस वाटत होतें, परंतु बादशा-

हावर फार ओझें न घालितां **नापोलियन** यानें तह केला, हें पाहून सर्व लोकांस मोठें आश्चर्य वाटलें. **रशिया**च्या बादशाहाच्या भिडेमुळें मी यावेळेस **आस्त्रियास** सोडून दिलें, असें **नापोलियन** म्हणे, परंतु याचें कारण वेगळेंच होतें तें पुढें स्पष्ट होईल.

तह झाल्यावर लागलाच **नापोलियन** व्हिएना येथून निघून **फ्रान्स** देशीं गेला. **पारिस** येथें पोहोंचल्यावर त्याच्या नांवाचा मोठा जयजयकार झाला. तारीख १४ नोवेंबर या दिवशीं मोठा दरबार झाला. त्या वेळेस "शूरांमध्यें महाश्रेष्ठ, केवळ जगाच्या कल्याणाकरितां राज्य संपादन करणारा," अशी त्याची स्तुति झाली.

भाग १३ वा.

स्पेन व **पोर्तुगाल** यांवर स्वारी करणें, **पोप**चें राज्य घेणें, वगैरे गोष्टींनीं **युरोपखंडां**तील लोक **नापोलियन** यावर रुष्ट झाले होते, तथापि **नापोलियन** याचा आपलें महत्व वाढविण्याचा प्रयत्न चालूच होता. त्यानें **फ्रान्स**देशीं आल्यावर लोकांस सांगितलें कीं, 'सर्व **युरोपखंडा**मध्यें मला कोणी शत्रु राहिला नाहीं. फक्त **स्पेन** देशामध्यें मात्र थोड्याशा बंडखोरांनीं लहानसा बखेडा केला आहे, परंतु त्याकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे असें नाहीं. फक्त एक चिंता राहिला आहे, त्याचा समुद्रांत पाठलाग करितां येईल. सर्व लक्ष सार्वजनिक हिताकडे लागलें आहे. बादशाही घराण्याची व्यवस्था करावी असें माझ्या मनांत आहे. मी व माझ्या कुटुंबांतील माणसें **फ्रेंच** लोकांच्या कल्याणाकरितां पाहिजे ती हानि सोसण्यास नेहमीं तयार आहों. फार काय, पण जे अत्यंत प्रिय प्रेमपाश व मनोरथ ते सुद्धां सोडून देऊं.' **नापोलियन** आणि **जोसे**फार्न यांची एकमेकांवर अत्यंत प्रीति असे. सुस्वभाव आणि परोपकार

या गुणांनीं **जोसेफाईन** लोकप्रिय झाली होती, त्यामुळें राज्यप्राप्ति करून घ्यावयाच्या कामांत **नापोलियन** यासही पुष्कळ उपयोग होता. तिच्या संगतीमुळें त्याच्या आंगचा क्रूरपणा पुष्कळ कमी झाला होता. ती त्याच्या सुखदुःखांची सारखी विभागी असे. त्याच्या महत्त्वाकांक्षेमुळें आपलाही नाश होईल, असें सतत तिला वाटे तरी त्याचें वर्चस्व वाढविण्याविषयीं ती नेहमीं झटत असे. तथापि तिच्या पोटीं आपणास संतति होत नाहीं, हें पाहून **नापोलियन** याचें मन उद्विग्न होऊं लागलें.

बादशाही प्राप्त झाल्यापासून **नापोलियन** संततीविषयीं फारच उत्सुक झाला होता. **नापोलियन** यास वंशपरंपरेनें **फ्रान्स** देशाचें राज्यपद द्यावें, असें ठरल्यापासून **जोसेफाईन** चिंताक्रांत झाली. ख्रिस्तधर्माप्रमाणें एक बायको जिवंत असतां दुसरी करण्याची मनाई आहे, यामुळें **युरोपांतील** लोक अनेक वेळां राजकीय संबंधानें घटस्फोट करितात, त्याप्रमाणें संतति न झाल्यास आपणावरही तसा प्रसंग यावयाचा असें तिला वाटूं लागलें. एकादे वेळेस तिला असें वाटे कीं, आपला मुलगा **युजिन** यास **नापोलियन** आपला वारस करील. कारण **नापोलियन** निपुत्रिक मेला असतां **इंताली** देशाची गादी **युजिन** यास द्यावी असें ठरलें होतें. **जोसेफाईन** हिच्या मुलीशीं **लुइस बोनापार्त** यानें लग्न लाविलें होतें; त्यास एक मुलगा झाला होता, तो **नापोलियन** याचा फार लाडका होता, त्यामुळें कित्येकांस वाटे कीं, हा **फ्रान्स** देशाच्या गादीवर बसेल. परंतु तो मुलगा लौकरच मेला त्यामुळें **जोसेफाईन** हिची काडी मोडून देण्याचा **नापोलियन** विचार करूं लागला.

तिल्सिट येथिल तहाच्या वेळेस व **एर्फर्त** येथें गांठ पडली त्या वेळेस **रशियाचा** बादशाहा **अलेक्झांदर** यापाशीं त्याच्या बहिणीस वरण्याविषयीं **नापोलियन** यानें इच्छा प्रदर्शित केली. परंतु **अलेक्झांदर** याच्या आईच्या मनास **नापोलियन** याची वर्तणूक अगदीं गैर वाटत असे; त्यामुळें ही गोष्ट सिद्धीस गेली नाहीं. यामुळेंच **रशि-**

यासीं आपलें सख्य राहणें कठीण आहे, असें **नापोलियन** यास वाटूं लागलें. **अलेक्झांदर** यानें लग्न होण्यास धर्मसंबंधाच्या वगैरे कांहीं नडी सांगितल्या.

जोसेफाईन हिचा घटस्फोट करण्याचें **नापोलियन** यानें मनांत न आणिलें तरी हें काम मोठें बिकट व वाईट होतें. जी आपणावर कायिक, वाचिक, मानसिक, खरी प्रीति करिते, जिनें सुखदुःखांत समविभागी होऊन आपलें पुष्कळ हित केलें, अशा स्त्रीचा विनाकारण घटस्फोट करणें म्हणजे फारच मोठें वाईट कृत्य होय. याकरितां ते नडीस जाण्यास फार अडचणी होत्या. **नापोलियन** याची इच्छा जाणून त्याची मर्जी संपादण्याकरितां **फोके** यानें एके दिवशीं महत्त बोलत असतां **जोसेफाईन** हिला विचारिलें कीं, **फ्रान्स** देशाच्या हिताकरितां तुझी स्वहितावर पाणी सोडाल काय ? हे शब्द ऐकून **जोसेफाईन** चकित झाली. **फोके** यास एकदम निघून जाण्यास सांगून ती लागलीच **नापोलियन** यापाशीं गेली, आणि तुझी यास असें विचारण्यास सांगितलें कीं काय, असें विचारूं लागली. **नापोलियन** यानें मीं सांगितलें नाहीं, असें उत्तर देऊन **फोके** यावर गैर मर्जी झाली असें दाखविलें. परंतु त्यास चाकरीवरून घालवून देण्याविषयीं **जोसेफाईन** आग्रहानें सांगत होती, तें त्यानें ऐकिलें नाहीं; तेव्हांच आपलें नशीब फिरलें असें तिला कळून आलें.

लुलरीस या राजवाड्यांत **नापोलियन** याची वसण्याची जागा होती, तिच्यावरच्या मजल्यावरच **जोसेफाईन** हिची वसावयाची जागा होती, त्यांमध्यें एक गुप्त वाट असे. **नापोलियन** यास **जोसेफाईन** हिला गोष्टी सांगण्यास खालीं बोलवावयाचें असल्यास ती गुप्त वाटेनें जाऊन दारावर थाप मारी. याप्रमाणें उभयतांच्या अत्यंत प्रेमाच्या वेळेस तीं पुष्कळ वेळपर्यंत बहुत वेळां बोलत बसत. परंतु **आस्त्रिया** देशांतून आल्यावर **जोसेफाईन** हिच्या सखींच्या जरेम असें आलें कीं, हल्लीं पहिल्यापेक्षां फारच वेळां दारावर थाप वाजते. थाप ऐकतांक्षणींच पूर्वी **जोसेफाईन** मोठ्या आनंदानें दार

उघडून जाई, त्याप्रमाणें न करितां दार ठोठावल्याबरोबर तिला फारच दुःख होतें असें दिसूं लागलें. एके दिवशीं रात्रीस जेवण झाल्यावर **नापोलियन** यानें सर्व चाकरमाणसांस दूर जाण्यास सांगितलें, तेव्हां आपल्या दुर्दैवाची घडी येऊन पोहोंचली हें **जोसेफाईन** समजली. **नापोलियन** याच्या शरीरास कंप सुटला होता. **जोसेफाईन** तर भयानें अगदीं विव्हळ झाली होती. शेवटीं **नापोलियन** तिचा हात धरून आपल्या छातीवर ठेऊन आणि क्षणभर उगाच तिजकडे मुकाल्यानें बघून नंतर बोलूं लागला. प्रिये, तुजवर माझी किती प्रीति आहे, हें तुला ठाऊक आहे. या जगांत मला सुख म्हणून जें कांहीं प्राप्त झालें, तें सर्व तुझ्यामुळें आहे. परंतु माझें दैव माझ्या मनोरथांपुढें धांवतें. **फ्रान्स** देशाच्या हिताकरितां मला सर्व प्रेमपाश एकीकडे ठेवणें प्राप्त आहे. हें ऐकतांच **जोसेफाईन** म्हणाली, पुरे आतां, बोलूं नका. आपण बोलणार तें मला कळलें. परंतु हा घाय फार मोठा आहे.

याप्रमाणें होऊन शेवटीं तारीख ५ दिसेंबर सन १८०९ या दिवशीं घटस्फोट करण्याचें ठरलें. नंतर १५ व्या तारखेस **नापोलियन** यानें मोठा दरबार भरविला, आणि तेथें सर्व बड्या लोकांस सांगितलें कीं, सर्व प्रकारें **फ्रान्स** देशाचे हितास तत्पर होऊन स्वहितास लाथ मारून मी या प्रिय पत्नीपासून वियुक्त होण्यास सिद्ध झालों. **जोसेफाईन** ही तेथें आली. तिच्या नेत्रांतून सतत अश्रुधारा चालल्या होत्या. तथापि तिनें ही पतीच्या करण्यास आपली मान्यता प्रदर्शित केली. नंतर लोकांनीं देश हितार्थ स्वहित त्याग करण्याबद्दल उभयतांची फारच स्तुति केली. **जोसेफाईन** हिची बादशाहीण ही पदवी कायम ठेवून तिला सरकारी खजिन्यांतून दोन लक्ष **फ्रांक*** पेनशन देण्याचें ठरलें. याशिवाय **नापोलियन** यांनें आपल्या खासगी उत्पन्नांतून एक लक्ष **फ्रांक** दुसरें पेनशन देण्याचें ठरविलें. घटस्फोट झा-

* एक फ्रांक एक रुपयाच्या $\frac{3}{5}$ बरोबर आहे.

ल्यावर जोसेफाईन तुलरीस येथून निघून मालमेसन् येथें रहा-
वयास गेली.

याप्रमाणें जोसेफाईन हिचा घटस्फोट करून आस्त्रियाच्या बादशाहाची कन्या जी व्हिएना शहर फ्रेंच लोकांनी घेतले तेव्हां आजारी असल्यामुळें राजवाड्यांत राहिली होती, तिला वरण्याविषयीं नापोलियन यानें बोलणें लाविलें. शेवटीं विवाहाचा निश्चय होऊन राजकन्या व्हिएना शहरांतून फ्रान्स देशाकडे येण्यास निघाली. नापोलियन ही आपल्या नववधूला भेटण्यास पारिस एथून निघाला. उभयतां समीप आल्यावर नापोलियन मोठ्या त्वरेनें राजकन्येजवळ गेला. पूर्वी राजकन्येनें नापोलियन यास प्रत्यक्ष पाहिलें नव्हतें. त्यामुळें एकाएकीं त्याची शांत गंभीर मुद्रा पहातांच ती म्हणाली, मीं पाहिलेली महाराजांची तसबीर बरोबर निघाली नाहीं. या वेळेस नापोलियन चाळीस वर्षांचा होता. चेहरा वगैरे भरून आल्यामुळें त्याचा आंगलोट या वेळेस फार सुंदर दिसत होता. तारीख २ माहे एप्रिल सन १८१० या दिवशीं पारिस येथें उभयतांचें मोठ्या थाटानें लग्न झालें.

नव्या राणीकरितां नापोलियन यानें फार सुंदर जागा व सामान तयार केलें होतें. त्यांत अशी खुबी करविली होती कीं, बापाच्या घरीं असतांना जे तिच्या जवळ पदार्थ होते, ते सर्व एकूनएक तसे हुबेहुब करविले होते. लग्न झाल्यावर कांहीं दिवस तो नेहमीं आपल्या नव्या तरुण प्रियवल्लभे बरोबर क्रीडा करण्यांत निमग्न असे. पहिल्या बायकोचें खुबीदार चातुर्ययुक्त मोहक भाषण मनांत येऊन आणि नवीचा लहानपणाचा साधेपणा पाहून त्यास मोठें आश्चर्य वाटे. दोन्ही बायकांची आपणावर अत्यंत प्रीति असे, असें तो सेंटहिलिना येथें असतां स्वमुखानें सांगत असे. जोसेफाईन हिचा परिचय करून घेण्याविषयीं नापोलियन यानें दुसऱ्या बायकोस फार आग्रह केला, परंतु उपयोग झाला नाहीं. शेवटीं तो वारंवार जोसेफाईन रहात असे तेथें जाई, तेंही त्यास बंद करावें लागलें.

नवीन शरीरसंबंधापासून **फ्रान्स** देशांतील बडे लोकांस मोठा आनंद झाला. त्यांस वाटलें आतां पराजांशीं तह होऊन लढाया बंद होऊन पूर्ण स्वस्थता होईल. परंतु या संबंधापासून पुष्कळ लोकांस वाईट वाटलें. **स्पेन** देशावरची स्वारी आणि **आस्त्रिया**च्या बादशाहाच्या मुलीशीं लग्न, हीं दोन माझ्या नाशाचीं मुख्य कारणें होत, असें, **नापोलियन सेंतहिलीना** येथें म्हणत असे. तो म्हणे, **रशिया**च्या बादशाहाच्या मुलीशीं लग्न करितों तर लोकांस इतकें वाईट वाटलें नसतें, व फार आग्रह करितों तर **अलेक्झांदर** यानेंही माझें म्हणणें मान्य केलें असतें. या नव्या शरीरसंबंधापासून वेगळाल्या कारणांनीं सर्व लोक असंतुष्ट झाले. दुष्ट जुलमी राजाशीं हाडवैर धरून त्यांचें निर्दलन करून लोक सत्ताकराज्य स्थापण्याच्या उद्देशानें राज्यक्रांति होण्यास ज्यांनीं मदत केली होती, त्या लोकांस आपल्या उद्योगानें उदयास आलेल्या विजयी पुरुषानें राजघराण्याशीं शरीरसंबंध केला हें पाहून फारच वाईट वाटलें. कित्येकांस, आपली महत्वाकांक्षा तृप्त करण्याकरितां **जोसेफाईन** सारख्या उत्तम स्त्रीचा **नापोलियन** यानें त्याग केला यापासून फार राग आला. **नापोलियन** निपुत्रिक मेला तर पूर्वीच्या राजघराण्यास पुनः गादी प्राप्त होईल अशी राजपक्षाच्या लोकांस आशा होती, ती नष्ट झाल्यामुळें ते फार खट्टू झाले. **नापोलियन** याचे मुख्य सरदार होते त्यांस असें वाटत होतें कीं, **शिकंदरबादशाहा** मेल्यावर त्याच्या सरदारांनीं त्याचें राज्य वांटून घेतलें, त्याप्रमाणें आपण करूं; हा त्यांचा मनोरथ भग्न झाल्यामुळें ते दिलगीर झाले.

नव्या शरीरसंबंधापासून लोक उद्विग्न झाले होते, तोंच **नापोलियन** याच्या हातून आणखी एक वाईट कृत्य घडलें, त्यामुळें त्याच्या वैभवाचा पाया ढिला होण्यास आरंभ होऊं लागला. त्यानें आपला भाऊ **लुईस बोनापार्त** यास **हालंद**च्या गादीवर बसविलें, तेव्हां सर्व राज्यकारभारांत प्रथमतः माझ्या महत्वाकडे तुझें लक्ष्य असलें पाहिजे, नंतर **फ्रान्स** देशाच्या हिताकडे, नंतर **हालंद** देशाकडे, असें सांगितलें होतें. **लुईस** स्वभावतः परोपकारी असे. व त्यापा-

शीं हालंद देशांतले प्रधान होते ते फार हुशार असत. त्यांच्या अं-
र्गी स्वदेशाभिमान फार असे. त्यामुळें त्याच्यानें **नापोलियन** याचें
स्मरणें एकदम अमलांत आणवत नसे. तो जसजसा **हालंद** देशांत
लोकप्रिय झाला, तसतसा **नापोलियन** त्यावर फारच नाखुष झाला.
शेवटीं **बर्लिन** येथील जाहीरनाम्याप्रमाणें न वागणारांकडे हा काना-
डोळा करितो, असें समजून **नापोलियन** यानें त्यास एकदम पारिस
येथें येण्यास हुकूम केला. **पारिस** एथें आल्यावर **नापोलियन**
यानें त्यास पदच्युत केलें. नंतर तो लांव एका शहरीं जाऊन सुखव-
स्तु राहिला. **हालंद** देशांत अद्याप त्याचें नांव प्रिय आहे. त्याची
बायको **जोसेफाईन** हिची मुलगी **नापोलियन** याच्या इच्छेप्रमाणे
नवऱ्यास वागण्यास सांगत असे, त्यामुळें ती तेथें अप्रिय झाली होती.
नवरा पदच्युत झाल्यावर ती आपली आई वैभवच्युत झाली हें मनांत
न आणितां **पारिस** येथें राहिली. तारीख ९ जुलई सन १८१० या
दिवशीं **नापोलियन** यानें **हालंद**चें राज्य **फ्रान्स**च्या राज्यास जो-
डिलें. याप्रमाणें **जर्मनी**तले आणखीं कित्येक मुलुख त्यानें **फ्रान्स**
देशास जोडले.

हालंद देश **फ्रान्स** देशास जोडिल्यावर **स्वीदन** देशांत वखेडा
झाला. **बर्लिन** येथील जाहीरनाम्याप्रमाणें न वागण्याबद्दल **नापो-**
लियन यानें त्या राज्याचे कांहीं प्रांत घेतले. परंतु यावेळेस **स्वीदन**
देशच्या गादीवर असलेला राजा हुषार नव्हता. **नापोलियन**ासार-
ख्या प्रबल शत्रूशीं कलह मांडणें योग्य नाहीं, असें लोकांस वाटे, परंतु
तें त्याच्या मनास येईना. शिवाय दुसऱ्या कित्येक कारणांनीं तो अ-
गदीं अप्रिय झाला होता. शेवटीं त्यास पदच्युत करून लोकांनीं
त्याच्या चुलत्यास गादीवर बसविलें. त्यामुळें **फ्रान्स** व **स्वीदन** या दे-
शांत पुनः तह झाला. **इंग्लंद**चा व्यापार **स्वीदन** देशांत अगदीं बंद
झाला. पुढें थोड्याच दिवसांनीं राज्याचा पुढील वारस मेला. त्या-
मुळें त्याच्या जागेवर कोणास निवडावें याविषयीं **स्वीदन**चे लोक
विचार करूं लागले. सर्वानुमतें **फ्रान्स** देशांतील सरदार **बर्नादोत**े

यास आणावें असें ठरलें. हा सरदार मोठा शूर असून नीतिमान् व शांत असे. व यास गादी दिली असतां **नापोलियन** यास वरें वाटेल, असें समजून **स्वीदन**च्या लोकांनीं त्याची निवड केली. **बर्नादोत्ते** हा आपल्या कृत्यास अनुकूल नाहीं, हें **नापोलियन** यास पक्कें माहीत होतें. त्यामुळें तो मनांतून त्यास अगदीं आवडत नसे. परंतु मंत्र्यांतील लोकांत व इतर लोकांत त्याची मान्यता मोटी असल्यामुळें **नापोलियन** याच्यानें त्याच्याविरुद्ध उघड बोलवेना. त्यास हा अधिकार मिळूंनये असें **नापोलियन** याच्या मनांत होतें; परंतु असें केलें असतां **फ्रान्स** व **स्वीदन** या दोन्ही देशांतील लोकांस फारच वाईट वाटेल, असें समजून त्यानें रुकार दिला. **पारिस** येथून जाण्याच्या वेळेस **फ्रान्स** देशावर कधीं शस्त्र धरणार नाहीं असें लिहून देण्यास **नापोलियन** यानें सांगितलें; तेव्हां **बर्नादोत्ते** म्हणाला, आपणास राजांचीं कर्तव्यकर्में माहित आहेत, ही आपली कल्पना नव्हे, कोणी तरी वकिलानें सांगितली आहे. मी असा करार लिहून देणार नाहीं. **नापोलियन** रागावून म्हणाला, वरें जा, आमचें काय तोंसें असेल तें होईल. न ऐकिलेंसें करून **बर्नादोत्ते** यानें काय म्हटलें म्हणून पुन्हा विचारिलें; त्यावर **नापोलियन** यानें तेंच उत्तर दिलें, तेव्हां तो निघून गेला. **बर्नादोत्ते स्वदिन** येथें गेल्यावर तो सर्व राज्यकारभार पाहूं लागला. तो तेथेंही फार लोकप्रिय झाला, त्याचें मन शुद्ध नव्हतें तरी तो सर्व कारभार **नापोलियन** याच्या तंत्रानेंच चालवीत असे.

लग्न झाल्यावर लौकरच नवीन स्त्री गरोदर होऊन तारीख २० माहे एप्रिल सन १८११ या दिवशीं पुत्र प्रसवली. त्यामुळे संततीविषयीं **नापोलियन** याचा मनोरथ परिपूर्ण झाला. प्रसूत होण्याच्या वेळेस राणीचे फारच हाल झाले. कांहीं वेळ तर ही या संकटांतून निभावणें कठिण असें वाटूं लागलें होतें. **नापोलियन** अगदीं जवळ बसला होता, त्यास एकीकडे बोलावून सुईणपण करणाऱ्या वैद्यानें विचारिलें कीं, दोन्ही जीव मोकळे होण्याची आशा सोडून एक वांच-

विण्याचा प्रसंग आला तर, बालकाचा किंवा आईचा जीव वांचवावा याविषयीं सांगून ठेवा. **नापोलियन** यानें उत्तर केलें कीं, अमा प्रसंग आल्यास मातेचा जीव वांचवावा. कारण हा तिचा हक्क आहे. शेवटीं खुटका होऊन मूल उपजलें, परंतु तें थोडा वेळ निश्चेष्ट होतें. कांहीं वेळानें मुलाचें रडणें **नापोलियन** यानें ऐकिलें, तेव्हां बाहेर मोठमोठे कामादार जमले होते त्यांस **रोमचा** राजा जन्मला असें त्यानें सांगितलें. **नापोलियन** यास वंशपरंपरेनें राज्यप्राप्ति व्हावी अशी पुष्कळांची इच्छा नव्हती, तथापि पूर्वी फ्रान्स देशाच्या राजास पुत्र झाला म्हणजे लोक जसा उत्साह करीत त्याप्रमाणें यावेळेसही **फ्रेंच** लोकांनीं मोठा उत्साह करून राजभक्ति प्रदर्शित केली. **नापोलियन** यास पुत्र झाल्यामुळें **फ्रान्स** देशाच्या पूर्वीच्या राजघराण्यास जसें वाईट वाटलें, त्याप्रमाणें **नापोलियन** यानें आपल्या मुलास **रोम**चा राजा ही पदवी दिल्यामुळें आस्त्रियांतील लोकांसही वाईट वाटलें. कारण त्यांच्या बादशाहाच्या ज्येष्ठ पुत्रास ही पदवी चालत असे.

पुत्रप्राप्ति झाल्यावर **नापोलियन** यास असें वाटूं लागलें कीं, कोणत्याही उपायानें **इंग्लंदाशीं** तह केल्याशिवाय आपलें राज्य सुरक्षित राहणार नाहीं. तो बाहेरून **इंग्लंदा**विषयीं तुच्छपणानें बोलत असे, तथापि, मनांत त्याची योग्यता पूर्णपणें समजत असे. त्यामुळें **इंग्लंदा**ची काय बिशाद आहे, अशा डौलाच्या गोष्टी कोणी आर्जवी मनुष्य बोलूं लागला तर तें त्यास आवडत नसे. **वाग्राम** येथील लढाई झाल्यावर एका आर्जवी चित्याच्यानें एका तर्सावरीचा नमुना त्यास दाखविला. त्यांत असें दाखविलें होतें कीं, चित्त्यास गरुड* तुडवीत आहे. हें चित्र पाहतांच **नापोलियन** त्यास रागें भरून म्हणाला, 'गरुडानें चित्त्यास तुडविलें आहे काय ? समुद्राचा असा लहानसा दरवील भाग नाहीं कीं, तेथें गरुड तोंड काढील. अशा रीतीनें खु-

* हें यावेळेस फ्रान्स देशाच्या निशाणाचें चिन्ह असे.

गामत करणें हें हलकेपणाचें काम आहे. चित्त्यानेंच गरुडास तुडविलें आहे असें म्हटलें तरी चालेल. '

इंग्लिश सरकार कोणत्या अटी ठरवून तह करील याचा कपास काढण्याकरितां **नापोलियन** यानें इंग्लंदच्या राजाच्या पररा्य संबंधी कारभाऱ्यांकडे गुप्त रीतीनें मनुष्य पाठविला. परंतु **फोके** यानें यजमानाची मर्जी संपादण्याकरितां एक कृत्य केलें, त्यामुळें हापत्न व्यर्थ गेला. परवानगीशिवाय **जोसेफाईन** हिजपाशीं घटस्फोाची गोष्ट काढली होती त्याबद्दल यजमानाची गैरमर्जी झाली नव्हती; त्याप्रमाणें यावेळेसही आपण आयती बातमी सांगितल्यास यजमाना म वरं वाटेल असें समजून **फोके** यानें आपल्या पदरचे दोन मनुष्य इंग्लंदच्या प्रधानांकडे तहाच्या अर्टींचा अदमास काढण्याकरितां पाठविले. परंतु **नापोलियन** यास न कळतां हे आले आहेत ही लबाडी कळतांच प्रधानांनीं त्यांशीं बोलणें बंद केलें. ही लबाडी कळतांच **फोके** यास बोलावून **नापोलियन** म्हणाला, ' काय महाराज, आपण तर मला कळविल्याशिवाय लढाया व तह करूं लागलां ! ' नंतर त्याचे कामावर दुसरा मनुष्य नेमून त्यास **रोम** येथील सुभेदारीच्या जागेवर पाठविलें. याप्रमाणेंच दुसरे कित्येक कामदार जे **नापोलियन** यास पूर्ण महत्व प्राप्त होण्यापूर्वी पाहिजे त्या कामांत मसलत देत होते तेही त्यास जवळ नकोतसे झाले. **स्पेन** देशावरील स्वारीचा परिणाम चांगला व्हावयाचा नाहीं असें **फोके** यानें म्हटलें होतें त्याप्रमाणें झाल्यामुळें **नापोलियन** यास तो नकोसा झालाच होता. कोणत्याही एका कामांत आपणापेक्षां ज्याचें शहाणपण अधिक दिसेल, असा मनुष्य जवळ असणें **नापोलियन** यास अगदीं सहन होत नसे.

संतति झाल्यामुळें **नापोलियन** राज्याचा पाया दृढ करण्यास यत्न करीत होता. परंतु कित्येक कारणांनीं तो अधिकाधिक शिथील होत चालला. **इंग्लंदा**शीं व्यापार बंद झाल्यामुळें, लढायांत देशांतले लाखों लोक मेल्यामुळें, व लढायांच्या खर्चाकरितां कोट्यव-

धि द्रव्य खर्च झाल्यामुळें सर्व लोक खिन्न झाले होते. लोक काय बोलतात हें समजण्यास ठेवलेले हेर, लोक असंतुष्ट झाले आहेत असें सांगत. पूर्वीच्या **बोर्बोन** वंशाच्या राजांप्रमाणें कोणी राजाविरुद्ध बोलल्यास त्यास पकडून बंदींत टाकावें म्हणून **नापोलियन** यानें एकळ नवीन तुरुंग बांधिले. सर्व लोकांच्या मनांत वाटे तेंच कोणी बोलला कीं, लागलाच तुरुंगांत जाई. याप्रमाणें शेंकडों लोक बंदींत पडले. हलक्या कुळांतल्या स्त्रीशीं लग्न केल्यामुळें **नापोलियन** आप ला भाऊ **लुशियन** यापाशीं इतका भांडला कीं, तो **इंग्लंदांत** जाऊन राहिला. हा **नापोलियन** याच्या सर्व भावांत हुशार होता. वर्तमानपत्रांची स्वतंत्रता अगदीं नाहींशी झाली. बादशाहाला आवडेल तें चढें लिहावयाचें बाकी खरें व प्रसिद्ध असेल तेंही छापावयाचें नाहीं. या व अशा दुसऱ्या कारणांनीं लोकांचीं मनें प्रतिकूल होत चाललीं. **स्पेन** व **पोर्तुगाल** या देशांत लढाया चालल्याच होत्या. तेथें **फ्रेंच** सरदारांनीं मोठमोठ्या लढाया मारुन पुष्कळ वेळ जय मिळविले, व शत्रूचा बहुत नाश केला, तरी **इंग्लिशांच्या फौजेचें स्पानिश** लोकांस साहाय्य असल्यामुळें लढाईचा शेवट होईना. **इंग्लिशां**च्या मदतीनें शत्रूंनींही **फ्रेंच** लोकांचा पुष्कळ पराभव केला. तलवारीच्या घानें उगाच बसतील तेवढेच. बाकी **स्पेन** देशांतील कोणीही मनुष्य **फ्रेंच** लोकांस अनुकूल नव्हते. **इंग्लिशां**चा सेनापति **वेलिंगटन** यानें **माद्रिद** शहर घेतलें त्यामुळें **जोजेफ्** यास तेथून पुनः पळून जावें लागलें. यामुळें त्रासून दुसऱ्या कोणासतरी या देशाचें राज्य द्यावें असें **नापोलियन** यास सांगावें असें त्यास वाटूं लागलें.

इकडे **आस्त्रिया**च्या बादशाहाच्या कन्येशीं **नापोलियन** यांचें लग्न झालें असें ऐकतांच **रशिया**च्या बादशाहास वाटूं लागलें कीं, आतां **नापोलियन** याची नजर आमच्या देशाकडे फिरावयाची. **इंग्लंदा**चा व्यापार बंद केल्यापासून लोकांचे फार हाल होऊ लागले, त्यामुळें तो ठराव **अलेक्झांदर** याच्यानें पूर्णपणें अमलांत आणवेना. त्यानें कित्येक बंदरांत येण्यास **इंग्लिश** गलबतांस मोकळीक दिली. या-

मुळें **नापोलियन** यास फार राग आला. कांहीं दिवस उभयतां बादशाहांचा कडक पत्रव्यवहार सुरू होता. **स्पेन**देशांत इंग्लिशांनीं फ्रेंच लोकांचा पराभव केला, हें ऐकून **अलेक्झांदर** यासही जरा अपमान आलें होतें. **आस्त्रिया**च्या बादशाहाशीं **नापोलियन** याचा आमपणा झाल्यामुळें त्यास असें वाटूं लागलें कीं, जर एकवार स्पेन आणि **पोर्तुगाल फ्रेंच** लोकांनीं पूर्णपणें जिंकिले तर मग सर्व युरोपखंडाचा **नापोलियन** मालक झाला म्हणून समजावें; याकरितां तिकडे लढाया सुरू आहेत तोंच आपण इकडे युद्धास आरंभ करावा.

आपल्या मुलखांतून **फ्रेंच** सैन्यास सुरक्षित जाऊं देण्याविषयीं **आस्त्रिया**च्या बादशाहानें जाहीरनामा प्रसिद्ध केल्यावरोवर **इंग्लिश** सरकारास वाटूं लागलें कीं, आतां आपला आणि **रशिया**च्या बादशाहाचा तह होईल. **रशिया**च्या बादशाहाशीं तह होण्याची आशा कमी होत चालली तेव्हां **नापोलियन** यानेंही मोठ्या सपाट्यानें सैन्याची तयारी चालविली.

स्पेन व **पोर्तुगाल** देशांत वारंवार पराभव झाल्यामुळें **नापोलियन** यासही **इंग्लिशां**शीं तह करावा असें वाटूं लागलें. परंतु **जोसेफ** हा **स्पेन**चा राजा मानिलाच पाहिजे या गोष्टीचा आग्रह तो सोडीना, त्यामुळें तह ठरेना. इकडे **बर्नादोत्ते** व **नापोलियन** यांची मनांत चुरस असल्यामुळें **स्वीदन** देशाशीं पुनः **फ्रान्स** देशाचा कलह उत्पन्न झाला. **तुर्कस्थान** व **रशिया** यांच्यामध्यें कलह उत्पन्न करावा, असें **नापोलियन** याच्या मनांत होतें, परंतु **इंग्लिशां**चा वकील **तुर्कस्थान**च्या दरबारांत होता, त्यानें **सुलतानास** सांगितलें कीं, जर एकवार **रशिया**चा पराभव झाला तर सर्व **युरोपखंड** **नापोलियन** याच्या ताब्यांत आलें असें समजलें पाहिजे. ही गोष्ट **सुलतानास** खरी वाटून त्यानें **नापोलियन** याचें म्हणणें न ऐकतां **रशिया**च्या बादशाहाशीं लागलेले तंटे मिटवून टाकिले. या-

प्रमाणें जवळच्या देशाशीं आपलें मित्रत्व नसतां **नापोलियन** सारख्या चतुर पुरुषानें **रशिया**देशावर स्वारी करण्याचा बेत केला, तस्मात् 'विनाश काले विपरीत बुद्धिः' हीच गोष्ट खरी ह्मटली पाहिजे.

रशियावर स्वारी करण्याचें मनांत आणिलें त्यावेळेस **नापोलियन** यानें पुनः फौजेंत लोकांचा भरणा करून आठ लक्ष फौज तयार केली. शिवाय **आस्त्रिया, इताली**, वगैरे तह झालेल्या देशांच्या राजांशीं फौजेची मदत करण्याचा ठराव होता, त्यामुळें त्यांतील तीन लक्ष, याप्रमाणें एकंदर अकरा लक्ष सैन्याची तयारी होती. इतर देशांत बंदोबस्ताकरितां लागणारी फौज सोडून केवळ **रशिया**वर स्वारी करण्याकरितां **नापोलियन** यानें सहा लक्षांवर फौज तयार ठेविली होती. **रशिया**च्या बादशाहास इतकें सैन्य मिळण्याचा संभव नव्हता. याप्रमाणें कडेकोट तयारी होती, तरी **नापोलियन** याचे हितेच्छु, राजकार्य धुरंधर, चतुर, दूरदृष्टि, पुरुष होते त्यांनी **नापोलियन** यास सांगितलें कीं, विचार करून या कृत्यास आरंभ करा. याचा परिणाम नीट दिसत नाहीं. त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें **स्पेन** देशावरील मोहिमेचा परिणाम वाईट झाला, यामुळें तरी **नापोलियन** त्यांच्या ह्मणण्याकडे लक्ष देईल असें वाटलें होतें, परंतु गर्वांध होऊन त्यानें मुत्सद्द्यांच्या अनादर केला, त्यामुळें त्याचा नाश झाला.

तालेरंद यानें पुष्कळ सांगितलें तरी व्यर्थ. प्रकृति बिघडल्याचें निमित्त करून **फोके पारिस** येथें आला होता. त्यानें **रशिया**वर स्वारी केली असतां परिणाम काय होतील त्यांचें मोठ्या चातुर्याने उत्तम रीतीनें वर्णन करून एक लेख तयार केला आणि स्वतः वाचून दाखविण्याविषयीं बादशाहास विनंती करून भेट घेतली. **फोके** यास पाहतांच **नापोलियन** ह्मणाला, तुह्मी काय सांगणार तें मला दिसत आहे. **स्पेन**देशावर स्वारी करणें तुह्मांस आवडलें नाहीं तसेंच **रशिया**वर स्वारी करणें आवडत नाहीं. त्यावर **फोके** ह्मणाला, आपण क्षमा कराल असें समजून या आणीबाणीच्या प्रसंगाविषयीं मला सुचलेल्या गोष्टी लिहिल्या आहेत. **नापोलियन** ह्मणाला, "प्रसंग

आणीबाणीचा मुळींच नाहीं. ही राजकीय कारणाकरितां लढाई आहे. **रशिया**च्या दरबारांत **इंग्लिशां**चें वजन कमी झालें म्हणजे **स्पेन** देश हातीं आला असें समजावें. आठ लक्ष शूर लोक मजपाशीं तयार आहेत. असें सैन्य जवळ असल्यावर **यूरोपखंड** म्हणजे मोतारी आहे, असें मी समजतों. माझ्या इच्छेप्रमाणें त्यास वागलें पाहिजे. अशक्य हा शब्द **फ्रेंच** भाषेंतला मुळींच नव्हे, हें तुम्हींच मला एक वेळ सांगितलें नाहीं काय? तुम्ही बडे लोक आतां श्रीमंत झालां. माझ्या कल्याणाविषयीं उत्सुकता दाखवितां मात्र, पण माझ्या राज्याची तुटातूट झाली असतां तुमचें काय होईल या विचारांत तुम्ही आहां. तुमच्या मसलती सोडून मी आपल्या फौजेच्या विचारप्रमाणें वागतों. मी एवढ्या महत्वास चढलों त्यामुळें मला पृथ्वीच्या कारभाराचें सूत्र हातीं घेणें भाग पडत आहे. यांत माझा अपराध आहे काय? माझें दैव अद्याप पूर्ण फलद्रूप झालें नाहीं. त्याचा उगाच मासला दृष्टीस पडत आहे. सर्व **यूरोपखंडां**त एक कायदा, सर्वांवर श्रेष्ठ एक न्यायसभा, व एक नाणें, असें अवश्य झालें पाहिजे. **यूरोपखंडां**तील सर्व राज्यें मिळून एक राष्ट्र होऊन **पारिस** शहर त्याची राजधानी झाली पाहिजे."

अलेक्झांदर बादशाहाजवळ चार लक्ष फौज आणि पन्नास हजार उत्तम स्वार आहेत; त्याचें राज्य मोठें विस्तीर्ण असल्याकारणानें पाहिजेतितकी फौज त्यास तयार करितां येईल; **रशियन** लोक मोठे स्वदेशाभिमानी असून फार शूर आहेत, त्यांचा देश आपल्या देशापासून फारच लांब आहे, तेथील हवा फारच वाईट, तिकडे लढाई फार दिवस चालली तर इकडे **स्पानिश** लोक **इंग्लिशां**च्या मदतीनें आपला पराभव करतील; आपणास तिकडे यश न आल्यास पुन्हा **जर्मनी**मध्यें बंड होईल, वगैरे **नापोलियन** याच्या मित्रांनीं लढाई करण्यास पुष्कळ प्रतिकूळ गोष्टी सांगितल्या परंतु दैवच प्रतिकूळ झाल्यामुळें त्या त्याच्या कानांत शिरल्या नाहींत. सर्व मित्रांनीं **रशिया**वर स्वारी करण्यास पुष्कळ अडचणी सांगितल्या परंतु केवळ मह-

त्वाकांक्षेनें ही गोष्ट करणें हा मोठा अन्याय आहे, असें कोणी एकही म्हणाला नाहीं, हें मोठें आश्चर्य होय. एक गृहस्थ नापोलियन याचा आप्त होता, त्यानें मात्र त्यास सांगितलें कीं, असें करून मनुष्यांचा आणि देवाचा आपणावर क्षोभ करून घेऊं नका.

याप्रमाणें कोणाचाही हितोपदेश न ऐकतां **रशिया**वर स्वारी करण्याचा निश्चय करून तह होत नाहीं असें ठरण्यापूर्वीच **अलेक्झांद**राच्या मुलुखाकडे **नापोलियन** यानें फौज रवाना केली. सैन्याच्या चालीचा रोंख पाहून **पारिस** येथील **रशिया**चे वकिलानें **नापोलियन** यास कळविलें कीं, तह करण्याचा तुमचा अजून मनोदय असेल तर सैन्य मागें फिरवा. त्याजवर **नापोलियन** यानें कळविलें कीं, लोकांच्या सूचनेप्रमाणें आम्ही सैन्याची व्यवस्था करीत नमतों. हें उत्तर ऐकिल्यावरोबर **रशिया**चा वकील **पारिस** येथून निघून गेला.

तारीख ९ मे सन १८१२ या दिवशीं **नापोलियन** आपल्या राणीसहवर्तमान **पारिस** येथून निघाला, तो सोळाव्या तारखेस **द्रेस्दन** शहरीं गेला. तेथें **आस्त्रिया**चा बादशाहा, व **प्रुशिया**, **नेपल्स**, **वर्टेंबर्ग**, **वेस्तफालिआ**, वगैरे ठिकाणचे राजे यांस भेटावयास बोलाविलें होतें. कदाचित् तह झाला तर होईल, असें मनांत आणून **नापोलियन** यानें **अलेक्झांदर** यासही या वड्या राजदरबारास बोलाविणें पाठविलें; परंतु बलावण्यास जाणाऱ्या मनुष्याचा **अलेक्झांदर** याजवळ प्रवेशच झाला नाहीं. **द्रेस्दन** येथें **नापोलियन** या राजमंडळामध्यें राजाधिराज महाराज होऊन बरेच दिवस राहिला. **स्त्रिया**चा **बादशाहा** व त्याची राणी यांपेक्षां सुद्धां **नापोलियन** यानें आपणास व आपल्या राणीस मोठा मान स्वीकारिला. इतर राजे तर त्याच्या कामदारांप्रमाणें दिसूं लागले. शेवटीं राणीची पारिस येथें परत रवानगी करून आणि तह न ठरतां लढाई सुरू झालीच तर कोणकोणत्या राजानें कसें वागावें तें सांगून, **नापोलियन** पुढें चालता झाला.

तारीख ७ जून रोजीं **नापोलियन** दांत्झिक् शहरीं गेला. या-ठेंस **अलेक्झांदर** विल्ना शहराजवळ सैन्याची व्यावस्था करीत होता. बादशाहांचा तह होण्याविषयीं पुनः शेवटील पत्रव्यवहार सुरू झाला. सर्व लोकांचे डोळे, काय होतें तें पाहण्याकडे लागले होते. शेवटीं तारीख २२ जून या दिवशीं **नापोलियन** यानें आपल्या सैन्यांत खालीं लिहिल्याप्रमाणें जाहीर नामा लाविला.

'शूरहो, **रशियास** दुर्दैवानें ओढिलें आहे. त्याच्या नशीबीं काय असेल तें झालें पाहिजे. **नीमेन** नदी उतरून पुढें चाल करून त्याच्या प्रांतांत आपण युद्ध करूं. पूर्वी एकवार आपण **पोलंद** देशांत जसा जय मिळविला, त्याप्रमाणेंच आतां पुनरपि मिळेल. परंतु आतां तह होईल तो पुन्हा मोडणार नाहीं. आज पन्नास वर्षें **रशिया** देशाचा **यूरोपखंडांतील** राज्यप्रकरणांत वरपगडा आहे त्याचा या तहामध्यें शेवट होईल.'

अलेक्झांदर यानेंही तह होण्याची निराशा झाल्यावर आपल्या सैन्यांत जाहीरनामा प्रसिद्ध केला. परंतु तो असा उद्धटपणाचा नव्हता. आपल्या देशाची स्वतंत्रता कमी न होऊं देतां तह करण्यास बहुत प्रयत्न केले, हें तो सत्य पक्षाचें रक्षण करणारा सर्वशक्तिमान, परमेश्वर पाहत आहे, तोच सहाय्य करो. असें म्हणून तो आपल्या सैन्यास म्हणाला, वीरहो, आपला धर्म, आपली स्वतंत्रता, व आपला देश, यांकरितां तुम्ही युद्ध करीत आहां. तुमचा **बादशाहा** तुम्हांजवळ आहे. देव विनाकारण कलह उत्पन्न करणाऱ्याचा शत्रु आहे.

पूर्वीप्रमाणें यावेळेसही **पोलंद**ांतील पुढारी लोक **नापोलियन** याच्या साहाय्यानें स्वतंत्र होण्याचा उद्योग करीत होते. परंतु आ-**स्त्रिया**च्या बादशाहाशीं झालेल्या ठरावाप्रमाणें त्यांचें म्हणणें त्यास कबूल करितां येईना. त्यामुळें **पोलंद**चे लोक **नापोलियन** यास साहाय्य न करितां उदासीन राहिले.

भाग १४ वा.

सैन्याच्या मोठमोठ्या टोळ्या करून त्यांवर, उत्तम, हुशार, शूर, सेनापति नेमून **नापोलियन** यानें **रशिया**च्या मुलखांत चाल सुरू केली. सेना चालूं लागली तेव्हां घोड्यास ठोकर लागून **नापोलियन** खालीं पडला. त्यावेळेस कोणी म्हणाला, 'शकुन वाईट आहे, असे झालें असतें तर **रोमन** लोक पुढें गेले नसते.' कांहीं लोक पुढें गेले त्यांस एक **रशियन** स्वार भेटला; त्यानें विचारिलें तुम्ही **रशिया** देश शांत कां शिरतां? त्यावर त्यानीं उत्तर केलें, तुमचा पराभव करून **विल्ना** शहर घेण्याकरितां आम्ही आलों आहों. हें ऐकतांच तो स्वार घोडा उडवीत पळून गेला. चोहोंकडे सुमारें दीडशें कोस सैन्य पसरल्यामुळें **सेंतपितर्सबर्ग** किंवा **मास्को** या दोन मुख्य शहरांपैकी कोणत्याकडे **फ्रेंच** लोकांचा रोख आहे तें कळेना. **रशियन** लोकांनीही सैन्याच्या टोळ्या करून उत्तम व्यवस्था केली होती. **नापोलियन** याचा असा बेत होता कीं, पूर्वी **आस्तर्लित्झ** यथें **आस्त्रियन** लोकांचा पराभव केला, त्याप्रमाणें **रशियन** लोकांचा त्यांच्या देशाच्या नाक्यावरच पराभव करून एकदम त्यांच्या राजधानीवर चालून जावें. **अलेक्झांदर** यानें असा बेत केला कीं, देशाच्या तोंडाशी लढाई न देतां शत्रूस आपल्या देशांत आणवेल तितका लांब आणावा; म्हणजे स्वदेशापासून पुष्कळ दूर आल्यामुळें मागून कुमक आणितां येणार नाहीं, व मुलुख उध्वस्त करून टाकिला म्हणजे त्यास खावयास मिळणार नाहीं; आणि आपल्या देशांतील भयंकर हिंवाळा सुरू झाला म्हणजे सहजच त्याचा पराभव होईल.

फ्रेंच लोक बरेच पुढें गेले तरी शत्रु पुढें येईना; त्यामुळें त्यांस आश्चर्य वाटलें. शेवटीं **रशियन** लोक **विल्ना** शहर सोडून गेले. नेयें आपणास लढाईचें व इतर सामान पुष्कळ सांपडेल असें **नापोलियन** यास वाटलें होतें; परंतु जवळ जातांच असें कळलें कीं, तेथील सर्व वस्तुंची राखरांगोळी करून **रशियन** लोक निघून गेले.

गेल्या युद्धांत **फ्रेंच** लोक कित्येक वेळ लुटीवर निर्वाह करीत; परंतु स्पेन देशांत हाल झाल्यापासून त्यांस कळलें होतें कीं, केवळ लुटीवर भरंवसा ठेवून उपयोग नाहीं; मरणाची पाळी यावयाची. **रशिया**चा मुलूख भिकार; लोक विरुद्ध झाले म्हणजे विकतसुद्धां कांहीं मिळावयाचें नाहीं, लढाई फार दिवस चालणार, वगैरे गोष्टी मनांत आणून **नापोलियन** यानें **पारिस** येथून निघण्यापूर्वी सर्व वस्तूंचा मोठा पुरवठा तयार करविण्यास हुकूम केला होता. **विल्ना** येथें शत्रूंनीं आपल्या सामानाची केलेली व्यवस्था पाहून आपल्या हुकमाप्रमाणें सामानाची तयारी आहे किंवा नाहीं, हें पाहण्याकरितां **नापोलियन** तेथें वीस दिवस राहिला. मोहीम सुरू झाल्यावर इतके दिवस एके ठिकाणीं **नापोलियन** आजपर्यंत कधीं राहिला नव्हता. त्याच्या कारभाऱ्यांनीं **फ्रान्स**, **जर्मनी**, **पोलंद**, येथील व्यापाऱ्यांस सामान पुरविण्याचे मक्ते दिले होते, परंतु अशा विलक्षण मोठ्या सैन्यास इतक्या लांब सामान पुरविण्यास गाड्या वगैरे मिळण्याची मोठी पंचाईत पडल्यामुळें व्हावा त्याच्या एका तृतीयांशापेक्षां जास्त पुरवठा होईना. तेव्हां लढाईचा बेत पुढल्या वर्षापर्यंत तहकूब ठेवावा किंवा होईल तें होईल असें म्हणून पुढें चालूं लागावें, याशिवाय दुसरा उपाय नाहीं, असें वाटून **नापोलियन** याचें चित्त जरा कचर खाऊं लागलें. त्यास वाटत होतें कीं शत्रूच्या देशांत कांहीं मिळालें नाहीं तरी बरोबर सामान पुष्कळ असल्यावर आपले लोक उपाशीं मरावयाचे नाहींत. मक्तेदारांस वाटे कीं, पूर्वी **आस्त्रिया**शीं लढाई झाली त्यावेळेस सामान न मिळाल्यास **फ्रेंच** लोक लुटीवर निर्वाह करीत त्याप्रमाणें आतांही करतील. पुरवठा करण्याचा मक्ता तर घ्यावा मग काय होईल तें होईल. या त्यांच्या अविचारामुळें किंवा लबाडीमुळें **नापोलियन** याचें फार नुकसान झालें.

विल्नाशहरीं **नापोलियन** बरेच दिवस राहिल्यामुळें या फुरसतीचा शत्रूस फार उपयोग झाला. **अलेक्झांदर** यानें तेवढ्या अवकाशांत **इंग्लंद**, **स्वीदन**, **स्पेन**, **तुर्कस्थान**, वगैरे देशाशीं तह केला.

त्यामुळें त्यास त्या त्या देशाच्या नाक्यावर ठेविलेली फौज आप-
ल्या सैन्याच्या मदतीकरितां आणतां आली. शत्रु स्वदेश जि-
कण्यास आला असें ऐकून **रशिया** देशांतील लोक फारच चवता-
ळले. ते आपल्या राजास लढाईचें लागेल तें सामान पुरविण्यास
तयार झाले. देशांतील लोक कवाईत शिकून स्वदेशाच्या संरक्षणार्थ
लढाईस तयार झाले. बडे श्रीमान् होते त्यांनीं आपल्या खर्चानें
कित्येक पलटणें राजाकरितां तयार करविलीं. **प्लेताफ** ह्मणून
एक श्रीमान् सरदार होता. त्यानें असें कळविलें कीं, **नापोलियन**
याचा पराभव करील त्यास मी आपली एकुलती एक मुलगी व लाख
रुपये बक्षीस देईन. देशांत श्रीमंत लोक सुद्धां सरकारी कामदारांकडे
जाऊन आह्मांस कवाईत शिकवा, आह्मी सैन्यांत येतों, असें ह्मणूं
लागले. याप्रमाणें शेतकरीसुद्धां कवाईत शिकून लढाईस जाण्यास
तयार झाले. यामुळें दोन लक्ष नवी फौज तयार झाली.

आपल्याकडून होईल तितकी सामानाची तजवीज करून **नापो-**
लियन सैन्यासहवर्तमान पुढें चालूं लागला. पहिल्यानें त्याचा बेत
सेंटपिटर्सबर्ग शहराकडे जाण्याचा होता, परंतु एक दोन ठिकाणीं
पराभव झाल्यामुळें त्यानें **मास्को** शहराकडे चाल केली. वाटेंत पु-
ष्कळ ठिकाणीं लहानसहान झटापटी झाल्या. त्यांत पहिल्यानें **फ्रेंच**
लोकांचा विशेष ह्मणण्यासारखा पराजय झाला नाहीं, तरी त्यांस को-
टें यशही आलें नाहीं. **फ्रेंच** लोकांपुढें आपलें चालत नाहीं असें
झालें ह्मणजे त्या शहरास किंवा गांवास आग लावून **रशियन** लोक
दुसरीकडे जात, याप्रमाणें त्यांनीं आपल्या देशांतील पुष्कळ शहरें व
शेंकडों गांवें जाळून फस्त केलीं. हें पाहून **फ्रेंच** लोक ह्मणत, रानटी
रशियन लोक शत्रूच्या देशाप्रमाणें स्वदेशाची राखरांगोळी करतात.
शत्रूंच्या हातीं कांहीं लागूं नये ह्मणून त्यांनीं तर असें करण्याचा बेत-
च केला होता.

पुष्कळ दिवस झाले तरी मोठी लढाई करण्याचा प्रसंग येईना.
फ्रेंच लोकांस आपल्या देशांत दूर आणण्याकरितां आपलाच मुलुख

उच्चस्त करावयाचा हें **रशियन** लोकांच्या मनास येईना, परंतु ते आपल्या राजाच्या इच्छेमुळें इतके दिवस कांहीं बोलले नाहींत, कारण **रशियन** लोक आपल्या राजास बापाप्रमाणें समजतात. परंतु ते **फ्रेंच** लोकांचा पराभव करण्याकरतां अगदीं उत्सुक झाले होते. त्याप्रमाणें **फ्रेंच** लोकही एकदां **रशियन** लोकांचा पराभव करण्याची केव्हां वेळ येईल याची वाट पहात होते. शेवटीं तारीख १७ सप्तंबर सन १८१२ या दिवशीं दोघांच्या इच्छेप्रमाणें युद्धाचा प्रसंग आला. युद्धास आरंभ होण्यापूर्वी **नापोलियन** सैन्यांतील लोकांस म्हणाला, 'शूर हो, तुह्मांस लढाई पाहिजे होती तिचा आज प्रसंग आला आहे. असा प्रसंग आलाच पाहिजे, कारण यापासून आपणास पुरवठा मिळेल, हिवाळ्यांत राहण्यास जागा चांगली मिळेल, आणि सुरक्षितपणें **फ्रान्स** देशास जाण्यास सांपडेल. **मास्को** शहराजवळच्या मोठ्या युद्धांत तो होता, असें तुह्मां प्रत्येकास पुढले लोक म्हणतील, अशा प्रकारचा पराक्रम करा.'

इकडे **रशियन** लोकांच्या सैन्यांत **पाद्री** लोक हातांत देवांच्या मूर्ति घेऊन, स्वदेशसंरक्षणार्थ झटून स्वर्गप्राप्तीस पात्र व्हा, असें सांगून लोकांस उत्तेजन देत होते. सातव्या तारखेस सकाळीं चार वाजतां लढाई सुरू झाली. हें युद्ध फारच भयंकर झालें. पहिल्यानें **फ्रेंच** लोकांनीं मोठ्या आवेशानें शत्रूच्या अंगावर जाऊन शत्रूस हटविलें. पुनः कांहीं वेळानें **रशियन** लोकांनीं **फ्रेंच** लोकांस हटविलें- दोघांकडे मिळून या जागीं सव्वा लाख फौज होती. एक दिवस पर्यंत सारखें कडाक्यानें तुंबळ युद्ध चाललें होतें. दोघांकडले मिळून सुमारें लाख लोक रणभूमीवर पडले. एकमेकांचे लोक कैद करणें, तोफा घेणें, वगैरे सारखेंच झालें. त्यामुळें लढाईंत बरोबरी झाली, तरी पुढें युद्ध चालविणें बरोबर नाहीं; असें समजून **रशियन** लोक सुरक्षितपणें दुसरीकडे गेले. पुनः तयारी करून **फ्रेंच** लोकही पुढें चालूं लागले.

तारीख १७ सप्तंबर सन १८१२ रोजीं **नापोलियन** सैन्यासह वर्तमान **मास्को** शहराजवळ जाऊन पोहोंचला. या शहराविषयीं

गशियन लोकांची मोठी पूज्य बुद्धि आहे. ते त्यास 'आई मास्को' असें म्हणतात. हें उत्तम जुनें शहर, त्यांतील मोठमोठ्या भव्य इमारती, त्यांतील फारच उंच **क्रेमलिन** नांवाचा राजवाडा, हीं दुरून पाहून **फ्रेंच** लोकांस मोठा आनंद झाला. जिकडे तिकडे 'मास्को मास्को' असा घोष झाला. **नापोलियन** घोडयावर होता, तो म्हणाला, शेवटीं पहा एकदांचें तें प्रसिद्ध **मास्को** शहर दिसूं लागलें.

नापोलियन लक्ष लावून **मास्को** शहराकडे पाहूं लागला, तों आंत कांहीं हालचाल नाहीं, कोठें धूर येत नाहीं, शहराच्या तटावर लढाईची तयारी नाहीं, हें पाहून त्यास मोठें आश्चर्य वाटलें. त्यास वाटलें होतें कीं, शहरांतील लोक शरण येऊन आमचें रक्षण करा असें म्हणतील; परंतु तसेंही कांहीं नाहीं. इतक्यांत **मुरात्** कांहीं लोक घेऊन पुढें गेला होता, तो परत येऊन सांगूं लागला कीं, आंत एक सेनापति आहे तो म्हणतो कीं, आम्हांस सुरक्षितपणें बाहेर जाण्यास दोन तासांचा अवकाश द्या, नाहीं तर मी **मास्को** शहर जाळून टाकितों. दोन तास झाले तरी **नापोलियन** याकडे कोणी येईना. तेव्हां **फ्रेंच** लोक शहरांत शिरले. आंत शिरून पाहतात तों कांहीं अगदीं भिकार दरिद्री लोक मात्र आंत आहेत.. बाकी सर्व मोठमोठीं घरें ओसाड. आंत शिरल्यावर **फ्रेंच** लोकांनीं लुटीस आरंभ केला. मोठमोठे वाडे, दुकानें, देवळें, वगैरे सर्व ठिकाणीं **फ्रेंच** लोकांची गर्दी झाली. यःकश्चित् शिपायास सुद्धां उत्तम रेशमी व लोंकरीचीं वस्त्रें पांघरण्यास, व उत्तम पदार्थ खाण्यास मिळाले. **गशियन** लोक असें उत्तम शहर सोडून गेले, हें पाहून **नापोलियन** चकित झाला.

क्रेमलिन नांवाच्या मुख्य राजवाड्यांत **नापोलियन** राहिला. रात्रीस निजल्यावर एकाएकीं मोठा गलबला झाला; तेव्हां जागा होऊन पाहतो तों शहरांत पुष्कळ ठिकाणीं आग लागली आहे, असें दिसलें. आग इतकी पेटली होती कीं, त्या उजेडांतच त्यानें तह करण्याविषयीं **अलेक्झांदर** यास पत्र लिहिलें.

सकाळच्या प्रहरीं जरी तरी आग विझाली, तेव्हां पुनः फ्रेंच लोक चांगल्या जागा पाहून तेथें रहावयास गेले. पुनः रात्रीस किती ठिकाणीं आग लागली. हें पाहून फ्रेंच लोकांस भय वाटूं लागलें. शोध करितां असें कळलें कीं, पाण्याचे नळ बंद केले आहेत, व पुष्कळ ठिकाणीं मुद्दाम ज्वालाग्राही पदार्थ भरून ठेविले आहेत. याप्रमाणें **मास्को** येथील अधिकारी इतर शहरांप्रमाणेंच या शहराची व्यवस्था करून निघून गेला होता; त्यामुळें फ्रेंच लोकांस फार राग आला. त्या अधिकाऱ्याचे लोक दृष्टीस पडले कीं त्यांस ते कापून काढीत.

मास्को शहराची अशी व्यवस्था होणार हें कांहीं अंशीं **नापोलियन** यास कळलें होतें. एक फ्रेंच प्रवासी तेथें रहात होता, तो आपल्या देशचे लोक जवळ आले हें ऐकून त्यांविषयीं कांहीं बोलला, त्यामुळें त्यास तुरुंगांत टाकिलें होतें. **नापोलियन** येण्याच्यापूर्वी एक दिवस तेथील अधिकाऱ्यानें कित्येक कैद्यांचा न्याय केला. त्या वेळेस तेथें एक **रशियन** मनुष्य होता तो आपल्या राजाविषयीं कांहीं बोलला होता, त्यास त्यानें देहांत शासन ठरविलें. त्या वेळेस त्याचा बाप जवळ आहे, असें पाहून, मुलाशीं कांहीं बोलून त्यास आशीर्वाद देणें असेल तर मी तुह्मांस अवकाश देतों, असें तो ह्मणाला. त्यावर तो ह्मातारा मनुष्य ह्मणाला, 'अशा बंडखोरास मी आशीर्वाद देईन काय ? मी त्यास शाप देतों' असें बोलतांच त्यास शिक्षा अमलांत आणण्यांस नेलें. नंतर अधिकारी फ्रेंच प्रवाशास ह्मणाला; आपल्या लोकांविषयीं तुमची आवड स्वाभाविकच आहे, याकरितां तुह्मांस सोडून देतों. एक **रशियन** राजद्रोही होता त्याचा देहांत तुह्मीं पाहिलाच. नंतर त्यानें सर्व कैदी लोक सोडून दिले, आणि बरोबर तितकी चिजवस्तु घेऊन लोक निघाले होते त्यांस बरोबर घेऊन तो निघून गेला. कित्येक लोक फ्रेंच लोकांस अनुकूळ आहेत असें वाटलें, त्यांच्या दंडांवर N (न) या अक्षराचा डाग दिला. **नापोलियन** याकडील हा मनुष्य आहे असें दाखविण्याकरितां ही

रवूण आहे, असें समजतांच एकानें कुऱ्हाड वेऊन आपला हात तो-
डला. एका वेळेस एका **रशियन** गृहस्थाचे वारा गुलाम एका **फ्रेंच**
अधिकाऱ्याच्या हातीं लागले. त्यांस तो म्हणाला, आमच्याकडे चा-
करीस रहा, नाहीं तर शिरच्छेद होईल. हें ऐकून चार असामी
माना पुढें करून देहांत शिक्षा भोगिल्या, परंतु **फ्रेंच** लोकांची चाकरी
पत्करली नाहीं. हें पाहून बाकीच्यांस त्या अधिकाऱ्यानें सोडून दिलें
या गोष्टी **नापोलियन** यास माहीत होत्या, तरी त्यानें शहरांत प्रवेश
केला. परंतु शहरास चौंहोंकडून आग लागली तेव्हां मात्र त्याची पा-
चावर धारण बसली. चार दिवस शहर जळत होतें. बहुतेक भाग
जळून खाक झाला. मोठमोठ्या प्राचीन इमारती जमीनदोस्त झाल्या.
आग लागून दोन दिवस झाले तरी **नापोलियन मास्को** शहरांतून
निघाला नाहीं. परंतु तिसऱ्या दिवशीं **क्रेमलिन्** राजवाड्यास
आग लागली तेव्हां घोडयावर बसून आगींतून बाहेर पडून दोन कोसां-
वर **रशिया**च्या बादशाहांचा हवा खाण्याचा वाडा होता तेथें जाऊन
राहिला. शहराची अशी दुर्दशा पाहून तो म्हणे, हे रानटी **सिथिअन**
लोक आहेत. हें मोठें अनर्थाचें चिन्ह आहे.

आग विझाल्यावर **नापोलियन** पुनः **क्रेमलिन्** राजवाड्यांत
राहिला. अशा जुन्या शहराचा नाश झाल्यामुळें तरी शत्रूचा दृढ
निश्चय कमी होईल असें त्यास वाटत होतें. बहुतेक शहर ज-
ळलें तरी **फ्रेंच** लोकांस राहण्यापुरती जागा व सामान होतेंच. **फ्रेंच**
लोकांच्या ऐषआरामाची हद्द आहे. तितक्यांत तेथें त्यांनीं नाटक
गृह तयार केलें. आणि **फ्रान्स** देशांतून नाटककार आले होते त्यां-
नीं तेथें नाटकें केलीं. **नापोलियन** यानेंही अंतःकरण स्वस्थ करून
राज्यप्रकरणी कित्येक ठराव लिहून **क्रेमलिन्** राजवाड्याचा मुक्काम
हालून **पारिस** येथें पाठविले !

बरेच दिवस झाले तरी **अलेक्झांदर** याकडून कांहीं उत्तर येई-
ना, त्यामुळें **नापोलियन** याचें मन चिंताक्रांत झालें. **स्पेन** देशांत
सालामांका येथें **फ्रेंच** लोकांचा मोठा पराजय झाला, अशी बातमी

झाल्यामुळें सैन्यांतील लोकांचीं मनें व्यग्र झालीं होतीं. दुसऱ्या प्रदेशांत गेलेल्या **फ्रेंच** सैन्याचा पराजय करून मुख्य सैन्यास टक्कर देण्याकरितां **रशियन** लोक एके ठिकाणीं जमत होते. उत्तरेकडील प्रदेशांतला भयंकर हिवाळा जवळ येत चालला. इतर मुलुखांतील लोकांपेक्षांच **मास्को** शहराच्या भोंवतालचे लोक **फ्रेंच** लोकांचा अधिक द्वेष करीत. **रशियन** लोक निघून गेल्यामुळें **फ्रेंच** लोकांस उपयोगी पडणारा कोणताही पदार्थ ते शहराकडे आणीत नसत. सोसाव्याचे लुटलेले पुष्कळ उंची पदार्थ जवळ होते, तरी शहरांतील खाण्याचे पदार्थ संपल्यामुळें उपाशीं मरण्याची वेळ आली. सोन्याचा तुकडा दिला तरी भाकरीचा तुकडा मिळेनासा झाला ! सैन्यांतील शिपाई लोक तर घोड्याचें मांस खाऊन निर्वाह करूं लागले. शेवटीं राहण्याची अगदीं सोय नाहींशी झाली तेव्हां **नापोलियन** यानें आणखी एकवार **अलेक्झांदर** यास तहाविषयीं पत्र लिहिलें. त्याचेही उत्तर येईना. तेव्हां निरुपाय होऊन **मास्को** शहर सोडून परत जाण्याचा **नापोलियन** यानें निश्चय केला.

तारीख १९ आक्टोबर सन १८१२ या दिवशीं **नापोलियन** (आंबट्झाक्सें या ह्मणीप्रमाणें) **मास्को** हें सैन्यास चांगलें स्थळ नाहीं असें प्रसिद्ध करून तें शहर सोडून परत जाण्यास निघाला. **फ्रेंच** लोक जातांच **रशियन** लोक पुनः शहरांत शिरले. त्यांनीं राहिलेल्या इमारतींची व्यवस्था केली. नंतर लौकरच बाजार वगैरे सुरू होऊन पुनः शहर गजबजूं लागलें ! **मास्को** शहरांतून निघाल्यापासून, खाचून मुद्दां आंगावर कांटा येण्यासारखे **फ्रेंच** लोकांचे हाल झाले, त्यांचें वर्णन केलें तर फारच विस्तार होईल. कसेंही संकट पडलें तरी पट्टदिशीं पार पडून जाण्याची एकादी युक्ति **नापोलियन** यास सुचे. परंतु या वेळेस चोंहोंकडून संकटें येऊं लागल्यामुळें त्याचेंही मन कित्येक वेळां ही गोष्ट करावी किंवा ती गोष्ट करावी याविषयीं संशयित होऊं लागलें. **रशियन** लोकांनीं तर असा क्रम चालविला,

कीं, समोर लढाई न देतां आडून लपून एकाएकीं छापा घालावा. फ्रेंच लोकांच्या वाटेवरील सर्व वस्तु जाळून टाकाव्या, असा त्यांचा क्रम पूर्वीपासून सुरू होताच. एका समयीं असें झालें कीं, **फ्रेंच** लोक जात होते त्या मार्गांतील एका गांवांत एका श्रीमान् **रशियन** सरदाराचा मोठा सुंदर वाडा होता, तो सरदार, **फ्रेंच** लोक जवळ आले, आपणास तर त्यांस टक्कर न देतां निघून जावयाचें, आपण गेलों तर शत्रु या वाड्यांत शिरतील, हें मनांत आणून वाड्याची राख करून चालता झाला. जाते वेळेस त्या वाड्याच्या बाहेर खालीं लिहिलेल्या मजकुराचा लेख त्यानें चिकटविला. 'आठ वर्षें हें स्थान सुशोभित करून मी त्यांत आपल्या कुटुंबांतील माणसांसहवर्तमान सुखानें राहिलों. या माझ्या वाड्याभोंवतालीं माझ्या जमिनी आहेत. त्यांत १७२० मनुष्यें रहात होतीं; तीं तुझी आल्याबरोबर घरदार सोडून गेलीं, आणि मीही तुमचे पाय लागून अपवित्र होऊंनये म्हणून आपलें घर जाळून टाकितों.'

परत जाण्यास **नापोलियन** यानें पुष्कळ बाटा योजिल्या, परंतु प्रत्येक वाटेंत **रशियन** लोक अडविण्यास तयारच होते, त्यामुळें कांहीं दिवस एका मार्गानें जावें, तिकडे संकट आलें म्हणजे पुनः दुसरीकडे वळावें, याप्रमाणें होऊं लागलें. या वेळेस **रशियन** लोक पुढे होऊन युद्ध करते तर सहज **फ्रेंच** लोकांचा पराजय झाला असता, परंतु **नापोलियन** याच्या नांवाचें त्यांस फार भय असे. त्यामुळे ते समोर आंगावर जाण्यास भीत. तथापि सवड सांपडली कीं **फ्रेंच** लोकांस त्रास देण्यास टपलेले असत. एका वेळेस तर **नापोलियन** स्वतः त्यांच्या हातांत सांपडण्याची वेळ आली होती, परंतु **फ्रेंच** लोकांचें सामान लुटण्याकडे **रशियन** लोकांचें लक्ष लागल्यामुळें **नापोलियन** निसटून गेला. लोकांस अन्न न मिळाल्यामुळें सैन्यांत अव्यवस्था होऊं लागली. हिवाळ्यानें शेंकडों लोक मरूं लागले. नद्यांवरून पूल होते ते **रशियन** लोकांनीं मोडून टाकिले. त्यामुळे वाटेंत मोठाल्या अडचणी येऊं लागल्या. **मास्को** येथून निघते वे-

ळेस **फ्रेंच** लोकांनीं पुष्कळ तोफा घेतल्या होत्या, परंतु घोडे वैगरे सर्व ओझ्यांचीं जनावरें थकून गेल्यामुळें त्या टाकून द्याव्या लागल्या. हजारों घोडे खावयास न मिळाल्यानें व थंडीनें मेले. त्यांशिवाय ऊन कपिण्याकरितां व कातडीं पांघरून थंडीची पीडा कमी करण्याकरितां **फ्रेंच** लोकांनींच पुष्कळ मारिले.

याप्रमाणें हाल सोशीत **फ्रेंच** लोक **स्मोलेन्स्को** या शहरापर्यंत आले. तेथें तरी आपणास सामानसुमानाचा कांहीं पुरवठा मिळेल, अशी **नापोलियन** यास आशा होती, परंतु त्या शहराचीही **रशियन** लोकांनीं नेहमींच्या वहिवाटीप्रमाणेंच व्यवस्था केल्यामुळें तेथेंही आशाभंग झाला. **मास्को** शहर सोडिलें तेव्हां **नापोलियन** याच्या बरोबरच्या मुख्य सैन्यांत एक लक्ष वीस हजार लोक होते. शिवाय हमाल्या कामदारांच्या हातारवालील टोळ्या होत्या. या एवढ्या प्रचंड सैन्यांतील या वेळेस सुमारें चाळीस हजार लोक मात्र शिल्लक राहिले. या सैन्याचे सारखे पुनः चार भाग करून **नापोलियन** **स्मोलेन्स्को** शहराहून निघाला.

फ्रेंच लोकांचें सैन्य परत जात असतां **द्नीपर** नदी उतरण्याचे वेळेस **रशियन** व **फ्रेंच** लोकांमध्यें मोठी चकमक झडली. **नापोलियन** स्वतः तलवार उपसून युद्धाच्या रगडयांत शिरला होता. शेवटीं **रशियन** लोकांच्या तडाक्यांतून **फ्रेंच** लोक नदी उतरून पलीकडे गेले. परंतु **मार्शाल् ने** हा **फ्रेंच** लोकांचा महा शूर सेनापति **स्मोलेन्स्को** शहराचें भस्म करण्यास आपली टोळी घेऊन मागें राहिला होता, त्यावर मोठें संकट आल्यामुळें **नापोलियन** यास मोठी काळजी लागली. त्यास शत्रूंनीं एक्या ठिकाणीं चोहोंकडून कोंडिलें, त्यामुळें बाहेर पडण्यास वाट नाहींशी झाली. **रशियन** लोकांच्या सेनापतीनें स्वाधीन होण्याविषयीं **मार्शाल्** ने यास निरोप पाठविला. त्यावर 'फ्रान्स देशांतील सेनापति शत्रूच्या स्वाधीन कधीं होत नाहींत.' असें निर्भय पणानें त्यानें उत्तर सांगून पाठविलें, आणि कांहीं वेळानें शत्रूंच्या आंगावर धुसून पार पडून जाण्याकरितां युद्धास आरंभ केला,

हजारों लोक ठार करून शत्रूंनीं त्याच्या टोळीस मागें हटविलें तरी फ्रेंच लोक घुसून पुढें गेले. या प्रसंगाविषयीं एक उत्तम इंग्लिश ग्रंथकार म्हणतो कीं, 'शौर्य आणि चातुर्य यांच्या संयोगानें दुर्निवार संकटें पार पडून जाण्याचीं यासारखीं उदाहरणें इतिहासांत फार सांपडत नाहींत.' शेवटीं द्वीपर नदी उतरण्याच्या वेळेस **मार्शाल्** ने यांचे फार हाल झाले. पुष्कळ ठिकाणीं उतरण्याचा यत्न केला परंतु शत्रू पुढें कांहीं चालेना, शेवटीं एके ठिकाणीं पाणी थिजून बर्फ झालें होतें त्यावरून जाण्याचा त्यानें बेत केला. जखमी लोकांनीं भरलेल्या पुष्कळ गाड्या बरोबर होत्या, त्या पटापट बर्फातून खालीं गेल्यामुळें हजारों मनुष्यें मरून गेलीं. इतक्यांत **रशियन** लोक पाठीमागून आले, त्यांनीं हल्ला करून पुष्कळ माणसें मारलीं. इतकीं संकटें सोसून शेवटीं **मार्शाल्** ने थोड्या लोकांसहवर्तमान **नापोलियन** यापाशीं जाऊन त्यास भेटला **मार्शाल् ने** संकटांतून पार पडल अशी नापोलियन यास आशा नव्हती, त्यामुळें तो दृष्टीस पडतांच त्यास आलिंगन देऊन त्यानें त्यास शूरामध्यें अतिशूर असें नांव दिलें.

स्मोलेन्स्को शहर आणि **द्वीपर** नदी यांजवळील लढायांत **रशियन** लोकांनीं **फ्रेंच** लोकांच्या सुमारें तीनशें तोफा घेऊन पंचवीस तीस हजार लोक कैद केले. रणांगणांत तर पुष्कळच पडले. **स्मोलेन्स्को** येथें असलेल्या चाळीस हजार मुख्य फौजेपैकीं या वेळेस बाराहजार लोक मात्र शिल्लक राहिले. **मिन्स्क्** नांवाच्या शहरीं लढाईच्या सामानाचा पुरवठा फार होता, याकरितां तेथें पोहोंचल्यावर आपलें संकट कांहीं अंशीं तरी कमी होईल, असें **नापोलियन** यास वाटत होतें, म्हणून तो तिकडे जाण्यास निघाला हाता, परंतु द्वीपर नदी उतरतांच त्यानें ऐकिलें कीं, तें शहर शत्रूंनीं घेतलें. हें ऐकून **नापोलियन** यास फारच वाईट वाटलें. नंतर **नापोलियन** पोलंद देशांतून परत जाण्याचा बेत करून तिकडे निघाला. यावेळेस दुसऱ्या बाजूस दोन सरदार होते, ते आपल्या पन्नास हजार लोकांसहवर्तमान **नापोलियन** याचे बरोबरच्या मुख्य सैन्यास मिळाले.

पोलंद देशांत जातांना **बेरिसिना** नदीजवळ **फ्रेंच** लोकांवर फारच मोठा भयंकर कहर गुदरला. शत्रु चोंहोंकडे टपले होते, त्यामुळें नदी उतरण्यास सांपडेना. शेवटीं दोन लांकडी पुलांवरून **फ्रेंच** लोक चालू झाले. इतक्यांत शत्रूंनीं भडिमार केला, तेव्हां सर्व लोक घाबरून मोठ्यानें ओरडूं लागले, त्यामुळें एकच गोंधळ झाला. पाळीपाळीनें थोडथोडया लोकांनीं उतरावयाचें; परंतु सर्वांसच जिवाचा धाक पडला होता, त्यामुळें एकदम गर्दी करून सर्व लोक पुलांवर घुसले. त्यामुळें भार फार होऊन मोठा पूल पडला. त्यावेळेस हजारों मनुष्यें, बायका, घोडे, जखमी मनुष्यांनीं भरलेल्या गाडया, वगैरे नदींत पडल्या. त्यांच्या अंतकाळच्या वेळच्या दुःखाच्या आरोळ्यांच्या गर्जनांनीं तोफांचा गडगडाट सुद्धां लोपवून टाकिला. नंतर दुसऱ्या पुलावर लोक घुसले. तेथेंही इतकी गर्दी झाली कीं, कित्येक चेंगरून मेले, कित्येक पुलावरून खालीं पडले, कित्येक शत्रूंचा भडिमार चालला होता त्या तडाक्यांत मेले. शेवटीं शत्रु अगदीं जवळ भिडला असें पाहून जखमी लोकांच्या गाडया व इतर सामानाच्या गाडया होत्या त्यांची आशा सोडून, कांहीं **फ्रेंच** लोक मोठ्या शौर्यानें आणि युक्तीनें पुलावरून गेले. आपल्यामागें शत्रु येऊं नये म्हणून त्यांनीं पूल जाळून टाकिला. त्यामुळें जखमी झालेले वगैरे सुमारें छत्तीस हजार लोक तेथल्यातेथेंच मेले.

बेरिसिना नदीवरच्या प्रसंगापासून तर **नापोलियन** याचा धीर खचूं लागला. नदी उतरल्यावरही शत्रु पाठीस लागलेच होते. **नापोलियन** या वेळेस त्यांच्या हातीं लागावयाचा, परंतु **पोलंदांतून** दुसरी एक सैन्याची टोळी मदतीस आल्यामुळें वचावला. या वेळेस हिंवाळ्याच्या कडकपणाची तर पराकाष्ठा झाली. शत्रूंच्या भयानें **फ्रेंच** लोक रात्रीस चाल करीत. दमले म्हणजे वाटेंत निजत. त्यांपैकीं थंडीनें कित्येक जागच्या जागीं मरत. एका ग्रंथकारानें असें लिहिलें आहे कीं, ' कांहीं थोडया प्रसंगीं हे थंडीनें मरणारे लोक, आपल्या पैकींच मेलेल्या लोकांच्या प्रेतांचें मांस भाजतांना दृष्टीस पडत,

असें म्हणतात. अशा प्रसंगाचें वर्णन अवश्य केलें पाहिजे. कारण ज्यास प्रताप हें नांव देण्याचें लोकांनीं अद्याप बंद केलें नाहीं, तो मिळविण्याकरितां महत्वाकांक्षी मनुष्य अशीं कृत्यें करितात, शिवाय ! मनुष्याचें अंतःकरण किती वाईट आहे ! एकवार त्यांत दुर्गुणांचें प्राबल्य झालें म्हणजे काय काय अनर्थ होतील याचा नियम नाहीं

कोणत्याही प्रसंगीं धैर्य न सुटण्याचा **नापोलियन** याचा स्वभाव होता तो नाहींसा झाला. कांहीं नवें संकट आल्यामुळें कोणी कांहीं विचारावयास गेला तर 'कां उगाच त्रास देतां ?' असें तो म्हणूं लागला. शेवटीं तारीख ३ दिसेंबर रोजीं **नापोलियन** यानें आपल्या सेनापतीस असें कळविलें कीं, तह झालेल्या देशांशीं वरचेवर होण्याचा पुनः संभव दिसतो, असें **पारिस** येथून वर्तमान आलें आहे. याकरितां मला सैन्य सोडून अवश्य गेलें पाहिजे. आतां तुम्ही पोलंद देशाजवळ आलां. तुम्हांस **विल्ना** शहरीं सामानाचा पुरवठा मिळेल. असें सांगून **मुरात्** यास मुख्य अधिकार देऊन दोन कामदार व आणखी दोन मनुष्यें अशीं फक्त चार मनुष्यें बरोबर घेऊन **नापोलियन पारिस** येथें जाण्यास निघाला. कोणास समजूनये म्हणून आपलें नांव व वेष बदलून तो भराभर मार्ग क्रमीत होता. **पारिस** येथें जाऊन पुनः सैन्य जमवून दुसऱ्या मोहिमेची तयारी करावी लोकर असा त्याचा बेत होता. वाटेनें जात असतां **रशियन** लोकांच्या हातीं लागण्याचा एक प्रसंग आला होता, त्यांतून पार पडून **नापोलियन ब्हार्सा** शहरीं पोहोंचला. तेथें त्याचा वकील होता, त्याची त्यानें गुप्त रीतीनें गांठ घेतली, तेव्हां त्यानें कित्येक ठिकाणचे लोक पुनः बरेंवडा करूं पाहतात असें सांगितलें.

आपण बहुत संकटांतून सुटलों हें बरें झालें, असें त्या वकिलानें म्हटलें. त्यावर **नापोलियन** म्हणाला, 'संकटें कांहीं नव्हतीं, मीं कित्येक लढायांत **रशियन** लोकांचा पराभव केला. मी नेहेमीं संकटांत च राहतों. स्वस्थ चैनींत घरीं बसणें हें कोंवड्यांच्या राजाचें काम आहे. माझें सैन्य पुनः **विल्ना** शहरीं तयार होईल. मी आणखी

तीन लक्ष नवी फौज **फ्रान्स** देशांतून आणून **ओडर** नदीवर एक दोन लढाया मारून त्या अडाणी **रशियन** लोकांचा पराभव करून पुनः एक महिन्यांत **नीमेन** नदीजवळ जाईन. सैन्यास सोडून जाण्यास मलाही वाईट वाटतें, परंतु उपाय नाहीं. **आस्त्रियन** व **प्रुशियन** हे काय करितात त्यावर मला नेहमीं नजर ठेविली पाहिजे. याप्रमाणें बोलून तेथून निघून **नापोलियन ड्रेस्डन** शहरीं गेला. तेथें **सा-क्सनी**च्या राजानें त्याची गुप्तपणें गांठ घेतली आणि आपल्या व आमच्या स्नेहांत कांहीं अंतर नाहीं, असें सांगितलें. नंतर तेथून निघाला, तो तारिख १८ दिसेंबर या दिवशीं रात्रीस **पारिस** येथें पोहोंचला. **तुलरीस** या राजवाड्याजवळ गेला तों राणी झोंपी गेली होती. एकाएकीं दोन चार मनुष्य रात्रीस राजवाड्यांत आले, हें पा. हून चाकर माणसें घाबरलीं. त्यांच्या बोलण्यानें राणी जागी झाली तेव्हां उभयतांची गांठ पडून सर्वांस मोठा आनंद झाला.

नापोलियन निघून गेल्यावर **फ्रेंच** लोकांची फौज शत्रूंचा पाठ-लाग व उपासमर यांचीं संकटें सोशीत येत होती. **विल्ना** शहरास फौज पोहोंचेपर्यंत शत्रूंनीं पुष्कळ लोक मारिले. कित्येक कैद केले. **फ्रेंच** लोकांची इतकी उपासमर झाली होती कीं, **विल्ना** शहरीं पो-होंचल्यावर पावाचा तुकडा दृष्टीस पडतांच मोठमोठ्या बलाढ्य शि-पायांच्या नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले. **विल्ना** शहरीं एक दिवस खातात पितात तों शत्रु पाठीशीं येऊन ठेपले, त्यामुळें धांदल उडून पुनः **फ्रेंच** लोक पळूं लागले. **पोलंदां**तील **प्रुशियन** लोकांच्या मुलुखांत गेल्यावर शत्रूंनीं त्यांचा पाठलाग केला नाहीं. **नापोलियन** सैन्य सोडून परत गेला, असें ऐकिल्यावर **आस्त्रियन** व **प्रुशियन** लो-कांचें सैन्य **फ्रेंच** लोकांवरोवर होतें, तें आपल्या मुलुखांत गेलें. या लोकांनीं लढाईत मनापासून मदत केली नाहीं, यामुळें **रशियन** लोकांनीं त्यांस त्रास दिला नाहीं.

याप्रमाणें **नापोलियन** याच्या **रशिया** देश जिंकण्याकरितां के-लेल्या विलक्षण मोहिमेचा परिणाम झाला. **फ्रेंच** लोकांच्या हजा-

रों तोफा व निशाणें शत्रूंनीं घेतलीं. एका ग्रंथकारानें खालीं लिहिल्याप्रमाणें या लढाईंतील **फ्रेंच** लोकांकडील मनुष्यहानीची हकीकत दिली आहे. सव्वा लक्ष मनुष्यें रणांगणीं मेलीं. श्रम, भूक, थंडी, यांच्या योगानें एक लक्ष वत्तीस हजार **माणसें** मेलीं. एक लक्ष ण्णव हजार **रशियन** लोकांनीं कैद केलीं. यांपैकीं अठेचाळीस सेनापति आणि तीन हजार मोठे कामदार होते. एकंदर साडेचार लक्ष मनुष्यांची प्राणहानि या मोहिमेंत झाली. शिवशिव ! काय अनर्थ हा ! **एशिया** खंडांतील मुसलमानांनीं भरभराटीच्या वेळेस लोकांस फार त्रास दिला, तो वाचून आंगावर कांटा येतो. परंतु अठराव्या शतकांत पृथ्वीवरील सुधारलेला भाग जो **युरोपखंड** त्यांतील सुधारलेल्या देशांत, ज्या धर्मास सर्व मनुष्यें भावंडांसारखीं आहेत. ह्या अत्युत्तम मताचा पाया आहे, अशा धर्मास अनुसरणाऱ्या लोकांनीं विनाकारण एकमेकांमध्यें कलह उत्पन्न करून असे अनर्थ करावे, हें पाहून अक्कल गुंग होते. मनुष्याची दुर्गुणप्रवृत्ति अनंत आहे असें वाटूं लागतें, व धर्मनिष्ठेचा प्रसार नसला तर कितीही सुधारणा झाल्या तरी मनुष्य असल्या अनर्थापासून निवृत्त होणें कठिण असा निश्चय होऊं लागतो. अस्तु. परमेश्वरकृपेनें कोणत्याही देशावर असे प्रसंग न येवोत.

भाग १५ वा.

नापोलेयन यास बादशाही प्राप्त झाली तरी त्यास पदच्युत करून पूर्वीच्या राजघराण्यांतील पुरुषास पुनः गादीवर बसविण्याविषयीं कित्येक लोकांच्या गुप्तपणें खटपटी चालल्याच होत्या. त्याप्रमाणेंच लोकसत्ताकराज्य असावें असें म्हणणाऱ्यांचेही आपली इच्छा परिपूर्ण करण्याविषयीं प्रयत्न चाललेच होते. **रशियाकडे** फौज

जाऊन बरेच दिवस झाले, तरी खरी बातमी कांहीं लागेना. त्यामुळें **नापोलियन** याचा अगदीं पराभव झाला वगैरे नानाप्रकारच्या त्यास प्रतिकूल अशा बातम्या लोक उठवूं लागले. त्यामुळें पुनः घोंटाळा होण्याचा संभव दिसूं लागला. हें वर्तमान कारभाऱ्यांनीं लिहून कळविल्यामुळें **नापोलियन** सैन्य सोडून मोठ्या त्वरेनें **पारिस** येथें आला; हें मागील भागांत सांगितलेंच आहे. पुष्कळ ठिकाणीं पराजय झाले तरी आमचा सर्व ठिकाणीं विजय आहे असें **नापोलियन पन पारिस** येथें लिहून पाठवीत असे. परंतु **पारिस** येथें पोहोंचण्यापूर्वी जें त्यानें पत्र लिहिलें त्यांत सर्व खरी हकीकत कळविली, त्यामुळें सर्व लोक घाबरले होते. तथापि **नापोलियन** याच्या नांवामध्येंच इतका मोहकपणा आला होता कीं, बहुतेक कुटुंबांतील कोणाचा मुलगा, कोणाचा भाऊ, वगैरे कोणी तरी लढाईंत पडलाच होता, असें होतें तरी आपला बादशाहा सुरक्षित येऊन पोहोंचला एवढ्यानेंच लोक स्वस्थ झाले. त्यांस असें वाटलें कीं, **रशिया** देशांतील हिंवाळा हा मुख्य शत्रु होय, त्यानें हा सर्व नाश केला. बाकी आपल्या बादशाहाच्या युद्धकौशल्यापुढें व **फ्रेंच** लोकांच्या शौर्यापुढें इतऱ्या कोणत्याही मोठ्या शत्रूचें कांहीं चालणार नाहीं. मोठमोठ्या अधिकाऱ्यांनीं व इतर बड्या लोकांनीं बादशाहास सन्मानपूर्वक पत्रें पाठविलीं. सर्व सरकारी खात्यांस जसा काय नवा जीव आला असें होऊन सर्व राज्यकारभार पुनः उत्तम रीतीनें चालूं लागला.

पारिस येथें आल्यावर **नापोलियन** यानें पुनः फौज जमविण्यास आरंभ केला. वेगळाल्या प्रांतांत हजारों घोडे तयार करविले. थोड्याच दिवसांनीं **नापोलियन** यास असें वाटूं लागलें कीं, साडेतीन लक्ष फौज घेऊन पुनः आपणास शत्रूंशीं टक्कर देतां येईल.

नापोलियन गेल्यावर **फ्रेंच** सैन्याच्या अधिकाऱ्यांत लहानसहान तंटे होऊं लागले. **मुरात्** इतर राजांच्या डौलाप्रमाणें बोलूं लागला म्हणजे इतर सेनापति त्यास म्हणत, ईश्वराच्या कृपेनें इतर राजांस वंशपरंपरेनें राज्य प्राप्त झालें आहे, तुला फक्त **नापोलियन** याच्या

मेहेरबानीनें राज्य मिळालें आहे. शिवाय आपली बायको राज्यकारभारांत फार ढवळाढवळी करिते हें ऐकिल्यामुळें **मुरात्** निघून गेला. **युजिन** यास मुख्य अधिकार दिल्यामुळें त्यास रागही आला होता. इकडे **प्रुशिया**च्या मुलुखांत **फ्रेंच** लोक पराभूत होऊन आले; त्यांची ती दशा पाहून व पूर्वीच्या आपल्या पराभवाचें स्मरण होऊन **प्रुशि**याचे लोकांस फार चेव आला. **फ्रेंच** लोकांची केव्हां खोड मोडूं असें त्यांस वाटूं लागलें. त्यांस विनाकारण त्रास न देण्याविषयीं **प्रुशिया**च्या राजानें आपल्या प्रजेस सांगितलें, परंतु लढाई करून **फ्रेंच** लोकांचा पराजय करण्याचा त्यांच्या उत्कट इच्छेचा त्याच्यानें अवरोध करवेना. त्यामुळें **ब्रेस्ला** शहरीं जाऊन ता० ३१ जान्युआरी सन १८१३ या दिवशीं त्यानें **फ्रेंच** लोकांशीं लढाई करण्याचा बेत प्रसिद्ध केला. **जीना** येथील प्रसंग गुदरल्यास सहावर्षे झालीं होतीं. इतक्या वेळांत पूर्वीच्या दुःखाचा उपशम करून एक मतानें शत्रूंचा सूड उगविण्यास पुनः **प्रुशियन** लोकांनीं उत्साह धरिला. लहान मोठ्या घराण्यांतले सर्व तरुण लोक युद्धास जाण्यास तयार झाले. मोठाल्या विद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या टोळ्या आपल्या गुरूस मुख्य करून लढाईस जाण्यास सिद्ध झाल्या. बायकांनीं आपले दागिने मोडून लढाईच्या खर्चाकरितां राजाकडे पैसे पाठविले. श्रीमान् लोकांनींही पुष्कळ द्रव्य दिलें. शिवाय लढाईच्या खर्चास लागेल तितका पैसा पाण्यासारखा पुरविण्यास **इंग्लिश** सरकार तयार होतेंच. स्वतंत्रतारूप ईश्वराची देणगी शत्रूंनीं हिसकावून घेतली, ती त्यांचें नरडें दाबून परत घेण्याकरितां **प्रुशियन** लोकांनीं दारविलेला स्वदेशाभिमान पाहून सर्व **युरोपांतील** लोकांस आश्चर्य वाटलें. **रशिया**च्या **बादशाहा**नें ही वदंता ऐकतांच तो सैन्य घेऊन आपल्या जुन्या मित्राच्या साह्याय्यास निघाला. निघण्याच्यापूर्वी त्यानें **युरोपांतील** सर्व राजांस जाहीरनाम्यानें असें कळविलें कीं, 'असा अनुकूल प्रसंग पुनः येण्यास पुष्कळ युगें पाहिजेत. **युरोपांतील** स्वस्थता व लोकसुख संपादण्याचा हा प्रसंग घालविणें हें ईश्वराच्या कृपेचा गैर उपयोग करणें आहे.'

निरुपायामुळें **मुशिया**च्या राजास कांहीं दिवस वाहेरून **अलेक्झांदर** याचें मित्रत्व सोडून द्यावें लागलें होतें. त्यामुळें उभयतां राजपुरुषांची (तारीख १५ मार्च सन १८१३) **ब्रेस्ला** येथें गांठ पडली, तेव्हां **मुशिया**च्या राजाच्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागले. तें पाहून **अलेक्झांदर** ह्मणाला, पुसा आतां हे शेवटले अश्रुपात. यापुढें आतां तुमच्या नेत्रांस अश्रु आणण्यासारखें **नापोलियन** याच्यानें कांहीं होणें नाहीं.

इकडे **वर्नादात्ते** पस्तीस हजार फौज घेऊन **मुशिया**च्या राजाच्या मदतीस निघाला. यामुळें एकंदर लाख फौज **फ्रेंच** लोकांशीं लढण्यास तयार झाली. **स्पेन** देशामध्यें **वेलिंग्लग्तन** यानें **फ्रेंच** लोकांवर मारा चालविलाच होता. अशी अवस्था होती तरी **नापोलियन** यास इतकी धमक होती कीं, **आस्त्रिया**चें आपण साहाय्य मागावें असें कोणीं सुचविलें, तें त्यास अगदीं आवडलें नाहीं. **जोझेफ स्पेन**चा राजा आहे, असें कबूल केल्याशिवाय कोणाशींही तह करावयाचा नाहीं, असा त्याचा दुराग्रह होता. आपण लढाईस गेल्यावर पुनः मागें घोंटाळा होऊंनये ह्मणून **नापोलियन** यानें लोकप्रीति संपादण्याकरितां **रोम** येथील **पोप फौंतेन्ब्लो** येथें होता, त्यास सन्मानपूर्वक परत पाठवून दिलें.

आपल्यामागें आपल्या राणीच्या नांवानें राज्यकारभार चालवावा, असें ठरवून **नापोलियन** एप्रिल महिन्यांत पुनः समर भूमीकडे जाण्यास **पारिस** येथून निघाला. **अलेक्झांदर** याचें सर्व सैन्य येऊन पोहोंचलें नव्हतें. **मुशियन** लोकांची तर सर्व नवी तयारी, याकरितां एकदम हल्ला करून त्यांचा पराभव करावा असा **नापोलियन** याचा बेत होता. या हेतूनें एवढ्या थोड्या वेळांत त्यानें दोन लक्ष फौज त्या बाजूस जमा केली. कांहीं दिवसांनीं **लत्झेन** शहराजवळ दोघां सैन्यांची टक्कर झाली. तीन शत्रूंनीं बराच टिकाव धरिला, तरी **नापोलियन** यानें मोठ्या चातुर्यानें त्यांचा पराभव केला. ह्या पराभवापासून शत्रु मनांत भ्याले; परंतु त्यांचा विशेष नाश झाला नाहीं.

लत्झेन येथें जय झाल्यामुळें पुनः लोकांची खातरी होऊं लागली कीं, नापोलियन असला ह्मणजे तेथें जय आहेच असें समजावें.

लत्झेन येथील लढाई झाल्यावर नापोलियन ड्रेस्डन शहराकडे गेला. साक्सनीच्या राजाच्या मनांत नापोलियन याचा पक्ष सोडावयाचा नव्हता, तरी कित्येक शहरांतील त्याची प्रजा मुशियन लोकांस मिळाली; या अपराधाबद्दल हांबर्ग शहरांतील लोकांस मोठ्या क्रूरपणानें फ्रेंच लोकांनीं शिक्षा केली. लत्झेन येथील लढाईंत पराजय झाला तरी शत्रूंची फुटाफूट झाली नाहीं, हें पाहून फ्रेंच लोकांचा सरदार मार्शाल् ने यानें आपलें सैन्य बर्लिन शहराकडे चालविलें. त्यास वाटत होतें कीं, असें केल्यास मुशियन लोक तिकडे जाऊं लागतील. तथापि मुशियन लोकांनीं असा बेत केला कीं, शत्रूंनीं आपल्या राजधानीवर हल्ला केला तरी हरकत नाहीं, परंतु आपली जागा सोडावयाची नाहीं. इकडे आस्ट्रियाचे बादशाहानें लढाईची तयारी चालविलीच होती. जर्मन लोकांचा मुलुख परत देऊन त्यांस स्वतंत्र करून तह करावा असें त्यानें कळविलें, परंतु नापोलियन यानें तें मनास आणिलें नाहीं.

तारीख २१ मे या दिवशीं पुनः ब्रॉत्झेन या शहराजवळ समर सुरू झाला. फ्रेंच लोकांनीं शत्रूंवर पुष्कळ वेळ हल्ले केले. त्यांच्यापुढें कांहीं चालेना तेव्हां शत्रु मोठ्या युक्तीनें रणांगणांतून सुरक्षित निघून गेले. एवढें युद्ध होऊन शत्रूंचे लोक हातीं लागले नाहींत, तोफा मिळाल्या नाहींत, हें पाहून नापोलियन यास फार वाईट वाटलें. सेनापतीस रागें भरून तो स्वतः युद्धाच्या गर्दीत शिरला, तरी कांहीं झालें नाहीं. इतक्यांत त्याचा एक प्रिय मित्र जवळ होता तो गोळी लागून पडला. हें पाहून जिवलग मित्र दूरोक् हा जवळ होता तो नापोलियन यास ह्मणाला, आज आपणास दैव प्रतिकूळ आहे. इतक्यांत तोही जखमी झाला. तेव्हां शत्रूंचा पाठलाग सोडून नापोलियन यानें त्या दिवशीं तेथेंच मुक्काम केला. मित्राचें प्राणोत्क्रमण होत असतां नापोलियन त्याच्याजवळ उभा होता. अतिदुःख

कौऊन त्याच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या होत्या. दूरोक् पडल्यापासून **नापोलियन** याच्या मनाचें चापल्य कमी झालें. कोणी कांहीं विचारिलें तरी 'उद्यां' असें तो म्हणूं लागला. मित्र मेल्यावर त्याच्या उत्तरकार्यास त्यानें तेथील धर्माध्यक्षाजवळ पुष्कळ पैसा देऊन थडग्यावर कोरण्याचा लेख आपण स्वतः लिहून दिला; आणि त्याच्या मुलास कांहीं नेमणूक करून देण्याकरितां ठराव लिहून पाठविला. या लढाईंत पंधरा हजार **फ्रेंच** लोक पडले. शत्रूंची जागा बांगली असल्यामुळें त्यांकडील दहा हजार लोक पडले.

आपण मध्यस्थ होऊन तह करण्याविषयीं **आस्त्रिया**चे बादशाहानें **अलेक्झांदर** व **प्रुशिया**चा राजा यांस कळविलें. **नापोलियन** यासही तह करावा असें वाटूं लागलें. त्यामुळें लढाई तहकूब असतांना सैन्यें कोठकोठें रहावीं हें ठरून व तहाचीं कलमें ठरविण्यास **प्रेग** या शहरीं सर्वांच्या मुखत्यारांनीं जमण्याचा ठराव होऊन युद्धें बंद झालीं.

नापोलियन यानें **स्पेन**च्या राज्यावरचा हक्क सोडला नाहीं, व केवळ सैन्याची तयारी करण्याकरितां मात्र त्यानें तहाचें बोलणें लाविलें आहे, असें समजून **इंग्लिश** सरकारानें आपला मुखत्यार **प्रेग** येथें पाठविला नाहीं. इतर राजांनींही सैन्याची जमाजम होण्याकरितांच तहाचें बोलणें लाविलें होतें. **द्रेस्दन** येथें **आस्त्रिया**चा प्रधान **नापोलियन** यापाशीं स्वतः बोलण्यास आला होता, त्यास **नापोलियन** म्हणाला, तुम्हांस यावेळेस आपलें कार्य साधून घ्यावयाचें आहे, तुम्हांस काय पाहिजे ? **इलिरिया** प्रांत पुरेल काय ? तुम्ही उदासीन रहावें एवढीच माझी इच्छा आहे. मी एकटा **रशियन** व **प्रुशियन** लोकांची खबर घेण्यास पुरे आहें. **प्रुशिया**चें राज्य घेऊन त्यांतील भाग सुद्धां **आस्त्रियास** देऊं असें **नापोलियन** यानें सुचविलें. त्यावर **आस्त्रिया**च्या प्रधानानें उत्तर केलें कीं, **आस्त्रिया**नें उदासीन रहावयाची वेळ गेली. **यूरोपखंडा**चा विचार केला पाहिजे. हुस-

च्याचा नाश करून आपलें हित करून घेण्याची आमची इच्छा नाहीं. आपण पूर्वीच्या **फ्रान्स** देशाच्या राज्यानें संतुष्ट राहून यूरोपखंडां- तील राजे स्वतंत्र झाल्याशिवाय शांतता होणार नाहीं. हें ऐकून **नापोलियन** रागानें म्हणाला, खरेंच सांगा, माझ्याविरुद्ध होण्यास **इंग्लिशां**नीं तुम्हांस काय देऊं केलें आहे ?

जशा येतील तशा अटी कबूल करून कसा तरी तह करून घ्या, सर्व **यूरोपखंडास** आपल्यावर शस्त्र धरण्यास लावूं नका, **स्पेन** दे- शांतील **फ्रेंच** लोकांचा अगदीं पराभव करून **वेलिंग्तन फ्रान्स** दे- शाच्या हद्दीकडे येत आहे, **जोजेफ** यास पळतां पळतां वाट पुरी झाली आहे, या प्रसंगीं आग्रह धरूं नका; असें **नापोलियन** यास सर्व मो- ठमोठ्या दूरदृष्टि कामदारांनीं व मित्रांनीं सांगितलें. **पारिस** येथून **फोके** आणि **तालेरंद** हे मुद्दाम याकरितां आले. त्यांनीं सांगितले कीं, देशांत आपल्या विरुद्ध फार लोक झाले आहेत. तर यावेळेस तह केल्याशिवाय राहूंनये. तह कसाही झाला तरी **फ्रान्स** देशाच्या पूर्वी- च्या कोणत्याही राजाकडे नव्हता इतका मुलुख आपल्याकडे राहील. कितीही सांगितलें तरी **नापोलियन** याचा आग्रह सुटेना. तो म्हणाला, दहा लढायांत पराजय झाला तरी इतकें वाईट वाटणार नाहीं, अशा प्रकारचें कृत्य आपण होऊन म्यां करावें असें तुम्ही सांगतां, परंतु मी एक लढाई जिंकिली तर **बर्लिन** व **ब्रेस्ला** हीं शहरें घेईन, आणि माझ्या कीर्तीस योग्य असा तह करीन. तुम्ही सर्व आपलें हित पाहतां, मला तुमचे बेत नकोत, परंतु मी सांगेन तसें करा म्हणजे झालें. या- प्रमाणें गर्वांध होऊन **नापोलियन** यानें सुव्यद्धाक्याचा अनादर करून स्वहिताचा प्रसंग दवडिला. त्यामुळें **आस्त्रियानें रशिया** व **प्रुशिया** यांशीं तह करून **फ्रान्सावर** शस्त्र धरण्याचा निश्चय केला.

नापोलियन यानें जिकडे तिकडे नाकेबंदी करून खुद्द **ड्रेस्डन** शहराजवळ अडीच लाख फौज जमविली. पूर्वीच्या चालीप्रमाणे शत्रूंची दाणादाण करून त्यांस घाबरें करून सोडावें असें त्याच्या मनांत होतें; परंतु या वेळेस त्याच्या सर्व खुब्या पूर्णपणें जाणणारे दोन गृह-

स्थ शत्रूंकडे होते, त्यांनींही **नापोलियन** याच्या युक्तींवर उलट युक्ति योजिल्या; त्यामुळें सर्व यत्न फुकट गेले. या दोन गृहस्थांपैकीं एक **बर्नादोत्ते** स्वीदनचा राजा व दुसरा **मोरो**. **मोरो** हा शूर सरदार पूर्वी **फ्रेंचां**च्या चाकरीस होता. परंतु त्याचें वर्तन **नापोलियन** यास प्रतिकूळ असल्यामुळें त्याजवर कांहीं दोषारोप करून त्यास हद्दपार केलें होतें. तो **अमेरिकेंत** होता. तेथून **रशियाच्या** बादशाहानें त्यास आपल्या सैन्यांत चाकरी करण्याकरितां बोलावून आणिलें, त्यामुळें शत्रूंस फार उपयोग झाला. शत्रूंस अनुकूळ होऊन **फ्रान्स** देशावर शस्त्र धरल्यामुळें **मोरो** याची कित्येक ग्रंथकार निंदा करितात. **ब्लुशियन** लोकांचा सेनापति **ब्लुचर** म्हणून होता, हाही मोठा विलक्षण शूर असून **नापोलियन** याचा हाडवैरी होता. त्यास सेनापतित्व दिल्यामुळें **प्रुशियन** लोक फारच खुष झाले होते.

या तीन गृहस्थांनीं अशी मसलत केली कीं, ज्या टोळीवर **फ्रेंच** लोक पहिल्यानें हल्ला करतील तिनें शत्रूंस टक्कर न देतां त्यांस आंगावर घेऊन मागें सरावें; असें झालें म्हणजे **नापोलियन** तिचा स्वतः पाठलाग करूं लागेल. तो बराच दूर गेल्यावर दुसऱ्या टोळीनें मागें **द्रेस्दन** शहरावर हल्ला करून तेथील लढाईचें सामान घेऊन शत्रूंच्या सैन्यांचे मध्यें आपलीं सैन्यें घालून त्यांची तुटातूट करावी. याप्रमाणें बेत झाल्यावर **ब्लुचर** यानें पहिल्यानें लढाईस सुरुवात केली. तेव्हां **नापोलियन** **द्रेस्दन** शहर सोडून त्याच्या फौजेवर गेला. त्यानेंही पूर्वी ठरलेल्या बेताप्रमाणें **नापोलियन** यास बरेंच लांब नेलें. तेव्हां इकडे दुसऱ्या सैन्यानें **द्रेस्दन** शहराकडे चाल केली. आपल्या पाठीमागें शत्रूंनीं **द्रेस्दन** शहरावर हल्ला करण्याचा बेत केला आहे, हें ऐकतांच **नापोलियन** **ब्लुचर** याचा पाठलाग सोडून परत येण्यास निघाला. **नापोलियन** येऊन पोहोंचण्यापूर्वीच शत्रु लढाई करते तर कदाचित् **द्रेस्दन** शहर त्यांच्या हातीं लागलें असतें, परंतु चकमक सुरू झाली त्याच दिवशीं **नापोलियन** येऊन पोहोंचला त्यामुळें **फ्रेंच** सैन्यास असें धैर्य आलें कीं, त्यानें महाप-

राक्रम करून शत्रूंचा अगदीं मोड करून त्यांचा प्रयत्न विफल करून टाकिला. हें युद्ध मोठें निकराचें झालें. प्रत्येकाकडले आठ आठ हजार लोक पडले. शिवाय **फ्रेंच** लोकांनीं शत्रूंकडील वीस हजार लोक कैद केले. व त्यांच्या पुष्कळ तोफाही घेतल्या. या प्रसंगीं शत्रूंकडील **मोरो** हा सेनापति पडला.

वर सांगितलेला युद्धप्रसंग झाल्यावर **नापोलियन** श्रमानें अजारी पडला. त्यानें इतके श्रम केले होते कीं, दुसरा मनुष्य तर मेलाच असता. वर सांगितलेल्या युद्धांत विजयश्रीनें आपल्या जिवलगमित्रास चांगलें साहाय्य केलें, परंतु या वेळेपासून तिनें त्यापासून दूर जाण्यास आरंभ केला. कांहीं सैन्य दुसऱ्या प्रदेशांत शत्रूंचा पाठलाग करीत गेलें होतें, तें **रशियन** व **प्रुशियन** या दोघांच्या दोन टोळ्यांच्या कचाटींत सांपडल्यामुळें, त्याचा अगदीं विध्वंस झाला. सेनापति व आठ हजार लोक हत्यारें ठेवून शत्रूंच्या स्वाधीन झाले. ड्रेस्दन येथें अजारी असतांच ही बातमी **नापोलियन** यास कळली तेव्हां, तो म्हणाला लढाईचें असेंच आहे; सकाळीं विजय आणि संध्याकाळीं पराजय. इकडे **नापोलियन** परत गेला असें कळतांच **ब्लुचर** यानें परतून **फ्रेंच** लोकांवर हल्ला केला. त्यांत पंधरा हजार **फ्रेंच** लोक पडले, व शत्रूंनीं शंभर तोफा घेतल्या. दुसरी एक **फ्रेंच** सैन्याची टोळी **बर्लिन** शहराकडे जात होती, तिचा **बर्नादोत्ते** यानें अगदीं पराभव करून दहा हजार **फ्रेंच** लोक कैद केले, व शेचाळीस तोफा घेतल्या.

कांहीं दिवसांनीं **नापोलियन** याची प्रकृति बरी झाली. नंतर त्यानें नव्या लढाईकरितां तयारी करण्याचा असा उद्योग चालविला कीं, असे श्रम त्यानें स्वतःदेखील पूर्वीं कधीं केले नव्हते. नवें सैन्य आणविलें. लढायांच्या योगानें **फ्रान्स** देशांतील इतके लोक मेले होते कीं, नव्या सैन्यांत शाळेंत विद्यार्थी शोभतील असे लहान लहान मुलगे येऊं लागले. सर्व तयारी झाल्यावर **नापोलियन** यानें सैन्य पाहिलें तेव्हां सर्वांनीं **बादशाहापुढें** नम्र होऊन अशी शपथ वाहिली कीं,

'आम्ही मरून जाऊं परंतु **फ्रान्स** देशांचा अपमान पाहणार नाहीं.' शत्रूंनीं ही **फ्रेंच** लोकांचा पराभव करण्याकरितां अडीच लक्षांवर फौज तयार केली.

याप्रमाणें उभयतांची तयारी होऊन ता० १६ अक्टोबर सन १८१३ या दिवशीं युद्धास आरंभ झाला. हा महा भयंकर समरप्रसंग **लीप्सिग** शहराजवळ झाला. त्यांत शत्रूंनीं **फ्रेंच** लोकांचा पराभव केला. तेव्हां **नापोलियन** याच्या मनांतील गर्वाच्या इमारतीचा पाया ढिला होऊन तह होईल तर बरें, असें त्यास वाटूं लागलें. **आस्तर्लित्झ** येथील लढाईच्या वेळेस **आस्त्रियाच्या बादशाहानें** जो कामदार पाठविला होता, तो **नापोलियन** यानें या लढाईंत कैदी केला होता, त्यासच तहाचें बोलणें करण्याकरितां **आस्त्रियाच्या बादशाहाकडे** पाठविलें. **नापोलियन** ह्यानें असें सांगितलें कीं, 'पोलंद **इलिरिया**, **हालंद**, **हान्सशहर**, **स्पेन**, वगैरे सर्व प्रांत व देश मी सोडून देतों. **इतालीं** देशास तुम्ही स्वतंत्र ठेवीत असलां तर मी त्यावरील आपला हक्क सोडून देतों. व **जर्मनी** मधून आपलें सैन्य घेऊन जातों. मजकडून तहाचें बोलणें निघालें असें त्या दोन्ही बादशाहांस कळलें म्हणजे त्यांस मागील गोष्टींची आठवण झाल्याशिवाय राहणार नाहीं.'

नापोलियन याचा पराभव करण्यास जमलेल्या राजांनीं तर अशी शपथ वाहिली होती कीं, **र्‍हाईन** नदीच्या पूर्व बाजूस **फ्रेंच** सैन्य आहे तों पर्यंत तहाचें बोलणें काढावयाचें नाहीं. लाखों लोक घेऊन शत्रूंच्या कचाटींतून **लिप्सिग** शहरापासून **नापोलियन** यास सुटून जातां येणार नाहीं, हें त्यांस पक्कें माहित होतें. त्यांनीं **नापोलियन** याच्या निरोपास उत्तरच पाठविलें नाहीं. त्यामुळें पुनः दुसरे दिवशीं लढाई सुरू झाली. हा संग्रामही मोठा निकराचा झाला. शत्रूकडील लोक फार होते. तरी कांहीं वेळ मोठ्या शौर्यानें नवशिक्या **फ्रेंच** लोकांनीं त्यांचें कांहीं चालूं दिलें नाहीं. **नापोलियन** यानें या प्रसंगीं आपलें विलक्षण युद्ध कौशल्य दाखविलें, परंतु, शेवटीं

शत्रूंनीं **फ्रेंच** लोकांचा पराभव केला. दहा हजार **साक्सन** लोक **नापोलियन** याजकडे होते ते फितूर होऊन शत्रूकडे गेले. या युद्धांत दोहों बाजूंकडील सैन्याचा पुष्कळ नाश झाला.

शेवटीं निरुपाय होऊन **लिप्सिग** शहरांतून पळ काढण्यास **नापोलियन** यानें मध्य रात्रीस आरंभ केला. त्यावेळेस **फ्रेंच** लोकांचे फारच हाल झाले. शत्रूंनीं मारा चालविलाच होता. यावेळेस ही **नापोलियन** याच्या कामदारांनीं फारच मोठें विलक्षण शौर्य केलें, नाहीं तर तो सुद्धां या प्रसंगांतून पार पडणें कठिण होतें. एक लहान पूल होता त्यावरून **फ्रेंच** लोक चालले होते, शत्रु अगदीं जवळ येऊन ठेपल्यास पूल उडवून टाकण्यास ज्या कामदारास **नापोलियन** यानें सांगितलें होतें, त्यास तशी वेळ आली असें वाटून त्यानें एकदम पूल उडवून दिला. तेव्हां अनर्थास काय विचारावें ! हजारों घोडे व माणसें नदींत पडलीं. हा कहर मागें सांगितलेल्या **बेरिसिना** येथील प्रसंगाप्रमाणेंच झाला. **मार्शाल् माक्दोनल्द** म्हणून **नापोलियन** याचा एक शूर सेनापति नदींतून पोहून पार पडला. पंचवीस हजार **फ्रेंच** लोक शत्रूंच्या स्वाधीन झाले. या लढाईंत **नापोलियन** याचे एकंदर पन्नास हजार लोक पडले. **साक्सनी** प्रांतांतून जात असतां **फ्रेंच** लोकांचे फार हाल झाले. **रशिया** देशांतील लोकांप्रमाणेंच तेथील लोकही त्यांस कोणताही पदार्थ देतना. शत्रूंचे लोक पाठीस लागलेच होते. **नापोलियन** जवळ असला तर मात्र सैन्यांत कांहीं व्यवस्था राही, नाहीं तर लोक पाहिजे तिकडे जात आणि देशांतील लोकांस पीडा देत. रोज कांहीं तरी अनर्थाची नवी बातमी येत असे, तरी धीर पुरुषास योग्य असें वर्तन करून **नापोलियन** यानें आपलें मन स्वस्थ ठेविलें होतें.

एर्फर्त येथें लढाईचें सामान पुष्कळ होतें, याकरितां **नापोलियन** तेथें कांहीं दिवस राहणार होता, परंतु शत्रूजवळ आले असें ऐकतांच पुनः चालूं लागला. मार्गांत एके ठिकाणीं पुनः **आस्त्रियन** लोकांची गांठ पडून लढाई झाली, तींत **फ्रेंच** लोकांनीं शत्रूंचा पराभव

केला. या लढाईंत **फ्रेंच** लोकांकडील सहा हजार लोक पडले. परंतु शत्रूंकडील दहाहजार पडून चार हजार **फ्रेंच** लोकांनीं कैद केले. शेवटीं राहिलेंसाहिलें सैन्य **मेंत्झ** या शहरीं ठेवून **नापोलियन** पुढें गेला. तो ता० ९ नोव्हेंबर रोजीं **पारिस** येथें पोहोंचला. इकडे शत्रूचे लोकही ऱ्हाईननदीजवळ येऊन पोहोंचले.

लीप्सिग येथील लढाईनंतर **नापोलियन** याच्या वैभवकमलाच्या पांकळ्या भराभर गळूं लागल्या. **जर्मनी**तील सर्व संस्थानें, **वेस्टफालिया**, **देन्मार्क**, **हालंद** वगैरे सर्व देश शत्रूंकडे मिळाले. **फ्रेंच** लोकांसही लढाई, **नापोलियन**, या शब्दांचा वीट आला. मुकाट् आपल्या राज्यामध्यें गेला होता, परंतु पुनः **ड्रेस्दन** येथें **नापोलियन** गेल्यावर त्यास साहाय्य करण्यास आला. परंतु **लीप्सिग** येथें पराभव झाल्यावर तो पुनः निघून गेला. त्यास **नापोलियन** यानें वैभवास आणलें असून तोही, **नेपल्सचें** राज्य मजकडे ठेवाल तर मी तुम्हांस मिळतों असें **आस्त्रिया**च्या **बादशाहास** म्हणूं लागला. इकडे **स्पेन** देशांतून सर्व **फ्रेंच** लोक हांकून देऊन **वेलिंग्तन** **फ्रान्स**च्या सरहद्दीवर पोहोंचला. यामुळें **नापोलियन** यास **रशियन**, **आस्त्रियन**, **मुशियन**, **इंग्लिश**, वगैरे बहुतेक **युरोपां**तील सर्व देशांतील लोकांबरोबर एकदम युद्ध करण्याचा प्रसंग आला.

बाहेरून असें संकट आलें असून **नापोलियन** यास पूर्वीप्रमाणें स्वदेशांतहि साहाय्य नाहींसें झालें. पूर्वीच्या राजवंशास गादीवर आणण्यास इच्छणारे व लोकसत्ताकराज्य इच्छणारे असे दोन पक्षाचे लोक **फ्रान्स** देशांत होते, त्यांस आपलें कार्य साधण्याची वेळ आली असें वाटून तेही **नापोलियन** याच्या नाशाविषयीं उद्युक्त झाले. **नापोलियन** आपला दुराग्रह सोडीना. तेव्हां त्याचे मित्र होते तेही शत्रूंस मिळाले. **नापोलियन** याच्याविरुद्ध झालेल्या सर्व राजांनीं **फ्रांकफोर्त** या शहरीं जाहीरनामा प्रसिद्ध करून **फ्रेंच** लोकांस असें कळविलें कीं, ' **फ्रान्स** देशानें बलाढ्य रहावें अशी आमची इच्छा आहे. **बोर्बोन** राजांकडे असलेल्या मुलुखापेक्षांही अधिक मुलुख

देण्यास आह्मी तयार आहों. **नापोलियन** यानें इतर राष्ट्रांवर जो वरचढपणा स्वीकारिला आहे, तो नाहींसा करावा, एवढाच **फ्रान्स** देशावर स्वारी करण्याचा उद्देश आहे. तुमच्या देशांतील राज्यव्यवस्थेंत हात घालण्याचा आमचा उद्देश नाहीं. तो तुमचा हक्क आहे. त्याची व्यवस्था तुह्मीं पाहिजे तशी करावी. **यूरोपखंडाचें फ्रान्स** देशाशीं शत्रुत्व नाहीं. **नापोलियन** याशीं आहे. **नापोलियन** या व्यक्तीशीं नाहीं, परंतु त्यानें घातलेल्या रीतीशीं आहे.' **नापोलियन** यासही त्यांनीं हाच मजकूर कळविला.

नापोलियन यानें तहाचें बोलणें चालविलें होतें तरी एकीकडे सैन्याची तयारी चालविलीच होती. फौजेंत नवीन लोक भरण्यास आणि लढाईच्या खर्चाबद्दल नवा कर बसवून पैसा उत्पन्न करण्यास त्यानें पुष्कळ यत्न केले. जाहीरनामे लावून स्वदेशाच्या रक्षणाकरितां कंबर बांधण्यास त्यानें **फ्रेंच** लोकांस सांगितलें. वर्तमानपत्रांनीही लोकांस उत्तेजन येण्यासारखे पुष्कळ मजकूर लिहिले. परंतु या वेळेस **नापोलियन** याच्या नांवाचा आणि त्याच्या शब्दाचा मोहकपणा अगदीं नाहींसा झाला होता. सैन्यांत आलेले लोकसुद्धां त्याला सोडून राजपक्षाच्या लोकांस मिळूं लागले. लोकांच्या मुखत्यारांची सभा होती, तिला देखील **नापोलियन** यानें आजपर्यंत एकीकडे ठेविलें होतें, परंतु यावेळेस तिनेंही धैर्य धरून तह करण्याविषयीं आपलें मत प्रदर्शित केलें. तेव्हां **नापोलियन** रागावून ह्मणाला, 'ही तुह्मास मोठी लज्जास्पद गोष्ट आहे. **वेलिंग्तन** दक्षिणेकडे आला आहे, **रशियन** उत्तरेच्या बाजूस चापीत पुढें येत आहेत, **प्रुशियन** व **आस्त्रियन** हे पूर्वबाजूनें येत आहेत, असें असून आपण सर्व त्यांस हांकून लावण्यास तयार होत नाहीं, ही मोठ्या शरमेची गोष्ट होय. माझ्या सर्व मित्रांनीं मला सोडून दिलें. **म्युनिच्** शहर जाळून टाकण्यापूर्वी तह करशाचा ? मला तुह्मी तीन लक्ष लोक द्या ह्मणजे एकंदर ह्ह्लीं आहे तिजसुद्धां मजजवळ दहा लक्ष फौज होईल. परंतु या वेळेस मला वयानें मोठे मनुष्य पाहिजेत. हीं मुलें वाटेंत उगाच गोंधळमात्र करितात.

मालंद सोडून द्या म्हणतां काय? सभासद हो, या वेळेस आवेश आला पाहिजे. सर्वांनीं तयार झालें पाहिजे. तुम्हीं कुटुंबांतील व राष्ट्रांतील मुख्य आहां. तुम्हीं सर्वांस उदाहरण दाखविलें पाहिजे. जिकडे तिकडे लढाई लढाई असा ध्वनि व्हावा, असें असून तह तह अशीच ओरड चालली आहे! माझा अपमान झाला तरी हरकत नाहीं, पण, तह झाला म्हणजे झालें, असें तुम्हांस वाटतें. मी हेंच सर्व राष्ट्र आहें. सिंहासन म्हणजे काय, लांकडाचा तुकडा सोन्यानें मढवून वर किनखाप घातलेला एवढेंच कीं नाहीं? मी हेंच सर्व राष्ट्र आहें. मी सर्व लोकांचा मुखत्यार आहें. मीं वाईट गोष्ट केली असली तरी तुम्हीं माझी चौघांत निंदा करूंनये. लोक घाणेरडे कपडे एकीकडे धुतात. मला **फ्रान्स** देशाची गरज आहे त्यापेक्षां **फ्रान्स** देशास माझी विशेष जरूर आहे.'

याप्रमाणें **नापोलियन** रागानें बोलला तरी या प्रसंगीं काय काय करावें, याविषयीं सभासदांनीं एक लेख तयार केला तो पाहून त्यास फारच राग आला. तो म्हणाला 'या सभेंतले लोक राजद्रोही आहेत. मला मदत करावयाची सोडून ते उलटा अडथळा आणितात. आम्हीं जोर धरिला पुरे कीं, शत्रु घाबरलेच. परंतु हे त्यांस बोलावणें पाठवितात. आपण या वेळेस छाती पुढें केली पाहिजे. परंतु हे पाठ दाखवितात. मी त्यांचा लेख प्रसिद्ध करूं देणार नाहीं. त्यांनीं आपलें कर्तव्य केलें नाहीं, पण मी आपलें करीन. मी ही सभाच मोडून टाकितों.' असें म्हणून त्यानेंही सभा तूर्त बंद आहे असा हुकूम फर्माविला.

दुर्दैव येऊं लागलें म्हणजे चोहोंकडून येऊं लागतें. एका कुटुंबाच्या व्यवस्थेप्रमाणें **नापोलियन** यांच्या राज्याची व्यवस्था सुरळीत असे ती मोडून सर्व खात्यांत अव्यवस्था झाली. लोक सैन्य सोडून पळून जात त्यांस शिक्षा होत तरी गुन्हे बंद होतनासे झाले. कित्येक लोक पैसा घेऊन बादशाहाच्या नांवानें रस्त्यांत पोवाडे गात, त्यांची लोक हुर्यो हुर्यो करीत. सरकारच्या बंदोबस्तास न जुमानितां

णीं विद्याभ्यासाकरितां राहिला होता; त्या ब्रिनी शहराजवळच पहिं-
ल्यानें शत्रूंची व फ्रेंच लोकांची लहानशी चकमक झडली. तेथें श-
त्रूंकडील एक मनुष्य **नापोलियन** याच्या पाठींत भाला मारीत होता
इतक्यांत त्याच्याजवळील एका फ्रेंच कामदारानें गोळी घालून त्यास
ठार केलें. ब्रिनी शहर शत्रूंनीं जाळून बेचिराख केलें.

ब्रिनी येथें चकमक झाल्यावर पुनः एकवार तहास कबूल हो-
ऊन आपलें रक्षण करण्याची वेळ आली तीही **नापोलियन** यानें घा-
लविली. तहाच्या अटी ठरविण्यास एक कामदार गेला होता, त्यास
त्यानें असें सांगितलें होतें कीं, बोलणें लांबणीवर टाकून शत्रु पारिस
शहरावरें लौकर जाणार नाहींत असें करावें; परंतु तसें करण्यास सांपडेना;
तेव्हां त्या कामदारानें असें कळविलें कीं, कोणत्या अटी आ-
पाहिजेत तें एकदम कळवा; नाहीं तर आतां शत्रु ऐकणार नाहींत.
यावेळेसही सर्व कामदारांनीं साधेल तसा तह करण्याविषयीं विनंति
केली. **नापोलियन** याच्या मनांत प्रथमतः तह करावा असें आलें;
परंतु पुनः गर्वानें जोर करून विचार शक्तीस हटविल्यामुळें तो बेत
रहित करून त्यानें शत्रूंच्या सैन्यावर चाल केली. यानें नदीजवळ
चार पांच दिवस मोठालीं युद्धें झालीं, त्यांत दोन तीन ठिकाणीं **नापो-
लियन** यानें शत्रूंचा अगदीं पराजय केला. त्यांचे पुष्कळ लोक मेले,
कैद केलेले सात हजार **प्रुशियन** लोक, तोफा, निशाणें, वगैरे विजयाचीं
चिन्हें **पारिस** येथें पाठविलीं. तेव्हां लोकांस वाटलें कीं, विजयश्रीनें
आपल्या जिवलगास अद्याप सोडिलें नाहीं. या विजयामुळें फ्रेंच
सैन्यास व **नापोलियन** यासही नवा दम आला.

इकडे **नापोलियन** मुख्य सैन्य घेऊन **प्रुशियन** लोकांवर गे-
आहे, असें कळतांच **आस्त्रियन** व **रशियन** लोकांनीं **पारिस** शह-
राकडे चाल केली. **प्रुशियन** लोकांच्या पराभवाची बातमी ताजी
आहे तोंच **पारिस**पासून अगदीं जवळ **फौन्तेब्लो** या जागीं **रशियन**
लोक आले अशी बातमी आली, तेव्हां शहरांतील लोक घाबरून गेले.
शत्रु दुसऱ्या बाजूनें **पारिस** शहराकडे जात आहेत हें ऐकतांच

शिपन लोकांजवळच्या सैन्याचा अधिकार दुसऱ्यास देऊन **नापो-**
लियन आस्त्रियन लोकांवर सैन्य जात होतें तिकडे गेला. **नापो-**
लियन आल्यामुळें सैन्यास इतकें अवसान आलें कीं, मोठा पराक्रम
करून त्यानें शत्रूंस मागें हटविलें. **आस्त्रियन** लोकांचा पुष्कळ नाश
झाला, परंतु ते **मान्तेरो** याठिकाणीं जाऊन नीटपणें राहिले. **नापो-**
लियन याचा सेनापति **व्हिक्तर** हा त्यांचा पाठलाग करीत होता,
त्यास शत्रूंस तेथून घालवितां आलें नाहीं, यामुळें **नापोलियन** यास
त्याचा फार राग आला. निर्भर्त्सना करून त्यानें त्यास अधिकारा-
वन दूर केलें, तेव्हां त्या शूर सरदाराच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या.
त्या दिवशींच सकाळीं लढाईंत त्याचा जांवई मेला होता. तो **नापो-**
लियन यास म्हणाला, ' मला अधिकार नाहीं तर नाहीं, परंतु इतर
शिपायांप्रमाणें मी सैन्यांत राहतों. ' ही स्वामिभक्ति पाहून **नापोलिय-**
न यासहि आपण वाईट गोष्ट केली असें वाटलें. पुनः त्याचा हात ध-
रून तो म्हणाला, ' तुमचा अधिकार मी दुसऱ्यास देऊन बसलों यास
उपाय नाहीं, परंतु आतां मी तुम्हांस दुसऱ्या टोळीचा अधिकार देतों. '
पुनः दुसरे दिवशीं कडक युद्ध सुरू झालें. युद्धाच्या गर्दीत शि-
रून इतर शिपायांप्रमाणें **नापोलियन** लढूं लागला, तेव्हां पूर्वीप्रमाणेंच
लोक आपण धोक्याच्या ठिकाणीं येऊं नका, असें त्यास विनंति करून
सांगूं लागले, तेव्हां तोही मागें न सरतां किंचित् हास्य करून म्हणाला,
' मुलांनों मला ठार मारणारी गोळी अझून सुटली नाहीं. ' याप्रमाणें
मोठें शौर्य करून त्यानें शत्रूंस पुष्कळ मागें हटविलें.

नापोलियन यानें पुनः आपणास अनुकूळ होण्याविषयीं **आस्त्रि-**
याच्या बादशाहास पत्र पाठविलें परंतु त्यानें एकच साफ उत्तर दिलें
कीं, ' ती गोष्ट तर होणें नाहींच. परंतु यावेळेस घस सोसून तह
करून घ्या आणि सर्वस्वनाश करून घेण्याचा प्रसंग टाळा. तुम्ही
असें कराल तर आम्ही **बोर्बोन** वंशास अनुकूल होणार नाहीं. ' इ-
कडे **पारिस** येथें मुखत्यारांनीं सभा भरवून सर्वानुमतें **नापोलियन**

लोक राजव्यवस्थेविषयीं वादविवाद करूं लागले. ते क्षणत आतां हैं चालणार नाहीं; दोरी फार ताणली, ती आतां लौकर तुटेल. हैं ऐकून एक गृहस्थ क्षणाला, समाप्तीस आरंभ झाला.

चोहोंकडून उपाय नाहींसा झाला तेव्हां **नापोलियन** यानें पोप व **स्पेनचा** राजा यांचीं राज्यें त्यांस परत दिलीं. असें केलें असतां **स्पानिश** लोक **इंग्लिशांस** आपल्या देशांतून घालवितील असें त्यास वाटत होतें. यावेळेस **फ्रान्स** देशांतील वर्तमानपत्रें इतकीं पराधीन होतीं कीं, बादशाहास प्रतिकूल अशी एकही गोष्ट त्यांत येत नसे. त्यामुळें **फ्रान्स** देशावर शत्रु चालून येत आहेत वगैरे साधारण लोकांस कांहीं एक माहीत नसे. बादशाहाच्या शौर्याची कीर्ति तर लोकांच्या मनांत अशी बिंबून गेली होती कीं, **फ्रान्स** देशाकडे शत्रु तोंड करील ही गोष्ट त्यांस असंभाव्य वाटे.

सन १८१२ या वर्षाच्या दिसेंबर महिन्यांत शत्रूंनीं **फ्रान्स** देशांत प्रवेश करण्यास आरंभ केला, तेव्हां शत्रु जवळ आल्याची वार्ता नमी चोहोंकडे पसरूं लागली. तेव्हां लांबलांबचे लोक भिऊन आपली मालमत्ता व बायकामुलें घेऊन **पारिस** येथें येऊं लागले. **फ्रेंच** लोकांनीं परदेशांतील लोकांस जसा त्रास दिला होता, त्याप्रमाणें शत्रूंच्या सैन्यांतील लोक **फ्रान्स** देशांतील लोकांस मारहाण करून लुटूं लागले. वाटेंत **फ्रेंच** लोकांचीं सैन्यें होतीं त्यांचा पराभव करून शत्रु पुढें येऊं लागले; तेव्हां **पारिस** शहरासही वेढा पडणार असें समजून लोक खाण्यापिण्याचा आंत पुरवठा करूं लागले. शत्रु इतके पुढें चेपीत चालले तरी लोक स्वदेशाभिमान धरून त्यास हटविण्यास तयार होतना. कांहीं थोड्या ठिकाणच्या लोकांनीं मात्र शत्रूस कांहीं वेळ अडथळा केला, बाकी सर्व लोक उदासीन राहिले. शत्रूच्या सेनापतींनीं ठिकठिकाणीं असे जाहीरनामे लाविले कीं आम्ही **फ्रान्स** देशाचे मित्र म्हणून येत आहों, शत्रु म्हणून येत नाहीं. असें असून जे आम्हांस अडथळा करतील त्यांस हाल भोगावे लागल्यास आम्हांकडे दोष नाहीं.

इतक्या गोष्टी झाल्या तेव्हां **फ्रान्स** देशावर शत्रु आले, याकरतां मी समरभूमीस जाणार, असें **नापोलियन** यानें प्रसिद्ध केलें. तेव्हां कार्नोत् वगैरे प्रसिद्ध गृहस्थ ज्यांस **नापोलियन** यानें पूर्वी घालवून दिलें होतें, ते द्वेषभाव मनांत न आणितां स्वदेशाचें कार्य असें समजून त्यास साहाय्य करण्यास आले. व त्यानेंही पूर्वीचें कांहीं एक मनांत न आणितां त्या सर्वांस मोठमोठे अधिकार दिले. ता० २३ जान्युआरी सन १८१४ या दिवशीं **नापोलियन** यानें आपल्या कामदारांस राजवाड्यांत बोलाविलें. सर्व बसल्यावर आपण मध्यें येऊन बसला. नंतर लागलींच राणी मुलासहवर्तमान तेथें आली तेव्हां **नापोलियन** यानें भाषण केलें:—

सरदार हो, **फ्रान्स** देशावर शत्रूंनीं स्वारी केली. मी सेनापतित्व स्वीकारण्यास आपल्या सेनेजवळ जातों. ईश्वराच्या साहाय्यानें व सेनेच्या बळानें मी शत्रूंस लौकर हद्दपार करीन, अशी आशा आहे. (नंतर एका हातानें राणीस व दुसऱ्या हातानें मुलास धरून तो म्हणाला,) परंतु कदाचित् शत्रु राजधानीजवळ पोहोंचलेच तर राणी आणि रोमचा राजा यांस (इतकें बोलतो तों मोठा गहिंवर येऊन म्हणाला, माझी बायको आणि मुलगा यांस) तुमच्या स्वाधीन करितों. हें एकतांच इतरांच्या काय, पण त्यांत जे त्याचे मनापासून इष्ट नव्हते, त्यांच्यासुद्धां नेत्रांतून अश्रु आले. बायको आणि मुलगा या उभयतांवर **नापोलियन** याची फारच प्रीति होती; तिनें यावेळेस गर्व, मोठा, महत्त्वाकांक्षा, वगैरे सर्व उद्दाम वृत्ति एकीकडे करून त्याच्याही मनास विव्हल केलें.

पूर्वीप्रमाणें पुनरपि राणीच्या नांवानें राज्यकारभार चालवावा असें ठरवून व **पारिस** शहराजवळ शत्रु आले असतां रक्षणाची चांगली तजवीज करून तारीख २५ जान्युआरी सन १८१४ या दिवशीं **नापोलियन पारिस** येथून निघाला. निघण्याच्यावेळेस तो उदास दिसत होता, परंतु समरभूमीजवळ जातांच आंगांत वीरश्री येऊन त्याचें मुख धैर्योत्साहयुक्त दिसूं लागलें. जेथें **नापोलियन** लहानप-

र्णी विद्याभ्यासाकरितां राहिला होता; त्या ब्रिनी शहराजवळच पहिं ल्यानें शत्रूंची व फ्रेंच लोकांची लहानशी चकमक झडली. तेथें श त्रूंकडील एक मनुष्य **नापोलियन** याच्या पाठींत भाला मारीत होता इतक्यांत त्याच्याजवळील एका फ्रेंच कामदारानें गोळी घालून त्यास ठार केलें. ब्रिनी शहर शत्रूंनीं जाळून वेचिराख केलें.

ब्रिनी येथें चकमक झाल्यावर पुनः एकवार तहास कबूल हो ऊन आपलें रक्षण करण्याची वेळ आली तीही **नापोलियन** यानें घा लविली. तहाच्या अटी ठरविण्यास एक कामदार गेला होता, त्यास त्यानें असें सांगितलें होतें कीं, बोलणें लांबणीवर टाकून शत्रु पारिस शहरावरें लोकर जाणार नाहींत असें करावें; परंतु तसें करण्यास सांपडेना; तेव्हां त्या कामदारानें असें कळविलें कीं, कोणत्या अटी आप पाहिजेत तें एकदम कळवा; नाहीं तर आतां शत्रु ऐकणार नाहींत. यावेळेसही सर्व कामदारांनीं साधेल तसा तह करण्याविषयीं विनंति केली. **नापोलियन** याच्या मनांत प्रथमतः तह करावा असें आलें; परंतु पुनः गर्वानें जोर करून विचार शक्तीस हटविल्यामुळें तो बेत रहित करून त्यानें शत्रूंच्या सैन्यावर चाल केली. **यान्** नदीज चार पांच दिवस मोठालीं युद्धें झालीं, त्यांत दोन तीन ठिकाणीं **नापो लियन** यानें शत्रूंचा अगदीं पराजय केला. त्यांचे पुष्कळ लोक मेले, कैद केलेले सात हजार **मुशियन** लोक, तोफा, निशाणें, वगैरे विजयाचीं चिन्हें **पारिस** येथें पाठविलीं. तेव्हां लोकांस वाटलें कीं, विजयश्रीनें आपल्या जिवलगास अद्याप सोडिलें नाहीं. या विजयामुळें फ्रेंच सैन्यास व **नापोलियन** यासही नवा दम आला.

इकडे **नापोलियन** मुख्य सैन्य घेऊन **मुशियन** लोकांवर गेला आहे, असें कळतांच **आस्त्रियन** व **रशियन** लोकांनीं **पारिस** शहराकडे चाल केली. **मुशियन** लोकांच्या पराभवाची बातमी ताजी आहे तोंच **पारिस**पासून अगदीं जवळ **फौन्तेब्लो** या जागीं **रशियन** लोक आले अशी बातमी आली, तेव्हां शहरांतील लोक घाबरून गेले. शत्रु दुसऱ्या बाजूनें **पारिस** शहरा[illegible] जात आहेत हें ऐकतांच

मूशियन लोकांजवळच्या सैन्याचा अधिकार दुसऱ्यास देऊन **नापोलियन आस्त्रियन** लोकांवर सैन्य जात होतें तिकडे गेला. **नापोलियन** आल्यामुळें सैन्यास इतकें अवसान आलें कीं, मोठा पराक्रम करून त्यानें शत्रूंस मागें हटविलें. **आस्त्रियन** लोकांचा पुष्कळ नाश झाला, परंतु ते **मान्तेरो** याठिकाणीं जाऊन नीटपणें राहिले. **नापोलियन** याचा सेनापति **व्हिक्तर** हा त्यांचा पाठलाग करीत होता, त्यास शत्रूंस तेथून घालवितां आलें नाहीं, यामुळें **नापोलियन** यास त्याचा फार राग आला. निर्भर्त्सना करून त्यानें त्यास अधिकारावरून दूर केलें, तेव्हां त्या शूर सरदाराच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या. त्या दिवशींच सकाळीं लढाईंत त्याचा जांवई मेला होता. तो **नापोलियन** यास म्हणाला, 'मला अधिकार नाहीं तर नाहीं, परंतु इतर शिपायांप्रमाणें मी सैन्यांत राहतों.' ही स्वामिभक्ति पाहून **नापोलियन** यासहि आपण वाईट गोष्ट केली असें वाटलें. पुनः त्याचा हात धरून तो म्हणाला, 'तुमचा अधिकार मी दुसऱ्यास देऊन बसलों यास उपाय नाहीं, परंतु आतां मी तुम्हांस दुसऱ्या टोळीचा अधिकार देतों.'

पुनः दुसरे दिवशीं कडक युद्ध सुरू झालें. युद्धाच्या गर्दीत शिरून इतर शिपायांप्रमाणें **नापोलियन** लढूं लागला, तेव्हां पूर्वीप्रमाणेंच लोक आपण धोक्याच्या ठिकाणीं येऊं नका, असें त्यास विनंति करून सांगूं लागले, तेव्हां तोही मागें न सरतां किंचित् हास्य करून म्हणाला, 'मुलांनों मला ठार मारणारी गोळी अझून सुटली नाहीं.' याप्रमाणें मोठें शौर्य करून त्यानें शत्रूंस पुष्कळ मागें हटविलें.

नापोलियन यानें पुनः आपणास अनुकूळ होण्याविषयीं **आस्त्रिया**च्या बादशाहास पत्र पाठविलें परंतु त्यानें एकच साफ उत्तर दिलें कीं, 'ती गोष्ट तर होणें नाहींच. परंतु यावेळेस घस सोसून तह करून घ्या आणि सर्वस्वनाश करून घेण्याचा प्रसंग टाळा. तुम्ही असें कराल तर आम्ही **बोर्बोन** वंशास अनुकूल होणार नाहीं.' इकडे **पारिस** येथें मुखत्यारांनीं सभा भरवून सर्वानुमतें **नापोलियन**

यास असें लिहून कळविलें कीं, 'शत्रु चोहोंकडून राजधानीवर येत आहेत, याकरितां होईल तसा लौकर तह करावा.' त्याजवळ कामदार होते तेही तह करण्याविषयीं आग्रह करूं लागले. इतकें झालें तरी नवीन जय झाल्यामुळें झालेला गर्व त्याच्या मनांतून निघेना. तो म्हणाला, 'लोकसत्ताकराज्याच्या वेळेस **फ्रान्स** देशाकडे असलेला मुलुख संभाळीन, अशी मी राज्याभिषेकाच्या वेळेस शपथ वाहिली आहे, ती मोडल्याशिवाय मला तह करितां येत नाहीं. माझी हानि होणेंच असेल तर आपल्या आपण होऊं द्या; मी होऊन करून घेणार नाहीं.'

तह होण्याची निराशा झाली तेव्हां आतां पुनः तहाचें बोलणें करावयाचें नाहीं, असें ठरवून शत्रूंनीं लढाया सुरू केल्या. या सर्व लढायांचें वर्णन करूं लागलें तर फार विस्तार होऊन पुनः पुनः त्या त्या गोष्टी वाचून वाचकांस कंटाळा येणार आहे, याकरितां तसें करितां येत नाहीं. हीं युद्धें मोठीं भयंकर निकराचीं झालीं. **लेओन, ह्मीन्स्**, वगैरे कित्येक ठिकाणीं मोठाले संग्राम होऊन उभय पक्षाचे फार लोक मेले. एक विद्वान् ग्रंथकार असें म्हणतो कीं, या वेळची **नापोलियन** याची आक्रमशक्ति, एका शत्रूपासून दुसऱ्या शत्रूकडे सावधपणानें जाणें, शत्रूंचे लोक पुष्कळ असले तरी निर्भयपणानें त्यांवर हल्ला करणें, त्याच्या कधीं सरावयाच्या नाहींत अशा नव्या युक्ति, या पाहून त्याच्या युद्धकलानिपुणतेची वाखाणणी कोण करणार नाहीं ? **नापोलियन** लढाईंत इतका गुंतलेला असे तरी आपल्या राज्याच्या कारभाराचें काम पहातच असे. सारांश पूर्वीप्रमाणें या वेळेसही त्याच्या मनाचें व शरीराचें दार्ढ्य तिळमात्र कमी झालें नाहीं. या वेळेसही त्याचें नांव ऐकतांच शत्रू एकादे वेळेस घाबरे होत.

वर सांगितल्याप्रमाणें **नापोलियन** यानें आपल्याकडून होतील तितके प्रयत्न केले, परंतु नाश होण्याची वेळ आल्यामुळें सर्व विफळ होत चालले. शत्रु चोहोंकडून व्यापूं लागले, तेव्हां इकडे जाऊं किंवा तिकडे जाऊं असें त्यास वाटूं लागलें. आपल्या देशांतील लोक

शत्रूंवर शस्त्र धरतील असें त्यास वाटत होतें, परंतु देशाची धूळधाण करीत शत्रूंचीं सैन्यें इकडून तिकडे जाणें, त्यानीं शहरें व गांवें जाळणें, **रशियन** व **प्रुशियन** लोकांनीं सूड उगविण्याकरितां क्रूरपणानें लोकांस मारहाण करणें, इत्यादि गोष्टींनीं त्रासून गेल्यामुळें लोक शक्तिहीन झाले. कित्येक सुपिक मुलखांत शत्रूंनीं अशी ओसाडी करून दिली कीं, तेथें लांडगे फिरूं लागले. ज्यांस सवड सांपडली ते पळून गेले, बाकीचे तेथें राहिले, त्यांच्या घरांत शत्रूंचे लोक राहिले. त्यांस दोन तीन महिन्यांत अन्न मिळालें नाहीं. त्यांच्या गांवाजवळील नद्यांतून नेहमीं त्यांच्या देशबंधूंचीं प्रेतें वाहत असत. अशा स्थितींत बादशाहाकरितां कोण आपल्या जिवावर उदार होतो. बाहेर मुलुखांत याप्रमाणें व्यवस्था असून शहरांतही **नापोलियन** याबद्दलची प्रीति लोकांच्या मनांतून भराभर कमी होत चालली. फ्रेंच लोकांचा जय आहे; असा वर्तमानपत्रांत मजकूर येई, तरी काय उपयोग ? प्रांतांतून भिऊन पळून आलेल्या लोकांची शहरांत गर्दी होऊं लागली. सर्व मोठमोठ्या इमारती जखमी झालेल्या लोकांनीं भरून गल्या. **सीन** नदींतून इतकीं प्रेतें वाहूं लागलीं कीं, कोणी पाण्यास शिवेनासें झालें. राज्यव्यवस्थेची तर अशी दशा झाली कीं, **पारिस** येथील खजिन्यांत नेहमीं कर वगैरे मिळून सुमारें तीस हजार रुपये जमा होत असे, ती दीडशें रुपये होऊं लागली. हें पाहून कारभाऱ्यांनीं **नापोलियन** यास कळविलें कीं, राज्य यंत्राचीं सर्व चक्रें बिघडलीं आहेत. शेवटीं **नापोलियन** याच्या दैवाची प्रतिकूलता पूर्ण होण्यास **वेलिंग्तन** ही **स्पेन** देशाच्या बाजूच्या फ्रेंच सैन्याचा पराजय करून **फ्रान्स** देशांत शिरला. तिकडल्या प्रांतांतील लोक पहिल्यापासून **नापोलियन** यास प्रतिकूळ होते. त्यांनीं आपल्या लोकांचे हाल करून इंग्लिशांस पुष्कळ मदत केली, आणि त्यांच्या साह्याच्यानें **बोर्बोन** राजवंशाच्या नांवानें झेंडा उभारून ते लढाईस सुद्धां तयार झाले. **नापोलियन** युद्धाची तयारी करून शत्रूंच्या मुख्य सैन्यावर चालला. कित्येक प्रसंगीं त्यानें शत्रूंचे पुष्कळ लोक

कैद केले. एका प्रसंगीं **आस्त्रियाचा** बादशाहाहि **फ्रेंच** लोकांच्या हातीं लागल्यासारखा झाला होता, परंतु नशीबानें निभावला. शत्रूंनी **नापोलियन** यास फसविण्यास अशी युक्ति केली कीं, तो होता त्या बाजूला एक सैन्य ठेवून हेंच मुख्य सैन्य आहे असें दाखवून न समजूं देतां दुसऱ्या वाटेनें थेट **पारिस** शहराकडे सैन्य चालविलें. पा**रिस** शहराजवळच्या किल्ल्यावर लढाईच्या तयारीची नीट व्यवस्था ठेवण्यास **नापोलियन** यानें सांगितलें होतें, परंतु त्याचा भाऊ जो**जेफ** हा विशेष हुशार नसून त्यास इतर राज्यकारभाराचें काम फार असल्यामुळें त्याच्यानें तें झालें नाहीं. शहराजवळ फौज ही फार थोडी होती. शिवाय नवे लोक सैन्यांत भरले होते, ते बहुतकरून शहरांतील शेटसावकारांपैकीं होते, त्यामुळें ते **नापोलियन** याकरितां निकरानें लढण्यासारखेही नव्हते. **बोर्बोन** वंशाच्या पक्षाचे लोक **नापोलियन** याचा पराभव होऊन पूर्वीच्या राजवंशास गादी मिळावी असें इच्छित होतेच. त्यांपैकीं कित्येक शत्रूच्या सेनापतींकडे जाऊन आपणास साह्य मागूं लागले; परंतु सेनापतींनीं सांगितलें कीं, **फ्रान्स** देशास कोणत्या प्रकारचें राज्य पाहिजे त्याचा विचार **फ्रेंच** लोकांनीं करावा. त्यांच्या देशाच्या कारभारांत हात घालण्याची आमची इच्छा नाहीं.

तारीख २६ मार्च १८१४ या दिवशीं **पारिस** येथें डुरून शत्रूंच्या तोफांचे अवाज ऐकूं येऊं लागले. ता० २८ या दिवशीं शत्रूंनी **मार्क्स** शहर घेतलें, तेव्हां तेथील हजारों लोक, मुलेंबाळें, गुरेंढोरें, वस्त्रपात्र, दाणादुणा, लांकूडफांटें, गवतकाडी, वगैरे, सर्व प्रकारची चीजवस्त घेऊन **पारिस** येथें येऊं लागले. थोडेंसें सैन्य शहरांत राखून बाकीचें शत्रु येत होता त्या बाजूस बाहेर पाठविलें. शत्रु अगदीं जवळ आला असें ऐकतांच एकूणतिसाव्या तारखेस राणी मुलास व इतर माणसांस घेऊन **ब्लाईस** येथें निघून गेली. तिच्याबरोबर संरक्षणार्थ तीनशें लोक होते. तिनें बरोबर राजवाड्यांतून पधरा गाड्या सोन्यारुप्याचें सामान नेलें. त्यावेळेस **जोजेफ** यानें असा जाहीरनामा लाविला कीं, "**पारिस** नगरवासी लोक हो, शत्रूचें सैन्य **मार्क्स**

शहराजवळ आलें, तें पुढें येत आहे. परंतु विजयी सैन्य बरोबर घेऊन बादशाहा त्याचा पाठलाग करीत आहे. राणी आणि रोमचा राजा यांच्या संरक्षणाची तजवीज कारभाऱ्यांनीं योजिली आहे. मी तुमच्याजवळ आहें. हें शहर, यांतील इमारती, संपत्ति, व आपलीं बायकामुलें, वगैरे ज्या आपल्या प्रिय वस्तु आहेत त्यांचें रक्षण करण्यास आपण सज्ज होऊं. हें मोठें शहर कांहीं वेळ लष्कराचा तह होऊंद्या म्हणजे विजय मिळवून जो तह उल्लंघण्यास शत्रु इच्छितो त्याजवळ आल्याबद्दल त्यास लाज वाटेल. बादशाहा तुमच्या मदतीस येत आहे. थोडावेळ अवसान धरून त्यास साहाय्य करून फ्रान्स देशाचें नांव राखा. ”

या जाहिरनाम्यानें लोकांच्या मनांत शत्रूंचा पराभव करण्याचा आवेश उत्पन्न होईल असें कित्येकांस वाटत होतें परंतु तसें कांहीं झालें नाहीं. लोक पूर्वीप्रमाणें उदासीन दिसूं लागले. शत्रु तर अगदीं जवळ येत चालले. माणसांच्या व घोड्यांच्या प्रेतांनीं सीन नदी भरून गेली. या दिवशीं मात्र पारिस येथील सर्व नाटकगृहें बंद झालीं. तिसाव्या तारखेस सकाळींच चोहोंकडून शत्रु पारिस शहराजवळ येऊन थडकले. शत्रूंचे लोक पुष्कळ तथापि फ्रेंच लोकांनीं आपल्या नांवास योग्य असें शौर्य करून कांहीं वेळ टिकाव धरिला. शाळेंत शिकणारे विद्यार्थी सुद्धां आवेशानें युद्धांत शिरले. पारिस शहरचे रस्ते प्रेतांनीं व जखमी झालेल्या लोकांनीं भरून गेले. सेनापतीनें आणखी लोक पाहिजेत असें सांगण्यास जोजेफ याकडे एक मनुष्य पाठविला; त्यास तो म्हणाला, आतां कोठले लोक आणूं? तुमचा घोडा चांगला आहे काय? त्या गृहस्थानें होय म्हटल्याबरोबर, या तर माझ्या मागून, असें म्हणून दोघे चालते झाले; ते ब्लाईस येथें गेले. शेवटीं निरुपाय होऊन फ्रेंच लोक शत्रूंस शरण गेले; तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, सगळी फौज पारिस येथून बाहेर जाईल तर आम्ही लढाई बंद करूं. ही अट कबूल केल्यावर युद्ध बंद झालें.

इकडे आपणास फसवून शत्रु राजधानीवर गेले असें कळतांच

जलदी करून **नापोलियन** तिकडे जाऊं लागला. वाटेनें मुलुख उध्वस्त झालेला असल्यामुळें सैन्यास खावयास सुद्धां मिळेना. इतक्यांत **नापोलियन** यास एका कामदाराचें पत्र आलें कीं, 'शत्रूंचे लोक शहरांतील लवाडलोकांच्या मदतीनें जवळ आले. शहर शत्रूच्या स्वाधीन होऊं नये अशी आपली इच्छा असेल तर एका क्षणाचाही विलंब न करितां तुम्ही येथें आलें पाहिजे'. हें पत्र आल्यावर **नापोलियन** यानें फारच त्वरा केली. कित्येक लोक म्हणत होते कीं, आतां पा**रिस** शहर शत्रूंच्या हातीं लागल्याशिवाय राहत नाहीं, तर आपण तिकडे नजातां दुसऱ्या ठिकाणीं शत्रूंस लढाई देऊन जय मिळवूं; किंवा रणांगणीं शूरासारखे मरून तरी जाऊं. आपण स्वतः गेल्यावर कांहीं तरी होईल असें समजून **नापोलियन** भराभर पुढें चालला. एके दिवशीं त्याचे लोक बेचाळीस कोस चालले. शेवटीं कांहीं वेळानें **नापोलियन** गाडींत बसून एकटाच पुढें चालला. नंतर भरधांव घोडा पिटाळीत जाऊन **फौंतेन्ब्लो** येथें पोहोंचला. तेथून पुढें जातो तों शत्रूंशीं करार झाल्याप्रमाणें **पारिस** येथून आलेलें सैन्य भेटलें, तेव्हां त्यानें **बेलिअर्द** या सेनापतीस विचारिलें, 'हें काय ? सैन्य घेऊन इकडे कां आलां ? शत्रु कोठें आहेत ? माझी बायको आणि मुलगा हीं कोठें आहेत ? दुसरे सेनापति कोठें आहेत ?'

बेलिअर्द यानें सर्व हकीकत सांगितली, तेव्हां **नापोलियन** त्यास घेऊन पुढें जाण्यास आग्रह करूं लागला. आतां **पारिस** येथें फौज मुळींच नाहीं, राहिलेली फौज मागून येत आहे, आतां तुम्ही पुढें जाऊन उपयोग नाहीं, इतकें सांगितलें तरी **नापोलियन** त्यास घेऊन पुढें जाऊं लागला. तो म्हणाला, 'चला, आपणास **पारिस** येथें अवश्य गेलें पाहिजे. मी दूर असलों म्हणजे कांहीं नीट व्हावयाचें नाहीं. ते नेहमीं चुका करितात. कांहीं वेळ तरी दम धरावयाचा होता. सर्व **पारिस** शहरच्या लोकांनीं यत्न करावयाचा होता. तुम्ही **रशियन** लोकांसारखे नाहीं. नाहीं तर शहराचें रक्षण झालें असतें. जा, जा, सर्वांची अक्कल गेली. मूर्ख, भित्रे, अशांस

कामें दिलीं म्हणजे असें होतें.' असें म्हणून **नापोलियन बेलिभर्द** यास घेऊन अर्ध कोस चालत गेला. तेथें दुसरें सैन्य त्यास भेटलें. त्याचा मुख्य **कुरिअल** यानें, तुम्ही पुढें गेलां तर मरण किंवा बंदिवासा यांशिवाय तिसरें कांहीं प्राप्त व्हावयाचें नाहीं, असें सांगितलें. हें ऐकतांच पुढें जाण्याचा बेत रहित करून **नापोलियन** तेथें थांबला. लागलींच चित्त स्वस्थ करून त्यानें आलेल्या सैन्याची व्यवस्था केली; आणि **कालेन्कोर्त** यास शत्रु म्हणतील तशा अटी पतकरून तह करून परत या असें सांगून **पारिस** येथें पाठविलें.

इकडे **रशियाचा** बादशाहा शहराच्या बाहेर राहिला होता, त्याकडे शहरांतील मुख्य मोठमोठे अधिकारी व शेटसावकार भेटावयास गेले. त्यांनीं शहराचें रक्षण करा म्हणून बादशाहास सांगितलें. बादशाहानें सर्वांचें योग्य आगतस्वागत करून असें सांगितलें कीं, **फ्रान्स** देशामध्यें आमचा एक शत्रु आहे. बाकी शहरांतील दुसऱ्या कोणास आम्ही पीडा देणार नाहीं.

शहरांतले लोक परत गेल्यावर **कालेन्कोर्त अलेक्झांदर** यास भेटावयास गेला. परंतु बादशाहानें त्याची भेट घेतली नाहीं, तेव्हां तो खिन्न होऊन परत आला. त्याचें हिरमुसलेलें तोंड पाहतांच आपलें नशीब फुटलें अशी **नापोलियन** याची खातरी झाली. शहरांत **तालेरंद** याचा मोठा वाडा होता त्यांत **अलेक्झांदर** रहावयास जाणार असें कळल्यावर पुरती निराशा झाली. **तालेरंद** बोर्बोन वंशास अनुकूल झाला होता.

फ्रेंच लोकांस कोणत्या प्रकारचें राज्य पाहिजे असें **अलेक्झांदर**च्या प्रधानानें भेटावयास गेलेल्या लोकांस विचारिलें, तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, तीन प्रकारचे लोक आहेत. फौजेंतील लोकांस **नापोलियन** बादशाहा असावा असें वाटतें. लोकसत्ताकराज्य असावें असें इच्छिणारे लोक आहेत त्यांस, त्यास पदच्युत करावें असें वाटतें. परंतु राज्यव्यवस्था चांगली करून योग्य कारभारी नेमिले तर त्याच्या मुलास गादीवर बसविण्यास ते अडथळा करणार नाहींत.

जुने वडे लोक आहेत ते तर **बोर्बोन** वंशास गादी मिळावी असें इच्छितात.

आस्त्रियाचा बादशाहा जांवयास, निदान त्याचे वंशास तरी अनुकूल होईल असें वाटत होतें. परंतु दुसऱ्या दिवशीं त्याच्याच सेनापतीनें जिकडे तिकडे असे जाहीरनामे लाविले कीं, 'आपण शहरांत प्रवेश करण्यापूर्वी **बोर्बोन** वंशास राज्यपदावर आणावें असा जमलेल्या राजांचा बेत झाला आहे. **फ्रान्स** देशांत योग्य राज्यव्यवस्था व्हावी अशी त्यांची इच्छा आहे. यावेळेस जगांत स्वस्थता वाढविण्याचें **पारिस** येथील लोकांच्या हातीं आहे. याप्रमाणें सर्व यूरोपखंड हातांत शस्त्र घेऊन तुम्हांस सांगत आहे, तर तुमचा स्वदेशाभिमान आणि शहाणपण यांविषयीं जो त्यांचा भरंवसा आहे तो खरा आहे असें दाखविण्यास त्वरा करा.'

वर सांगितलेल्या तीन व्यवस्थांपैकीं कोणती व्यवस्था करावी याविषयीं जमलेल्या राजांचा पुष्कळ वेळ निश्चय होईना. आज पर्यंत वर्तमानपत्रांस मोकळीक नव्हती, परंतु यावेळेस त्यांत पाहिजे तो मजकूर येऊं लागला. कित्येक **बोर्बोन** वंशास गादी मिळावी असें प्रतिपादन करूं लागले; कित्येकांनीं **नापोलियन** याचा पक्ष उचलिला. पूर्वीच्या राज्यक्रांतीच्या वेळेस राजास मारण्यांत जे पुढारी होते त्या लोकांनीं **बोर्बोन** यांचें नांव ऐकिल्यावरोबर दंगा केला, परंतु त्यांचें कांहीं चाललें नाहीं. **बोर्बोन** वंशास गादी देण्यास आग्रह करणाऱ्या लोकांस **अलेक्झांदर** म्हणाला, **बोर्बोन**पक्षाकडले आहीं असें दाखविल्याबरोबर ज्यांच्या प्राणांचें रक्षण झालें असतें, अशा पांच सहा हजार लोकांनीं **नापोलियन** याकरितां आपला प्राण केला या गोष्टीस फार वेळ झाला नाहीं. यावर एकजण म्हणाला कित्येकांनीं **नापोलियन** याचे ही पुतळे व तसबिरा फोडून टाकिल्या. लोक क्षणांत पाहिजे तिकडे वळतात, त्यांच्या कृत्यावरून एकादी गोष्ट करण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

ता० २१ या दिवशीं जमलेल्या राजांनीं पन्नास हजार सैन्यासह

वर्तमान मोठ्या थाटानें **पारिस** शहरांत प्रवेश केला. तरुण व रूपवान् **रशियाचा** बादशाहा, **प्रुशियाचा** राजा, व इतर राजे, व प्रधान, यांस पाहण्याकरितां शहरांतील लोकांची गर्दी झाली. त्यामुळें स्वारी हलके हलके चालली होती. त्यावेळीं आपणास जिंकून शत्रू आपल्या शहरांत शिरताहेत असें न वाटतां जसा काय आपला राजा परदेश जिंकून विजयी होऊन आल्यामुळें डौलानें शहरांत शिरत आहे, असें **पारिस** येथील लोकांस वाटतें कीं काय असें दिसे. जिकडे तिकडे **अलेक्झांदर** बादशाहाचा जय असो, **प्रुशियाच्या** राजाचा जय असो, असा ध्वनि होऊं लागला. मधून मधून कोणी **बोर्बोन** वंशांतील राजांचा जय असो, असें ही म्हणत. याप्रमाणें ज्या राजांस थोड्या काळांत अवर्णनीय पराक्रमानें जिंकून **फ्रेंच** लोकांनीं त्यांच्या राजधानींत डौल मिरविला होता, त्या सर्वांनीं त्यांच्या राजधानींत प्रवेश केला. तस्मात् कधीं कधीं या हातावरचें फळ या हातावर येतें, असें म्हणतात ती गोष्ट खरी आहे.

जमलेले राजे शहरांत शिरल्यावर लोकसत्ताकराज्याच्या वेळच्या प्रतिनिधींच्या सभा **नापोलियन** यानें कांहीं दिवस बंद केल्या होत्या त्या भरूं लागल्या. त्यांत सर्वानुमतें **नापोलियन** पदच्युत झाला असें ठरलें. **नापोलियन** याच्या मुलास गादी देण्याविषयीं शत्रूंनीं अडथळा घेतला नसता, परंतु असें झालें असतां **नापोलियन** याचें वर्चस्व पुनः होण्याचा संभव होता, यामुळें **फ्रेंच** लोकांनीं ती गोष्ट केली नाहीं. **कालेनकोर्त** यानें **नापोलियन** यास सांगितलें कीं, कोणती ही अट न सांगतां तुम्ही मी पदच्युत झालों असें लिहून पाठवाल तर शत्रु तुमची काय तजवीज करावयाची याविषयीं बोलतील. दुसऱ्या दिवशीं (ता० ४ एप्रिल) **नापोलियन** यानें **पारिस** येथून आलेली सर्व फौज जमा करून उभी केली आणि तीस सांगितलें कीं, **पारिस** येथील लबाड लोकांनीं विश्वासघात केला, तेथें एकदम जाण्याचा माझा विचार आहे. हें ऐकतांच सर्वांनीं **पारिस पारिस** असा ध्वनि केला. या वेळेस पन्नास हजार लोक होते. त्यांस घे-

ऊन शत्रूंचे लोक पुष्कळ होते तरी त्यावर हल्ला करण्याकरितां पारिस येथें जाण्याचा त्याचा बेत होता, परंतु अधिकाऱ्यांनीं, सांगितलें कीं, पदच्युत न होतां आणखीं लढाई करण्याचा आपला बेत असेल तर आह्मी आपल्याबरोबर येणार नाहीं. यामुळें निरुपाय होऊन, शांत मन करून, खालीं लिहिलेला प्रसंगास योग्य असा त्यानें लेख लिहून पाठविला.

'युरोपांत स्वस्थता होण्यास **नापोलियन** हाच मुख्य अडथळा. असें जमलेल्या राजांनीं प्रसिद्ध केल्यावरून, शपथ वाहिल्याप्रमाणें **फ्रान्स** देशाच्या कल्याणाकरितां मी पदच्युत होण्यास, देशत्याग करण्यास, फार तर काय पण प्राणत्याग करण्यासही तयार आहें. परंतु माझ्या मुलाचे व बायकोचे हक्क आणि मी केलेली राज्यव्यवस्था हीं **फ्रान्स** देशाच्या हितास प्रतिकूळ आहेत असें नाहीं.' हा लेख घेऊन जाणाऱ्या गृहस्थांनीं विचारिलें कीं, हें राज्यव्यवस्थेविषयीं झालें परंतु स्वतः तुह्मांविषयीं काय मागावें? **नापोलियन** ह्मणाला, काय चांगलें मिळेल तें **फ्रान्स** देशास मागा. मी आपणास कांहीं मागत नाहीं. या वेळेस **नापोलियन** यानें आपलें मन अगदीं शांत केलें होतें. परंतु स्वस्थ टेंकून कांहीं वेळ बसल्यावर दम उठून ज्यापासून पूर्वी वारंवार रणांगणांत त्याच्या सैन्यास संकटकाळीं मोठें अवसान येत असे, तसें स्मित करून ह्मणाला, 'गडेहो. चला, एकदां पुढें होऊं. आणखी एकवार आपण रणभूमि पहावी.' पूर्वीप्रमाणें या वेळेस कांहीं उत्तर झालें नाहीं.

नापोलियन यानें पाठविलेल्या लेखांत आपणाविषयीं कांहीं लिहिलें नाहीं, हें पाहून **अलेक्झांदर** यास मोठें आश्चर्य वाटलें. ह्मणाला, 'मी त्याचा मित्र आहें. मी त्याच्या वतीनें बोलेन. बादशाही हा ही पदवी कायम ठेवून एल्बा अथवा दुसऱ्या एखाद्या बेटाचें राज्य त्यास द्यावें,' परंतु इतर राजे ह्मणूं लागले कीं, बायकोचा व मुलाचा कांहीं एक उल्लेख न करितां माझा **फ्रान्स**च्या गादीवर कोणत्याही

प्रकारें हक्क नाहीं असें लिहून दिल्याशिवाय त्याविषयीं कांहीं बोलावयाचें नाहीं.

नापोलियन यानें राज्यपरित्यागाचें पत्र पाठविल्यावर त्याजवळ असलेल्या कामदारांपैकीं एक एक जण हळूहळू त्यास सोडून नव्या राज्यांत अधिकार मिळविण्याकरितां जाऊं लागला. त्याच्या प्रीतीतला **मारमान्त्** म्हणून एक अधिकारी होता, तो गेला तेव्हां त्यास फार वाईट वाटलें. तो म्हणाला, काय कृतघ्न मनुष्य आहे, असो, परंतु मजपेक्षां त्याची मला फार दया येते. **नापोलियन** यास सोडून आल्यामुळें एक गृहस्थ म्हणाला, **मारमान्त्** लुच्चा मनुष्य आहे. हें ऐकून **तालेरंद** थट्टेनें म्हणाला, 'त्याचें घडयाळ इतरांपेक्षां जरा जलद चालतें एवढेंच काय तें.' त्याचा जिवलग मित्र **बर्दिंभर** हा म्हणाला, मी खासगी कामाकरितां **पारिस** येथून जाऊन येतों. त्यास **नापोलियन** यानें परवानगी दिली, परंतु तो निघाला तेव्हां आपणाशीं म्हणाला, आतां हा परत येणार नाहीं. **मेमलूक** जातीचा एक त्याजवळ फार विश्वासू चाकर होता; तो विचारल्याशिवाय गेला त्यामुळें त्यास फारच वाईट वाटलें.

राज्यावर आपला हक्क नाहीं असा लेख घेऊन गेलेले कामदार परत आले त्यांनीं सांगितलें कीं, राणीचा व मुलाचा कांहीं एक संबंध न दाखवितां नुसता मी पदच्युत झालों असा लेख शत्रु मागतात. हें ऐकून **नापोलियन** याचें मन खवळून गेलें. काय करावें याविषयीं त्याचा निश्चय होईना. एकदां त्यास वाटे **स्पेन** देशाकडे फौज आहे तीस मिळून पुनः लढाई करून पहावी. एकदां वाटे आपणाबद्दल **फ्रेंच** लोक शत्रूंवर उठतील असा कांहीं यत्न करावा. असें होत आहे तों **फौन्तेंब्लो** या ठिकाणास शत्रूंच्या सैन्यानें गराडा घातला. तेव्हां माझा व माझ्या वारसाचा **फ्रान्स** व **इताली** येथील राज्यपदावर कोणत्याही प्रकारें हक्क राहिला नाहीं, असें त्यानें लिहून दिलें. यावेळेस **नापोलियन** सारख्या महत्वाकांक्षी मनुष्याच्या मनाची काय अवस्था झाली असेल, तिचें शब्दांनीं वर्णन करणें कठिण आहे.

ती वाचकांनींच मनांत आणली पाहिजे. यःकश्चित् लहानसा कार्यघात झाला तर मनुष्य वेडयासारखा होऊन कांहीं सुचेनासें होतें. मग ज्यानें स्वपराक्रमानें मोठे श्रम करून एवढें ऐश्वर्य मिळविलें, तें त्याचें समूळ नाहींसें झालें तेव्हां त्यास किती वाईट वाटलें असेल! माझा व माझ्या वारसांचा हक्क नाहीं असें लिहून दिलेला कागद ज्या गृहस्थाचे हातांत दिला होता, त्याच्या हातांतून पुनः परत घेण्यासुद्धां एकवार **नापोलियन** यानें यत्न केला, परंतु परत न देतां तो तसाच शत्रूंस देण्याकरितां निघून गेला. कोणी असें सांगतात कीं, हा लेख गेल्यावर **नापोलियन** यानें विषप्राशन करण्यासुद्धां यत्न केला. कोणी म्हणतात कीं, **नापोलियन** यानें असें केलें नाहीं, परंतु त्यासारख्या मनुष्यास हा असें करण्याचा प्रसंग खरा, यामुळें कोणी तरी ही कंडी उठविली असावी; व ती उठविण्यास असें कारण झालें कीं, ही गोष्ट झाल्यावर तो फार आजारी पडून मृतप्राय झाला; व किंचित् बरा झाल्यावरही कित्येक दिवसपर्यंत अत्यंत ग्लान व खिन्न वदन होता. ठीकच आहे. त्द्योग मोठा कठिण आहे. ज्याकरितां इतके श्रम व इतकी मनुष्यहानि झाली, तें सर्व नाहींसें होऊन जे आपल्या नांवास सुद्धां भीत होते, ते सांगतील तसें वागावयाचें असा प्रसंग आल्यावर **नापोलियन** सारखा महत्वाकांक्षी मनुष्य दुःखमूर्छित झाल्याशिवाय कसा राहील?

पारिस शहर शत्रूंनीं घेऊन **नापोलियन** याचा अगदीं पराभव झाला, हें **वेलिंग्तन** यास माहीत नव्हतें. याकरितां तो **स्पेन** देशाच्या बाजूकडे **फ्रेंच** लोकांवर हल्ला करीतच होता. **तुलोस** या शहरीं फार मोठी लढाई झाली, तींत **फ्रेंच** लोकांचा अगदीं मोड झाला. ही लढाई व्यर्थ झाली, हिचें कांहीं कारण नव्हतें, असें कळतांच **वेलिंग्तन** लढाई सोडून **पारिस** येथें जमलेल्या राजांस भेटावयास आला.

जमलेल्या राजांनीं **बोर्बोन** वंशास गादी देण्याचा ठराव करून अठरावा **लुई** यास गादीवर बसविलें. **नापोलियन** यास बादशा-

ही पदवी कायम ठेवून एल्बा बेटाचें राज्य दिलें. त्याच्या संरक्षणापुरता फौजफांटाही देण्याचें ठरविलें, आणि शिवाय साठ लक्ष फ्रांक फ्रेंच सरकारानें दरवर्षास रोख द्यावे अमें ठरविलें. राणीस दोन तीन संस्यानांचें राज्य दिलें. शिवाय जोसेफाईन आणि नापोलियन याच्या कुटुंबांतील इतर माणसें यांस योग्यतेप्रमाणें एकंदर पंचवीस लक्ष फ्रांक वर्षास द्यावे असें ठरविलें.

नापोलियन फौन्तेंब्लो येथें असतांनाच अठरावा लुई गादीवर बसला. तारीख २० एप्रिल रोजीं शेवटला सलाम करण्याकरितां आपल्या सैन्यांतील कामदारांस पुनः एकवार नापोलियन यानें जवळ बोलाविलें. ज्यांनीं राजभक्तीची शपथ वाहिली होती, असे कित्येक कामदार हजर होते. त्यांस नापोलियन म्हणाला, 'लुई बुद्धिमान् असून त्याजवळ साधनेंही आहेत. तो म्हातारा व अशक्त झाला आहे, याकरितां मला वाटतें तो आपल्या राज्यास आतां कलंक लावणार नाहीं. तो शहाणा असेल तर विशेष फेरफार न करितां माझी व्यवस्था कायम ठेवील. त्याचे आतां थोडे दिवस राहिले आहेत, याकरितां गत गोष्टी मनांत न आणितां त्यानें सैन्यांतील लोकांस चांगलें वागविलें पाहिजे. कामदार हो, आतां मी तुम्हांजवळ नाहीं. आतां तुम्ही दुसऱ्या राज्यांत आहां, याकरितां निष्कपटपणानें आणि विश्वासानें जशी तुम्ही माझी चाकरी करीत होतां, तशीच हल्लींच्या राजाची करणें हें तुम्हांस योग्य आहे.'

हें झाल्यावर त्यानें खासगी फौजेकडील लोक होते त्यांस बोलावून रांगेनें उभें राहण्यास सांगितलें, आणि आपण घोड्यावर बसून जाऊन त्यांच्यामध्यें खालीं उतरला. या वेळेस त्याच्या नेत्रांतून अश्रु वाहत होते. नंतर तो त्यांस म्हणाला, 'सर्व युरोपखंडानें मजवर शस्त्र धरिलें. खुद्द फ्रान्स देशानें मला सोडून दुसरा राजा स्वीकारिला. मीं आपल्या सैन्यासहवर्तमान पुष्कळ वर्षें लढाई चालविली असती, परंतु त्यामुळें फ्रान्स देशास दुःख झालें असतें. तु-

मच्या देशानें ज्यास कबूल केलें आहे, त्या राजाची विश्वासानें चाकरी करा. मजकरितां दुःख करूं नका. तुम्ही सुखी आहां असें ऐकिलें म्हणजे मी सर्वदां सुखी असेन. मी मरून गेलों असतां त्यापेक्षां सोपें कांहीं नाहीं; पण मी नेहमीं सन्मार्गानें वागेन. तुम्ही आणि मी मिळून जीं महत्कृत्यें केलीं आहेत तीं मी लिहून ठेवीन.' इतकें बोलून त्यांच्या मुख्यास हातांत धरून म्हणाला, 'तुम्हां सर्वांस माझ्यानें आलिंगन देववत नाहीं, याकरितां तुमच्या सेनापतीस मात्र आलिंगन देतों. तीं निशाणें इकडे आणा. हे प्रिय निशाणांनो मी तुम्हांस केलेला सलाम शूर लोकांच्या मनांत नेहमीं राहो. सलाम मुलांनो सलाम, शूरमित्रहो एकवार माझ्या सभोवतीं जमा. सलाम!'

हें भाषण ऐकतांना सर्वांचीं मुखें अत्यंत शोकयुक्त झालीं होतीं, त्यांच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या होत्या. **नापोलियन**ही गुदरलेल्या प्रसंगाप्रमाणें वागण्याचा निश्चय करून गाडींत बसून **फौन्तेंब्लो** येथून निघून **एल्बा** बेटास जाण्याकरितां गलबतावर बसण्यास **फ्रीजस्** बंदराकडे जाण्यास निघाला.

या अद्वितीय मनुष्याची ही अवस्था पाहून त्यानें महत्वाकांक्षेमुळें जिचा परित्याग केला, अशी जी त्याची प्रियपत्नी **जोसेफाईन** तिला अपरिमित दुःख झालें. तिच्या इतकें दुःख कोणासही झालें नाहीं. शत्रु **पारिस** शहराजवळ आले तेव्हां ती पळून गेली होती, परंतु तुम्हांस कांहीं भय नाहीं, असा **अलेक्झांदर** बादशाहानें निरोप पाठविल्यामुळें ती **नापोलियन फौन्तेंब्लो** येथून जाण्याच्यापूर्वीच परत आली. वारंवार स्वतः भेटावयास जाऊन **अलेक्झांदर** तिचें सांत्वन करीत असे. आपल्या प्रियकराच्या नाशाच्या शोकशंकूनें तिला अगदीं घायाळ करून टाकिलें. शत्रु **पारिस** येथून जाण्यापूर्वीच तिचें देहावसान झालें!

नापोलियन याची दुसरी राणी व मुलगा यांस **आस्त्रिया**च्या बादशाहानें आपल्याबरोबर नेलें. याप्रमाणें **नापोलियन** याच्या सर्व महत्कृत्यांचा व पराक्रमाचा शेवट झाला. या अद्वितीय महा परा-

इसी पुरुषाचा स्वशक्तिसंपादितवैभवमहागिरिशिखरापासून इतक्या अल्पकालांत पात झाला असे ऽ, हें प्रथमतः दूरच्या लोकांस खरें वाटेना. परंतु ज्याची वाढ लौकर, त्याचा नाश लौकर, हा सृष्टीतील नियम या गोष्टीसच कां लागू होणार नाहीं ? पाण्याच्या लोंसारिखें जें वैभव घो घो घो धांवत आलें होतें, तें त्याप्रमाणेंच पुरा- सारिखें पाहतां पाहतां वाहून गेलें. ईश्वराची करणी अगाध आहे. अशीं उदाहरणें पाहूनही ऐहिक वैभव अळवाच्या पानावरच्या जलबिंदुप्रमाणें आहे, असें न समजतां तें संपादण्याकरितां नानाप्रकारचीं दुष्कृत्यें मनुष्यें करितात हें आश्चर्य नव्हे काय ? इतकें होऊनही **नापोलियन** याच्या मनांतून महत्वाकांक्षा सुटूंनये, यासारखें मनुष्याच्या अंतःकरणाची नीच स्थिति दाखविणारें दुसरें काय आहे ? यावरून ऐहिक सुख प्राप्त करून घेण्यास ईश्वरकृपेशिवाय दुसरा मार्ग नाहीं असें सिद्ध होतें. याकरितां सदाचरणानें वागून तिचें संपादन करणें हेंच सुखाचा मार्ग होय.

भाग १६ वा.

नापोलियन एल्बा येथें जाण्यास निघाला तेव्हां **आस्त्रिया, रशिया, प्रुशिया** आणि **इंग्लंद**, या चार सरकारांनीं आपला एकेक कामदार त्याबरोबर पाठविला. शिवाय एल्बा येथील राज्याच्या रक्षणाकरितां आठशें लोक बरोबर दिले. **फ्रीजस्** बंदराकडे **नापोलियन** जात असतां पहिल्यानें कांहीं दिवस वाटेतील शहरांच्या अधिकाऱ्यांनीं त्याचा बराच मानमर्तब ठेविला. परंतु बराच लांब गेल्यावर लोक त्याचा फारच अपमान करूं लागले. हुर्यो हुर्यो करीत लोक भोंवतालीं जमूं लागत तेव्हां **नापोलियन** यास जिवाची सुद्धां भीति वाटे. कधीं कधीं त्यास गुप्तपणें सुद्धां जावें लागे. **फ्रीजस्** येथें

गेल्यावर तेथें एक सरकारी गलबत होतें, परंतु **बोर्बोन** राजाच्या गलबतांत वसून जाण्यापेक्षां दुसऱ्या गलबतांत बसणें बरें, असें समजून तेथें एक **इंग्लिशां**चें गलबत होतें त्यावर **नापोलियन** चढला. प्रसंग पडेल तसें वागण्याचा गुण **नापोलियन** यामध्यें पूर्ण होता, हें मागें सांगितलेंच आहे. यावेळेसही आपल्या गोड भाषणानें त्यानें गलबताचा अधिकारी व इतर लोक यांस खुष केलें. तो नेहमी **इंग्लिशां**ची स्तुति करी; त्यामुळें सर्वांस वाटूं लागलें कीं, **नापोलियन** फार चांगला मनुष्य आहे. गलबतांतून उतरतेवेळेस त्यानें खलाशांस बक्षीस दिलें. त्यामुळें त्यानीं त्यास दुवा दिला.

तारीख ४ मे सन १८१४ या दिवशीं **नापोलियन** आपल्या नव्या राहण्याच्या ठिकाणीं पोहोंचला. **एल्बा** बेटांतील लोक आपणास अनुकूल आहेत किंवा प्रतिकूल आहेत हें पाहण्याकरितां प्रथम तो गुप्तरूपानें आंत जाऊन आला. **नापोलियन** येथें राहण्यास आल्यामुळें आपल्या बेटाचें महत्व वाढेल असें समजून ते लोक आपलें आगमन हितावह आहे असें मानितात असें समजल्यावर तो पुनः गलबतावर आला आणि दुसरे दिवशीं प्रसिद्धपणें त्यानें **पोर्तोफेरेओ** या शहरांत प्रवेश केला. स्थलाच्या योग्यतेप्रमाणें तेथें त्याचा मानमरातब चांगला झाला. **रशिया** आणि **प्रुशिया** सरकारचे कामदार आंत न जातां परत आले. **आस्त्रिया** आणि **इंग्लंद** या दोघांकडील कामदार मात्र तेथें रहावयास आले. त्यांशीं **नापोलियन** फार सलगीनें वागूं लागला. तो नेहमीं त्यांस बरोबर जेवावयास व फिरावयास जाण्यास बोलावी, त्यांबरोबर मागल्या पुढल्या गोष्टी सांगे. तो **इंग्लिशां**च्या कामदारास म्हणाला, ' जगांत लोक म्हटले म्हणजे इंग्रज खरे. बाकी इतर सरासरी माणसें आहेत, त्यांत कांहीं अर्थ नाहीं. मी **फ्रेंच** लोकांस तुमच्याबरोबरीस आणण्याचा यत्न केला, परंतु तो सिद्धीस न गेल्यामुळें माझा नाश झाला. राजकीय संबंधानें मी युरोपांत मेल्याप्रमाणेंच आहें. आतां **एल्बा** बेट सुधारण्यास माझ्यानें होईल तेवढें मी करीन. ' एके दिवशीं डोंगरावर चढून चोहोकडे

पाहून **नापोलियन** ह्मणाला, हें बेट फारच लहान आहे.

एल्बा बेटाचा घेर सुमारें तीस कोसांचा आहे. सर्व **फ्रान्स** देश व अर्धे **यूरोपखंड** याचा कारभार सहज करणारी बुद्धिशक्ति हें बेट सुधारण्याकडे **नापोलियन** यानें लाविली, तेव्हां मग काय विचारावें ? पुष्कळ कारखाने एकदम सुरू केले. सर्व बेटांतील जागा त्यानें आपण स्वतः पाहिल्या. जवळ दुसरीं एक दोन ओसाड बेटें होतीं त्यांत समुद्रांतील चांचे लोकांचे भयानें कोणी रहात नसे, तेथें वस्ती करण्यास लोक पाठविले. आपल्या राहण्याच्या चार जागा करून नेहमीं आज येथें तर उद्यां तेथें याप्रमाणें तो फिरत असे. तेथील राहण्याच्या जाग्यांतसुद्धां त्यानें **तुलरीस** या राजवाड्याप्रमाणें यथाशक्ति व्यवस्था केली होती. त्याच्या येण्यानें एल्बा येथील व्यापार फार वाढला. **इताली** वगैरे देशांतून पुष्कळ गलबतें येऊं लागलीं. **नापोलियन** याच्या नांवाचें अजून इतकें भय असे कीं, गलबताच्या निशाणावर त्याचें नांव असलें ह्मणजे चांचे लोक तिकेडे पहात नसत.

नापोलियन यानें पुष्कळ सुधारणांस आरंभ केला, तरी पैसा जवळ नसल्यामुळें त्याचे प्रयत्न सफल होतना. बेटाचा वसूल फारच थोडा. आणखी कर बसवून तेथील वसूल वाढविण्याची सोय नव्हती. **फ्रान्स** देशांतून रोख पैसा यावयाचा, तो येईना. पैसा वेळच्या वेळेस पाठविण्याविषयीं त्यानें पुष्कळ तकारी केल्या, परंतु **लुई** यानें अन्यायानें व मूर्खपणानें त्यांकडे लक्ष दिलें नाहीं. पैशाच्या कमताईमुळें उभारलेले उद्योग पुढें चालत नाहींतसे होऊन **नापोलियन** याचें मन पुनः अस्थिर होऊं लागलें. नवीनपणा नाहींसा झाल्यावर त्यास या स्थळाचा कंटाळाही येऊं लागला.

इकडे **फ्रान्स** देशांत **लुई** गादीवर बसला होता, तो शहाणा असून लोक कल्याणेच्छु होता, परंतु ह्मातारा, अशक्त आणि गर्भश्रीमंत असून ऐषआरामांत काळ घालविणारा असल्यामुळें **नापोलियन** सारख्या महा पराक्रमी पुरुषासमुद्धां घाबरवून सोडणारें रा-

ज्यसूत्र चालविण्यास तो अगदीं नालायक होता. शिवाय त्याच्या जवळचे लोकही चांगले नव्हते.

नापोलियन यास पदच्युत केल्यावर लोकांच्या मुखत्यारांनीं लुई यास गादीवर बसविण्याचा ठराव केला; तेव्हां त्यांनीं असें ठरविलें कीं, राज्यक्रांति झाल्यापासून लोकांस जे हक्क प्राप्त झाले आहेत व **नापोलियन** यानें ज्या लोकांस इनामें, जहागिरी, पदव्या, वगैरे दिल्या आहेत त्या सर्व राजानें चालवाव्या. हा ठराव राजाच्या वतीनें ज्यांनीं खटपटी केल्या होत्या, त्यांस मान्य नव्हता. त्यांस वाटे, असें झालें म्हणजे राजाच्या अधिकाराविरुद्ध बोलणारांचीं मतें खरीं आहेत असें झालें. त्यांस राज्यक्रांतीच्या वेळेस गेलेली आपली मालमत्ता परत मिळण्याची आशा होती; ती नाहींशी झाल्यामुळें ते असंतुष्ट झाले. राजानें असें केलें कीं, राज्यक्रांतीपासून ज्या लोकांस हक्क, पदव्या, इनामें जहागिरी, प्राप्त झाल्या आहेत त्या आम्ही त्या लोकांस देतों असें जाहीर केलें, त्यामुळें त्या लोकांस असें वाटे कीं, राजाच्या या जाहीरनाम्यावरून असें सिद्ध होतें कीं, आजपर्यंत झालें तें सर्व कायदेशीर नाहीं.

जमलेल्या राजांनीं आपली फौज परत नेली, शत्रु राज्यांत आल्यामुळें भय होतें तें नाहींसें झालें, पालटलेल्या स्थितीचा नवीनपणा गेला, इत्यादि गोष्टींनीं पुनः १७९२ यावर्षीं ज्यांनीं बखेडा केला होता तसल्या लोकांत असंतोष उत्पन्न झाला. शत्रूंनीं लढाईत कैदी केले होते ते सर्व **फ्रेंच** लोक मुक्त करून **फ्रान्स** देशांत परत पाठविले त्यामुळें नवे दीडलाख शूरलोक **फ्रान्स** देशामध्यें आले. हे सर्व **नापोलियन** यानें मोठमोठाले पराक्रम केले तेव्हां त्याजवळ होते यामुळें बादशाहावर त्यांची फार प्रीति असे. त्याच्या पराजयाच्या वेळेस ते जवळ नव्हते त्यामुळें ते उघडरीतीनें असें म्हणूं लागले कीं, आम्ही येथें असतों तर अशा गोष्टी झाल्या नसत्या. त्यांस असें वाटे कीं, देशांतल्या लोकांनीं विश्वासघात केला नसता तर **नापोलियन** पदच्युत झाला नसता. कांहीं अंशीं या गोष्टीस पुष्कळ आधा-

होता. नेहमीं लढाया मारून जय मिळविण्यास संवकलेल्या यां लोकांस पुनः तलवार गाजवून **युरोपखंडांत** झालेली **फ्रान्स** देशाची अपकीर्ति नाहींशी करून टाकावी असें वाटूं लागलें. **नापोलियन** पास भिऊन त्याची बादशाहा ही पदवी कायम ठेविली व त्यास एल्बा बेटाचें राज्य दिलें असें या लोकांस वाटे. त्यांस संतुष्ट ठेवण्याकरितां **लुई** यानें सर्वांस लष्करांत नौकऱ्या दिल्या. **नापोलियन** याचा शूर सेनापति **सौल्त** यास लष्करी खात्याचें आधिपत्य दिलें, यामुळें राजाकरितां ज्यांनीं फार खटपटी केल्या होत्या त्यांस राग आला. त्यांचा राग शमविण्याकरितां कांहीं जागा त्यांस दिल्या म्हणजे **नापोलियन** याच्या सेनेंतील लोकांस वाटे कीं, दिवसेंदिवस आमचा मान कमी करण्याचा राजाचा बेत आहे. याप्रमाणें **लुई** यास अनेक विघ्नें येऊं लागलीं. या सर्व गोष्टींकडे **नापोलियन** लक्षपूर्वक करून पाहत होता.

सन १८१५ या वर्षाच्या आरंभापूर्वीच **नापोलियन** याचें वर्तन पहिल्यापेक्षां वेगळें दिसूं लागलें. त्याचे पूर्वीचे मुलकी व लष्करी खात्यांतील विश्वासू नौकर **एल्बा** येथें जाऊं लागले. त्याची आई व बहीण **पालाईन** ह्याही तेथें गेल्या. **पालाईन** ही जशी रूपवान् तशीच मोठी हुशार व मसलती बायको होती. ती वारंवार **इताली** वगैरे देशांत जाऊं येऊं लागली. नवे नवे लोक येत ते थोडे दिवस रहात आणि परत जात. ते कोठून व कशाकरितां आले तें कांहीं कळेना. **इंग्लिश** सरकारचा कामदार **सर नील् क्याम्बेल्** म्हणून तेथें होता, त्याची व **नापोलियन** याची पूर्वीप्रमाणें वारंवार गांठ पडेनाशी झाली. याकरितां तो कोठें बाहेर लांब प्रवासास जावयाचें आहे असें निमित्त करून **नापोलियन** याची गांठ घेई. यामुळें त्यास बळेंच प्रवासास जावें लागे. कांहीं तरी खटपट चालली आहे असें त्यास वाटूं लागलें. **नापोलियन** याची बादशाहा ही पदवी कायम ठेविली ही गोष्ट **इंग्लिश** सरकार मान्य करीना, **फ्रान्स** देशाच्या तिजोरींतून त्यास रोख पैसा मिळावयाचा तो मिळेना, या

गोष्टींचा परिणाम चांगला व्हावयाचा नाहीं असें **सर नील** म्हणे, परंतु त्याच्या म्हणण्याकडे कोणी लक्ष पुरविलें नाहीं. **फ्रान्स** देशां-तील कित्येक कामदारही **नापोलियन** याशीं गुप्त रीतीनें पत्रव्यवहार करूं लागले. आपल्या बरोबरच्या दोनशें लोकांस **नापोलियन** यानें **फ्रान्स** देशीं परत जाण्यास रजा दिली, त्यामुळें हे सर्व लोक देशभर फिरून **नापोलियन** याचा स्तुतिपाठ करूं लागले. व कित्ये-क तर **नापोलियन** याचें कल्याण असो असें उघड म्हणत. पुनः आपल्यामध्यें **नापोलियन** येणार नाहीं कशावरून ? असें त्यांस वाटूं लागलें.

पुष्कळ दिवस खटपट करून वेळ आल्यावर **नापोलियन** यानें **फ्रान्स** देशास जाण्याकरितां गलबतें तयार करविलीं. तारीख २६ फेब्रुआरी सन १८१५ या दिवशीं रात्रीस **पालाईन** हिनें आपल्या घरीं सर्व **एल्बा** बेटांतील लोक कांहीं निमित्तानें बोलाविले होते. मध्य रात्रीस कोणास न समजूं देतां सर्व सैन्यांतील लोक त्यांच्या अधिकाऱ्यानें बंदरावर जमा केले. त्यांस पहिल्यानें आपणास एव-ढ्या रात्रीस कां आणिलें हें माहीत नव्हतें. पहांट होतांच बादशाहा व सर्व कामदार आले तेव्हां आपला मनोरथ सफळ होण्याची वेळ आली, हें पाहून सर्वांस आनंद झाला. बाटेंत एके ठिकाणीं **नापो-लियन** यावर मोठें एक संकट आलें होतें, परंतु त्यांतूनही तो युक्तीनें पार पडला. बाटेंत एक **फ्रेंच** सरकारचें लढाऊ गलबत भेटलें, तेव्हां सर्व लोकांस गुपचुप आडवें पडण्यास **नापोलियन** यानें सांगितलें. त्या गलबतावरील तांडेलानें हाक मारल्यावर या गलबतावरील तांडेलानें उत्तर दिलें, तेव्हां संशय न येतां तें गलबत निघून गेलें.

नापोलियन बंदरांतून निघून गेल्यावर लागलाच **सर नील** क्या म्बेल् बाहेर गेला होता तो परत आला. **नापोलियन** आफ्रिकेकडे गेला आहे असें त्याची आई व बहीण यांनीं सांगितलें, तरी नील यास तें खरें वाटेना. तारिख १ मार्च या दिवशीं **नापोलियन** **कान्स** या बंदरीं पोहोंचला. त्याच बंदरीं पूर्वी **नापोलियन** मिसर

देशांतून परत आला होता व तेथूनच दहा महिन्यांपूर्वी एल्बा येथें निघून गेला होता. **नापोलियन** बंदरावर उतरला तेव्हां त्यास अडथळा करण्यास तेथें फौज नव्हती. बरोबर फक्त आठ नऊशें लोक होते त्यांस घेऊन **नापोलियन** बंदरावर उतरल्याबरोबर **पारिस** शहराकडे जाण्यास निघाला. तेथील अधिकाऱ्यानें **नापोलियन** याचे पांचपंचवीस लोक कैद केले, तरी तो पुढें जाण्यास भ्याला नाहीं.

रात्रीस **नापोलियन** आपल्याबरोबरच्या लोकांसहवर्तमान एका शेताजवळ वस्तीस राहिला. तेथें पहांटेसच एक शेतकरी काम करण्यास आला. आपल्या पूर्वीच्या बादशाहास ओळखितांच तो आनंदानें म्हणाला, मी **इताली** देशांत गेलेल्या सैन्यांत चाकरीस होतों, यावेळेस फौज असती तर मी आनंदानें तींत शिरलों असतों. हें ऐकून **नापोलियन** म्हणाला, ही येथें फौज तयार आहे. कांहीं वेळानें फौज पुढें चालू झाली. पुढें **ग्रास्से** नांवाच्या शहरीं गेले तों तेथेंही कोणीं अडथळा केला नाहीं. कांहीं लोकांनीं तर उलटा आनंद प्रदर्शित केला. मार्च महिन्याच्या ५ व्या तारखेस **नापोलियन** **ग्रास्से** नांवाच्या शहरीं जाऊन पोहोंचला. तेथेंही लोकांनीं त्याचा जयजयकार केला; परंतु आपणास फौज येऊन मिळेल असें त्यास वाटलें होतें तीं अद्याप येईना, त्यामुळें त्यास काळजी लागली होती.

ग्रास्से शहरीं पोहोंचल्यावर **नापोलियन** यानें जाहीरनामा लावून फ्रेंच सैन्यास याप्रमाणें मजकूर कळविला. "शूरहो, आमचा पराजय झाला नाहीं. आमच्या दोन कामदारांनीं विश्वासघात करून आपल्या देशास, आपल्या राजास व हितकर्त्यास बुडविलें. मी तुमच्यापार असतां तुमचें म्हणणें मला तेथें ऐकूं येत होतें. सर्व अडथळे व संकटें यांस न जुमानितां आणखी एकवार मी तुम्हांमध्यें आलों आहें. आपण जगाचे मालक होतों हें विसरूं, परंतु आमच्या कामांत लोकांनीं हात घालणें हें आम्हांस सहन होणार नाहीं, आम्हांस परतंत्र करण्यास कोण धजणार आहे ? **भल्म्, आस्तर्लित्झ्, जीना, मांत्मिरेल्**, या ठिकाणीं निशाणें होतीं तीं पुनः हातांत घ्या,

तुमच्या जुन्या धन्याच्या झेंड्याभोंवतालीं एकवार जमा. पुढें पाऊल टाकिल्याबरोबर विजयश्री आपल्यामागें येईल. सर्व पर्वतांच्या शिखरांवर च **नात्रिदेम** देवळाच्या घुमटावर गरुडयुक्त ध्वज फडकूं लागतील. झातारपणीं आपल्या पराक्रमाच्या गोष्टी सांगाल तेव्हां शहरांतील लोक तुमच्या भोंवतालीं जमून मोठ्या सन्मानानें त्या ऐकतील, नंतर तुम्ही योग्य अभिमानानें झणाल; ज्यानें दोनवार ह्विएना शहरांत प्रवेश केला, ज्यानें **रोम, बर्लिन, माद्रिद, मास्को**, हीं शहरें घेतलीं, व ज्यानें आपल्याच लोकांच्या विश्वासघातानें व परकीय लोकांच्या आगमनानें लागलेला **पारिस** शहरचा कलंक नाहींसा केला, त्या मोठ्या सैन्यांत मी होतों. ”

पुढें गेल्यावर **नापोलियन** यास पकडण्यास सरकारी सैन्याची टोळी आली. ती जवळ येतांच **नापोलियन** घोड्यावरून उतरला. आणि छाती उघडी करून बेधडक पुढें चालला; आणि अगदी जवळ गेल्यावर त्या लोकांस झणाला, ‘ आपला सेनापति. आपला बादशाहा, यास ठार मारण्यास तुझ्यांपैकीं एकादा शिपाई इच्छित असेल तर त्यानें आतांच तसें करावें; हा मी येथें आहें ’. हें भाषण ऐकतांच सर्वांनीं बादशाहाचा विजय असो असा पूर्वीप्रमाणेंच जयघोष केला. नंतर लागलींच **नापोलियन** त्यांच्या मंडळींत गेला, आणि एका कामदारास झणाला, ‘ आपल्या बादशाहास ठार मारावें असें तुझ्या अंतःकरणानें तुला सांगितलें असतें काय ? हें ऐकून त्या मनुष्यानें बंदुकींतून गज काढिला आणि निकामी बंदूक बादशाहास दाखवून झणाला, मी तुझ्यांस काय इजा केली असती ती तुम्हीच पहा; याप्रमाणेंच सर्व आहे. याप्रमाणें ऐक्य झाल्यावर सर्व पुढें चालू झाले.

कांहीं पुढें गेल्यावर लुई राजाच्या प्रीतींतला व त्यानें वाढविलेला असा एक कामदार कांहीं सैन्य घेऊन **नापोलियन** याची चाल बंद करण्यास आला; परंतु दोन्ही सैन्यांची गांठ पडतांच **नापोलियन** चिरायु होवो, त्याच्या सैन्यांतील लोक चिरायु असोत, असें झणत

सर्व लोक एकत्र झाले. हें पाहून त्यांचा अधिकारीही **नापोलियन** यास मिळाला. पुढें **ग्रेनोबल्ल** या शहराजवळ **नापोलियन** गेला तेव्हां तेथील सैन्याचा अधिकारी **नापोलियन** यास वश होईना, परंतु त्याच्या हात्तारखालचे लोक **नापोलियन** यावर शस्त्र धरीतना, हें पाहून काय होईल तें होईल असें म्हणून **नापोलियन** पुढें गेला; तेव्हां बादशाहाचा जयजयकार असो अमें म्हणून लोकांनीं त्यास खांद्यावर घेऊन आनंदानें शहरांतील मुख्य ठिकाणीं नेलें. दुसऱ्या दिवशीं शहरांतील सर्व अधिकाऱ्यांनीं **नापोलियन** याची सन्मानपूर्वक नम्रपणानें भेट घेतली. या वेळेस त्याजपाशीं सात हजार सैन्य जमलें.

तारिख १० या दिवशीं **नापोलियन लिआन्स** या शहराजवळ जाऊन पोहोंचला. तेथें दोन सरदार पुष्कळ फौज घेऊन आले आहेत असें वर्तमान त्यानें ऐकिलें तरी न भितां तो पुढें गेला. पूर्वीप्रमाणेंच बादशाहास पाहिल्याबरोबर सर्व सैन्य त्याकडे जाऊं लागलें. हें पाहून राजाचे कामदार पळून गेले. नंतर मोठ्या समारंभानें **नापोलियन** यानें या प्रसिद्ध शहरांत प्रवेश केला. या शहरांत व्यापाराचे कारखाने फार आहेत. इंग्लंदांतील माल पुनः येऊं लागल्यामुळें या लोकांचा तोटा होऊं लागला होता, यामुळें आपल्या पूर्वीच्या हितकर्त्याच्या आगमनानें त्यांस आनंद झाला.

लढाई संपल्यावर कित्येक गोष्टींविषयीं ठराव व्हावयाचे राहिले होते ते करण्याकरितां **युरोपां**तील सर्व राजांचे मुखत्यार **व्हिएना** येथें जमले होते. **रशिया**चा बादशाहा स्वतः तेथें होता. **फ्रान्स**च्या राजाच्या वतीनें **तालेरंद** होता. तारिख ११ मार्च या दिवशीं यांनीं **नापोलियन फ्रान्स** देशांत पुनः आल्याची बातमी एकाएकीं ऐकिली, तेव्हां आश्चर्यानें चकित होऊन ते एकमेकांकडे पाहूं लागले.

नापोलियन येऊन बरेच दिवस झाले तरी कांहीं दिवस **पारिस** शहरांतील वर्तमानपत्रांत कांहीं मजकूर आला नाहीं. शे-

वर्ती राजानें **नापोलियन** राजरक्षणवहिष्कृत आहे असा जाहीरनामा लाविला. राजपक्षाचीं वर्तमानपत्रें; **नापोलियन** यास कोणाचा आश्रय नाहीं, तो रानांतून भटकत फिरत आहे, फार तर दोन तीन दिवसांत तो कैदी होऊन येथें येईल, वगैरे मजकूर छापीत. इकडे **नापोलियन** याच्या पक्षाचे लोक त्यास अनुकूल अशा नानाप्रकारच्या वातम्या उठवीत. ते म्हणत, जीमुळें सर्व **यूरोपखंड** त्याचें शत्रुत्व करीत होतें, ती महत्वाकांक्षा **नापोलियन** यानें सोडून दिली. लुई फ्रेंच लोकांस न आवडणाऱ्या गोष्टी करूं लागला. **फ्रान्स** देशास स्वतंत्रता आणि समता देण्याकरितां तो येत आहे, आतां त्यास मोठें सैन्य बाळगून लोकांस धाकांत ठेवण्याची इच्छा नाहीं. त्यानें आपण केलेल्या पूर्वीच्या सर्व चुका दिसूं लागल्या. आतां **फ्रान्स** देशाच्या खऱ्या कल्याणाकडे आपली लोकोत्तर बुद्धि व उद्योग हीं खर्चावीं एवढेंच त्यास वाटत आहे. त्यास **आस्त्रिया, रशिया** व **इंग्लंद** या देशाचीं सरकारें सुद्धां आंतून अनुकूल आहेत. **फ्रान्स** देशांतील सर्व सैन्य त्यास अनुकूळ आहे. याप्रमाणें एकास एक विरुद्ध अशा बातम्या उठल्यामुळें इतर लोकांस खरी स्थिति कांहीं दिवस कळली नव्हती.

लिआन्स शहरीं आल्यावर **नापोलियन** यानें राज्यकारभार पहाण्यास आरंभ केला. आपल्या नांवानें राज्यकारभार चालविण्याविषयीं जाहीरनामे लाविले. शिवाय **लुई** यानें बरतर्फ केलेल्या कामदारांस पुनः पूर्वीच्या अधिकारावर नेमिलें आहे, वगैरे अनेक जाहीरनामे लाविले. त्यांपैकीं कित्येक **पारिस** शहरापर्यंत येऊन पोहोंचले. तेव्हां महाशूर जो **मार्शाल** ने यास मोठी सेना देऊन **नापोलियन** याचा पराभव करण्यास **लुई** यानें पाठविलें. राजाचा निरोप घेऊन जातेवेळेस **ने** यानें सांगितलें कीं, **नापोलियन** यास पकडून वनपशुप्रमाणें पिंजऱ्यांत घालून आपल्या पायांपाशीं आणितों.

सैन्य घेऊन जात असतां वाटेत **नापोलियन** यानें ज्यास पूर्वी शूरामध्यें अतिशूर असा किताब दिला होता, त्यास सैन्यासहवर्तमान

आपणास येऊन मिळण्याविषयीं पत्र लिहिलें. पत्र पोहोंचतांच सैन्यासहवर्तमान **नापोलियन** याकडे जाऊन **मार्शाल्** ने त्यास मिळाला. नंतर **नापोलियन** सर्व सैन्यासहवर्तमान आपली पूर्वीची आवडती जागा जी **फौंतेन्ब्लो** येथें येऊन पोहोंचला. हें ऐकून राजानें **माक्दोनल्द्** या सरदारावरोबर आणखी फौज पाठविली. त्या सैन्यांतील लोकही इतर सैन्याप्रमाणेंच **नापोलियन** दृष्टीस पडतांच बादशाहाचा विजय असो असें म्हणून त्याकडे गेले. हें पाहून विश्वासू **माक्दोनल्द् पारिस** येथें पळून गेला. तो **पारिस** येथें पोहोंचण्यापूर्वीच राजवाड्यांतील माणसांनी भयानें मोठा हाहाकार केला, तरी लोक कांहीं बोलतना, हें पाहून लुई आपलीं माणसें घेऊन पळून गेला.

तारीख २० या दिवशीं **नापोलियन** यानें, ज्यांनीं विश्वासानें चाकरी केल्यामुळें आपणास पुनः अशी स्थिति प्राप्त झाली, त्या सैन्यांतील लोकांसहवर्तमान पुनः **पारिस** शहरांत प्रवेश केला. रस्त्यांत मौज पाहण्यास पहिल्यानें लोकांची फार गर्दी झाली नाहीं, परंतु **नापोलियन** याचे सर्व भक्त **तुलरीस्** या राजवाड्यापाशीं त्यास सामोरे जाण्यास जमले होते, ते बादशाहाची स्वारी आली असें ऐकतांच आनंदाच्या आवेशानें पुढें गेले. कित्येकांनीं बादशाहास खांद्यावर घेऊन जयघोष करीत राजवाड्यांत नेलें. तेथें बडे लोक व पूर्वीचे कामदार त्यास भेटण्यास जमले होते. त्यांत **फोके** हाही होता. हा मनुष्य फार लबाड होता. असले मासलेदार लबाड मनुष्य जगांत फारच थोडे असतील. लुई यास मिळून **नापोलियन** याच्या विरुद्ध त्यानें पुष्कळ खटपट केली होती, असें असून **नापोलियन** आल्यावर त्याशीं मसलती करून लुई यास बडविण्यास तो तयारच होता. असो. सर्वांच्या गांठी पडल्यावर **नापोलियन** त्यांस म्हणाला, जे आपमतलबी नव्हते, अशा लोकांनीं मला येथें आणिलें. सैन्यांतील लोक व कामदार यांनीं या सर्व गोष्टी केल्या. प्रजा आणि सेना यांनीं मला ही स्थिति प्राप्त करून दिली आहे.

व्हिएना येथें जमलेल्या युरोपांतील राजांच्या मुखत्यारांनीं खालीं लिहिलेला जाहीरनामा प्रसिद्ध केल्यामुळें **नापोलियन** यास इतर राजे कितपत अनुकूल आहेत, याविषयीं लोकांची संशयनिवृत्ति झाली. 'एल्बा बेटांत राहण्याचा ठराव मोडल्यामुळें **नापोलियन** यास आतां कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क उरला नाहीं. तो घोंटाळा व अव्यवस्था करण्याकरितां पुनरपि **फ्रान्स** देशांत आल्यामुळें त्यास आतां कायद्याचें रक्षण मिळणार नाहीं, तो आहे तोंपर्यंत स्वस्थपणा किंवा तह कांहीं एक व्हावयाचें नाहीं, असें त्यानें जगास सिद्ध करून दाखविलें. याकरितां जमलेले सर्व राजे असें मानतात कीं, घरगुती किंवा राजकीय कोणत्याही संबंधानें त्याचें रक्षण होणें नाहीं. जगाची स्वस्थता मोडणारा या संबंधानें त्यानें आपणास सर्व जगानें त्याचा सूड उगवावा अशा स्थितीस आणिलें आहे.'

याप्रमाणें जाहीरनामा प्रसिद्ध करून नवा तहनामा करून मोठ्या चार राष्ट्रांपैकीं प्रत्येकानें निदान दीड लाख तरी फौज **नापोलियन** पदच्युत होईपर्यंत किंवा त्यापासून कोणास भीति नाहीं अशा स्थितीस येईपर्यंत तयार ठेवण्याचा ठराव केला. कदाचित् इतकी फौज आपणास पाठवितां येणार नाहीं असें समजून **इंग्लिश** सरकारनें असा करार केला कीं, जितके लोक कमी येतील त्यांत प्रत्येक शिपायाबद्दल वर्षास तीनशें रुपये व पायदळांतील प्रत्येक शिपायाबद्दल वर्षास दोनशें रुपये याप्रयाणें आम्ही रोख पैसा देऊं. याप्रमाणें ठराव झाला तरी सर्व राष्ट्रांनीं सैन्यांची फारच मोठी तयारी केली. पुनः राज्यावर बसून थोडे दिवस गेले नाहींत तोंच **नापोलियन** यानें असें ऐकिलें कीं, **आस्त्रियाची** तीन लक्ष फौज, रशियाची सव्वा दोन लक्ष, **प्रुशियाची** दोन लक्ष छतीस हजार, **जर्मनींतील** इतर संस्थानांचीं दीड लक्ष, **हालंदची** पन्नास हजार, व **इंग्लंदची** पन्नास हजार याप्रमाणें एकंदर दहालक्ष अकरा हजार सैन्य आपलें निर्दलन करण्यास तयार झालें आहे. हें अवाढव्य सैन्य मनांत आणून **नापोलियन**

मारल्या दृढ मनाच्या पुरुषास तरी आपलें सिंहासन सुरक्षित आहे असें वाटलें असेल काय ?

पुनः राज्यावर बसल्याबरोबर **नापोलियन** यानें सैन्य जमविण्याची तयारी चालविली. तो **फ्रान्स** देशांत परत आला तेव्हां पुरती दोन लक्ष सुद्धां फौज नव्हती; परंतु **कार्नोत्** याच्या मदतीनें त्यानें बहुत श्रम करून थोडयाच महिन्यांत सुमारें चारलक्ष चांगली फौज जमविली. आपण कितीही सैन्य जमविलें तरी शत्रूंच्या सैन्याच्या प्रसंगास आपलें सैन्य पुरणार नाहीं हें **नापोलियन** यास माहीत होतें, त्यामुळें तो जमलेल्या सर्व राजांशीं सल्ला करण्याच्याही उद्योगांत होता. **इंग्लंदांत** तर राज्यकारभारांत असणारे कित्येक पुरुष त्यास अनुकूलही होते. **एल्बा** बेटांतून **फ्रान्स** देशांत येण्याचा दोष उडविण्याकरितां त्यानें दोन तीन कारणें आपल्या मतें सयुक्तिक अशीं सांगितलीं. तीं अशीं, आपल्या बायकोस व मुलास **आस्त्रिया**च्या बादशाहानें अडकून ठेवणें, ठरावाप्रमाणें **लुई** राजानें पैसा न पाठविणें, व आपण परत येण्याविषयीं **फ्रेंच** लोकांचा उत्कट इच्छा, हीं कारणें शत्रूंस योग्य वाटलीं नाहींत. त्यांचें म्हणणें असें होतें कीं, बायको व मुलगा यांस न पाठविणें यांत इतर राजांचा संबंध नाहीं. रोख पैसा न पोहोंचल्याबद्दल **व्हिएना** येथें जमलेल्या मुखत्यारांस कळविलें असतें तर विचार झाला असता. तिसरें कारण तर अगदींच पुळपुळीत होतें. कारण कांहीं लोक त्यास अनुकूळ होते व कांहीं प्रतिकूळही होते.

इकडे **लुई** पळून गेला तरी **नापोलियन** राजा आहे असें लोकांकडून कबूल न करविण्याविषयीं राजपक्षाच्या लोकांच्या खटपटी चालल्याच होत्या. त्यांनीं एक दोन ठिकाणीं झटापटी ही केल्या. परंतु सैन्य थोडें असल्यामुळें त्यांचें कांहीं चालेना. या लोकांत साबा **लुई** याची एक मुलगी होती तिनें एका प्रसंगीं असें विलक्षण शौर्य दाखविलें कीं, तें पाहून **नापोलियन** खुद्दां म्हणाला कीं, या बंशांत एवढामात्र मर्द आहे. पराभव झाल्यावर ती **इंग्लंदांत** पळून

गेली. सर्व राजपक्षी लोकांचा पराभव होऊन **नापोलियन** याचे विजयध्वज पुनः **फ्रान्स** देशाच्या किल्ल्यांवर फडफडूं लागले.

आस्त्रियाचा बादशाहा बायकोस व मुलास पाठवीना, तेव्हां **नापोलियन** यानें त्यांस तेथून जुलुमानें पळवून आणविण्याचा बेत केला होता. राणीच्या पदरीं कांहीं **फ्रान्स** देशांतील माणसें होतीं त्यांच्या साहाय्यानें हा बेत तडीस जाण्याच्या बेतांत आला होता, परंतु इतक्यांत एक असामी फितला त्यानें सर्व हकीकत तिच्या बापास सांगितली. **आस्त्रिया**च्या बादशाहास ही गोष्ट कळतांच त्यानें सर्व **फ्रेंच** माणसें घालवून दिलीं, आणि मुलीजवल **नापोलियन** याचें वस्त्रपात्र व सामान होतें तें टाकून देण्यास सांगितलें, इतकेंच नव्हे, तिची बादशाहीण ही पदवी काढून लग्न झाल्यापूर्वीचे जे माहेरचे किताब होते तेच चालू केले. ही बातमी **पारिस** येथें पसरतांच सर्व लोकांची खातरी झाली कीं, आतां पुनरपि मोठें रण माजल्याशिवाय रहात नाहीं.

व्हिएना येथील मुखत्यारांच्या सभेंत **तालेरंद** यानें असा आग्रह धरिला होता कीं, **नापोलियन** यानें अन्यायानें **मुरात्** यास **नेपल्स**च्या गादीवर बसविलें, त्यास अवश्य पदच्युत केलें पाहिजे. ही बातमी कळतांच **मुरात्** यानें पन्नास हजार फौज घेऊन **रोम** शहरावर स्वारी केली, **आस्त्रिया**पासून सोडवून तुह्मांस स्वतंत्र राज्य स्थापून देतों असें सांगून **इताली** देशांतील लोकांस आपल्याकडे वळविण्याचा त्याचा बेत होता, परंतु अशा बोलण्यांत किती अर्थ असतो, हें लोकांस या वेळेस चांगलें समजूं लागलें होतें. यामुळें त्याच्या बोलण्याकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं. त्यास वाटलें कीं, आपण केलेलें धाडस **नापोलियन** यास आवडून तो आपणास मदत पाठवील, परंतु तसें झालें नाहीं. शेवटीं **आस्त्रिया**च्या सैन्यानें त्याचा अगदीं मोड करून टाकिला, तेव्हां तो **फ्रान्स** देशांतील **तूलो** शहरीं पळून गेला. **पारिस** येथें आपणास येऊं देण्याविषयीं त्यानें पुष्कळ आर्जवें केलीं, परंतु अशा विश्वासघातकी मनुष्यावर **नापोलियन** यानें

पुनः भरंवसा ठेविला नाहीं. कांहीं लोकांची मदत घेऊन पुनः राज्यावर बसावें ह्मणून तो **नेपल्स** येथें पुनः गेला, परंतु तो जाण्यापूर्वीच पूर्वीचा राजा राज्यावर बसला होता, त्यानें **मुरात्** यास पकडून देहांत शासन दिलें. मरणकालींसुद्धां त्यानें मोठें धैर्य दाखविलें. याप्रमाणें महा शूर परंतु विलक्षण अशा या पुरुषाचा वाईट रीतीनें शेवट झाला. याच्या शूरत्वाची **नापोलियन** सुद्धां फार तारीफ करीत असे. **सेंत-हिलिना** येथें असतांना तो ह्मणत असे कीं, **वातर्लू** येथील लढाईच्या वेळेस **मुरात्** असता तर जगाची स्थिति आज वेगळी असती.

मुरात् यानें केलेल्या कृत्यास **नापोलियन** याचा सल्ला असेल असें वाटून शत्रूंनीं **फ्रान्स** देशावर स्वारी करण्याची तयारी केली. त्यामुळें लोकर लढाईस गेलें नाहीं तर शत्रु अगदीं जवळ येऊन पोहोंचतील असें **नापोलियन** यास वाटूं लागलें, तरी राज्याची व्यवस्था नीट होईना, त्यामुळें त्यास एकदम **पारिस** येथून जातां येईना. या वेळेस **नापोलियन** यास राज्यव्यवस्थेच्या कामांत फार विघ्नें येऊं लागलीं. अनेक पक्षांच्या लोकांचें समाधान करण्याकरितां त्यानें अनेक उपाय योजिले. परंतु एका पक्षास जी गोष्ट अनुकूल तीच दुसऱ्या पक्षास प्रतिकूल असल्यामुळें या उपायांपासून कांहीं उपयोग न होतां उलटा अपाय मात्र होई. लोकसत्ताकराज्य इच्छिणारांस बरें वाटण्याकरितां त्यानें **पारिस** येथें आल्यावरोवर वर्तमानपत्रांस पाहिजे तो मजकूर लिहिण्यास स्वतंत्रता आहे असा जाहीरनामा लाविला. तो ह्मणे कीं जुलुमानें राज्य करून लोकांस धाकांत ठेवावें यापेक्षां शांतपणानें राज्य करून लोकप्रीति संपादावी हें किती चांगलें आहे, तें मला हद्दपार झाल्या पासून दहा महिने विचार करून कळलें आहे. आतां चांगल्या रीतीनें राज्य करून पूर्वीच्या दोषांचा विसर पाडावा एवढीच माझी इच्छा आहे.

स्वतंत्रता प्राप्त होतांच वर्तमानपत्रकर्ते आपापल्या पक्षाच्या वतीनें पाहिजे तसे कडक मजकूर लिहूं लागले. **नापोलियन** याच्या कृत्यांवर फार टीका होऊं लागल्या. त्यामुळें त्यास असें वाटलें कीं,

आपण ह्यांस स्वतंत्रता दिली ही फार वाईट गोष्ट केली. असें वाटे तथापि हातघाईच्या वेळेस त्यास केलेली गोष्ट फिरवितां येईना. लोकांस पूर्ण स्वतंत्रता देण्याची इच्छा आहे असें दाखविण्याकरितां त्यानें दुसरी एक युक्ति केली ती अशी कीं, आफ्रिकेंतील लोक आणून त्यांस गुलाम करून गुरांप्रमाणें विकण्याची चाल असे ती मोडून टाकण्यास आरंभ केला. वर्तमानपत्रांस स्वतंत्रता देणें, गुलामांचा व्यापार बंद करणें, वगैरे गोष्टी लोकांच्या मुखत्यारांच्या संमतीशिवाय **नापोलियन** यानें केल्या त्यांमुळें त्यांसही असें वाटलें कीं, पूर्वीप्रमाणेंच आमच्या डोळ्यांत धूळ घालण्याच्या ह्या तजविजी आहेत. कारण कायदे करण्याचा सर्व अधिकार बादशाहानें आपल्याकडेच ठेविला आहे. सैन्यांतील लोकांस तर असें वाटे कीं, **नापोलियन** यास आह्मीं गादीवर बसविलें आहे, आमच्या साहाय्याशिवाय त्याचे पाय येथें लागले नसते. यामुळें इतर लोकांच्या समजुतीकरितां **नापोलियन** ज्या गोष्टी करी त्यांपासून त्यांस राग येई. नवीन राज्यव्यवस्थेचे नियम करण्याच्या कामांत **नापोलियन** यास फारच विघ्नें आलीं. शेवटीं कायदे करणाऱ्या मंडळींत पुष्कळ वादविवाद होऊन नियम ठरत ना, तेव्हां **नापोलियन** स्वतःच नियम तयार करून त्यांसच लोकांची कशी तरी मान्यता मिळवून तेच प्रसिद्ध करून समरभूमीस जाण्यास तयार झाला.

यावेळेस लढाईस जाण्यापूर्वी **नापोलियन** यानें पूर्वीपेक्षां **पारिस** शहराचा चोहोंकडून उत्तम बंदोबस्त केला. **आस्त्रिया** वगैरे इतर शत्रूंच्या बाजूस हुशार सेनापतींबरोबर सैन्य पाठवून आपल्या शत्रूंपैकीं फार शूर जे **इंग्लिश** व **प्रुशियन** लोक त्यांवर स्वतः सैन्य घेऊन त्यानें जाण्याचा बेत केला. त्याचा बेत असा होता कीं, पूर्वीप्रमाणें सर्व शत्रूंचीं सैन्यें एकमेकांजवळ आलीं नाहींत तोंच एकेकावर धाड घालून विध्वंस करून टाकावा. या हेतूनें तारिख १९ जून सन १८१५ या दिवशीं समरांगणास जाण्यास **पारिस** येथून **नापोलियन** निघाला. जाते वेळेस मी **वेलिंग्तन** याचा समाचार घेण्यास जातों

असें तो म्हणाला. सैन्याजवळ पोहोंचल्यावर लोकांस उत्तेजन आणण्याकरितां त्यानें भाषण केलें; त्यावेळेस तो म्हणाला; 'शूर हो, याच दिवशीं पूर्वी आपण **मारेंगो**, **फ्रिदलांद**, या ठिकाणीं जय मिळविले. आपण आणि ते पूर्वीपेक्षां बदललों काय ? ते मूर्ख आहेत. क्षणभर विजय झाल्यामुळें ते आंधळे झाले आहेत. **फ्रेंच** लोकांवर जुलूम करणें किंवा त्यांस जिंकणें हें त्यांच्या शक्तीच्या बाहेर आहे. ते जर **फ्रान्स** देशांत शिरतील तर आपलीं थडगीं येथें होणार असें त्यांस कळेल. शूर हो आपण पूर्वी मोठमोठ्या मोहिमा केल्या आहेत, लढाया जिंकिल्या आहेत, मोठमोठ्या संकटांस झुगारून दिलें आहे. खरा **फ्रेंच** आहे त्यास मारणें किंवा मरणें या गोष्टींचा प्रसंग आला आहे.' हें भाषण ऐकून सेनेंतील लोकांसही फार स्फुरण आलें. या वेळेस स्वतः **नापोलियन** याजवळ सव्वा लक्षावर उत्तम सैन्य होतें; तें घेऊन तो शत्रूंकडे चालला.

इकडे **इंग्लिशां**चा सेनापति **वेलिंग्तन** व **प्रुशियाचा** सेनापति **ब्लुचर** हे दोघे महा पराक्रमी पुरुष **बेलजिअम** देशांत शत्रूंस टक्कर देण्याकरितां तयार होतेच. **वेलिंग्तन** याजपाशीं **इंग्लंदां**तील फौज थोडी होती, तरी **स्पेन**, **पोर्तुगाल**, व **जर्मनी**तील कित्येक संस्थानें, यांची फौज त्याजवळ असल्यामुळें एकंदर पाऊण लक्ष लोक त्यापाशीं होते. **ब्लुचर** यापाशीं एक लक्ष फौज होती. या दोघांनीं असा बेत केला होता कीं, **नापोलियन** ज्यावर अगोदर हल्ला करील त्यास दुसऱ्यानें साहाय्य करावें. शूरांत शूर जो **ने** यास **वेलिंग्तन** याच्या फौजेकडे पाठवून पहिल्यानें **नापोलियन** यानें **ब्लुचर** याच्या सैन्यावर स्वतः फौज घेऊन हल्ला केला. तारिख १६ व १७ या दोन दिवसांत **फ्रेंच** आणि **प्रुशियन** यांचे दोन तीन संग्राम झाले. दोघांचे मिळून सुमारें पन्नास हजार लोक मेले. या दोन्ही प्रसंगीं **फ्रेंच** लोकांची सरशी झाली, यामुळें **प्रुशियन** लोकांचा सेनापति **ब्लुचर** सावधपणानें शत्रूंपासून निसटून गेला.

ब्लुचर मागें हटला असें पाहून त्यावर दुसरें सैन्य पाठवून **ना-**

पोलियन वेलिंग्तन याच्या सैन्याकडे वळला. वातर्लु येथील मैदानांत संग्रामाचा प्रसंग आणावा असें पूर्वीच वेलिंग्तन यानें योजून ठेविलें होतें. तिकडेच नापोलियन चालला. त्यास असें वाटलें कीं, ब्लुचर मागें हटला असें ऐकून कदाचित् वेलिंग्तनही रशियाकडून मदत येण्याची वाट पाहण्यास मागें निघून जाईल. यासाठीं मोठ्या त्वरेनें तो तिकडे गेला. तो तेथें गेल्यावर वेलिंग्तन याचें सैन्य तयार आहे असें पाहून म्हणाला, 'शेवटीं हें इंग्लिश लोक माझ्या तडाक्यांत सांपडले.'

प्राचीन व अर्वाचीन इतिहासांत देशाची किंवा राष्ट्राची स्थिति बदलणाऱ्या ज्या अनेक लढाया वर्णिल्या आहेत, त्यांपैकींच वातर्लु येथील लढाई होय. या लढाईत जर नापोलियन याचा जय होता, तर यूरोपखंडांतील कित्येक देशांची स्थिति आज कदाचित् वेगळी असती. या एका लढाईत नापोलियन याच्या सर्व प्रयत्नांचा शेवट झाला. ग्रंथकारांनीं या लढाईचें फार विस्तृत वर्णन केलें आहे. परंतु विस्तार भयास्तव तसें वर्णन या पुस्तकांत करितां येत नाहीं. एकसारखे वीस वर्षें नापोलियन यानें इंग्लंदाचा पराभव करण्याविषयीं अनेक प्रयत्न केले, परंतु शेवटीं त्या देशाच्या लोकांपासूनच त्याचा पूर्ण पराभव झाला. या लढाईत नापोलियन याचा पराभव केल्यामुळें ड्यूक आफ् वेलिंग्तन या महा पराक्रमी पुरुषाचें नांव शूरांमध्यें अग्रगण्य होऊन त्याची कीर्ति अजरामर झाली आहे. असा पुरुष आपणामध्यें झाला याचा इंग्लिश लोकांस अभिमान वाटतो, हें ठीकच आहे.

हा प्रसिद्ध संग्राम तारीख १८ जून सन १८१५ या दिवशीं झाला. युद्ध सुरू होण्यापूर्वी नापोलियन व वेलिंग्तन या उभयतांनीं आपल्या बुद्धि कौशल्यानें सैन्याची उत्तम व्यवस्था केली होती. युद्ध सुरू झाल्यावर दोहोंकडील सैन्यांनीं मोठे पराक्रम केले. युद्ध फार वेळ चाललें होतें. एके प्रसंगीं तर वेलिंग्तन घोड्यावरून उतरून हातांत तलवार घेऊन स्वतः लढाईत शिरला होता. पूर्वीच्या ठ-

रावाप्रमाणें **प्रुशियन** लोक आपल्या मदतीस येतील असें **वेलिंग्तन** यास माहीत होतें, यामुळें तो अवसान धरून फार वेळ लढाई चालली होती आणि लोकही पुष्कळ मेले, तरी शत्रूंस हार गेला नाहीं. इकडे **ब्लुचर** ही **मेंझ** लोकांस चुकवून आपली फौज घेऊन त्वरेनें **वेलिंग्तन्** याच्या मदतीस आला. **प्रुशियन** लोक दुरून दिसूं लागतांच **वेलिंग्तन** याच्या लोकांस इतका आवेश आला कीं, गर्दी करून ते एकदम **फ्रेंच** लोकांच्या आंगावर चालून गेले. या वेळेस **नापोलियन** स्वतः सैन्य बरोबर घेऊन शत्रूंवर हल्ला करणार होता, परंतु तितक्यांत बेत फिरवून त्यानें शूरांत शूर जो **मार्शाल् ने** त्यास आपल्या सेनेपैकीं जे अत्युत्तम लोक होते ते बरोबर देऊन शत्रूंच्या आंगावर पाठविलें. परंतु शत्रु आंगावर येतांच **फ्रेंच** सैन्याची दाणादाण झाली. लोक देमाय धरणी ठाय म्हणत भांबावल्यासारखे होऊन वाट सांपडेल तिकडे पळूं लागले. **नापोलियन** शांतपणानें दुरून दुर्बिणींतून पहात होता, परंतु आपल्या लोकांची ही अवस्था दृष्टीस पडतांच एकदम त्याच्या तोंडावर प्रेतकळा आली. सध्यां सर्व नष्ट झालें असें म्हणून तोही रणांगणांतून पळून गेला. **फ्रेंच** लोकांचा आणखी पाठलाग करावयाचा, परंतु **वेलिंग्तन्** याचे लोक फार वेळ तुंबळ युद्ध करून अगदीं थकले होते यामुळें त्यानें तें काम **प्रुशियन** लोकांस सांगितलें, व त्यांनीं ही तें हौसेनें पत्करिलें. त्यांनीं पुष्कळ वेळपर्यंत **फ्रेंच** लोकांचा पाठलाग केला, व जेथें जेथें शत्रूंचे लोक हातीं लागले, तेथें तेथें त्यांस पकडून निर्दयपणें कापून काढिलें. याप्रमाणें होऊन **नापोलियन** याच्या बरोबरच्या पाऊण लक्ष फौजेपैकीं सरासरी तीस हजार लोक शिलक राहिले. या लोकांस दुसऱ्या सेनापतींच्या स्वाधीन करून **नापोलियन** पूर्वी **प्रुशियन** लोकांच्या मागें **फ्रेंच** फौजेची दुसरी टोळी लागली होती तिकडे जाण्यास निघाला. परंतु त्या टोळीचा पराभव होऊन तिचा मुख्य जो **ग्रोची** त्यास शत्रूंनीं कैद केलें, असें खोटें वर्तमान ऐकतांच तेथून निघून मोठ्या घाईनें प्रवास करीत तो **पारिस** येथें गेला.

या भयंकर लढाईंत वेलिंग्तन् याचे ही फार लोक मेले. माठ्या प्रतीचे सुमारें शंभर लष्करी कामदार मेले, पांचशें कामदार जखमी झाले, व एकंदर सुमारें पंधरा हजार लोक मेले.

इकडे **पारिस** शहरांत पहिल्यानें दोन तीन ठिकाणीं **फ्रेंच** लोकांची सरशी झाल्याची बातमी पोहोंचल्यामुळें १९ व्या तारखेस **नापोलियन** याच्या नांवाचा जयजयकार चालला होता. हा आनंद प्रदर्शित करण्याकरितां अधिकाऱ्यांनीं शंभर तोफा सोडिल्या. **फ्रान्स** देशाचें वैभव सुरक्षित आहे, असें त्याच्या पक्षाचे लोक बोलूं लागले. हें ऐकून **बोर्बोन** पक्षाचे लोक खिन्नवदन दिसूं लागले. परंतु दुसऱ्याच दिवशीं **नापोलियन पारिस** येथें पोहोंचला तेव्हां सर्व उलट होऊन त्याच्या पक्षाच्या लोकांच्या आनंदांत विरजण पडून खिन्नवदन झालेल्या लोकांस जरा अवसान आलें.

भाग १७ वा.

सैन्यांतील लोकांप्रमाणेंच इतर लोक आपणास अनुकूळ आहेत असें **नापोलियन** यास वाटत होतें. परंतु **वातर्लू** येथून पराजित होऊन आल्यावर लांगलींच आपला अदमास खोटा आहे असें त्याच्या अनुभवास आलें. आतां पुढें कोणता उपाय योजावा याविषयीं विचार करणार तोंच २१ व्या तारखेस मुखत्यारांची सभा जमली, तींत **नापोलियन** याच्या विरुद्ध अनेक ठराव झाले. **पारिस** शहराचें रक्षण कसें करावें याविषयीं विचार होऊं लागले. हें पाहून त्याचा भाऊ **लुशिअन** व इतर कामदार लष्करी लोकांस पाठवून सभासदांस हांकून देऊन सभा मोडून टाकण्याविषयीं सांगत होते, परंतु ही गोष्ट **नापोलियन** यानें ऐकिली नाहीं. इकडे मुखत्यारांच्या सभेंत **नापोलियन** यास पदच्युत करण्याविषयीं वादविवाद होऊन ही गोष्ट

बहुमतानें ठरणार असें पाहून त्यानें आपण होऊन खालीं लिहिलेला राजीनामा पाठविला.

"फ्रेंच लोकहो, देशाची स्वतंत्रता राखण्याकरितां लढाई आरंभिली, त्याबेळेस सर्व अधिकारी एक मतानें यत्न करतील व आपली कार्यसिद्धि होईल असें मला वाटत होतें, म्हणून मीं शत्रूंस जुमानिलें नाहीं. आतां सर्व गोष्टी उलट झाल्या. **फ्रान्स**देशाच्या शत्रूंस मी आपला बळी देतों. फक्त मजविषयींच शत्रुत्व आहे असें ते म्हणतात, तें खरें करून दाखवोत. राजकीय संबंधानें माझें आयुष्य संपलें. दुसरा **नापोलियन** असें नांव देऊन मी आपल्या मुलास **फ्रान्स** देशाचें राज्य देतों. तुम्हांस आपल्या राष्ट्राची स्वतंत्रता राखणें असेल तर सर्व एक मतानें वागा. तारीख २२ जून सन १८१५."

नापोलियन

हा लेख पाहून **फ्रान्स**देश **नापोलियना**सारख्या महावीराच्या युद्धकौशल्यास मुकणार असें मनांत येऊन **कोर्नोत्** याच्या नेत्रांत अश्रु आले. पूर्वीपासून हा **नापोलियन** याच्या महत्वाकांक्षेविरुद्ध असे, पण **फ्रान्स** देशास शत्रूंचा पाय लागूंनये अशी त्याची फार इच्छा होती. त्यास वाटत होतें कीं, **ग्रोची** यार्चे सैन्य अद्याप बऱ्याच स्थितींत आहे; तें व **वातर्लू** येथून सुटून आलेले लोक एकत्र करून प्रयत्न केला तर कदाचित् **फ्रान्स**देशावर आलेलें अरिष्ट टळेल. परंतु इतक्यांत सेनापति **माशाल ने** हा परत आला. त्यानें सांगितलें कीं, आतां **बोर्बोन** वंशाच्या राजास परत बोलावण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. तो परत आला म्हणजे फितुरावद्दल मला गोळी घालून मारील ही माझी खातरी आहे म्हणून मी **अमेरिकेंत** जाईन, तेथें माझें काय होईल तें होवो, परंतु **फ्रान्स** देशाच्या बऱ्याकरितां जो फक्त एक उपाय राहिला आहे तो तुम्ही करा.

नापोलियन फ्रान्स देशाच्या हिताकरितां आपण होऊन पदच्युत झाला, हें पाहून कित्येक पुढारी लोक आभार मानण्याकरितां त्यास भेटावयास गेले. **नापोलियन** यानेंही शेवटची वेळ

समजून बादशाहीचा पोषाक करून सर्वांची शांतपणानें भेट घे-
तली. मुलास गादी देण्याचें कबूल करून घेण्याविषयीं त्यानें यत्न
केला, परंतु त्या विषयीं कोणीं उत्तर दिलें नाहीं. याप्रमाणें
नापोलियन याच्या दुसऱ्या बादशाही अमलाचा शेवट झाला.
यावेळेस एकंदर त्यानें शंभर दिवस बादशाही भोगिली. **नापो-
लियन** याच्या मुलास बादशाही देण्याचें ठरेना, त्यामुळें त्याचे
कित्येक मित्र म्हणूं लागले कीं, ही गोष्ट होईपर्यंत बादशाहाचा राजी-
नामा रद्द आहे असें समजलें पाहिजे. यामुळें लष्करी लोकांत पुनः
घोंटाळा होण्याचा रंग दिसूं लागला. तेव्हां **नापोलियन** यास पुढारी
लोकांनीं सांगितलें कीं, 'आतां तुमच्यावर माझा कांहीं एक अधिकार
नाहीं.' असें तुम्ही सैन्यांतील लोकांस स्पष्टपणें सांगा. निरुपाय हो-
ऊन **नापोलियन** यास ही गोष्ट करावी लागली. नंतर तूर्त राज्यव्य-
वस्था पाहण्यास **फोके**, **कार्नोत्**, वगैरे पांच असामींची नेमणूक
झाली. **पारिस** येथें लोकांच्या नजरेपुढें असल्यामुळें गडबड हो-
ण्याची धास्ती आहे, असें निमित्त करून **फोके** यानें **नापोलियन**
यास **माल्मेसन्** या ठिकाणीं निघून जाण्यास सांगितलें. तेंही
नापोलियन यास करावें लागलें. तेथें बंदोबस्ताकरितां म्हणून कांहीं
लोक आले त्यांवर अधिकारी होता तो **बोर्बोन** पक्षाचा असून **नापो-
लियन** याचा पूर्वीपासून द्वेष करीत असे. त्यास पाहून **नापोलियन**
यास समजलें कीं, कैद झाल्याप्रमाणेंच आपली अवस्था झाली.

इकडे पराजित झालेली **फ्रेंच** लोकांची फौज एकत्र होऊन पा-
रिस शहराकडे परत येत होती. **ब्लुचर** आणि **वेलिंग्तन्** हे आपा-
पलीं सैन्यें घेऊन तिच्या पाठीस लागलेच होते. हें पाहून राज्यव्य-
स्था पहाणाऱ्यांस असें भय वाटूं लागलें कीं, **माल्मेसन्** येथून सुटून
पुनः **नापोलियन** सैन्यास मिळाला तर मोठी पंचाईत पडेल. **नापो-
लियन**ही दुसऱ्या **नापोलियन** बादशाहाचा सेनापति होऊन लढाईस
जाण्यास परवानगी मिळण्याकरितां अधिकाऱ्यांस पत्रें पाठवीतच होता.

कार्नोत् याच्या मनांत त्याचें म्हणणें मान्य करावयाचें होतें, परंतु फौके यानें तसें करूं दिलें नाहीं.

फोकेसारखे विश्वासघातकी मनुष्य ज्ं ांत फारच थोडे असतील. पूर्वीपासून हा **नापोलियन** व **बोर्बोन** वंशाचे राजे या दोघांसही विश्वास दाखवून फसवीन असे. दोन्ही पक्षांस वाटे कीं, हा गृहस्थ पूर्णपणें आपल्या पक्षाचा आहे. यानें तर असें करावें कीं, दोन्ही पक्षांस ज्यांत आपला मतलब फसणार नाहीं अशा एकमेकांच्या बातम्या सांगाव्या, व वेळ आली म्हणजे ज्या पक्षाचें वर्चस्व होईल तिकडून बक्षीस मिळविण्यास तयार असावें. पूर्वी **नापोलियन** व **बोर्बोन** यांशीं ज्या रीतीनें हा मसलती करी त्याप्रमाणेंच या वेळेस **फ्रान्स** देशावर येणाऱ्या परकीय राजांशीं ही करूं लागला. **नापोलियन** यास घालविण्यास त्यानें युक्ति केली, ती अशी कीं, मोठा कळवळा आणून त्यानें **नापोलियन** यास सांगितलें, आतां तुम्हांस सुरक्षितपणाचा व प्रतिष्ठेचा मार्ग एकच उरला आहे. तो कोणता तर एकदम **अमेरिकेंत** निघून जाणें. आपला बेत तडीस जाण्यास त्यानें नीचपणानें अशी युक्ति केली कीं, **नापोलियन** याचे कर्जदार होते त्यांस **माल्मेसन्** येथें जाऊन पैशाची मागणी करून त्याला त्रास देण्यास लाविलें. नंतर त्यानें **वेलिंग्तन** यास असें कळविलें कीं, **नापोलियन** यानें **अमेरिकेंत** जाण्याचा निश्चय केला आहे, याकरितां **आत्लांतिक** समुद्रांतून तो सुरक्षित जाईल अशी तजवीज आपण ठेवावी. या लबाड विश्वास घातकी मनुष्याचे असें करण्यांत दोन उद्देश होते. कदाचित् **वेलिंग्तन** यानें ऐकिलें तर **नापोलियन** यास आपण काम केलेंसें वाटेल. न ऐकिलें तर बातमी कळविल्यामुळें **वेलिंग्तन्** याचें मोठें काम केलेंसें होईल. **नापोलियन** यास जाऊं देण्यास मला अधिकार नाहीं, असें **फोके** यास उत्तर पाठवून **वेलिंग्तन्** यानें त्याचा मार्ग अडविण्यास लागलींच गलबतें पाठविलीं.

वेलिंग्तन् यानें पाठविलेलें उत्तर **नापोलियन** यास कळवून फोकें ल्लणाला, **इंग्लिश** सरकार कदाचित् तुह्मांस पकडण्याची तजवी- ज करील, याकरितां निघून जाण्याची जलदी करा. आपणास नेण्याकरितां **रोचेफोर्त** या बंदरीं गलबतें तयार आहेत. या वेळेस **नापोलियन** यावर अगदीं अखेरीचा प्रसंग आला. काय करावें हें त्यास सुचेनासें झालें. सेनेंतल्या लोकांचें मत **नापो- लियन** यानें येऊन आणखी युद्धास तयार व्हावें असें होतें. त्यामुळें त्यास जावें किंवा न जावें असें होऊं लागलें. परंतु आप- णास या वेळेस पराकाष्ठा साठ हजार फौज एकत्र करितां येईल. एवढ्याशा फौजेच्या बलावर **इंग्लंद, प्रुशिया, स्पेन,** इताली, जर्मनी, **आस्त्रिया,** व **रशिया,** या सर्व देशांच्या एकंदर आठ लक्ष फौजेब- रोबर लढण्याचें मनांत आणणें मूर्खपणाचें काम आहे, अशी **नापो- लियन** याची खातरी झाली. तेव्हां एक दोन विश्वासू पदरचे मनुष्य बरोबर घेऊन तारीख २९ जून १८१५ या दिवशीं **माल्मेसन्** येथून तो निघून गेला.

जुलईच्या तिसऱ्या तारखेस बंदराजवळ पोहोंचल्यावर लागलीच गलबतांत बसण्याचा **नापोलियन** याचा बेत होता. परंतु गलबता- च्या अधिकाऱ्यानें कळविलें कीं, **इंग्लिशां**चीं लढाऊ गलबतें आपणा- स अडविण्याकरितां तयार आहेत. याकरितां अशा धोक्यांत मा- ह्यानें गलबत हांकारवत नाहीं. नंतर **नापोलियन** यानें **हालंदा**- तील व्यापाऱ्याचें एक गलबत होतें तें भाड्यानें घेण्याचा बेत करून त्यावरून गुप्त रीतीनें जाण्याचा बेत केला. परंतु त्या गलबतावरील तांडेलानें सांगितलें कीं, ही गोष्ट **इंग्लिश** गलबतावरील खलाशांस क- ळल्याशिवाय राहणार नाहीं. कांहीं उपाय नाहीं, तेव्हां कित्येक त- रुण **फ्रेंच** खलाशी होते त्यांनीं गलबतांत बसवून रात्रीच्या समयीं **नापोलियन** यास नेण्याचा बेत केला. परंतु सर्व अनुभवी दर्यावर्दी लोकांनीं सांगितलें कीं, हजार वांट्यानीं **इंग्लिश** लोकांस न कळतां गलबत जाणार नाहीं. व कदाचित् जाईल असें झटलें तरी अशा

गलबतांस **आतलांतिक** महासागरांत मोठा धोका आहे. हें ऐकून निराश होऊन **नापोलियन** म्हणाला, जेथें जेथें लांकडाची धलपी तरंगेल तेथें तेथें **इंग्लिशां**चें निशाण फडकावयाचेंच.

इतकें होत आहे तों अशी बातमी येऊन पोहोंचली कीं, **ब्लुचर** आणि **वेलिंग्तन्** पारिस शहराजवळ आले. त्यांशीं ठराव होऊन **फ्रेंच** लोकांचें सैन्य **पारिस** येथून निघून जाण्याचें ठरलें. शत्रु लुई यास **फ्रान्स**चे गादीवर बसविणार. पुष्कळ ठिकाणीं पूर्वीचा पांढरा झेंडा फडफडूं लागला. अशा प्रसंगीं सैन्यास मिळण्यास जावें तर **बोर्बोन** पक्षाच्या लोकांच्या हातीं लागण्याचें भय. याकरितां सर्व उपाय सोडून **इंग्लिशां**च्या गलबतावरील अधिकारी **कप्तान मेत्लंद** याशीं **नापोलियन** यानें तहाचें बोलणें लाविलें. आपले दोन मनुष्य पाठवून **मेत्लंद** यास त्यानें असें कळविलें कीं, मला सुरक्षितपणें जाऊं देण्याचें कबूल केलें आहे, याबद्दल तुह्मांस लिहून आलें किंवा नाहीं ? **मेत्लंद** यानें परत उत्तर पाठविलें कीं, तुह्मांस जाऊं देण्याविषयीं मला लिहून आलें नाहीं, इतकेंच नव्हे, उलटें दैवयोगानें सवड सांपडल्यास तुह्मांस पकडून एकदम **इंग्लंदास** घेऊन जाण्याचा हुकूम आहे. **नापोलियन** याकडून गेलेल्या गृहस्थांनीं **मेत्लंद** यास सांगितलें कीं, **नापोलियन** आपण होऊन **पारिस**मधून निघून आला आहे. त्यास कोणीं घालविलें किंवा तो पळून आला असें नाहीं. यावर **मेत्लंद** यानें सांगितलें कीं, तें कांहीं असो, मला त्या गोष्टीची गरज नाहीं. मी तुह्मांस कोणत्याही गोष्टीचें वचन देणार नाहीं. घरगुती नात्यानें तुह्मांस इतकें सांगतों कीं, **नापोलियन इंग्लंदास** आला तर त्याचें आगतस्वागत चांगल्या रीतीनें होईल. तो आमच्या गलबतावर आला तर त्यास बंदिवानासारखा न वागवितां पाहुण्यासारखा वागवूं.

निरुपाय होऊन **इंग्लिश** लोकांच्या स्वाधीन होण्याचें मनांत आणून **नापोलियन** यानें **इंग्लंद**च्या राजास पत्र पाठविलें.

'महाराज, माझ्या देशांत अनेक दुफळ्या झाल्यामुळें व यूरोपां-

तील मोठमोठ्या राजांच्या शत्रुत्वामुळें मी राज्यसंबंध सोडून शेमिस्-तोक्लिअँस याप्रमाणें ब्रितिश लोकांमध्यें येऊन राहतों. माझ्या शत्रूंमध्यें आपण मोठे प्रबल, स्थिर व उदार असें समजून ब्रितिश लोकांच्या कायद्यांचें रक्षण मी आपणाजवळ मागतों.'

नापोलियन.

दैवगतीचा काय चमत्कार आहे! ज्या लोकांस पराजित करण्यास अनेक वर्षें प्रयत्न करीत होता, त्यांसच शरण जाण्याचा प्रसंग नापोलियना सारख्या जगास जिंकण्यास इच्छिणाऱ्या महत्वाकांक्षी मनुष्यास आला! या गोष्टीपासून त्यास किती वाईट वाटलें असेल! पत्र पाठविल्यावर **नापोलियन** यानें **इंग्लिशां**च्या गलबतावर जाण्याचा बेत केला. तिकडे जाण्यास होर्डीत पाय ठेविला, तेव्हां **नापोलियन** याच्या बरोबरच्या सर्व लोकांस अत्यंत दुःख झालें. ते ढळढळां रडूं लागले. गलबतावर आल्यावर **मेत्लंद** यानें पदच्युत बादशाहाचा चांगला आदरसत्कार केला, परंतु तोफांचे अवाज वगैरे कांहीं एक राजमान दिला नाहीं. गलबतावर गेल्यावर **मेत्लंद** यास **नापोलियन** यानें गंभीरपणानें सांगितलें कीं, 'तुमचा राजा आणि कायदे यांच्या छत्राखालीं मी आलों आहें.'

दुसरा मनुष्य तर इतकी फजिती झाल्यावर झुरून क्षीण झाला असता, परंतु **नापोलियन** याचें मन विलक्षण दृढ होतें, त्याच्या दृढतेस तुलना नाहीं. **इंग्लिशां**च्या गलबतावर गेल्यावर धैर्यानें मन स्वस्थ करून तेथील लोकांशीं तो गोडी गुलाबीनें वागूं लागला. गलबतावरील सर्व वस्तू त्यानें लक्षपूर्वक पाहिल्या. सर्व वस्तूंची स्तुति

---

* हा प्राचीनकाळीं ग्रीस् देशांत मोठा शूर व राज्यधोरणी पुरूष होता. इराणी लोकांनीं ग्रीस् देशावर स्वारी केली तेव्हां आथेन्स येथील सर्व लोक भिऊन गेले होते, त्यावेळेस आपल्या चातुर्यानें यानें स्वदेशावर आलेल्या संकटाचे निवारण केलें. परंतु पुढें इतर कारभाऱ्यांशीं वैमनस्य पडल्यामुळें हा शत्रुच्या मुलखांत पळून गेला. त्यानीं त्याचा सत्कारकरून त्यास मोठें कामही दिलें.

कैली. **इंग्लिश** लोक व विशेषेंकरून त्यांचीं लढाऊ गलबतें यांची त्यानें फारच वाखाणणी केली; आणि स्पष्टपणें असें म्हणून दाखविलें कीं, **वेलिंग्तन्** हा युद्ध कौशल्यामध्यें माझ्या बरोबरीचा असून दूरदृष्टि हा त्यामध्यें विशेष गुण आहे. गलबतें **इंग्लंदा**कडे जाण्यास निघालीं तेव्हां **नापोलियन** पुष्कळ वेळ पर्यंत खिन्नवदन होत्साता **फ्रान्स** देशाकडे पहात होता. ही त्याची आणि **फ्रान्स** देशाच्या किनाऱ्याची शेवटली दृष्टादृष्ट. ज्या देशांत त्यानें आपल्या बुद्धि कौशल्यानें, पराक्रमानें, व महत्वाकांक्षेनें अनेक वर्षेंपर्यंत पुष्कळ बऱ्या वाईट गोष्टी केल्या, तो देश पुनरपि डुरून सुद्धां त्याच्या दृष्टीस पडला नाहीं.

गलबतें **इंग्लंदा**च्या किनाऱ्यानजीक गेल्यावर **मेत्लंद** यास असा हुकूम आला कीं, गलबतावरील कोणा एकाही मनुष्यास जमिनीवर येऊं देऊंनये. **नापोलियन** आपल्या किनाऱ्याजवळ आला आहे असें ऐकतांच त्यास पाहण्यास उत्सुक झालेले हजारों लोक होड्यांत बसून चालले, त्यामुळें गलबताभोंवतीं फारच गर्दी झाली. **नापोलियन** सर्वांच्या दृष्टीस पडण्यासारख्या उंच ठिकाणीं बसला होता. लोक त्यास आनंदानें सलाम करीत व तोही किंचित् स्मित करून लोकांचे सलाम परत करी. तारीख २१ जुलई या दिवशीं **इंग्लिश**ांचे दोन कामदार गलबतावर आले, त्यांनीं **नापोलियन** याविषयीं सरकारचा ठरलेला अखेर निकाल जाहीर केला. त्यांत दोन कलमें होतीं.

एक, सेनापति **बोनापार्त** यास **इंग्लंदा**च्या किनाऱ्यावर उतरूं देऊंनये. त्यास **सेंतहिलिना** येथें घेऊन जावें. सरकारच्या ताब्यांत असलेल्या ठिकाणांत तेंच त्यास ठेवण्यास योग्य ठिकाण आहे. तेथून तो पुनः सुटण्याचें भय नाहीं. व त्यासही तेथें स्वतंत्रपणें मोकळें फिरावयास सांपडेल. दुसरें. **साव्हरी** व **आलेमंद** यांशिवाय पाहिजे ते तीन असामी कामदार त्यानें आपल्याबरोबर घ्यावे. आपला वैद्य बरोबरोबर घ्यावा व आणखीं बारा माणसें बरोबर घ्यावीं.

शिवशिव ! काय हा प्रसंग ! ! शब्दावरोवर लाखों माणसें जमविणाऱ्या **नापोलियनासारख्या** मनुष्यास शत्रूंचा मोजकीं वारा मनुष्यें नेण्याचा हुकूम पाळण्याची वेळ यावी ! काय हा महत्वाकांक्षेचा परिणाम ! तस्मात् ' दैवीविचित्रागतिः ' हीच गोष्ट खरी म्हटली पाहिजे. **इंग्लिश** सरकारच्या अधिकाऱ्यानें **फ्रेंच** भाषेंत वरील ठराव नापो**लियन** यास वाचून दाखविला, तेव्हां तो साश्चर्य किंवा खिन्न न होतां शांतपणें ऐकत होता.

आपणास यावर कांहीं बोलावयाचें आहे काय ? असें **इंग्लिश** सरकारच्या अधिकाऱ्यानें विचारिलें, तेव्हां **नापोलियन** शांत गंभीर स्वरानें म्हणाला, लढाईंत धरलेल्या बंदिवानाप्रमाणें माझी व्यवस्था करण्यास **इंग्लिश** सरकारास अधिकार नाहीं. तुमच्या एखाद्या गांवांत जावें त्याप्रमाणे मी तुमच्या गलबतांत आलों. तुम्हांस कैद केलें जाईल असें मला सांगितलें असतें तर मी आलों नसतों. **इंग्लिश** सरकारानें मला सेनापति ही पदवी दिली हैं गैर आहे. माझा पदवीचा हक्क गेला नाहीं. तीन महिन्यापूर्वी लुई जसा **फ्रान्स**चा राजा होता, तसाच मीही **एल्बा** बेटाचा बादशहा होतों. एका राजानें दुसऱ्या राजाच्या मुलुखावर स्वारी केली म्हणजे त्याची पदवी जाते असें नाहीं. **इंग्लिश** सरकारावर म्यां विश्वास ठेविला त्याचा त्यांनीं असा घात केला तर जगांत त्यांची अपकीर्ति होईल. **आस्त्रिया**च्या अथवा **रशिया**च्या बादशाहानें मला असें वागविलें नसतें. **सेंतहिलीना** येथें बंदींत टाकिल्यास तेथील हवेनें मी मरेन. याकरितां तेथें न जाण्याचा माझा निश्चय आहे.

इंग्लिश सरकार सांगेल तें ऐकिल्याशिवाय **नापोलियन** यास दुसरा मार्ग नव्हता, असें असून त्यानें वर सांगितल्याप्रमाणें भाषण केलें, त्यामुळें **इंग्लिश** सरकारानें त्याचें म्हणणें न ऐकिल्यास तो आत्महत्या करील अशी वदंता उठली होती. कारण वर सांगितलेलें भाषण ऐकून गलबतावर **फ्रान्स** देशांतल्या कांहीं **स्त्रिया** होत्या त्या रडूं लागल्या. **नापोलियन** आत्महत्या करणार ही बातमी अगदीं

खोटी होती असें एक ग्रंथकार ह्मणतो. कारण जोव आहे तोपर्यंत आशा आहे, या वाक्यावर त्याचा पूर्ण भरंवसा होता. गेलेलें आपलें वैभव पुनः परत येणार नाहीं कशावरून ? असें त्यास शेवटपर्यंत वाटत असे.

नापोलियन इंग्लिश लोकांकडे गेल्यावर मागें अठरावा लुई पुनः गादीवर बसला. **मुशियन** व **इंग्लिश पारिस** शहरांत शिरले. त्यांनीं **नापोलियन** यानें पूर्वी **यूरोपखंडांतील** देश जिंकून तेथून आणलेलीं चित्रें, पुस्तकें, पुतळे, वगैरे सर्व नेलें; वगैरे गोष्टींचा संबंध **नापोलियन** याच्या चरित्राशीं राहिला नाहीं, याकरितां त्या येथें सांगण्याचें कारण नाहीं.

नापोलियन शरण आला असून आपल्या देशांत त्यास येऊं दिलें नाहीं, त्याची बादशाहा ही पदवी रद्द करून त्यास सेनापति असें ह्मटलें, याबद्दल **नापोलियन** याच्या पक्षाचे कित्येक ग्रंथकार **इंग्लिश** सरकारास दोष लाविताात. परंतु **इंग्लिश** ग्रंथकारांनीं या गोष्टीचें चांगलें समाधान केलें आहे. त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, **नापोलियन** यास **इंग्लंदांत** येऊं दिलें असतें तर पुनरपि यूरोपखंडांत घोंटाळा होऊन रक्तपाताचा प्रसंग आला असता. **इंग्लंद** व **फ्रान्स** देश अगदीं जवळ. **इंग्लंदांत** वर्तमानपत्रांस स्वतंत्रता पुष्कळ. त्याच्या पक्षाचे लोकही **इंग्लंदांत** बरेच होते. या गोष्टींमुळें त्यानें अनेक मसलती करून पुनः घोंटाळा केला असता. ज्यानें तह झाल्यावर एल्बा बेटांतून सुटून येऊन पूर्वीचे सर्व करार एकीकडे ठेविले, त्याचा विश्वास पुनः न धरणें हें योग्यच होतें. त्याच्या दुसऱ्या शत्रूंच्या देशांतील लोकांनीं तर जिवंत हातीं लागल्यास गोळी घालून त्यास ठार मारून टाकण्याचा बेत केला होता. बादशाहा ही पदवी रद्द करण्याविषयीं **इंग्लिश** ग्रंथकारांचें असें ह्मणणें आहे कीं, **एक्स्** येथें तह झाला त्या वेळेस त्यास जी पदवी होती ती **इंग्लिश** सरकारानें कायम ठेविली. त्यापुढें **नापोलियन** यानें ज्या गोष्टी केल्या, त्या **इंग्लिश** सरकारास पूर्वीपासूनच कबूल नव्हत्या. **नापोलियन** यास

इंग्लंदांत आणण्याविषयीं त्याच्या पक्षाच्या लोकांनीं पुष्कळ यत्न केले ते सर्व व्यर्थ गेले. त्यानें इंग्लंदच्या राजाची स्वतः गांठ घेण्यास परवानगी मिळण्याविषयीं पुष्कळ खटपट केली, परंतु राजाच्या प्रधानांनीं तेंही कबूल केलें नाहीं. आपल्या भाषणानें दुसऱ्याचें मन वळवून घेण्याचा गुण **नापोलियन** यामध्यें पूर्णपणें होता. त्यामुळें प्रधानांस असें भय वाटे कीं, या दोघांची गांठ पडल्यास कदाचित् आपण केलेली सर्व व्यवस्था बिघडेल. **लार्द कीथ** म्हणून एक **इंग्लिश** सरकारच्या सैन्यांतील मोठा अधिकारी होता; तो **नापोलियन** आणि राजा यांच्या भेटीविषयीं कोणाशीं बोलत असतां असें म्हणाला कीं, 'माझ्या मनाची खातरी आहे कीं, जर तुम्ही त्यांची भेट होऊं दिली, तर अर्ध्या तासांत त्यांचें उत्तम मित्रत्व जमेल.'

मेत्लंद यानें विश्वास घात केला, असें म्हणून **नापोलियन** याच्या पक्षाच्या लोकांनीं त्यावर निंदेचा वर्षाव केला. **नापोलियन** याचा वाजवीपेक्षां फाजील मान ठेविल्यामुळें कित्येक **इंग्लिश** लोकांनीं त्यास दोष दिला. असें असून त्यानें **नापोलियन** याच्या मोहकपणाविषयीं असें लिहिलें आहे कीं;-

'ज्यानें आपल्या देशास इतकीं दुःखें दिलीं, त्या विषयीं **इंग्लिश** सरकारच्या कामदाराच्या मनांत थोडा तरी ओढा उत्पन्न होणें ही गोष्ट आश्चर्यकारक वाटेल, परंतु दुसऱ्यास खुप करण्याची शक्ति त्याच्या आंगीं इतकी विलक्षण होती कीं, मजप्रमाणें महिनाभर त्याच्याजवळ असून अनेक मोहक गुणांनीं संपन्न व मोठ्या वैभवास चढलेल्या अशा मनुष्याची मी पाहिली त्या प्रकारची वाईट स्थिति पाहून मनांत दया उत्पन्न होऊन वाईट वाटणार नाहीं असा मनुष्य क्वचित् सांपडेल.'

सामानाची तयारी होऊन गलबत हाकारण्यास तयार झालें तेव्हां **नापोलियन** याच्याबरोबर कोणकोण माणसें जावयाचीं तें ठरलें. **बेत्रांद** व **मान्थोलोन्** हे त्याच्या पदरचे दोन मोठे कामदार आपल्या बायका व मुलें बरोबर घेऊन त्याजबरोबर निघाले. आपल्या

धन्यास सोडून जाण्याचा ज्यांस प्रसंग आला, त्यांस फार शोक झाला. सर्व मोठमोठ्यांनीं रडूं लागले. कित्येक **नापोलियन** याचे पाय सोडीनात. **साव्हरी** आणि **आलेमंद** हे जाण्यास मोकळीक मिळाची म्हणून **इंग्लिश** सरकारच्या कामदारांचीं फार आर्जवें करीत होते, परंतु त्यांचें म्हणणें कबूल झालें नाहीं. त्यामुळें त्यांस फारच धाक पडला. त्यांस वाटलें, आम्हांस **लुई** राजाच्या स्वाधीन करण्याचा **इंग्लिश** सरकारचा बेत आहे. परंतु **इंग्लिश** सरकार तसें करणार नाहीं, असें वचन मिळाल्यामुळें ते उगीच बसले. वर सांगितलेल्या दोन कामदारांशिवाय आणखी एक कामदार, एक वैद्य, नऊ चाकर, व तीन दासी, याप्रमाणें माणसें **सेन्तहिलीना** येथें जावयाचीं असें ठरलें. **नापोलियन** यानें बरोबर आणलेल्या संपत्तीपैकीं सोन्यारुप्याचें सामान होतें तें मात्र बरोबर नेण्यास परवानगी देऊन रोकड चाळीस हजार रुपये होते ते **इंग्लिश** सरकारानें जप्त केले, आणि तुमचा खर्च आम्ही चालवूं म्हणून सांगितलें.

नंतर तारीख ८ आगष्ट सन १८१५ या दिवशीं **नार्दंबर्लंद** नांवाचें गलबत **यूरोप** खंडास जिकणाऱ्याला नेऊन **सेन्तहिलीना** बेटांत बंदींत टाकण्याकरितां घेऊन चाललें. गलबतावर मुख्य अधिकारी **सर जार्ज काक्बर्न** हा होता. त्यानें **नापोलियन** यास आपणापेक्षां मोठा मान दिला नाहीं, तथापि तो त्यास चांगल्या रीतीनें वागवीत असे. **नापोलियन** यानेंही आपलें अंतःकरण स्वस्थ ठेविलें होतें. तारीख १५ अक्टोबर रोजीं गलबत नियमित स्थळीं पोहोंचलें.

सेन्तहिलीना हें बेट **आफ्रिका** खंडाच्या पश्चिमेस **आत्लांतिक** महासागरांत आहे. यांतील जमीन खडकाळ आहे. गलबत बंदराजवळ आल्यावर **नापोलियन** यानें दुर्बिण लावून सर्व बेट निरखून पाहिलें. गलबतांत बसून बरेच दिवस झाल्यामुळें **नापोलियन** लागलींच जमिनीवर उतरला. त्यास पाहण्यास लोक फार येऊं लागले, यामुळें तो कांहीं दिवस एकीकडे जाऊन राहिला. नंतर सर्व जागांची पारख करून **लांगवूद** म्हणून तेथील अधिकाऱ्याचें ठिकाण

होतें तेथें राहण्याचें त्यानें ठरविलें. तेथील बंगला साधारण बराच मोठा होता, तरी **नापोलियन** याची गैर सोय होऊंनये ह्मणून आणखी कांहीं जागा बांधिली. इमारत तयार होईपर्यंत जाण्याची सोय झाली त्याप्रमाणें **नापोलियन** व बरोबरचीं माणसें वेगळाल्या ठिकाणीं राहिलीं होतीं. बंगला तयार झाल्याघर आपल्या सामानाची, पुस्तकांची, वगैरे नीट व्यवस्था लावून बरोबरच्या सर्व माणसांसहवर्तमान **नापोलियन** तेथें राहण्यास गेला. लढाया, राज्यकारभार, वगैरे नाहींसें झाल्यामुळें **नापोलियन** याची विशाळ बुद्धि निश्चल न राहतां ग्रंथ लिहिण्याकडे वगैरे वळेल असें वाटलें होतें, परंतु त्याच्या शरीराची चंचलता नाहींशी करतांच बुद्धीची तीव्रताही नष्ट झाली.

नापोलियन सेंतहिलीना येथें राहूं लागल्यावर इंग्लिश सरकारानें त्याचे फार हाल मांडिले आहेत असा त्याच्या मित्रांनीं सर्व **यरोपांत** गोंगाट केला. बेटांतील हवा चांगली नाहीं, त्यास राहण्यास घेर चांगलें नाहीं, चाकर माणसें पुरेशीं नाहींत, दिवसभर पहारा असल्यामुळें त्यास बाहेर जाण्यास मोकळीक नाहीं, निर्वाहाच्या पदार्थांचा पुरवठा भरपूर नसून पदार्थही चांगले नाहींत, बायकोचा व मुलाचा वियोग, खर्चास पैसा अगदीं थोडा, वगैरे पुष्कळ गोष्टींविषयीं लोक गोंगाट करूं लागले. परंतु कांहीं कारण नसतां हे सर्व प्रकार, आपणाकडे **यूरोपांतील** लोकांचें पुनः मन वळवावें ह्मणून **नापोलियन** यानें करविले असावे असें कित्येक ग्रंथकारांचें ह्मणणें आहे. त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, तेथें घरें होतीं त्यांपैकीं चांगलें होतें त्यांत **नापोलियन** रहात होता; त्यास पुरे इतकी जागा होती; पुस्तकें वगैरे सामान त्यापाशीं होतें, चाकर माणसें पुरेशीं होतीं; खर्चास वर्षास एक लक्ष वीस हजार रुपयांची नेमणूक होती; वस्त्रपात्र पुरेसें होतें; त्याचा जेवणाखाणाचा बेत **इंग्लिश** सरकारच्या सैन्यांतील अधिकाऱ्याप्रमाणें असे; त्यास कोणास विचारल्याशिवाय दोन कोसपर्यंत जाण्याची परवानगी होती; परवानगीनें चार कोसपर्यंत व पहारा बरोबर असून सहा कोसपर्यंत व **इंग्लिश** सरकारच्या अधिकाऱ्यास

वरोवर घेऊन वेटांत पाहिजे तिकडे जाण्याची परवानगी होती. बायको व मुलगा न पाठविण्यांत इंग्लिश सरकारचा संबंध नव्हता. त्यांस आस्त्रियाच्या बादशाहानें पाठविलें नाहीं. सेंतहिलीना येथील हवा विशेष वाईट नसून नापोलियना सारख्या मनुष्यास दुसऱ्या ठिकाणीं ठेवण्याची सोय नव्हती. इंग्लिश सरकारच्या अधिकाऱ्यास दाखविल्याशिवाय यूरोपांत कोणासही पत्र पाठविण्याची नापोलियन यास परवानगी नव्हती, या प्रतिबंधावद्दल सर वालतर स्काट् या ग्रंथकारानें इंग्लिश सरकारास दोष लाविला आहे. परंतु यावरही कित्येक ग्रंथकारांचें असें म्हणणें आहे कीं, पूर्वीप्रमाणें खलबतें होऊन पुनः युरोपांत घोंटाळा होऊंनये असें करण्याकरितां ही गोष्ट करणें भाग पडलें. नापोलियन इतक्या बंदींत असतांही त्याच्या मित्रांनीं त्यास तेथून पळविण्याविषयीं अनेक उद्योग चालविले होते. एका मनुष्यानें या कामाकरितां इंग्लंदांत मुद्दाम चमत्कारिक रीतीचें एक गलबत तयार करविलें होतें. कांहीं वेळ पाण्यांत बुडून रहावें अशी त्यांत कांहीं युक्ति होती; ती अशी कीं, रात्रीच्या वेळेस सेंतहिलीना वेटाजवळ जाऊन गलबत पाण्यांत बुडवून ठेवावें आणि प्रसंग साधला म्हणजे नापोलियन यास घेऊन निघून जावें. परंतु त्या गलबताची चमत्कारिक रचना दिसतांच सरकारानें तें मोडून टाकिलें.

कांहीं दिवसांनीं नापोलियन व सेंत हिलीना येथील इंग्लिश सरकारचा मुख्य अधिकारी सर हडसन् लो यांमध्यें फार भांडणें होऊं लागलीं. यामुळें यूरोप खंडांतील वर्तमान पत्रांत, राजकीय सभांत, वगैरे फारच चर्चा होऊं लागली. हडसन् लो हा नापोलियन यास फारच त्रास देत आहे, असें ठिकठिकाणीं लोक बोलूं लागले. इंग्लंदांतील प्रसिद्ध कवि बायरन् यानें नापोलियन याच्या स्तुतिपर कांहीं कविता लिहिल्या, त्यांत सुद्धां नापोलियन यास वाईट रीतीनें वागविण्याचा उल्लेख केला आहे. या गोष्टीविषयीं कित्येक ग्रंथकारांचें असें म्हणणें आहे कीं, नापोलियन याच्या मित्रांनीं उगाच अ-

तिशयोक्तीनें या गोष्टींचा यूरोपांत पुकारा केला. हडसन् लो त्यास चालीप्रमाणें योग्य रीतीनें वागवीत असे, असें हिंदुस्थानांतून येणाऱ्या कित्येक गलबतांवरील लोक तेथें जात त्यांनीं सांगितलें आहे. यांतील कित्येक लोक **नापोलियन** यास भेटावयास जात त्यांपैकी **नापोलियन** गोडीगुलाबीनें बोलत असे. चोवीस तासांत एकवार तरी **नापोलियन** कोणत्याही इंग्लिश कामदाराच्या दृष्टीस पडला पाहिजे, वगैरे गोष्टी **नापोलियन** यास अपमानकारक वाटत, परंतु त्यास हडसन् लो याचा उपाय नव्हता. त्यास सरकारचा हुकूम अमलांत आणणें भाग होतें. अस्तु.

सेंताहिलीना येथें राहूं लागल्यावर **नापोलियन** याचा वर्तनक्रम पुढें लिहिल्याप्रमाणें होता. तो सकाळीं लौकर उठे. उठल्यावर लागलींच पायांनीं किंवा घोड्यावर बसून फिरावयास जाई. वाहेर न गेल्यास कोणास तरी आपण पूर्वी केलेल्या कित्येक गोष्टींचा इतिहास लिहावयास सांगत बसे. पुनः दहा वाजतां जेवण झाल्यावर दोन तीन तास वाचीत किंवा लिहावयास मजकूर सांगत बसे. नंतर कोणास भेटणें झालें तर भेटे. नंतर गार्डीत किंवा घोड्यावर बसून पदरची सर्व मंडळी वरोबर घेऊन फिरावयास जाई. परत आल्यावर पुनः वाचीत किंवा लिहावयास सांगत बसे. नंतर रात्रीचें जेवण आठ वाजतां होई. तो नेहमीं साधें अन्न खात असे. त्याचा आहार बराच होता, तरी त्यास पाहिजे तसें खाणें सोसत नसे. तो दारू ही विशेष पीत नसे. तो तपकीर फार ओढी. रात्रीस जेवण झाल्यावर कांहीं वेळ गोष्टी सांगणें किंवा कोणी कांहीं वाचल्यास ऐकणें हें झाल्यावर निजे. सर्व आयुष्य उद्योगांत गेल्यामुळें त्यास अगदीं थोडी झोंप पुरत असे. परंतु तेवढ्या झोंपेतून देखील दचकून मध्येंच उठण्याची त्यास संवय होती. त्यामुळें जागा झाला असतां वाचूं लागण्यास कोणी तरी पुस्तक घेऊन जवळ तयार असे. तो आपल्या शरीराची चांगली जोपा राखी. रोज स्नान करी. तुल-

ग्रीस राजवाड्यांत बादशाहा असतां जो पोषाक असे त्याप्रमाणेंच तेथेंही असे.

वानलू येथील लढाई झाल्यापासूनच **नापोलियन** याची शक्ति थोडयोडी कमी होत चालली होती, तरी सन १८१७ या वर्षापासूनच त्याच्या तोंडावरची कळा कमी होऊं लागली. तेव्हां त्यास अधिक मोकळीक देण्याकरितां त्याच्याबरोबरीचे लोक विनंति करूं लागले, परंतु यांत कांहीं तरी मतलब असेल असें वाटून अधिकाऱ्यांनीं त्याचें म्हणणें कबूल केलें नाहीं. सन १८१८ या वर्षाच्या सप्टेंबर महिन्यांत **नापोलियन** याची प्रकृति फारच बिघडली. हें पाहून वैद्यास-सुद्धां धाक वाटूं लागला. वैद्यानें त्यास सांगितलें कीं, तुम्ही मोकळ्या हवेंत व्यायाम करा, नाहीं तर प्रकृति आटोक्याबाहेर जाईल. **नापोलियन** यानें कांहीं दिवस बाहेर जाणें अगदीं सोडिलें होतें. त्यानें वैद्यास सांगितलें कीं, पहारेकरी अपमान करितात तो सोसून माझ्यानें बाहेर फिरावयास जाववत नाहीं. वैद्यानें सांगितलें कीं, फिरावयास न जाण्याचा आग्रह धराल तर परिणाम वाईट होईल. यावर **नापोलियन** म्हणाला ज्या **इंग्लिश** सरकारानें मला या हवेंत पाठविलें, त्याच्या कीर्तीस माझ्या मृत्यूनें कालिमा लागेल एवढें तरी होऊंद्या. जें एकवार कपाळीं लिहिलें आहे तें खरें. आपले दिवस एकदांच ठरले आहेत. **नापोलियन** याजवळ **इंग्लंदांतील** वैद्य होता, तो **लंदन**मध्यें **नापोलियन** याचा कोणी मनुष्य होता त्याबरोबर पत्रव्यवहार ठेवितो, असा संशय आल्यामुळें **हडसन् लो** यानें त्यास **इंग्लंदांत** परत पाठविलें. तो दुसरा वैद्य आणविणार होता, परंतु **नापोलियन** यानें सांगितलें कीं, तुम्ही आणलेल्या वैद्याचें औषध मी घेणार नाहीं. नंतर त्याची बहीण **पालाईन** हिनें **इताली** देशांतला वैद्य पाठविला. **नापोलियन** यानें लिहून पाठविल्यावरून त्याच्या चुल-त्यानें दोन पाद्रीही पाठविले. **नापोलियन** याची प्रकृति फारच बिघडत चालली. कोणी असें म्हणतात कीं, **नापोलियन** याचा हट्टो-

गानें शेवट लौकर झाला. कारण अशी अमर्याद महत्त्वाकांक्षा बाळ-
गणाऱ्या आणि सर्व युरोपखंडास आपल्या ताब्यांत आणणाऱ्या
मनुष्यास शत्रूंच्या कैदेंत रहावयास लागल्यावर मनोदुःखानें त्याचा
अंत होणें हें सहाजिकच आहे. **नापोलियन** यानें व्यायाम सोडून
दिला त्याप्रमाणें औषध घेणेंही सोडून दिलें. **इतालीं** देशांतील वैद्य
औषध घेण्यास आग्रह करूं लागला, तेव्हां **नापोलियन** म्हणाला,
'वैद्यबावा औषधाचा कांहीं उपयोग नाहीं, आपण यंत्राप्रमाणें वांचावें
अशी तजवीज केलेली आहे. त्यासारखीच आपली रचना आहे. त्याप्र-
माणेंच आपला स्वभाव आहे. ज्या जीवनकलेच्या योगानें मनुष्य वांचतो.
तीविषयीं तुम्ही कांहीं उपाय करूं नका, ती तशीच असूंद्या. तीस
आपलें आपण रक्षण करूंद्या. आमच्या औषधापेक्षां ती आपल्या-
आपण बरी राहील. आपलें शरीर हें घड्याळ आहे, तें नेमलेल्या वे-
ळेपर्यंत चालावें अशी योजना आहे. घड्याळ करणाऱ्यास तें उघ-
डितां येत नाहीं. याकरितां आपल्याआपण चालेल तोपर्यंत चालेल.
जर त्यानें आपल्या ओबडधोबड हत्यारांनीं तें एकदां नीट केलें तर ते
दसपट विघडून शेवटीं मोडून जाईल.'

शरीराबरोबर **नापोलियन** याचें मनही क्षीण होत चाललें. चे-
हरा अगदीं खिन्न व उदास झाला. तो वारंवार बेशुद्धासारखा नि-
श्चेष्ट पडूं लागला. एका वेळेस आपणाशीं बोलत असतां तो म्हणाला,
'मी मागें **नापोलियन** होतों. आतां मी कांहीं नाहीं. माझें आं-
गबळ, बुद्धिबळ, सर्व नाहींसें झालें. मी आतां जिवंत असून मेल्या-
सारखा आहें.'

नापोलियन याची प्रकृति फारच विघडत चालली, तेव्हां
हडसन् लो ह्यानें ही गोष्ट **इंग्लिश** सरकारास कळविली. तेव्हां त्या
सरकारानें **केप्आफ्गुडहोप्** येथून **नापोलियन** यास पाहिजे तो
वैद्य आणविण्याविषयीं हुकूम लिहिला. परंतु तो पोहोंचण्यापूर्वी-
च **नापोलियन** याचा अंतकाळ जवळ आला. औषध घेण्या-
विषयीं पुनः वैद्यानें आग्रह केला, तेव्हांही **नापोलियन** म्हणाला,

'आपली घटका नेमलेली आहे. नशीबांत लिहिलें आहे त्यापेक्षां क्षण-भरसुद्धां अधिक आयुष्य कोणास मिळणार नाहीं.'

सन १८२१ चे एप्रिल महिन्यांत **नापोलियन** त्यानें आपलें मृत्युपत्र केलें त्यांत त्यानें आपल्या पेटींतील सर्व वस्तू आपल्या मुलास द्याव्या असें लिहून ठेविलें. हा लेख मोठा वेधक आहे असें म्हणतात. मृत्युपत्र झाल्यावर त्यानें असें सांगून ठेविलें कीं, 'मी मेल्यावर वैद्यानें माझें शरीर फाडून आंतील रोगाची नीट पारख करून काय ठरेल तें माझ्या मुलास कळवावें. तो म्हणाला, 'एकामागून एक वरच्यावर ओकाऱ्या येतात, यावरून मला असें वाटतें कीं, माझ्या कोठ्यांतील सर्व अवयव बिघडले आहेत आणि ज्या रोगानें माझा बाप मेला, त्याच रोगानें मला घेरलें आहे. ह्या रोगाचें स्वरूप कोठ्यांत खालच्या बाजूस मांसग्रंथि होणें हें होय. **मांत्पेलिअर** एथील वैद्यानें सांगितलें होतें कीं हा रोग आमच्या कुटुंबांत वंशपरंपरेनें राहील.' त्यानें आपलें शरीर कसें पुरावें याविषयींही पाद्रयास सांगून ठेविलें. तो त्यास म्हणाला, 'मी नास्तिक नाहीं, किंवा आपल्या बुद्धीस सयुक्तिक दिसेल तें करावें असें म्हणणारा नाहीं. माझा परमेश्वरावर भरंवसा आहे. मी आपल्या बापाच्या धर्माप्रमाणें वागणारा आहें. मी रोमनक्याथोलिक धर्मास अनुसरणाऱ्या कुलांत जन्मलों त्याप्रमाणेंच मरेन. त्यांत सांगितलेल्या आश्रयाचा स्वीकार करीन.'

नापोलियन याचा मरणकाल अगदीं जवळ आला असें वाटूं लागलें तेव्हां जवळच्या मनुष्यांनीं आणखी वैद्य आणण्याचा यत्न केला तरी त्यापुढें त्यांचें कांहीं चालेना. त्याचा इतका धाक असे कीं, तो बोलेनासा झाला तरी त्याच्या बघण्याचें सुद्धां चाकरमाणसांस भय वाटे. पाद्रयानें प्रायश्चित्तासारखा शेवटला कांहीं संस्कार आहे तो केला. त्यानंतर **नापोलियन** अगदीं बेशुद्ध पडला. सन १८२१ या वर्षीं मे महिन्याच्या चवथ्या तारखेस **सेंतहिलीना** या बेटांत एवढें मोठें वादळ झालें कीं झाडें सुद्धां मुळांसकट उपटून गेलीं. पांचव्या तारखेसही वादळ सुरू होतेंच. त्या दिवशीं सायंकाळीं

सहा वाजतां **नापोलियन** यानें प्राण सोडिला. मरणसमयापर्यंत त्याच्या मनांत लढाईचे विचार घोळत होते असें म्हणतात.

सहाव्या तारखेस वैद्यानें त्याच्या मंडळीसमक्ष **नापोलियन** याचें प्रेत कापिलें; तेव्हां असें कळलें कीं, चाळपुळीसारखें क्षत होऊन त्यानें सर्व कोठा न्यापून टाकिला होता.

ज्या **फ्रेंच** लोकांवर मी इतकी प्रीति करीत होतों, त्यामध्यें **सीन** नदीच्या कांठीं माझें प्रेत पुरावें अशी **नापोलियन** याची इच्छा होती, परंतु हें म्हणणें **लुई** राजा मान्य करणार नाहीं असें समजून **हडसन् लो** यानें ज्या जागीं **नापोलियन** संध्याकाळच्या वेळेस हवा खाण्यास बसत असे आणि मला **सेंतहिलीना** येथेंच पुरणें झाल्यास येथें पुरावें असें म्हणत असे त्या ठिकाणीं त्यास पुरण्याचा बेत केला.

तारीख ८ मे या दिवशीं **नापोलियन** याचें प्रेत पुरण्याचा समारंभ झाला. **मारेंगो** येथील प्रसिद्ध लढाईच्या वेळेस जो झगा त्याच्या आंगावर होता तो प्रेतावर घातला. बेटांतले सर्व लोक **नापोलियन** बादशाहाचें प्रेत पाहण्यास आले. लष्करी खात्यांतील सर्व लोक एकामागूनएक जाऊन सन्मानपूर्वक बादशाहाच्या गार होतां स्पर्श करूं लागले. बेटाचा मुख्य अधिकारी व इतर सर्व कामदार प्रेताच्या मागून चालले. बंदुकांच्या व तोफांच्या आवाजांचा गडगडाट एकसारखा पुष्कळ वेळ चालला होता. नेमलेल्या स्थळीं गेल्यावर पाद्र्यानें प्रेतसंस्कार केला, तेव्हां ज्याचें नांव ऐकून **युरोपखंड** घाबरें होत असे, व ज्याचें नांव राहण्याकरितां दगडावर लेख कोरण्याची गरज नाहीं, त्या **नापोलियन** बादशाहाच्या साडेतीन हात देहास तयार केलेल्या खळग्यांत काष्ठवत् ठेवून लोकांनीं वर माती लोटिली ! एक उत्तम ग्रंथकार असें म्हणतो कीं, मनुष्याची महत्वाकांक्षा व्यर्थ आहे, असें मनांत भरवून देणारी अशी दुसरी गोष्ट कदाचित् कधीं झाली नसेल. ही गोष्ट पाहून ऐहिक महत्वाच्या व्यर्थत्वाविष-

यीं कधींही विचार न करणाऱ्या मनुष्याचेंही मन उद्विग्न झाल्याशिवाय राहिलें नसेल.

यात्रमाणें या महापराक्रमी पुरुषाचा शेवट झाला. ग्रंथाच्या शेवटीं, ज्याचें चरित्र लिहिलें असेल त्याच्या स्वभावाविषयीं वगैरे संक्षिप्त वर्णन करण्याची चाल आहे. परंतु उपोद्घातांत सांगितल्याप्रमाणें **नापोलियन** याविषयीं तसें करणें कठिण आहे. यासाठीं आरंभापासून वाचलेल्या गोष्टी मनांत आणून वाचकांनीं **नापोलियन** कसा होता हें समजावें. कारण ग्रंथकर्त्यांनीं त्याच्या स्वभावाचें परस्परांशीं अगदीं भिन्न अशा रीतीनें वर्णन केलें आहे. कित्येक त्यास दुर्गुणाचा समुद्र, राक्षस असें म्हणणारे आहेत. कित्येक सद्गुणांची खाण असेंही म्हणणारे आहेत. यावरून असें दिसतें कीं **नापोलियन** यामध्यें गुण आणि दोष दोन्ही वास करीत होते, गुण असल्यामुळेंच तो जगत्प्रसिद्ध झाला, व दोषांमुळेंच त्याचा नाश झाला. या दोन्ही गोष्टी खऱ्या आहेत. **नापोलियन** याच्या दोषांचा विचार करिते वेळेस **फ्रान्स** देशांतील लोकांची स्थिति मनांत आणिली पाहिजे. तो स्वतः वारंवार म्हणे कीं, भाग्योदयानेंच माझा नाश केला. वयास तीस वर्षें होण्यापूर्वीच माझ्या हातांत मोठी सत्ता आली, व मोठमोठ्या गोष्टी मी करूं लागलों. एक सुज्ञ ग्रंथकार असें म्हणतो कीं, **नापोलियना**सारख्या तापट, तीव्रबुद्धिमान् व महाधैर्यवान् मनुष्यास दारिद्र्य व अप्रसिद्धपणा जाऊन एकदम मोठी कीर्ति, मोठी संपत्ति, आणि मोठी सत्ता, प्राप्त झाल्यावर त्याच्या मनावर कोणता स्वाभाविक परिणाम होईल, हें जो मनांत आणणार नाहीं, त्यास त्याच्या उदयकालांतील व ऱ्हासकालांतील स्वभावाविषयीं जो त्या मत देतां येणार नाहीं. ज्या गोष्टींनीं इतर मनुष्य दिपून जातात, त्याच गोष्टींचा परिणाम **नापोलियन** याच्या मनावर नाशकारक झाला. आपणांमध्यें कांहीं तरी अमानुष गुण आहे, असें त्यास वाटूं लागलें, व त्यामुळें आपणास कशाचीही आडकाठी नाहीं, असें

तो समजूं लागला. सर्व मनुष्यांनीं मला वश व्हावें, माझी वाखाणणी करावी, व मला मान द्यावा, असें त्यास वाटूं लागलें.

नापोलियन हाडाचा दुष्ट होता, असें म्हणतां येत नाहीं. तो दहा लक्षांवर मनुष्यांच्या नाशास हेतुभूत झाला खरा; परंतु अशा रीतीनें आजपर्यंत जे अनेक महान् महान् पराक्रमी विजयी पुरुष झाले, त्यांतील बहुतेकांस दुष्ट म्हटलें पाहिजे. कारण केवल महत्वाकांक्षा पूरणार्थ प्रवृत्त होऊन लाखों मनुष्यांचा संहार करणारे त्यांत पुष्कळ सांपडतील. **नापोलियन** यापेक्षां त्यांच्या हातून थोड्या मनुष्यांचा वध झाला असला तरी त्यांचें मन **नापोलियन** यापेक्षां चांगलें ह्या गोष्टीस कारण असें म्हणतां येत नाहीं. यासारखाच त्यांस प्रसंग आला असता तर तेही असे झाले नसते कशावरून ? हल्लीं पृथ्वीवर जीं राजघराणीं आहेत, त्या सर्वांच्या पूर्वजांनीं न्याय्यरीतीनेंच राज्य मिळविलें आहे काय ? मोठमोठ्या लढाया करून कायदेशीर राजास गादीवरून हांकून देऊन आपणच राजे झाले अशीं राज्यें आज पृथ्वीच्या पाठीवर किती असतील ? बळी तो कान पिळी हा अतिदुष्ट नियम परमेश्वरकृपेनें जगांतून केव्हां नाहींसा होईल तो होवो. अद्यापपर्यंत तर तो अपवादास आपल्यापुढें टिकूं देत नाहीं.

वरील लिहिण्याचा हेतु **नापोलियन** याच्या दोषांवर पांघरूण घालण्याचा नव्हे. परंतु त्यास एकटाच खड्यासारखा न निवडितां आजपर्यंत जे थोड्या बहुत अंशानें त्यासारखे झाले, त्यांच्या मालेतील मेरुस्थान त्यास द्यावें एवढाच आहे. वास्तविक पाहतां लढाई ही गोष्ट मनुष्यजातीस मोठी लज्जास्पद आहे. आजपर्यंत अनेक धर्मांच्या कांहीं कांहीं गोष्टींनीं मनुष्याचे जे फायदे केले आहेत, त्यापैकींच गुलामगिरी अथवा मनुष्यविक्रय याचा समूल नाश ही गोष्ट होय. या गोष्टीचें श्रेय ख्रिस्ती धर्मास आहे. ज्या धर्माच्या योगानें ह्या गोष्टीचें निसंतान व्हावयाचें होतें त्यास अनुसरणाऱ्या लोकांतच मनुष्यविक्रय हें कुकर्म अतिनीच गर्हणीय स्थितीस जाऊन पोहोंचलें होतें. परंतु त्यांतच ईशसत्तेनें मनुष्यास मनुष्यानें विकणें हें मनुष्यत्वास

केलेंक लावणारें धर्मबाह्य कृत्य होय, अशी कित्येक सज्जनांस प्रेरणा झाली, तेव्हां त्यांनीं संकटें वं हाल सोसून दास्यरूप फार मा-जलेल्या विषवृक्षांच्या मुळास अग्नि लावून त्याचें भस्म केलें. त्या-प्रमाणेंच या युद्धरूप विषवल्लीच्या मुळ्या उपटण्यास कोणास तरी परमेश्वर प्रेरणा करील असा सुदीन येईल काय ? शत्रु आपल्या आं-गावर आल्यावर त्याचा नाश करणें ही गोष्ट सर्वांशीं न्याय्य आहे तरी, कोणत्या तरी कारणानें मोठ मोठे समाज दोहोंकडे होऊन रक्त-पात होणें हें मनुष्यत्वास कलंक आणणारें मनुष्यविक्रयापेक्षांही अति-नीच कृत्य नव्हे काय ? शेजाऱ्याचें शेत घेण्याकरितां त्याचा नाश कोर्णी केला, असें ऐकिलें तर मनुष्यांच्या अंगास शाहारे येतात, परंतु एका राजानें दुसऱ्या राजाचा प्रांत घेण्याकरितां लढाई केली, असें ऐकून मनुष्यें खेदविव्हल होत नाहींत, हें आश्चर्य नव्हे काय ? इतकें खरें आहे कीं, इतर गोष्टींत सुधारणा होऊन मनुष्यांचें अज्ञान नष्ट होत चाललें आहे, त्या मानानें लढाईच्या कामांतही पुष्कळ सुधारणा झाली आहे. पूर्वापेक्षां लढायाही फार कमी होतात. आणि त्याही पूर्वीप्रमाणें भयंकर होत नाहींत. असो.

नापोलियन याचे दोष क्षणभर मनांत न आणितां गुणांचाच विचार केला तर त्यांपासून जगास व **युरोपखंडास** पुष्कळ फायदे झाले आहेत. त्यानें युद्धकलेंत फार सुधारणा केली. एक विद्वान् ग्रंथकार असें म्हणतो कीं, युद्धकलेच्या कामांत **नापोलियन** याज-पासून शिकलेल्या गोष्टींनीं जो शहाणपणा प्राप्त झाला, त्याच्याच योगानें शेवटीं त्याचा लोकांनीं नाश केला. **फ्रेंच** लोक अगदीं विघ-डून गेले होते त्यांस **नापोलियन** यानें ताळ्यावर आणिलें. अर्वा-चीन शास्त्रें व कलाकौशल्य यांच्या सुधारणेस त्यानें उत्तेजन दिलें. कायद्यांची सुधारणा केली. या गोष्टींनीं **नापोलियन** याचें नांव **फ्रेंच** लोकांत अद्याप अप्रिय झालें नाहीं. **नापोलियन** वैभवापा-सून च्युत झाला तेव्हां **फ्रेंच** लोकांस विशेष वाईट वाटलें नाहीं, तरी त्याचें नांव **फ्रान्स** देशांत द्वेष्य नाहीं, इतकेंच नाहीं, तर उलटें पूज्य

आहे, असें मानण्यास पुष्कळ कारणें आहेत. सन १८४० या वर्षीं सप्टंबर महिन्यांत **फ्रान्स** देशांतील मोठमोठ्या लोकांनीं खटपट करून **इंग्लिश** सरकारची परवानगी घेऊन **नापोलियन** याचें पुरलेलें प्रेत उकरून स्वदेशीं आणून मोठ्या राजकीय थाटामाटानें मृत्युपत्रांत त्यानें लिहिल्याप्रमाणें **सीन** नदीच्या कांठीं पुरिलें. त्याचा पुतळा करून प्रसिद्ध ठिकाणीं ठेविला. पुढें त्याच्या पुतण्यास सर्वानुमतें **फ्रान्स** देशाची गादी मिळून तिसरा **नापोलियन** यानांवानें त्यानें कांहीं दिवस चांगलें राज्य केलें. या सर्व गोष्टी **नापोलियन** याविषयीं **फ्रेंच** लोकांच्या मनांत प्रेम असल्याशिवाय कशा होतील ?

नापोलियन याच्या सर्व दुर्गुणांत महत्वाकांक्षा हा मुख्य होय. या दुर्गुणामुळें त्याच्या सर्व गुणांवर पाणी पडलें; आणि त्याच्या बुद्धिमत्तेचा व इतर गुणांचा लोकांस व्हावा तसा उपयोग नव्हतां त्याचाही सर्वस्वीं नाश झाला. त्याची स्वतःची व्यवस्था वाचकांस सर्व कळली. आपल्या कुटुंबाच्या महत्वाकरितां जो त्यानें एवढा मोठा उपद्व्याप केला, तोही व्यर्थ गेला. पहिल्या बायकोची व्यवस्था मागें आलीच आहे. दुसऱ्या बायकोपासून जो त्यास मुलगा झाला, त्यास त्यानें **रोमचा** राजा हें नांव दिलें होतें हें पूर्वी सांगितलेच आहे. आपणास नाहीं तर आपल्या मुलास तरी **फ्रान्सची** गादी मिळावी अशी **नापोलियन** यानें खटपट केली ती फुकट गेली. **नापोलियन एल्बा** बेटांत गेला तेव्हां हा मुलगा आईबरोबर आजोळीं गेला, तो शेवटपर्यंत तेथेंच होता. **आस्त्रिया**च्या बादशाहानें त्याच्या विद्याभ्यासाची वगैरे तजवीज चांगली केली होती. हा मुलगा ही स्वभावानें फार चांगला व मनानें उदार असा होता; परंतु विसाव्या वर्षींच क्षयरोग लागून त्याचा शेवट झाला. **नापोलियन** याची दुसरी बायकोही आपल्या पदरच्याच दुसऱ्या एका मनुष्याशीं पुनर्विवाह करून साधारण मनुष्याप्रमाणेंच अप्रसिद्धपणें रहात होती. स्वतः **युरोप** खंडांतील मोठ्या बादशाहाची कन्या, आणि सर्व **युरोप**खंड जिंकणाऱ्या **नापोलियन**ासारख्या विजयी पुरुषाची पट्टराणी,

असून भर्त्याचें वैभव नष्ट होऊन माहेरीं राहूं लागल्यावर आपल्या महत्वास विसरून या बाईनें यःकश्चित् मनुष्याबरोबर पुनर्विवाह केला, ही गोष्ट आश्चर्यकारक आहे. याप्रमाणें **नापोलियन** याचा व ज्यांवर त्याची अत्यंत प्रीति होती व आपलें नाहीं तर त्यांचें तरी वैभव रहावें असें तो इच्छित होता, त्यांचा नाश झाला. महत्वाकांक्षेमुळें घडलेल्या पातकाचें आणखी काय फल पाहिजे ? ज्याची इच्छा होती तें महत्व तर गेलेंच परंतु तें प्राप्त करण्याकरितां केलेल्या कर्माचें प्रायश्चित भोगावें लागलें.

पुढल्यास ठेंच आणि मागला सावध अशी म्हण आहे, त्याप्रमाणें जगांत कोणतीही चांगली किंवा वाईट गोष्ट झाली तर लक्ष लावून विचार करणारास तीपासून कांहीं तरी नवीन ज्ञान प्राप्त होतेंच. **फ्रान्स** देशांतील राज्यक्रांति आणि **नापोलियन बोनापार्ता**ची महत्वाकांक्षा या दोन्ही गोष्टीं पासून **युरोपखंडां**तील राजे व प्रधान यांस मोठा उपयोग झाला. राज्य केवढेंही असो, परंतु लोकांच्या कल्याणाकडे लक्ष न देतां पाहिजे त्या रीतीनें राजा वागूं लागल्यास कांहीं दिवस प्रजेनें सोसून घेतलें तरी शेवटीं त्रासून त्याचा नाश करण्यास प्रवृत्त झाल्याशिवाय लोक राहत नाहींत; हें मनांत आणून **युरोपां**तील राजे पूर्वापेक्षां हल्लीं लोककल्याणाकडे अधिक लक्ष देऊं लागले. व प्रजा संतुष्ट असली तर आपल्या वैभवाची स्थिरता कायम राहील असें त्यांस वाटूं लागलें. त्याचप्रमाणें लोकांसही वाटूं लागलें कीं, देश, काल, वर्तमान, यांकडे लक्ष देऊन कोणत्या गोष्टी बदलण्याच्या किंवा मोडून टाकण्याची वेळ आली आहे असें न पाहतां, केवळ तर्कशास्त्रानें उत्तम ठरलेल्या गोष्टी एकदम प्रवृत्त करण्यास यत्न करूं लागल्यास हातचें सोडून पळत्याच्यामागें लागणाऱ्या मनुष्याप्रमाणें नवें हित न होतां आहे तेंसुद्धा नाहींसें होईल. बहुत दिवस चालत आलेल्या गोष्टींत कांहीं वाईटपणा असला तरी तो सावकाश व युक्तीनें काढून टाकण्यास झटलें पाहिजे. नाहीं तर तो काढून टाकण्यास जीं साधनें आपण योजूं तींच प्रतिकूळ होऊन आपला सर्वस्वीं

नाश करतील. ही गोष्ट धर्मांतर, राज्यांतर, वगैरे गोष्टी करण्यास इच्छिणाऱ्यांनीं सतत लक्षांत ठेविली पाहिजे.

फ्रान्स देशांतील राज्यक्रांति आणि **नापोलियन बोनापार्ट** याची महत्वाकांक्षा या दोन्ही प्रलयाग्नीचें एकही किटाळ आपणावर येऊं दिलें नाहीं, असा सर्व **युरोप** खंडांत एक **इंग्लंद** देशमात्र होय. त्या किटाळाचा स्पर्श न झाल्यामुळें **इंग्लिश** लोकांच्या धैर्य, गांभीर्य, दृढनिश्चय, शौर्य, राजनिष्ठा, उत्तम राज्यव्यवस्था, वगैरे गुणांची कीर्ति जगांत पसरून त्यांची सत्ता वाढत चालली. व हे गुण त्यांमध्यें आहेत तोंपर्यंत ती अशीच वृद्धिंगत होईल यांत संशय नाहीं.

समाप्त.